म. ग्रं. सं. ठाणें.
विषय इतिहास
वा. नं. ५७७

सुवर्णमहोत्सवार्थ

# जागृत सातारा

वंदे मातरं



पु. पां. गोखले

# जागृत सातारा.

[ १८४८ ते १९३५ चें राष्ट्रीय समालोचन ]

" कांग्रेसशीं एकनिष्ठपणानें वागत जा म्हणजे गरीब शेतकरी व मजूर यांचे दुःखनिवाणार्थ ती उपयोगी पडेल हें मी खात्रीनें सांगतों. " ए. ओ. ह्यूम [ वाळवे छोटी कॉंग्रेस. ]

लेखकः-श्री. पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, कराड.

४५३

[ सर्व हक्क लेखकानें राखून ठेवले आहेत. ]

कांग्रेस महोत्सव ] १९३५ [ २८ डिसेंबर

किंमत १ रुपया

# या पुस्तकांचे आधार.

१ केसरी, नवाकाळ, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, टाइम्स, शुभसूचक, महाराष्ट्रमित्र, प्रकाश, ऐक्य, शाहू, समर्थ, भारतमाता, विद्याविलास, वृत्तसार, अभ्युदय, विदूषक, इत्यादि नियतकालिकें.

२ लो० टिळक चरित्र (केळकर-कृत), स्थानिक स्वराज्य संस्थांचे अहवाल, जिल्हासभेचें जुने दप्तर, जिल्हा-प्रांतिक—सभांचे अहवाल, सत्यसमाज-हीरक-महोत्सव-ग्रंथ, कायदेमंडळांतलि कामांचे काळे—करंदीकरांचें अहवाल, प्रतापसिंह महाराज (राणेकृत), श्रीशाहू महाराज (लठ्ठेकृत), दादासाहेब करंदीकरांच्या व रामभाऊ कुलकर्णी (तासगांव) यांच्या रोजनिशा, वाई सार्वजनिक सभेचें दप्तर वगैरे.

३ नाथ घाणेकर, भाऊसाहेब सोमण, न. गं. जोशी नानासाहेब देशपांडे, गणेश अंताजी जोशी, रामभाऊ कुलकर्णी (तासगांव), डॉ. आठल्ये, ना. जाधव, डॉ. शेणोलीकर यांच्या मुलाखती. 4 Story of Satara, How India wrought for Freedom.

५ न्यायाधीश छापखान्याचे व आनंद छापखान्याचे दक्ष मालक, अनुक्रमें श्री. विष्णुपंत दवळे व बाबूराव वैद्य यांची तत्परता व मजबद्दलची आपुलकी.

माहिती घेऊन व तिचा धावता का होईना अभ्यास करून अवघ्या साडेतीन महिन्यांत ३०० पानांच्या ग्रंथाची ही सेवा मी वरील आधाराशिवाय करूंच शकलों नसतों; म्हणून त्या सर्वांना कृतज्ञतापूर्वक मी अभिवादन करतों.

—लेखक

करतां जन्मास
नेंबरच्या २८
हिंदुस्थानची
त लिहिला
मीअधिक
ें उचित
ामाचे

भारताच्या अभ्युदयासाठी

आपलें नांवही न निघावें इतक्या
निरपेक्ष त्यागभूमीवरून
एकनिष्ट सेवा करणाऱ्या
सातारा जिल्ह्यांतील

## सर्व ज्ञाताज्ञात देशभक्तांस

सदर पुस्तक

## सादर समर्पण

ग्रंथकर्ता.

लेखकानें स्थूल
खालसा झाल्यापासून इ.
दिपलेल्या प्रजाजनांची राजकीय काम.

# प्रस्तावना.

हिंदी राष्ट्राच्या आकांक्षांना चालना देण्याकरतां जन्मास आलेल्या राष्ट्रीयसभेचा सुवर्णमहोत्सव येत्या डिसेंबरच्या २८ तारखेस सर्व देशभर साजरा होणार आहे. या प्रसंगानें हिंदुस्थानची राजकीय क्षेत्रांत कशी प्रगती होत गेली याचा इतिहास लिहिला जाणार असून देशांतील निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या कमीअधिक कामगिरीचाही या इतिहासांत उल्लेख होईल व व्हावा हें उचित दिसतें. सातारा जिल्ह्यापुरताच विचार केला तर या इतिहासाचे लेखक श्री. बाबूराव गोखले यांची असा सर्वांगीण, सर्व पक्षांच्या राजकीय कार्याचा इतिहास लिहिण्याची योजना दिसते. अगदीं अर्जविनंतीच्या काळापासून तों तहत १९३० च्या सत्याग्रह काळापर्यंत व त्यापुढील सत्याग्रह थांबविल्यानंतरचा आजपर्यंतचा-काळ. याचें पर्यालोचन लेखकानें स्थूलमानानें केलेलें आहे. आणि हें करतांना लेखकानें जिल्ह्यांत वर्तमानपत्रद्वारा व खासगी सामुग्री उपलब्ध झाली ती मिळवून तिचा उपयोग यथार्थतेनें केला आहे. लेखकानें हा काळ सुमारें ७५ वर्षांचा घेतला आहे व या काळांत सातारा जिल्ह्यांत जें जें सार्वजनिक स्वरूपाचें राजकीय कार्य झालेलें दिसलें त्याची स्थूल कल्पना वाचकांस करून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. राष्ट्रीय सभेच्या जन्मापूर्वीचा काळ, राष्ट्रीय सभेच्या जन्मानंतर १९०७ पर्यंतचा काळ, १९०७ ते १९२० पर्यंतचा काळ, १९२० ते १९३२ पर्यन्तचा काळ, व १९३२ नंतरचा आजतागायतचा काळ असे या इतिहासाचे मुख्यतः पांच भाग करतां येण्यासारखे आहेत, व या पांच भागांचे क्रमशः लेखकानें स्थूलमानानें विवेचन केलेलें आहे. सातारचें राज्य खालसा झाल्यापासून इंग्रजी अमदानींतील नव्या तेजानें डोळे दिपलेल्या प्रजाजनांची राजकीय कामगिरी ती काय असणार ? परंतु

या काळांतीलही त्यावेळच्या सार्वजनिक हितबुद्धि असणाऱ्या तुरळक व्यक्तींनीं व वृतपत्रकारांनीं आपापल्यापरीनें नवीन राज्य–पद्धतीची गाऱ्हाणीं वेशीवर टांगण्याचा थोडाबहूत प्रयत्न कसा केला, याचें दिग्दर्शन लेखकानें सन १८८५ च्या पूर्वींच्या वृत्त-पत्रांतील उतारे देऊन केलें आहे. सन १८८५ पासून सन १९०७ पर्यन्त त्याकाळचे सातारा जिल्ह्यांतील पुढारी यांनीं तत्कालीन कांग्रेसच्या घोरणास अनुसरून ठिकठिकाणीं जिल्हासभा, तालुका-सभा, वगैरे भरवून सरकारचें कानावर प्रजेचीं गाऱ्हाणीं घातलीं. कांग्रेसच्या इतिहासांत सातारा जिल्ह्याचे जर कांहीं वैशिष्टय असले तर दुसऱ्या कांग्रेसपासून तें अव्याहत १९०७ पर्यन्त सातारा जिल्ह्यांतील पुढाऱ्यांनीं कांग्रेसच्या सभांस हजर राहून कांग्रेसचा संदेश जनतेस पोचविणें हें कार्य मोठ्या निष्ठेनें केलें आहे. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जिल्ह्यांपेक्षां याबाबतींत सातारा जिल्ह्याचा नंबर खालीं निःसंशय लागावयाचा नाहीं. १९०७ सालीं कांग्रेसमध्यें दुफळी होऊन लोकमान्य टिळकांचे नेतृत्वाखालीं नवा पक्ष निर्माण झाला. त्या पक्षाला सातारा जिल्ह्यानेंही बराच पाठिंबा दिला असून पुन्हा कांग्रेसमध्यें दोन्ही पक्षाची एकी घडवून आणण्याचे आपल्यापरीनें कसे अटोकाट प्रयत्न केले याचेंही दिग्दर्शन या इतिहासांत दिसून येणारें आहे. त्या वेळच्या नेमस्त पक्षाला सातारा जिल्ह्यांत अगदींच पाठिंबा नव्हता असें नाहीं. पण सातारा जिल्ह्याची एकीनें काम करण्याची भूमिका असल्यानें या जिल्ह्यांत या दोन पक्षांत विशेष फाटाफूट झाल्याचें दिसून येत नाहीं. उलटपक्षी कै. लोकमान्य टिळक तुरुंगांत असतां सन १९१४ सालीं जी प्रांतिक सभा साताऱ्यास भरली त्या प्रांतिक सभेच्या कार्यांत त्या वेळचे सातारा जिल्ह्या–तील पूज्य नेमस्ताग्रणी कै. राव बहादूर पाठक यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. कांग्रेसची दुफळी झाल्यानंतर महाराष्ट्रांत कांग्रेसचें कार्य अल्पप्रमाणांत कां होईना कोठेंही चालल्याचें

आढळून येत नव्हतें, व अशा निराशामय कालांत देखील सातारा जिल्ह्यानें आपलें जिल्हासभेचें कार्य कै. रा. ब पाठकासारख्या नेमस्त सद्गृहस्थांचें मदतीनें सातत्यानें चालविलें ही गोष्ट या जिल्ह्यास भूषणावहच समजली जात असे.

बंगालच्या फाळणीनंतर नाशिकचे कलेक्टर मि. जाकसन यांचा खून १९०९ सालीं झाला. त्यानंतरच्या दोनचार वर्षांचा काळ सार्वजनिक कार्यकर्त्यांस किती बिकट झाला होता, त्याची कल्पना त्या वेळच्या सार्वजनिक कार्य करणाऱ्या व आज हयात असलेल्या वाचकांना पूर्णपणें असेलच. १९२० च्या पूर्वींच्या काळांतील कौन्सिल निवडणुकीमध्येंही सातारा जिल्ह्याचा कल हा नेहमीं नव्या पक्षाकडे झुकता असे हीही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. सन १९१४ च्या प्रांतिक सभेनें अल्पांशानें कां होईना कांग्रेसमध्यें दोन पक्षांत एकी घडवून आणण्यास मदत केली असे उद्गार कै. लोकमान्यांनीं तुरुंगांतून सुटून आल्यावर चारदोन वेळ तरी काढल्याचें आम्हांस माहित आहे. कै. लोकमान्यांच्या हयातींत नव्या पक्षाचें बीजारोपण सातारा जिल्ह्यांत होऊन त्या पक्षाची वाढ बरीच झपाट्यानें झाल्यामुळें १९२० नंतरच्या असहकार काळांत सातारा जिल्हा इतर ठिकाणच्या मागें राहूं शकला नाहीं. आणि १९३० व १९३२ सालाच्या सत्याग्रह-युद्धांत सातारा जिल्ह्यानें सत्याग्रहींचा पुरवठा इतर कोणत्याही ठिकाणाप्रमाणेंच आपल्या मगदुराप्रमाणें अटोकाट केला असें अभिमानपूर्वक बोलतां येण्यास जर कोणतें एखादें विशिष्ट कारण असेल तर त्याचें श्रेय सातारा जिल्ह्यांतील पूर्वकालीं चालू असलेल्या राजकारणाच्या थोड्याबहुत सातत्यालाच दिलें पाहिजे यांत शंका नाहीं. सत्याग्रह युद्धांत बिळाशी सारखीं प्रकरणें उद्भवली तथापि महात्माजींचें सत्याग्रहांतील जें अमोघ शस्त्र शांति त्या शस्त्राचा आश्रय कोणी सोडला नाहीं हें या जिल्ह्यांतील सत्याग्रही पुढाऱ्यांच्या उपदेशाचें फल होय. सत्याग्रह युद्ध महात्माजींच्या व कांग्रेसच्या अनुज्ञेनें थांबलें आहे

यामुळें १९३० व ३२ या सालचा इतिहास वाचतांना जरी वाचकांच्या मनास उद्वेग वाटला तरी महात्माजींच्या शांतिसूक्ताचा त्याग या जिल्ह्यांत होणें शक्य नसल्यामुळें लेखकानें त्या सत्याग्रह-युद्धाचा इतिहास थोडा विस्तृततेनें देण्यांत कसूर केली नाहीं.

सत्याग्रह युद्ध थांबवून शांततेच्या, सनदशीर मार्गाचाच केवळ अवलंब करून कांग्रेसनें कौन्सिल प्रवेशाची चळवळ हातीं घेतली व या चळवळींतही सातारा जिल्ह्यानें आपली कामगिरी कांग्रेसचे अनुज्ञेप्रमाणें निष्ठिनें बजावली आहे, ही गोष्ट वाचकांचे स्मरणांत असेलच. देशांत जीं जीं राजकीय चळवळ चालेल त्या त्या राजकीय चळवळीस सक्रीय पाठिंवा देण्यास सातारा जिल्हा सदैव तयार होता व आहे या गोष्टीचें प्रत्यंतर या इतिहासावरून सहज मिळण्यासारखें आहे.

सातारा जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांत राजकारणाचे बाबतींत मतभेद नाहींत असें नाहीं. अगदीं नेमस्तपक्षांपासून तों नव्या उदय पावलेल्या समाजसत्तावादी पक्षापर्यन्त प्रत्येक पक्षास थोंडे-बहुत अनुयायी या जिल्ह्यांत आहेत. तथापि सामान्यपणें बोला-वयाचें झाल्यास राष्ट्रीयसभेच्या अनुयायांचा व हाच या जिल्ह्यांत बहुसंख्य आहे. असें असूनही नेमस्त, प्रतिसहकार-वादी, निष्ठावंत कांग्रेसवाले व समाजसत्तावादी या सर्व पक्षांची एकीनें काम करण्याची सातारा जिल्ह्यांतील भूमिका उज्वल आहे असें स्वाभिमानपूर्वक म्हणतां येईल, व हीच ऐक्यानें काम करण्याची प्रथा यापुढेंही चालू राहिल्यास सातारा जिल्हा महाराष्ट्रांतील इतर कोणत्याही जिल्ह्याच्या मागें राहू शकणार नाहीं. सातारा जिल्ह्याचें हल्लींचें आशामय वातावरण निर्माण करण्याचें सर्व श्रेय सातारा जिल्ह्यांतील विद्यमान व दिवंगत वृद्ध पिढीकडे आहे हें विसरून चालावयाचें नाहीं.

या इतिहासाचे लेखक श्री. गोखले यांनीं हल्लींच्या इतिहासास सामुग्री गोळा करण्यांत किती परिश्रम घेतलें आहेत व

त्यांना त्या कार्यासाठीं किती वृद्धतरुण कार्यकर्त्यांच्या गांठी घ्याव्या लागल्या व जिल्ह्यांतील जुनें लिखाण मिळवून त्यांतून योग्य ती माहिती घ्यावी लागली याची जाणीव आम्हांस आहे. श्री. गोखले हे जिल्ह्यांतील तरूण पिढीतील एक उत्साही कार्यकर्ते आहेत. त्यांची राष्ट्रसभेबद्दलची निष्ठा उच्च प्रकारची आहे. शांतियुक्त राजकारणावर त्यांचा अढळ विश्वास आहे हें माहीत असल्यामुळेंच त्यांच्या सांगण्यावरून त्यांच्या पुस्तकास ही प्रस्तावना लिहीण्याचें मी कबूल केलें. सदर्हु इतिहास लिहितांना जुनी माहिती मिळवण्यास जो त्रास पडतो तो लक्षांत घेतां या इतिहासांत किरकोळ चुकाही असण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें लेखक हे स्वतां कार्यकर्त्यापैकीं एक असल्यामुळें उत्साहभरांत त्यांच्या लेखनांत क्वचित् प्रसंगीं कठोरपणाही असल्याचा भास होणें संभवनीय आहे. तथापि हा इतिहास लिहीतांना आपल्या जिल्ह्याचें चित्र यथातथ्य रेखाटण्याची त्यांची सदिच्छा ही लक्षांत घेतली असतां वाचकांनीं त्यांच्या इतिहास-लेखनाकडे सहृदयतेनें पहावें अशी वाचकास विनंति करणें मला युक्त वाटतें. सदर इतिहासांतील कांहीं चुका अथवा विपर्यस्त कांहीं भाग असल्यास व तो कोणीं लेखकाच्या नजरेस आणून दिल्यास त्याची दुरुस्ती दुसऱ्या आवृत्तींत लेखक अवश्य करतील यांत शंका नाहीं.

**रा. ग. सोमण.**

सातारा.

ता. १७-१२-३५

---

# जागृत सातारा

## नजर--भेट

### भाग १ ला (पृष्ठें १ तें १६८)

प्रकरण १ लें:--राजदर्शन—वडिलांची कीर्ति ही पार्श्वभूमि १ साताऱ्चें राज्य खालसा २ रंगोबापूजींची विलायतेंत शिष्ठाई ४ आबासाहेबांची योग्यता ५ साताऱच्या राज्यघराण्यावरील प्रसंग ...."ताटाबरोबर कांठही गेला ६--७ छत्रपती घराण्याबद्दल आदर ८ साताऱचें राजघराणें ९

प्रकरण २ रें:—जुन्यांतून नव्याकडे--शिवाजी महाराजांबद्दल आदर १०--११ इंग्रजीराज्य ईश्वरी प्रसाद असा १२--१३ दादाभाई नौरोजी -- न्यायमूर्ति रानडे प्रभृति महाभागांच्या मनाची ग्वाहि १४ सातारा जिल्ह्याची ' न धरी शस्त्र करीं मी ' ही वृत्ति १५

प्रकरण ३ रें:-- सार्वजनिक सभा – जिल्ह्याच्या राजकीय आयुष्याचा लोकसंमत प्रारंभकाळ. १६ सार्वजनिक सभांची स्थापना १८ राजकीयबाब मुख्य धरून इतर गाऱ्हाण्यांचा शेवट लावून घेण्याकडे प्रवृत्ति १९. १८७७ च्या जानेवारीचे पहिल्या तारखेस व्हिक्टोरिया राणीच्या दरबारानिमित्तानें केलेल्या मागण्या २० स्थानिक स्वराज्याची चळवळ २२. शेतकरी--कर्ज-मुक्तीच्या कायद्याचा फायदा घेण्याविषयीं प्रयत्न २३ होऊं घातलेल्या राष्ट्रीय सभेनें काय मागणी करावी २५.

प्रकरण ४ थें:- छोटी कांग्रेस- राष्ट्रीय सभेचें एकनिष्ठ वारकरी २५. इंग्रजी राज्याचें नागमोडी वळण २७ " राष्ट्रीय सभेचें कार्याला मदत करूं नका " असा सरकारी हुकूम २८. राष्ट्रीयसभेचें वजन जिल्ह्यांत वाढविण्याची खटपट, छोट्या कांग्रेसचीं स्थापना २९ शिराळ्याची छोटी कांग्रेस ३० इसलामपूर-बोरगांवची छोटी

कांग्रेस ३१. वाळव्याची ह्यूम-टिळक-गोखले हजर असलेली छोटी कांग्रेस, वाईची छोटी कांग्रेस ३५ जिल्हासभेचा उपक्रम, राष्ट्रीय सभेला आमंत्रण, ३६

प्रकरण ५ वें :— छोट्या कांग्रेसच्या सुमारासचः--लोकांच्या अंगीं कलेक्टरास नोटीस देण्यापर्यंत धीटपणा आला. कऱ्हाड-पाटण तालुक्यांतील शेतकरी कलेक्टरचे बंगल्यावर ३८ हिंदुमुसलमानांचें प्रेम ३९ ह्मैसाळकरांच्या सर्कस तंबूंत १८९५ चे कांग्रेसकरतां प्रतिनिधी निवडण्यासाठीं जिल्हयाची सभा ४१

प्रकरण ६ वें:--स्वावलंबनाची वळणें:--स्वावलंबनाची शिडी उभारली पाहिजे ही घोषणा इसलामपूरास झाली. रामभाऊ कुलकर्ण्यांनीं कुलकर्णीपण सोडलें ४३ शेतसाऱ्याची गैरशिस्त वसुली व लोकांचा संघटित प्रतिकार ४४ मुम्बई सरकारचें लँड रेव्हेन्यू बिल व म्युनिसिपल बिलांतील पिछेहाटीचे फ़ेरफार ४५ प्लेगचा जुलूम व केळकर मामलेदारांची माफी ४६ रमेशचंद्र दत्तांचें उद्बोधन ४७ स्वदेशी चळवळ व प्रदर्शन, आणि दादासाहेब करन्दीकरांचे प्रयत्न व झीज ४८ बंगालला सहानुभूति व कळंबे मास्तरांचें उग्रतेज ४९ शेतकरी म्हणजे जिल्हयाचा प्राण. त्यांच्यासाठीं शेतकरी सभांची स्थापना ५०

प्रकरण ७ वें:-शेतकरी सभा व स्वदेशी—जावली तालुका शेतकी सभेचें अभिनंदनीय कार्य ५३ कसबे कुडाळची तपशीलवार माहिती ५४ कऱ्हाडचें शेतकी प्रदर्शन ५६ जिल्हासभेची स्थापना राष्ट्रीय सभेच्या सेवेसाठीं झाली ५७ स्वदेशीच्या प्रचारासाठीं लोकमान्य टिळक व काळकर्ते परांजपे यांची कऱ्हाडास व्याख्यानें ५८ साताऱ्यास स्वदेशी कंपनी व आणासाहेब चिरमुल्यांचें नेतृत्व; पैसाफंड ५९ कऱ्हाडची मॅचफॅक्टरी ६०

प्रकरण ८ वें– ऐक्यवृत्तीचें संरक्षण– स्वदेशी चळवळीमुळें उद्भवलेल्या दहशतशाहींतही लोकांनीं दाखविलेलें तेज ६२. तालुका सभांचा उपक्रम ६३. डॉ. भिड्यांच्या अध्यक्षतेखालीं खटावतालुका

सभा ६४ मवाळ-जहालांच्या एकीबद्दल सातारा जिल्हयाचा अट्टाहास ६५

प्रकरण ९ वें :— स्वराज्यसंघ आणि सहकार— १९०८ ते १९१३ तील जिल्हयाची नंदादीपाची वृत्ति ६७. १९१४ चे मद्रास कांग्रेसमध्यें आप्पासाहेब आळतेकर व भाऊसाहेब सोमण यांचे राष्ट्रीय सभेंतील तडजोडीचा प्रयत्न व जिल्हासभा-तालुकासभा यांच्या साखळीनें राष्ट्रीय सभेच्या कार्याची अखंड साखळी जोडण्याची खटपट ६८ होमरूल लीगची चळवळ ६९ स्वराज्यव द्यांवर विलिंग्डनसाहेबानीं घेतलेल्या आक्षेपांचा निषेध ७२ तहपरिषदेंत हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून लोकमान्यांना घ्यावे म्हणून मागणी ७३ 'स्वराज्या'साठीं हसबनीसांनीं मिळकत दिली ७४ सहकारी चळवळीचा प्रसार ७५

प्रकरण १० वें:— मित्रप्रवरि-प्रागतिकांचें गुणग्रहण ७८ रा. ब. काळयांची स्वतंत्र कामगिरी ७९ न्या. रानडयांची पुण्यतिथी ८० माणूसकीच्या हक्कासाठीं सत्यसमाज ८१ जवळकरांचें सामने व शहाणपण ८२ ऐक्याबद्दल दक्षता ८३

प्रकरण ११ वें:— असहकाराचा ऐनभर—महात्मा गांधींचा असहकारासाठीं दौरा ८४ असहकाराचें आचरण व टिळकस्वराज्य फंड ८५ मुळशी सत्याग्रह व राष्ट्रीयसप्ताह ८६ खादीचा प्रसार व कऱ्हाडची दसरा मिरवणूक ८७ दारूवरील निरोधन, भास्कर विले यांचे पराक्रम, युवराजांच्या आगमनावरील बहिष्कार ८८. तासगांव तालुक्यांतील ग्रामसंघटन ८९ खटावचे रजिस्ट्रारप्रकरण व उडाणटप्पूचे खटले ९० कायदेमंडळावरील बहिष्काराविरुद्ध मतप्रदर्शन ९१ कोयनाधरणाची माहिती शेतकऱ्यांना देण्यासाठीं फिरती ९२ वाईतालुक्यांत खादीप्रसार, काकाराव पंडित व येळगावकरांचें इनाम जप्त ९३

प्रकरण १२ वें:—उतरण—राजकारणांत बहात्तर रोगांवर एकच औषध सांपडलें नाहीं ९४ स्वराज्यपक्षातर्फे सोमणांची निवडणूक आणि कौन्सिलांतील लढा. ९५

प्रकरण १३ वें:--बहुरंगी तीन वर्षे--'खादी हेंच स्वदेशीचें शुद्ध स्वरूप' म्हणून महात्माजींचा दौरा ९७ परचुरेशास्त्र्यांच्या 'खेडयांतील यात्रा' ९८ सातारातालुका खेडकरी परिषद् ९९ तुकडेपट्टीबिलासंबंधीं नानासाहेब देशपांडे-शिराळकर-सोमण-घाणेकरांचे दौरे १०० तुकडेपट्टीबिलाचे सार्वत्रिक निषेध १०६ इसलामपूर येथील जिल्हा शेतकरी परिषद् १०७ दारूबाबत जिल्हा 'कोरडा' करण्याबद्दल मागणी १०८ कोयना धरणाचा प्रश्न धसाला लागला १०९ चवथी राष्ट्रीय शिक्षण परिषद १११ राष्ट्रपति अय्यंगार यांचा दौरा व हिंदुस्थानी सेवादलाचा उपक्रम ११२ सेवादलाचें शिबीर ११३ सायमन सप्तकाच्या स्वागताचा बहिष्कार ११४ बारडोलीच्या शेतकऱ्यांचें अभिनंदन व नेहरूरिपोर्टाचा प्रचार ११५ स्वातंत्र्याची तुतारी ११६

प्रकरण १४ वें:—जिल्ह्यांतील शांतिसंग्राम — प्राज्ञपाठशाळा व टिळक राष्ट्रीय विद्यालय यांनीं कस दाखविला ११८ कायदे-भंगाच्या स्वयंसेवकांचें शिबीर व कायदेभंगाचा प्रचार ११९ स्वयंसेवकांना लोकांचें अनाहूत सहाय्य १२१ कायदेभंगाचें माणूसबळ व द्रव्यबळ १२२ झेंडा प्रकरणें १२३ जंगल सत्याग्रहाचा श्रीकार १२६ मसूर-तारळें मद्यपाननिरोधन व जुलूमशाहीबद्दलचा वीट १२७ सातारा व कराड येथील गव्हर्नरसाहेबांचें काळ्या निशाणांनीं स्वागत १२८ मिठाचे व अन्य सत्याग्रह १३१ बेकायदशीर संस्था आणि बत्तीस ठिकाणचा एकवट जंगल सत्याग्रह १३२ विशिष्ट दिन आणि स्वदेशी बहिष्कार सप्ताह १३३.

प्रकरण १५ वें:- बिळाशी भागांत- रामेश्वराचें देवळांत राष्ट्रीय झेंडा १३५. बंकर्टसिंगाचा 'बिळाशीला बंड' झाल्याचा रिपोर्ट, कारण घोडयाला गवतही मिळालें नाहीं. १३६ किचनेर पलटणीचे पराक्रम १३७ रामेश्वराचे देवळावर स्वारी व राजू कदमचा पराक्रम १३८ गोळीबाराला मुलें बळी, डॉ. कोल्हटकरांचा

रिपोर्ट १३९ बिळाशीकरांचे सांत्वन व टाईम्सचा खोडसाळपणा.

प्रकरण १६ वें:--स्वाभिमान संरक्षणार्थ—मिठागरावरील जिल्ह्यांतील लोकांची कामगिरी १४२ सेनापति बापटांना प्रांतिक कांग्रेसकमेटीचे अध्यक्ष करा १४५ महर्षि बापटांचा दौरा १४६ सातारला साष्टांगनमस्कार-- अनुष्ठान व इसलामपूरचा बहिष्कारसप्ताह, प. मालवीयांचा दौरा १४६ कराचीच्या 'स्वराज्याचे ठरावाचा प्रचार', व बोरगांवची शेतकरी परिषद १४८ पांचगणीचें झेंडाप्रकरण, प. जवाहिरलाल व सुभाषचंद्र बोस यांचे दौरे १४९ फर्मानी कायद्यान्वयें पुढाऱ्यांची डेटेन्यू म्हणून उचलबांगडी १५१ जिल्ह्यांतील सर्वाधिकारी व स्त्रिया १५२ हजेरीच्या नोटीसा १५३ राजवाड्यापुढील जिल्हासभा, गव्हर्नरसाहेबांचे काळ्या निशाणानें स्वागत १५४ जंगलसत्याग्रह, तुरुंगवासाचे बळी १५५ कायदेभंग बंद पण नोकरशाहीचा खेळ १५६

प्रकरण १७ वें:— पाठी मागील जमणूकः—राष्ट्रीय सभेचा उत्सव, पूर्ण स्वराज्यदिन १५८ संयुक्त मतदार संघ व हरिजनांला राखीव जागा, खादीपैदाशीची योजना, आजन्मसेवक-संस्थेची वाटाघाट १६० शेतकीसंघ १६१ एकसळचा शेतकरी-सेवा-संघ, शेतकरी परिषदा १६२ महात्माजींचा उपवास, हरिजन-सेवा १६३ नाठवड्याचें ग्रामोन्नति-कार्यालय-समाजसत्तावादाकडे तरुणांचा कल, सरकारी मापानें राष्ट्रीय सभेवरील निष्ठा १६५ राष्ट्रपति राजेंद्र बाबूंचा दौरा व संदेश १६६ ते १६८

## भाग २ रा ( पृष्ठें १ ते ५८)

प्रकरण १ लें:—राजकारणी वृत्तपत्रें:— जिल्ह्याचें प्रतिबिंब दाखविणारीं पत्रें १, १८५८ ते १९३४ निघालेलीं वृत्तपत्रें २ वृत्तपत्रांच्या कामगिरीचें सामान्य स्वरूप ४ कायद्याच्या परिसीमेवर "तारेवरील नाच" ६ मोदवृत्तावरील खटला ८. प्रतोदवरील खटले, ९ प्रकाशवरील सरकारी अवकृपा ११ वृत्तपत्रांचीं सजावट. १२

प्रकरण २ रें:- सार्वजनिक खटले - वाई तालुक्यावर जादा पोलिस. १४ वाई येथील 'द्वाराचा' खटला १५ कऱ्हाड धान्यलूट १८ कोरेगांवच्या गुरव मास्तरवर पिकेटिंगचा खटला. २१ औंध येथील बाँबचा खटला २२. फणसळकरांचे घरीं बॉम्ब २५. उडतरें प्रकरण २६ देऊर प्रकरण २८ पिकेटिंगचे खटले व डोमिगोसाहेबास सोमणांचें आव्हान ३० जमानतीचे खटले व गणपतराव साठे यांचें बाणेदार उदाहरण ३१. बिळाशी बंड ३३ कऱ्हाड येथील काळ्या निशाणाचा 'तीन तेरांचा' खटला. ३५ बेकायदेशीर संस्थानच्या सभासदांवरील खटला ३७ साठे वकीलांची टोपी, कुलकर्णी---गाडगीळांची हद्दपारी, अन्याय्य खटल्याचा नमुना ३८

प्रकरण ३ रें:--राष्ट्रीयसभेंत:--साताऱ्यास राष्ट्रीयसभेला आमंत्रण ४० दादासाहेब करदीकर, आगाशे व फणसळकरांची राष्ट्रीयसभेतील कामगिरी ४१ बळवंतराव सहस्रबुद्धे, आप्पासाहेब आळतेकर यांचे काम ४२ जिल्ह्याची राष्ट्रीयसभेविषयीं निष्ठा ४३

प्रकरण ४ थें:--प्रांतिक परिषदांतून:--चवथ्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष गोविंद्रराव लिमये ४४ सँढर्स्टच्या कारभारावरील मतभेदानें पडणारी फूट न होऊं देणारी १९०० ची प्रांतिक परिषद ४६ मवाळजहालांच्या एकीचे गणेश व्यंकटेश जोशी मध्यस्थ घालून प्रयत्न ४९ मवाळ---जहालांच्या एकीचा पाया घालणारी सन १९१४ ची प्रांतिक परिषद ५१ पुणें, सोलापूर, पेण येथील कामगिरी ५४ फेर--नाफेर वाल्यांच्या समेटानें लोकमान्यांच्या मार्गावर येणारी १९२५ ची प्रांतिक परिषद ५६.

## भाग ३ रा. [पृष्ठें १ ते ४४]

प्रकरण १ लें:— जिल्हासभा:— स्थापना २ जिल्हासभेचीं स्वरूपें व कार्यपद्धति ३ गणेश व्यंकटेश जोशांचे कौतुकपूर्ण आशीर्वाद ५ कांग्रेसनिशाणाखालीच पण कौन्सिलबहिष्कार मान्य नसल्यामुळें लांबलेलें अधिवेशन ७ शहरांतून खेड्यांत जिल्हासभा गेली व

कारण त्यासालींच सातारचें राज्य खालसा नाहीं कां झालें? सातारचे त्यावेळचे राजे श्रीमत् छत्रपति शहाजी महाराज वारले आणि त्यांना औरस संतति नसल्यामुळें त्यांनीं विधिपूर्वक दत्तक घेतलेला आणि रेसिडेंटनें मान्यता दिलेला मुलगा व्यंकोजी हाच शहाजीच्या गादीचा वारस होता. पण रेसिडेंट आणि जनता यांचें हें मत गव्हर्नर जनरल डलहौसी यांस पटलें नाहीं. १८१८ त पेशव्यांचें राज्य खलसा करतेवेळीं प्रतापसिंह महाराज इंग्रजांच्या हातीं येऊन त्यांना सातारचें राज्य देतांना ता. २५ सप्टेंबर १८१९ रोजीं जो चौदा पेव्यांच्या संस्थानाचा अकराकलमी तह केला त्यांत तें राज्य छत्रपतींच्या "Sons, heirs and successors" (British India by R. W. Fraser) फरजंद व वारिस व कायम मुकाम, यांच्याकडे चालविलें जाईल असे शद्ब होते. डलहौसीच्या मतें "वारिस" हा शद्ब फक्त औरस संततीलाच लागू करावयाचा असल्याकारणानें ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांनीं त्याला अनुमति देतांच सातारचें राज्य खालसा झालें!!

औरस संततीच्या पोकळ सबबीवर सातारचें राज्य खालसा झालें हा छत्रपतींच्या व स्वराज्याच्या अभिमान्यांना धक्का होता. ता. ५ सप्टेंबर १८३९ रोजीं प्रतापसिंह महाराजांना पदच्युत केलें त्यावेळेसच वास्तविक सातारची गादी खालसा झाली होती. कारण त्यांच्या गादीवर बसलेले त्यांचे बंधु आप्पासाहेब हे रेसिडेंटच्या हातातील केवळ एक बाहुलें होतें. १८३६ मध्यें कांहीं लोकांच्या कारवाईमुळें इंग्रजाविरुद्ध प्रतापसिंह कट करात असल्याचा संशय आल्यावरून रेसिडेंट कर्नल लॉडविक प्रभृतींचें गुप्त चौकशीकमिशन् बसलें आणि

त्याच्या निर्णयानुसार, सुमारें २१ वर्षें प्रजाहितदक्षतेनें, व इंग्रजांनींदेखील विलायतेहून रत्नजडित तलवार नजर करण्याइतक्या चतुराईनें हाकलेलें, नीरा व वारणा यांच्यामधील भीमाकृष्णांच्या संगमापावतचें, चौदालक्षांच्या मुलखाचें राज्य प्रतापसिंहाना सोडावें लागलें होतें. हें चौदा लक्षांचें राज्य ह्मणजेच अगोदर एल्फीन्स्टनच्या मुत्सद्देगिरीनें मराठी मुलखावर टाकलेला एक फासा होता. १८१८ त पुण्याला युद्ध सुरू होऊन इंग्रजाकडून खडकी, कोरेगांव येथें पराभव पावलेला रावबाजी साताऱ्यास प्रतापसिंहाना भेटण्यास आला, आणि सहाय्यार्थ पंचवीसहजार सैन्य देऊं करून इंग्रजाशीं चाल लेल्या युद्धांत पुढाकार घेण्यासाठीं आग्रहानें विनवूं लागला; छत्रपतींच्या गुरुघराण्याची, चाफळकर स्वामींची जामिनकीही रावबाजीनें पटविली तसे शूर व देशाभिमानी महाराज इंग्रजाला तोंड देण्यास तयार झाले. अशावेळीं एल्फीन्स्टन् साहेबानें " बाजीरावाचें सारें साम्राज्य छत्रपतींच्या पदरांत टाकण्याचा इरादा " प्रगट करून छत्रपतींना इंग्रजाकडे मिळवून घेतलें. छत्रपतींच्या या बुद्धिभेदास त्यावेळच्या मुत्सद्यांची वागणूक कमी जबाबदार नाहीं. पण अष्टयाच्या रणसंग्रमांत पेशव्यांचा पाडाव केल्यावर साम्राज्याऐवजीं प्रतापसिंहाना ज्यावेळीं राज्याचा "तुकडा" मिळाला त्यावेळींच अंतःकरणांत किती कालवाकालव झाली असेल त्याची कल्पनाच केलेली बरी !!

या अपमानाच्या भरीला जेव्हां १८३९ मध्यें पदच्युतीचा कळस चढला, तेव्हां छत्रपतींवरील सर्व अन्यायाचें परिमार्जन करण्याकरतां कुंपणीसरकारच्या माहेरघरीं ह्मणजे इंग्लंडांतच

सातत्यानें भरली ८ जिल्हा सभांची रूपरेखा १० राष्ट्रीय आकांक्षांची कांग्रेसनिष्ठ वाढ १२ शेतकऱ्यांची प्रामुख्यानें कळकळ १५ इतर हितसंबंध १६ जिल्ह्यापुरती मध्यवर्ती राष्ट्रीय संस्थेची योजना १९

प्रकरण २ रें:--कायदेमंडळांत -१९११ पासून १९३५ पर्यंत सातारचे कौन्सिलांतील प्रतिनिधी २१ लोकपक्षीय प्रतिनिधींची कार्यपद्धति २३ दादासाहेबांची कामगिरी २४ भास्करराव जाधवांचें काम २५ नानासाहेब देशगांडच्यांचें काम २७ भाऊसाहेब सोमणांची कामगिरी २९ रा. ब. काळे यांची कामगिरी ३१ बडया कौन्सिलांतील काम ३२

प्रकरण ३ रें:—संस्थानी स्वराज्यांत—संस्थानिकांची लोकचळवळीला सहानुभूति ३४ शिवाजीक्लब, अभिनवभारतसंस्थेची नक्कल ३५ स्वदेशी चळवळ ३६ होमरूल चळवळ ३७ खादीप्रसार, वृत्तपत्रांवरील खटले ३८ ब्रिटिश मुलखांत व संस्थानांत संस्थानी प्रजेची चळवळ ३९ चळवळ्यांचे भोग ४१ कायदेभंगांतील कामगिरी ४२ संस्थानिक व प्रजेचे पुढारी ४४

समालोचन:- स्वराज्यविषयक चळवळ ४५. स्वदेशी बहिष्कार ५० सहकारीं चळवळ ५१ गोरक्षण, शिक्षण - शारीरिक, बौद्धिक ५२. राष्ट्रीय शिक्षण ५३. इतिहासाचा अपुरेपणा ५४. संघटित व शिस्तीची संस्था ५६-५७.

चित्रें:-- राव० लिमये, नानासाहेब वैद्य, ३२ दादासाहेब करंदीकर, बळवंतराव सहस्रबुद्धे, दादाभाई नौरोजी ४८ लोकमान्य टिळक, ७२ न्यायमूर्ति रानडे ८० महात्मा गांधी १२८ रा. ब. पाठक, ग. ब. फणसळकर, ना. गोखले, भाग ३ पान ९

जिल्हा सभांचा तक्ता ( भाग ३ पृ. २ )

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
ता. ३ नं. ५११
ता.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ५३३५.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५३...
ठाणे

# जागृत सातारा

## प्रकरण १ लें

## राजदर्शन

पिढ्यापिढ्यांच्या कर्तबगारीनें इतिहास रंगत असतो. बापापेक्षां बेटा आणि गुरुपेक्षां शिष्य सवाई व्हावा असें म्हणण्यांत " चढत्या वाढत्या पदवीनें " इतिहास रंगावा अशी अपेक्षा असते. ही अपेक्षा पूर्ण करावयास तरुण पिढीपुढें वडील पिढीनें केलेल्या कामाचा आढावा असेल, तर आपल्या कार्यक्षेत्राचा क्षितीज आपणांस किती वाढवितां येईल याचा बहुशः बिनचूक अंदाज तरुणांना घेतां येतो, महत्त्वाकांक्षेला तजेला चढतो व आत्मविश्वास वाढतो. या दृष्टीनेंच ब्रिटिश रिसायतींत सातारा जिल्ह्यांत झालेल्या राष्ट्रीय चळवळीचा थोडक्यांत शब्दपट मांडण्याचा हा एक प्रयत्न आहे. नुसतीच " सांगे वडिलांची कीर्ति " तो समर्थांच्या दृष्टीनें " एक मूर्ख " ठरत असेल, पण सवाई कर्तबगारीच्या राष्ट्रसेवेनें पितृऋण फेडूं इच्छिणाऱ्या तडफेच्या तरुणांना " वडिलांची कीर्ति " हा एक उठाव ठरतो, ही एक उज्ज्वल पार्श्वभूमि ठरते.

ब्रिटिश रिसायतींतला झाला तरी सातारा जिल्ह्याला १८४८ पासून आपला राजकीय इतिहास सांगतां येतो.

कारण त्यासालींच सातारचें राज्य खालसा नाहीं कां झालें? सातारचे त्यावेळचे राजे श्रीमत् छत्रपति शहाजी महाराज वारले आणि त्यांना औरस संतति नसल्यामुळें त्यांनीं विधिपूर्वक दत्तक घेतलेला आणि रेसिडेंटनें मान्यता दिलेला मुलगा व्यंकोजी हाच शहाजीच्या गादीचा वारस होता. पण रेसिडेंट आणि जनता यांचें हें मत गव्हर्नर जनरल डलहौसी यांस पटलें नाहीं. १८१८ त पेशव्यांचें राज्य खलसा करतेवेळीं प्रतापसिंह महाराज इंग्रजांच्या हातीं येऊन त्यांना सातारचें राज्य देतांना ता. २९ सप्टेंबर १८१९ रोजीं जो चौदा पेट्यांच्या संस्थानाचा अकराकलमी तह केला त्यांत तें राज्य छत्रपतींच्या "Sons, heirs and successors" (British India by R. W. Fraser) फरजंद व वारिस व कायम मुकाम, यांच्याकडे चालविलें जाईल असे शद्ब होते. डलहौसीच्या मतें "वारिस" हा शद्ब फक्त औरस संततीलाच लागू करावयाचा असल्याकारणानें ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांनीं त्याला अनुमति देतांच सातारचें राज्य खालसा झालें!!

औरस संततीच्या पोकळ सबबीवर सातारचें राज्य खालसा झालें हा छत्रपतींच्या व स्वराज्याच्या अभिमान्यांना धक्का होता. ता. ५ सप्टेंबर १८३९ रोजीं प्रतापसिंह महाराजांना पदच्युत केलें त्यावेळेसच वास्तविक सातारची गादी खालसा झाली होती. कारण त्यांच्या गादीवर बसलेले त्यांचे बंधु आप्पासाहेब हे रेसिडेंटच्या हातांतील केवळ एक बाहुलें होतें. १८३६ मध्यें कांहीं लोकांच्या कारवाईमुळें इंग्रजाविरुद्ध प्रतापसिंह कट करात असल्याचा संशय आल्यावरून रेसिडेंट कर्नल लॉडविक प्रभृतींचें गुप्त चौकशीकमिशन् बसलें आणि

त्याच्या निर्णयानुसार, सुमारें २१ वर्षे प्रजाहितदक्षतेनें, व इंग्रजांनींदेखील विलायतेहून रत्नजडित तलवार नजर करण्याइतक्या चतुराईनें हाकलेलें, नीरा व वारणा यांच्यामधील भीमाकृष्णांच्या संगमापावतचें, चौदालक्षांच्या मुलखाचें राज्य प्रतापसिंहाना सोडावें लागलें होतें. हें चौदा लक्षांचें राज्य ह्मणजेच अगोदर एल्फीन्स्टनच्या मुत्सद्देगिरीनें मराठी मुलखावर टाकलेला एक फासा होता. १८१८ त पुण्याला युद्ध सुरू होऊन इंग्रजाकडून खडकी, कोरेगांव येथें पराभव पावलेला रावबाजी साताऱ्यास प्रतापसिंहाना भेटण्यास आला, आणि सहाय्यार्थ पंचवीसहजार सैन्य देऊं करून इंग्रजाशीं चाल लेल्या युद्धांत पुढाकार घेण्यासाठीं आग्रहानें विनवूं लागला; छत्रपतींच्या गुरुघराण्याची, चाफळकर स्वामींची जामिनकीही रावबाजीनें पटविली तसे शूर व देशाभिमानी महाराज इंग्रजाला तोंड देण्यास तयार झाले. अशावेळीं एल्फीन्स्टन् साहेबानें "बाजीरावाचें सारें साम्राज्य छत्रपतींच्या पदरांत टाकण्याचा इरादा" प्रगट करून छत्रपतींना इंग्रजाकडे मिळवून घेतलें. छत्रपतींच्या या बुद्धिभेदास त्यावेळच्या मुत्सद्यांची वागणूक कमी जबाबदार नाहीं. पण अष्टयाच्या रणसंग्रमांत पेशव्यांचा पाडाव केल्यावर साम्राज्याऐवजीं प्रतापसिंहाना ज्यावेळीं राज्याचा "तुकडा" मिळाला त्यावेळींच अंत:करणांत किती कालवाकालव झाली असेल त्याची कल्पनाच केलेली बरी !!

या अपमानाच्या भरीला जेव्हां १८३९ मध्यें पदच्युतीचा कळस चढला, तेव्हां छत्रपतींवरील सर्व अन्यायाचें परिमार्जन करण्याकरतां कुंपणीसरकारच्या माहेरघरीं ह्मणजे इंग्लंडांतच

रंगो बापूजी चिटणवीस १८३९ तच गेले. आपलें सर्वस्व गमावूनसुद्धां कुंपणीचें दायरेक्तर, पार्लमेंटचे सभासद, वजनदार इंग्रज गृहस्थ या सर्वांच्या पुढें रंगो बापूजींनीं छत्रपतींची कैफीयत अशी जोरदार व न्यायास अनुसरून मांडली कीं, एकादा हिरण्यकश्यपू विदुर झाला असता. पण खरेखोटे कागद करणारा लॉर्ड क्लाइव्ह आणि बेगमांना लुटणारा वॉरन् हेस्टिंग्ज ज्या न्यायनिष्ठुरतेनें निर्दोषी ठरला, तीच न्यायनिष्ठुरता छत्रपतींच्याबाबत हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांचे निर्णय वज्रलेप केल्याशिवाय कशी राहणार ?

अशा तऱ्हेनें फसगत होऊन १८५८ च्या डिसेंबर महिन्यांत परत आलेल्या रंगोबापूजीच्या मागें सातारच्या स्थानिक इंग्रजांनीं नवीनच लचांड लाविलें. यावेळीं १८५७ सालींच सुरू झालेल्या स्वातंयत्र्युद्धानें अखिल भारत तापवून सोडला होता. त्याचा फायदा घेऊन रंगोबापूजीविरुद्ध अशी अवई उठविण्यांत आली कीं परळीच्या बाजूकडून बंडावा उठविण्याचा प्रयत्न रंगोबापूजी करीत असून इंग्रजांचें राज्य उलथून पाडण्याचा त्याचा विचार आहे. पण धामधूम उठवून आणि ५०० रुपयांचें बक्षीस लावून देखील रंगोबापूजी हातार्शी लागला नाहीं तेव्हां त्याच्या मुलास आणि जवळच्या नातेवाईकांस फासावर चढविण्यांत आलें !!

बस्स् ! राज्याला मुकण्याचा अशुभसा प्रसंग सातारच्या छत्रपतींवर आल्यावर रंगोबापूजींच्या प्रयत्नाव्यतिरिक्त स्वराज्यसंपादनाचा प्रयत्न साताऱ्यांत फारसा झालेला दिसत नाहीं !! खुद्द छत्रपती घराण्यानें तर "सुसरीबाई तुझी पाठ मऊ" म्हणूनच नेकीनें दिवस काढले आहेत. राज्याला मुकल्यावर

ता. ३ नं. ६११
ता.



शहाजीराजांच्या पत्नी सगुणाबाई ऊर्फ आईसाहेब महाराज यांना दरमहा पांच हजार रुपयांच्या नेमणुकीवरच दिवस कंठावे लागले! तेव्हां आयाळ व नख्या काढलेल्या सिंहाप्रमाणें आपल्याच ठिकाणीं फार तर छत्रपतींनीं अगर त्यांच्या आश्रितांनीं सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाला मनोमन आशीर्वाद दिले असतील! नाहीं ह्मणावयास, बंडानंतर जे जिते जागते बंडखोर दक्षिणेंत विखुरले, त्यांपैकीं कित्येक जोगी–बैराग्यांच्या वेषानें "बहुत देरतक" हिंडत असल्याच्या आणि त्यांतील कांहींनीं वाई तालुक्यांत व शिराळे पेठ्यांत कांहीं काळ तळ दिल्याच्या कर्णकथा क्वाचित् प्रचलित आहेत. पण साताराजिल्ह्यांत एकादा खराखोटा नानासाहेब पेशवा पकडलाही गेला नाहीं कीं त्याचा एकादा साथ्या ह्मणून कोणा गोसाव्यावर आळही आला नाहीं.

असो. अशा रीतीनें दिवस जात असतां १८६४ सालीं व्यंकोजी महाराज नगर येथें मरण पावले आणि १८६९ च्या मे महिन्यांत शेडगांव ( अहमदनगर ) च्या एका मुलाला आईसाहेबांनीं दत्तक घेतलें. या द्वितीय दत्तकाचें नांव आबासाहेब महाराज होय. संस्कृत व इंग्रजीचें जरुरीपुरतें ज्ञान, घोडा फेकणें, निशाण मारणें, भाला बोथाटी चालविणें, कुस्ती करणें त्यांना असें अवगत होतें कीं महाराष्ट्रराज्याचे संस्थापक थोरले आबासाहेब महाराजांसारखा पराक्रम, काल अनुकूल असतां तर, याही आबासाहेबांच्या हस्तें झाला असता, असें ह्मणतात.

ता. १९ जून १८६९ रोजीं आबासाहेबांना पुत्ररत्न झालें तेव्हां राजवाड्यांत मोठा उत्सव झाला खरा; पण

मराठी ग्रंथसंग्रहालय
नोंद नं. ५३७

त्याच्यावर सत्ताहीनतेची विषण्ण छाया होतीच. १८९८ सालींच आईसाहेब महाराजांनीं दिवाणी व फौजदारी दप्तरें बंद केली होतीं; त्याच सालच्या ४ डिसेंबर रोजीं सेनापतींचे वाड्यांतील मामलेदार-कचेरीखेरीजकरून सर्व वाडा रा० बळवंतराव पटवर्धनांनीं ३०१० रुपयांस खरेदी केला होता व राज्याचा विस्तार तर केव्हांच "लिंबांत" येऊन बसला होता. छत्रपतींच्या या विपन्नावस्थेची परिसीमा शनिवार ता. २१ मार्च १८७४ रोजीं झाली. त्यादिवशीं रंगमहालाच्या इमारतीस आग लागून अधिकाऱ्यांच्या हयगयीमुळें २९ हजार रुपयांचें नुकसान झालें! याचा जणों आघात अगोदरच आजारी असलेल्या आईसाहेबांना बसला आणि मंगळवार ता. २४ मार्च १८७४ रोजीं त्यांचा कैलासवास झाला!!

आईसाहेबांचा कैलासवास झाल्यावर चार महिन्यांच्या आंतच सातारकरांच्या सात इमारतींवर इंग्रजांचा पोलीस पहारा बसला. राजेपणाचें एकही द्योतक छत्रपतींच्या घराण्यांत नांदू द्याव-याचें नाहीं असा जणूं मनसुबा झाल्याचा संशय जनतेस आल्या-मुळचें ता० ७ सप्टेंबर रोजीं तात्यासाहेब दिवाणांच्या वाड्यांत "साताऱ्च्या राजघराण्यावरील प्रसंगाबद्दल" विचार करण्याकरतां जनतेची सभा झाली, तिला पंतप्रतिनिधी व चाफळकर स्वामी हजर होते. पण अशा सभांचा अगर खुद्द छत्रपतींनीं केलेल्या अर्जांचा विचार नकारघंटेनेंच झाला! सदर संबंधांत ता. १८ सप्टेंबर १८७४ चा शूभसूचक म्हणतो, "चौदा लक्षांचें राज्य तोंडांत टाकून दरमहा पांचहजार रुपये प्रमाणें सालाचें साठ हजार रुपयांची नेमणूक आबासाहेब

महाराजांस देण्याससुद्धां दुःख वाटतें, तेव्हां अशा दयाळु सरकारचें गोऱ्या न्यायाचें कृत्य कोण नापसंत करील ? शिवाय वाडे हिसकावून घेऊन मराठ्यांचें समूळ नांव बुडविण्यासाठीं इच्छा आहेच." तथापि सत्तेपुढें शहाणपणाचा तसाच जळफळाटाचा तरी कसा उपयोग होणार ? ह्मणून आबासाहेबांना अडीच हजारांची नेमणूक स्वीकारून रहावें लागलें आणि ११ डिसेंबरच्या शूभसूचकनें उद्गार काढले कीं "ताटाबरोबर कांठही गेला."

तथापि दैवाचें समाधान एवढ्यानेंच कोठें होतें ? १८७५ च्या एप्रिल २३ तारखेस धन्नीच्या बागेंतील बंगल्यास आग लागून त्याची राख झाली, तर मे १८७६ अखेर छत्रपतींना "नवा राजवाडा" ब्रिटिश सरकारच्या डि० जज्जकोर्ट व फ० स० जज्जकोर्ट यांच्याकरतां खालीं करून द्यावा लागला.

दैवाच्या अशा कराल करण्या पाहिल्या, सांगितल्या तरी एक गोष्ट बिनचूक लक्षांत ठेवली पाहिजे कीं छत्रपतींबद्दलचा आदर लवमात्र कमी झाला नाहीं. उदाहरणेंच द्यावयाचीं तर शिंदेहोळकरांनीं छत्रपतींच्या घराण्यावरील सुखदुःखांच्या प्रसंगीं सक्रीय सहानुभूति प्रगट केली आहे, इतकेंच नव्हे तर शांत व उदार स्वभावाचे आबासाहेब महाराज ८ एप्रिल १९०४ रोजीं वयाच्या ९४ व्या वर्षी वारले तेव्हां त्यांच्या अंत्यदर्शनास पुण्यापासून लोक लोटले होते. फार काय, सांप्रतच्या शाहू महाराजांचें दत्तविधान ता. २८ मे १९२९ रोजीं झालें त्यावेळीं चाफळकर बापूराव स्वामी, मुद्गलभट्टाचे वंशज सरदार पंडितराव, औंधकर बाळासाहेब पंतप्रतिनिधी प्रभृतींनीं आपआपलीं पदप्राप्त कर्तव्यें पूर्वीच्या

ऐतिहासिक इतमामास शोभेल अशा कर्तव्यनिष्ठेनें पार पाडली, कोल्हापूरच्या छत्रपतींच्या प्रतिनिधींनीं आपुलकीनें आहेर केले आणि जनतेनें तर आनंदाश्रूंचा अभिषेक केला. छत्रपतींचें घराणें आणि जनता यांच्या आपुलकीच्या आविष्करणाचें अगदीं अलिकडचें उदाहरण म्हणून नमूद करतां येईल कीं सातारा जिल्ह्याच्या मर्दुमकीच्या सामन्यांचा बक्षीससमारंभ ता १३ जानेवारी १९२८ रोज शुक्रवारीं बालराजे शाहू यांच्या हस्तें व अध्यक्षत्वाखालीं व्हावा म्हणून जनतेनें हार्दिक विनंति करतांच बालराजांनीं ती स्वीकारली आणि त्यावेळीं छोटेंच पण हृदयस्पर्शी भाषण करून व सामना मंडळास ५० रुपयांची देणगी देऊन लोकसंग्राहक छत्रपतींच्या घराण्याचें आपण भूषण होऊं असा जनतेच्या मनांत विश्वास उत्पन्न केला.

# परिशिष्ट

## सातारचें राजघराणें

श्रीमत् छत्रपति शाहूमहाराज
|  (१७०८ ते १७४९)
रामराजा (राजारामाचा नातू)
|  (१७४९ ते १७७८)
धाकटा शाहू (बावीकर भोसल्यांपैकीं दत्तक घेतलेला विठोजी)
|  (१७७८ ते १८०८)
प्रतापसिंह (धाकटचा शाहूचा थोरला मुलगा)
|  (१८०८ ते १८३९ पदच्युत. १८४७ मृत्यु)
शहाजी (प्रतापसिंहाचे धाकटे बंधु)
|  (१८३९ ते १८४८)
व्यंकोजी (शहाजी राजांचे दत्तक)
|  (१८४८ ते १८६४)
आबासाहेब (शहाजीराजांच्या पत्नी सगुणाबाई ऊर्फ आईसाहेब यांनीं घेतलेला दत्तक)
|  (१८६४ ते १९०४)
आण्णासाहेब (आबासाहेबांचे चिरंजीव)
|  (१९०४ ते १९१४)
भाऊसाहेब (आण्णासाहेबांचे बंधू)
|  (१९१४ ते १९२५)
बालराजे शाहू (भाऊसाहेबांच्या पत्नी ताराराणी यांचा दत्तक)
(२८ मे १९२५ पासून)

## प्रकरण २ रें

# जुन्यांतून नव्याकडे —

छत्रपतींच्या घराण्याबद्दल जनतेला प्रेम वाटतें, याचें कारण महाराष्ट्रांचे संस्थापक शिवाजी महाराज यांनीं " धर्मासाठीं आह्मी घेतली फकिरी " ह्मणून जो बाणा धरला तोच पुण्यश्लोक बाणा जरी प्रतापसिंह महाराजांना राज्य गमवावें लागलें तरी छत्रपतीघराण्यांत कायम आहे. या बाण्यामुळेंच छत्रपतींचा उत्सव महाराष्ट्रीय अंतःकरणांतून होत असतो. " इंग्रज नव्हेत, कारण इंग्रज हे पुराणवस्तुसंशोधक व संरक्षक आहेत; पण दुसरे कोणी चोर हिंदुस्थानांत आले तर कदाचित् रायगडावरील दगडांच्या छातीचें तुझें सिंहासन सुरुंग लावून ते फोडतील; तेव्हां अढळ असें सिंहासन मी तुला देतें, आणि तें ह्मणजे महाराष्ट्राच्या हृदयाचें सिंहासन होय, असें देवी भवानी शिवाजीराजांना ह्मणाली. काळकर्ते परांजप्यांचे १९२४ सालीं सातारा येथील ग. व्या. शाळेच्या गणपत्युत्सवांत व्याख्यान झाल्यावर संदेशकार कोल्हटकरांनीं जे वरील उद्गार काढले ते छत्रपतींच्या बाण्यानें महाराष्ट्रीय अंतःकरणांत उत्पन्न केलेल्या कृतज्ञतेचे बोल आहेत, हें कोण नाकबूल करील ? या कृतज्ञतेच्या जाणीवेंतूनच लोकमान्य टिळकांनीं शिवाजीमहाराजांचा उत्सव सालोसाल करण्यास शिकविलें, आणि साताराजिल्ह्यांत तो उत्सव प्रेमानें साजरा झाला, इतकेंच नव्हे, तर इतिहाससंशोधकांच्या धुमश्चक्रीमुळें त्रिशतसांवत्सरिक शिवजन्मोत्सव १९२७ व १९३० अशा दोन सालीं आले

असतां दोनही वेळीं सातारा जिल्ह्यानें तो उत्सव सारख्याच जिव्हाळ्यानें साजरा केला. १९३० सालीं सदर उत्सव आणि महात्माजींनीं स्वातंत्र्यमार्गावरील कायदेभंगाची जी मोहीम सुरू केली ती एकासुमारासच झाल्याकारणानें महाराष्ट्रांतील इतर भागाप्रमाणेंच शिवाजी महाराजांचें नांव घेऊनच सातारा जिल्ह्यांतील लोकांनीं सदर चळवळींत भाग घेतला. अशा तऱ्हेची उत्कट भक्ति असल्याकारणानें छत्रपतींची निंदा साताऱ्यास सहन झाली नाहीं तर नवल कसलें? १९२७ सालीं 'पेशवा' या हसननिजामीच्या दिल्ली येथील पत्रांत आणि १९३९ सालीं कानडी इतिहासाच्या पुस्तकांत (१९२९ पासून) शिवाजीमहाराजांबद्दल निरर्गल प्रलाप येतांच त्यांचा तीव्रतम निषेध करण्यांत आला.

काळ पालटला तशी परिस्थिति, लोकांच्या आकांक्षा, अपेक्षा व मार्ग पालटले, हें खरें. पण राज्याच स्वरूप कोणतेंहि असलें तरी महाराष्ट्राला आनंदवनभुवन करून सोडणाऱ्या छत्रपतींच्या राज्यासारखेंच तें राज्य "देवाचें आणि धर्माचें" असलें ह्मणजे झालें, हा कटाक्षच छत्रपतींच्या प्रेमाची संततधार राखण्यांत आहे. ब्रिटिश रियासतीच्या आरंभीं नवें राज्य ह्मणजे "ईश्वरी प्रसाद" असें बहुजनसमाजाला आणि अधिकारलोलुप पांढरपेशा वर्गाला वाटलें ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. इंग्रजी विद्या, इंग्रजी सुधारणा यांची धुंदी अशी तीव्र होती कीं गेलेल्या स्वराज्यापेक्षां आलेलें परराज्य हेंच खरें "छत्रपतींचें रामराज्य" असें लोकांना वाटे. "राजा कालस्य कारणम्" या न्यायानें "एतिकेतां"चा ह्मणजे इंग्रजी चालचलणुकींचा कित्ता सही उचलण्यांत व देवीमदिरेच्या कृपाप्रसादानें पुनीत होऊन गटार-

स्नानें करण्यांत सुशिक्षितांना कांहीं कमीपणा वाटत नसल्याचे उल्लेख सांपडतात.

तरी पण छत्रपती घराण्याशीं ब्रिटिशबहादुरांनीं केलेलें वर्तन ज्यांच्या ज्यांच्या डोळ्यांना दिसलें व खुपलें, त्यांनीं काळाची रंगपालट लक्षांत घेऊन आपलेही पवित्रे बदलले. प्रज्ञावंत पुरुषांच्या दूरदृष्टीला चिकित्सेनें कांहींही दिसलें तरी, सुशिक्षित समाजाच्या बुद्धिवादाला तें पटल्याशिवाय आणि बहुजन समाजाच्या अंतःकरणाला तें भिडल्याशिवाय, प्रज्ञावंत पुरुषाचें तत्त्वज्ञान आचरणाच्या अभावीं निष्प्रभ ठरतें. ह्मणून आंग्लाईच्या गोड धुंदींत समाज असतांना आणि तो आपली निःशस्त्र, निष्प्रभावी व निःसत्त्व स्थिति हीच नंदनवनाची स्थिति समजत असतांना, " लोकांच्या बोलीनें बोलावें, लोकांच्या चालीनें चालावें " या समर्थ-दंडकास अनुसरून वागणारे त्यावेळचे प्रज्ञावंत देखील बोलले कीं " ईश्वरी इच्छेनेंच इंग्रजांचा आणि आमचा योगायोग आला. "

इंग्लंडानें जी औद्योगिक क्रांति केली होती आणि वतनदार वर्गाबरोबर राजकारणांत व्यापारी वर्गाला व सुशिक्षितांना महत्त्वाचें स्थान मिळवून देण्यांत जें यश रक्तरहित क्रांतीच्या जोरावर मिळवलें होतें, त्याची छाप जगाच्या मनावर अमर्याद होती. मग मिल्, स्पेन्सरांचे ग्रंथ आदरणीय मानून त्या ग्रंथांच्या उदार व मुक्तबंध शिकवणीच्या जोरावर इंग्लंडच्या राज्यपद्धतीचे नमुने उठवण्यांत अहमहमिका लागली तर काय आश्चर्य ? इंग्रजी राज्यामुळें जें पाश्चात्त्य ज्ञानभांडार येथें खुलें झालें आणि इंग्रजीविद्येच्या द्वारें जागतिक प्रवृत्तिंचा ओघ परिचित होऊं लागला; इतकेंच नव्हें तर, इंग्रजाला हाडाचे

दुष्मन समजणारांसही आपल्या तोटकेपणाची आण खाकेंतील निखाऱ्यांना फुलवून ठेवणाऱ्या परकीय युक्तिबाजीची ओळख झाली, हाच खरोखर इंग्रजी राज्याच्या रूपानें आलेला ईश्वरी प्रसाद होय. एरवीं हें सर्वांनीं एकमुखानेंच म्हटलें तरी चालेल, कीं "इंग्रज लोकांचें राज्य झाल्यापासून राजा-पासून रंकापर्यंत साऱ्यांस सारखी निस्तेजता आली आहे. बुद्धीला उत्तेजन, व्यापाराला खप, व कलाकौशल्याला पोशिंदा नाहींसा झाला आहे. जिकडे पहावें तिकडे उत्साहशून्यता दिसते. मोठें औदार्य, मोठें शौर्य, मोठें धाडस, मोठी कल्पकता, सारांश, प्रत्येक प्रकारच्या मोठेपणाचा लोप झाल्यासारखा झाला आहे. लढाई किंवा तह करणें, लोकांच्या सुखासाठीं राज्यसंबंधीं किंवा व्यापार-संबंधीं मोठमोठ्या युक्त्या काढणें, वित्तसर्वस्व व बुद्धिसर्वस्व खर्ची घालून नवीन शोध करणें, निरपेक्षबुद्धीनें विद्याव्यासंगांत किंवा लोकोपकारांत गढून राहणें, देशासाठीं किंवा स्वार्थासाठीं अचाट कृत्यें करण्यास तयार होणें, टोलेजंग कारखाने समाईक भांडवलानें चालविणें, राज्यविषयक व समाजविषयक सुधारणा करण्यासाठीं मंडळ्या व सभा स्थापून उत्साहपूर्वक कामें करणें वगैरे सुधारलेल्या स्वतंत्र देशांत दृष्टीस पडणाऱ्या गोष्टी येथें क्वचित् दृष्टीस पडतात." फार काय, "आमचें घोर दारिद्र्य" हा इंग्रजी राज्याचाच परिणाम असल्याबद्दल हिंदुस्थानचे प्रपितामह दादाभाई नौरोजी व महाराष्ट्राचे पुनरुज्जीवक न्यायमूर्ति रानडे यांचीहीं खात्री होती. तरी इंग्रजी राज्याविरुद्ध शस्त्र उपसण्याची ताकद राष्ट्रांत उद्यां आली तरी तसें करूं नये, असा वरील सत्पुरु-

षांचा सिद्धांत होता. कारण मिल् स्पेन्सरप्रभृतींनीं आणिक औद्योगिक सुधारणांनीं निर्माण केलेल्या "तडजोडीच्या राजकारणा"चे पुरस्कर्ते इंग्रज होते. आणि इंग्रज मुत्सद्यांपैकीं उदारमतवादी लोकाग्रणींची खात्री पटविली तर आपल्या अडी-अडचणींची वाट तेव्हांच लागेल अशी दादाभाई-रानडे यांसारख्या लोकाग्रणींची खात्री होती. एवढ्याकरतां हिंदुस्थाना-प्रमाणेंच विलायतेंतही चळवळ चालवावी, प्रांताप्रांतानीं आपला एकएक माणूस विलायतच्या चळवळीस पुरवावा, पार्लमेंटांत हिंदी लोकांनीं शिरावें, आणि अशा तऱ्हेनें "तडजोडीच्या राजकारणाचा" अटोकाट करून ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीकडून १८५८ च्या राणीच्या जाहिरनाम्यांत इंग्रजांनीं दिलेलें वचन पूर्ण करून घ्यावें आणि साम्राज्यसंरक्षणासाठीं वेळ पडल्यास पैसा आणि माणसें पुरवावींत. कारण इतकी राजनिष्ठा दाखविली नाहीं, आणि जर यदाकदाचित् रशिया सारखें राष्ट्र येथें उद्यां राज्य करूं लागलें तर ब्रिटिश अमलापेक्षांहीं आपली स्थिती कुत्र्यानिपट होईल. एवढ्याच करतां कीं "इंग्लंड इतकें उदार राष्ट्र जगाच्या पाठीवर दुसरें नाहीं" अशी नौरोजी-रानडेप्रभृतीं महाभागांच्या मनाची ग्वाही होती. ह्मणून स्वराज्याशिवाय हिंदुस्थानची सोय नाहीं अशी घोषणा करूनदेखील दादाभाईंनीं गेल्या (१९१४-१८) महायुद्धांत पैशापुरुषांनीं साम्राज्याला मदत करण्याबद्दल विनंती केली होती. इतकें कशाला? 'बहिष्कारा'चा पुरस्कार करणोर लोकमान्य सहा वर्षांची मंडालेहून शिक्षा भोगून आल्यावर देखील "रंगरूट" जमविण्याला प्रोत्साहन देत होते. तात्पर्य, मवाळ, जहाल, कसलेही

पर्याय वा पंथ असले तरी "मिळेल तें पदरांत टाकून अधिकाबद्दल धडपड करणाऱ्या राजकारणाची" छाप १९१८ अखेर जशी जगावर, तशीच हिंदुस्थानावर आणि महाराष्ट्रावर होती, आाणि साताराजिल्हा या सर्वव्यापी धोरणाला बहुश: अपवाद नव्हता. १८७९ च्या वासुदेव बळवंत फडक्याचे "बंडा"चे वेळीं तासगांव तालुक्यांतील विसापूरजवळील शिरगांवचे कांहीं "रामोशी" सातारा जिल्ह्यांत आरोपित झाल्याचा दाखला जुन्यापुराण्या दैनंदिनींतून ( तासगांवचे रा. वि. कुलकर्णी ) सांपडतो, नाशिकला जॅक्सनसाहेबांचा खून झाल्यावर जिल्ह्यांत जिकडे तिकडे झडत्यांचें सत्र झडल्याचेंही प्रमाण आहे; किंबहुना पुण्यास रँड साहेबाचा खून झाल्यावर वाईकडे सरकारी डोळे संशयानें पहाताहि होते, त्यापेक्षां १९१० सालीं औंध येथील बाँबचा खटला सातारा जिल्ह्यांत गाजला, या गोष्टी खऱ्या असल्या तरी महाराष्ट्राच्या इतर भागाप्रमाणेंच सातारा जिल्ह्यांतही "न धरी शस्त्र करीं मी" हीच वृत्ति मूळ धरून होती हें निर्विवाद आहे. आणि म्हणूनच इंग्लंडच्या इतिहासानें "सनदशीर सुखसंवर्धनाचा सोपान" जो सेवा, सभा, समिती, नियतकालिक आणि सवाल अशा पायऱ्यांचा दाखविला होता तोच सातारा जिल्ह्यांतही प्रारंभिण्यांत आला हें निराळें सांगावयास कशास हवें ?

## प्रकरण ३ रें.

# सार्वजनिक सभा.

" परम दयाळू इंग्रज सरकारचा आम्हांस लाभ होऊन त्यांचेच कृपेनें आपणांस आपली अवनती कशी दूर करतां येईल हें शिक्षण मिळालें त्याचाच आजची सभा हा परिणाम आहे " स्वागताध्यक्ष जिल्हा सभा पाटण १९१८.

जुळतें—मिळतें घेण्याच्या राजकारणीपध्दतीचा हा सातारा जिल्हांतील शेवटचा कृतज्ञ उच्चार आहे. उदार मतवादी म्हणून गाजलेल्या इंग्रजी मुत्सद्यांनीं काढलेल्या उद्‌गारांना वेदवाक्य म्हणून घेऊन चालणाऱ्या या प्रथेला सातारा जिल्ह्यांत जवळ जवळ पाऊणशे वर्षांपूर्वीच आरंभ झाल्याची बोलवा आहे. दारूचे मक्ते देणें हें लोकांच्या प्रगतीला व आर्थिक सुबत्तेला घातुक असून तें सरकारनें अजी बंद करावें, असा त्यावेळीं अर्ज झाला होता असें ह्मणतात. पण १८६१ सालीं विश्वविद्यालयें स्थापन होऊन त्यांतून पदवीधर बाहेर पडूं लागल्यानंतर, सरकारमान्य मार्गांनीं लोकांची गाऱ्हाणीं दूर करण्याकरतां " जिल्हा असोसिएशन " नांवाची संस्था स्थापन झाली आणि " घराखालील जमीन-मोजणीच्या कायद्यासंबंधीं नामदार गव्हर्नर जनरलसाहेब यांजकडे शेकडों सह्यानिशीं अर्ज " वरील असोशिएशन-तर्फे ता. १८ डिसेंबर १८६८ रोजीं झाला. सातारा जिल्ह्याच्या सार्वजनिक राजकीय आयुष्याचा हा लोकसंमत प्रारंभकाळ समजावयास हरकत

नाहीं. एकोणिसाव्या शतकाची ‘ सत्तरी ’ ह्मणजे स्वाभिमान-पूर्वक स्वोन्नतीचा श्रीगणेशायनमः जर महाराष्ट्रांतच होता, तर सातारा जिल्ह्यांतही होताच होता. इंग्रजी राज्य आणि इंग्रजी चालीरीती ह्मणजे “ देवाचें राज्य आणि स्वर्गीय चालीरीति ” अशा समजुतीला धक्का एकोणिसाव्या शतकाच्या सत्तरीनेंच प्रथम दिला. सातारा येथें लायब्ररींत ता. २६ जून १८७० रोजीं “ स्वाभिमानपूर्वक सार्वजनिक हितासाठीं व तरुण लोकांची सुधारणा व्हावी ” या हेतूनें एक सभा स्थापन झाली. आणि या विद्वानांच्या सभेंत “ सरकार जे कायदे करतें त योग्य कीं अयोग्य हें ठरवीत असत. ” ता. ७ आक्टोबर १८७० चा शुभसूचक म्हणतो कीं “ सांप्रत या सभा भरण्याचा बराच प्रघात पडत चालला आहे. ” अशा सभांनीं शेतकऱ्यांसुद्धां सर्व लोकांना एकत्र जमवून देशस्थिति समजावून देण्याचा प्रयत्न १८७० सालीं वाई, वाळवें, कऱ्हाड, खटाव येथें झाले खरे, पण ता. १७ जुलै रोजीं सातारा येथील लायब्ररींत झालेल्या शेतकऱ्यांच्या सभेइतकी कोणतीच यशस्वी आढळत नाहीं.

असे विखुरलेले प्रयत्न होत असतांच, महाराष्ट्रांत एकजीव चळवळ व एकमुखीं मतप्रदर्शन करतां यावें ह्मणून खटपट करणारे पुण्याचे गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका हे ता. २८ मे १८७१ रोजीं साताऱ्यास आले आणि गणेश नारायण कोल्हटकर व कृष्णराव सखाराम महाजनी यांच्या सहाय्यानें त्यांनीं “ सार्वजनिक सभा ” स्थापन केली इतकेंच नव्हे तर साठ सभासदही मिळविलेच. याच्या अगोदरच [illegible]यमूर्ति रानडे यांच्या प्रेरणेनें वाईस तेथील कार्यकर्ते श्रीमंत

नानासाहेब वैद्य यांनीं " सार्वजनिक सभा " स्थापन केली होती. या " सार्वजनिक सभे"च जाळें जिल्हाभर करण्याच्या उद्देशानें साताराचे गणेश नारायण कोल्हटकर, नारायण पांडुरंग आगटे व कृष्णाजी वासुदेव जोशी, कऱ्हाडास ता. १३ आगष्ट १८७१ रोजीं आले आणि ' वेदो नारायण ' गुण्डाचार्य घळसासी यांच्या नेतृत्वाखालीं ' कऱ्हाड सार्वजनिक सभेचा जन्म ' झाला. अशा " सार्वजनिक सभा " मध्यें पंतप्रतिनिधी, पंत सचीव अध्यक्ष, उपाध्यक्ष होऊनसुध्दां भाग घेत आणि " पोलिस पट्टीबद्दलचे कायद्यासंबंधीं सरकारास सूचना करण्याविषयींचा इंग्रजी अर्ज " पुढें पाठवीत. १८७२ सालीं ' खानदेश रिलीफ फंड ' सार्वजनिक सभांमार्फत जिल्हाभर जमविण्यांत आला होता, त्यांत " कऱ्हाड येथें १०० रु. जमले प्रण मामलेदार कचेरीची पै नाहीं " असा प्रमुख दावा सांगितलेला आढळतो. याचा अर्थच असा कीं, सरकारी नौकरांनीं भुतदयेच्या कामांत बरोबरीनें भाग घेतला नाहीं तर त्यावेळींसुद्धां लोक चिडत. उलट कऱ्हाड येथील तत्कालीन मुन्सफ श्री. बाबासाहेब नागपूरकर यांच्यासारखे जे सरकारी नौकर सार्वजनिक हित-बुद्धीनें रात्रींच्या शाळा, स्त्रीशिक्षण, वक्तृत्वोत्तेजक सभाकाढून अगर चालवून लोकांत मिसळत. यांच्याबद्दल आदर तर दाखविला जाईच, पण सुट्टीच्या किंवा फिरतीच्या निमित्तानें त कोण्या गांवांत – मग तें साताऱ्यासारखें जिल्ह्याचें ठिकाण कां असेना – आले कीं त्यांच्या ज्ञानाचा आणि मार्ग-दर्शकत्वाचा फायदा लोक पुरेपूर घेत. ता. ३१ मे १८७२

रोजीं सातारा जिल्ह्यांत जी " मिठावरील कराची ओरड " प्रदर्शित करण्यांत आली, किंवा त्यापूर्वीच १९ एप्रिल रोजीं, वाई येथील कृष्णेंत स्नानास नग्नावस्थेंत उतरणाऱ्या लष्करी युरोपियनापासून नेटिवास त्रास होई तो सरकारच्या नजरेस जो आणण्यांत आला, त्याला " लोकहितेच्छु सरकारी नोकरांचा " हातभार होता हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

या सार्वजनिकसभांचा कटाक्ष राजकीय बाब मुख्य धरून तिच्या अनुषंगानें लोकांच्या इतरही गाऱ्हाण्यांचा शेवट लावून घेण्याकडे दिसतो. ता. १९ आक्टोबर १८७४ रोजीं सातारा सार्वजनिकसभेतर्फे " सर्व हक्क राजाचे व प्रजेचें कांहीं नाहीं " ह्मणून व्याख्यानांत सदाशिव रावजी गवंडे यांनीं ब्रिटिश कारभारावर बरीच टीका केली होती तर सार्वजनिक काकांनीं " स्वदेशाभिमान व स्वदेशी कपडा " यांचें महत्त्व लोकांना पटवून दिलें होतें. " येथील राजांची हल्लींची स्थिति " असा निबंध इंग्रजीमध्यें ता. २१ आक्टोबर १८७४ रोजीं गोविंद वासुदेव कानिटकर यांनींही वाचल्याचें आढळतें. सातारा जिल्ह्यांतील संस्थानी प्रश्नांचा स्वतंत्र विचार ह्मणून पहिलें महत्त्व या निबंधासच द्यावें लागेल. तथापि १८७५ ता मल्हारराव महाराज गायकवाडांवर ज्यावेळीं किटाळ आलें, त्यावेळीं वाईच्या सार्वजनिक सभेनें जोरानें उचल केली आणि ता. २६ जानेवारी रोजीं चौकशी कमिशनची मागणी केली. एवढ्यावरच न थांबतां नानासाहेब वैद्यप्रभृती वाईकरांच्या प्रोत्साहनानेंच ता. २९ एप्रिल १८७५ रोजीं सातारचे दिवाणांचे वाड्यांत सभा भरून " मल्हाररावांस गादीवर बसाविणें

बद्दल" विनंति करण्यांत आली. तथापि एकपरी हे प्रकार, किंवा "सातारा जिल्ह्यांतील मुलकी व दिवाणी खात्यांपैकीं कित्येक अधिकारी व त्यांचे हाताखालील नोकर एकाच जागीं पुष्कळ वर्षें काम करीत आहेत त्यांच्या बदल्या करा" असा ता. २४ मार्च १८७४ रोजीं "शिराळे"करांनीं केलेला अर्ज, अगर १८७६ च्या दुष्काळानिमित्तानें तासगांव येथील लोकांनीं धान्य आणण्यासाठीं दस्तुऱ्यांची माफी मागितली पण सरकारनें ती नाकारली वगैरे वृत्तांत कोणास मामुली वाटतील; पण तो काळ बहुशः विचारजागृतीचाच होता ही गोष्ट लक्षांत घेतली तर सातारा - जिल्हा - सार्वजनिक-सभेची बैठक दिवाणांच्या वाड्यांत भरून ता. ३ डिसेंबर १८७६ रोजी खालील ठराव पास केलेले पाहिले ह्मणजे खरोखर कौतुक वाटेल. १८७७ च्या जानेवारी १ तारखेस व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणानिमित्त हे ठराव झाले होते. ते असे:—

(१) राजकीय मोठाले प्रकरणांत सर्व राजे यांच्या संमती घेत जाव्या. (२) लष्करी व दिवाणी खात्यांत मोठाली हुद्यांचीं कामें नेटिवांस द्यावी (३) सातारा व वऱ्हाड अन्यायानें घेतले, ते परत मिळावे (४) हिंदुस्थानांतील जमिनीचा सारा जास्ती वाढलेला आहे तो कमी करून निरंतर कायम ध्यावा व ऐनजिन्नस. सारा घेत जावा. (५) लोकांस निःशस्त्र केले आहे तीं शस्त्रें देण्याचा विचार व्हावा. (६) हिंदुस्थानवर कर्ज आहे त्याचें व्याज इंग्लंडांतील कर्जाप्रमाणें कमी व्हावें. (७) विलायतचे पार्लमेंटांत हिंदुस्थानचे लोकांतर्फें प्रतिनिधी असावे. व कायदेकौन्सिलांत लोकांनीं निवडलेले सभासद असावेत.

या ठरावांतील पायाशुद्ध विचारसरणी व धीटपणा अवलोकन केला, ह्मणजे " सरकारांनीं स्थापन केलेल्या कोर्टांतून पक्षकारांचे तंटे चुकविण्यास खर्च फार लागतो, व निष्कारण वेळ जातो. आणि एकमेकांत अति वैर माजून मोठमोठालीं नुकसानें होतात. .......... देशांतील तंटे जितके कमी होतील तितका देशास व राज्यास फायदा आहे व देशांत तंटे कमी असणें हें राज्यास भूषण आहे. असें समजून तंटे आपसांत मांडून तोडण्याकरतां " ता. ७ जुलै १८७६ रोजीं सार्वजनिक काकांच्या हस्तें साताऱ्यास व राव ब. माधवराव रामचंद्र (पेन्शनर डेप्युटी कलेक्टर) यांच्या हस्तें ता. १९ आगष्ट १८७७ रोजी वाईस लवाद कोर्टें स्थापन केलीं, अथवा हायस्कूलचे हेडमास्तर जठार व कृ. पां. आगटे यांनीं सातारा म्युनिसिपालिटींत "साखरेचा कारखाना काढण्याचें ठरविलें " हें अगदीं साहजिक वाटतें.

मात्र दरिद्याच्या मनोरथाप्रमाणें सदर साखरेचा कारखाना त्यावेळीं कागदीच प्रगति करूं शकला. ता. १७ नोव्हेंबर १८८२ चा शुभसूचक बरीक सांगतो कीं सातारा जिल्ह्यांतील गणेश गोपाळ पंडित बी. ए. आणि विठ्ठल महादेव गोखले आय्. सी. ई. या दोन गृहस्थांनीं अहमदाबादेस छिटाची गिरणी काढली व टर्कीरेड् सूत तयार केलें.

निबंधमालेनें आणि न्यायमूर्ति रानड्यांनीं स्फूर्ति दिलेल्या महाराष्ट्रानें १८८० सालीं न्यूस्कूलच्या जन्माबरोबर जें नवीन वळण गिरवण्यास सुरवात केली होती, तीमधलीच सातारा जिल्ह्याची एक लपेट ह्मणून वरील छिटाच्या गिरणीचा गौरव करतां येईल. खुद्द सातारा जिल्ह्यांत बघतां, केसरीवरील बर्वेप्रकरणाच्या खटल्याकरतां फंड जमविण्यांत आला, आणि

त्या निमित्तानें दादासाहेब करंदीकरांनीं आजकालच्या सातारा जिल्ह्याची कुंडली मांडली.

मराठा-केसरीकर्त्यांस झालेली शिक्षा सरकारनें दया करून माफ करावी म्हणून ता. ११ आगष्ट १८८२ रोजीं साताऱ्याहून व त्याच तारखेच्या आसपास वाई-कऱ्हाडहून अर्ज झाले खरे, पण त्यासालची सातारा जिल्ह्यांतील खरी चळवळ ह्मणजे स्थानिक स्वराज्यासंबंधींची होय. यासंबंधांत पुण्याच्या सार्वजानिक सभेचे एजंट रामचंद्र नारायण करकरे यांच्या डिसेंबर महिन्यांतील भेटींचा उल्लेख करणें जरूर असलें तरी खुद्द जिल्ह्याची जागरूकता मनांत भरण्यासारखीच आहे. ता. २ जुलै रोजीं घाटेथिएटरांत नारायणराव फडणीस यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरून दादासाहेब करंदीकरांनीं रिपनसाहेबांच्या स्थानिकस्वराज्याच्या योजनेवर मुख्य भाषण करून तिची समजूत दिली आणि हायस्कूलचे फर्स्ट असिस्टंट गोपाळ अनत भट, गणपतराव कोल्हटकर, अनंद बहिरव पिंगळे व हायस्कूलचे हेडमास्तर पाठक यांनीं त्या योजनेचा उहापोह केल्यावर रिपनसाहेबांना द्यावयाचे मानपत्र सखाराम रामचंद्र किर्लोस्कर यांनीं तयार केलें. स्थानिक स्वराज्याच्या रिपनकृत योजनेनें आनंदाच्या टाळ्या पिटण्यापुरतें हुरळून न जातां, ती योजना जिल्हाभर समजून सांगण्याकरतां करंदीकरांच्या प्रेरणेनें गंगाधर रामकृष्ण किराणे, कऱ्हाड, वाळवें, तासगांव, पाटण या भागांत हिंडले. दरम्यान मुंबई सरकारनें स्थानिकस्वराज्यव्यवस्थेसंबंधानें जो ठराव प्रसिद्ध केला त्या ठरावांत हिंदुस्थान सरकारच्या पहिल्या ठरावाविरुद्ध अशा पुष्कळ गोष्टी असल्यानें पुन्हां

हिंदुस्थान सरकारनें ४ आक्टोबरचा दुसरा ठराव प्रसिध्द केला व तो फार योग्य व पोक्त विचाराचा असल्यामुळें " त्याबद्दल रिपन साहेबांचे आभार २९ आक्टोबर रोजीं मानण्यांत आले.

वरील सभेंतच " शेतकरी कर्ज मुक्तीचा कायदा त्रासदायक ह्मणून " असाही ठराव ग. पां. आगटे, वि. ल. रांगोळे, ना. स. फडणीस यांनीं केला. शेतकरी कर्जमुक्ततेच्या कायद्याचा परिणाम त्यासालीं तरी असा दिसून आला कीं " शेतकरी ॲक्टाच्या तडाक्यांत बहुतेक व्यापारी सांपडल्यामुळें दिवाळीचा सण व्हावा तसा झाला नाहीं. " बिचाऱ्या शेतकऱ्यांना तर दिवाळी ठाऊक असण्याचें कारणच काय? १८८३ चा ता. १४ जानेवारीला केशव पांडुरंग नातू व बाळाजी महादेव गोळे यांच्या समवेत दादासाहेब करंदीकर सार्वजनकि सभेचे चिटणीस निवडून आल्यावर, त्यांनीं शेतकरी-कर्जमुक्ततेच्या कायद्याचा फायदा शेतकऱ्याला भरपूर व्हावा ह्मणून फार खटपट केली. त्या कायद्यापायीं सातारा जिल्ह्याच्या वाटणीस आलेल्या पोलनसाहेबांची गांठ ता. ४ फेब्रुवारीस घेऊन, "कऱ्हाडचे श्री. भास्कर गोपाळ सावरकर हे शेतकऱ्यांची उत्कृष्ट वकिली करतील " असें आश्वासन दिलें पण साहेबास असाही इषारा दिला कीं " रा. ब. रानड्यांचा दक्षिणेंतील शेतकऱ्यांसंबंधीचा इतिहास व अभिप्राय वाचा. " वाईस असाच इषारा नानासाहेब वैद्य व कऱ्हाडास भाऊसाहेब भागवत यांनीं केल्याचें नमूद आहे. पुणें सार्वजनिक सभेचे एजंट काशिनाथ त्रिंबक खरे " शेतकी ॲक्ट " समजावून देण्याकरतां जिल्ह्यांत १८८४ चे जानेवारींत चक्कर मारून गेले पण या सगळया प्रयत्नांचा उपयोग शेतकऱ्यांच्या बाबत

उपड्या घड्यावरील पाण्याप्रमाणेंच झाला.

" नेटिव्ह मॅजिस्ट्रेट ज्युरिस्डिक्शन बिलाचा विचार " ता. १७ जून १८८३ रोजीं आगट्यांच्या वाड्यांत सुमंत, नातु, करंदीकर वगैरे वीस सभासदांनीं करून सहस्रबुध्दे व पांडुरंगराव देसाई यांच्या चिकित्सेनें पुणें सार्वजनिक सभेच्या मागणी प्रमाणें एक मेमोरिअल पाठविण्यांत आलें. एवढी एक ठळक गोष्ट नमूद करून " सार्वजनिक सभां " विषयीं एक साधारण विधान करतां येईल कीं नानासाहेब वैद्यांचे देखरेखीखालीं वाईची सभा जितकी कार्यकर्ती होती, तितकी कोणतीच नव्हती. रस्त्यावरील म्युनिसिपल कचऱ्यापासून तों थट प्युनिटिव्ह पोलीसपर्यंत सर्व बाबींत वाई सार्वजनिक सभेनें अतिशय जागरूकता दाखविल्याचे तिच्या दप्तरावरून कळतें. महाबळेश्वरास जाणाऱ्या गव्हर्नरांस जातांयेतां केव्हांतरी गांठून मानपत्राच्या निमित्तानें आपलीं गाऱ्हाणीं सरकारच्या वेशीवर टांगण्याचा त्या सभेचा जणुं शिरस्ताच दिसतो. तोंच कित्ता पुढें सातारा म्युनिसिपालिटीनें उचललेला आढळतो. या व अशा प्रयत्नांचा परिणाम आतांच काय, पण त्यावेळीं देखील फारसा दृग्गोचर नव्हता. पण पायांतील दगडांना चिखलांत तोंड खुपसून जमीनीच्या खालींच गडप होऊन रहावें लागते ना ? अशा सर्व खटाटोपांनीं एक गोष्ट सुतराम् साधली आणि ती म्हणजे विचारजागृति या जागृतिच्याच. जोरावर १८८५ सालीं " सावराष्ट्रीक कॉन्स्फरन्स " ऊर्फ राष्ट्रीय सभा जेव्हां होऊं घातली तेव्हां तिच्यापुढें ठेवण्याची महत्त्वाची गोष्ट म्हणून ता. २१ डिसेंबरचें वाई येथील

वृत्तसार पत्र नमूद करतें कीं "विलायतेंत इंग्लंड, स्कॉट्लंड, आयर्लंड या प्रांतांतून पार्लमेंटसभेमध्यें जसे मेंबर पाठविले जातात त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या तर्फेनें कांहीं मेंबर पाठविण्यास आम्हांस अधिकार मिळावा" असें आपलें मागणें पार्लमेंट-सभेपुढे ठेवलेंच पाहिजे.

---

## प्रकरण ४ थें

# छोटी कॉंग्रेस.

ता. २८ डिसेंबर १८८५ रोजीं, पुण्यास अडचण उत्पन्न झाल्यामुळें मुंबापुरीस राष्ट्रीय सभेचा जन्म झाला. त्या पहिल्या वाहिल्या सभेला सातारा जिल्ह्यांतून कोणी हजर असल्याचें आढळत नाहीं. तथापि अखिल भारताचें एकमुखी मागणें जगापुढें मांडण्याकरतां, किंबहुना भारतवर्षानें आपलें सार्वजानिक सामर्थ्य व मतप्रदर्शन करावें आणि धर्म व पंथ यांचा विचार न करतां लहान मोठ्या सर्व दर्जाच्या लोकांना आपल्या संपूर्ण व स्वयंपूर्ण वाढीसाठीं क्षेत्र निर्माण करावें, अशा रोखानें राष्ट्रीय सभेचा दृष्टीकोन आहे, असें पटतांच, दादासाहेब करंदीकर हे तिचे एकनिष्ठ "वारकरी" झाले आणि त्यांनीं हें व्रत एकनिष्ठपणें १९२९ अखेर अव्याहत चालविलें होतें. दादासाहेबांच्या बरोबरीनेंच ज्यांचीं नांवें कॉंग्रेस निष्ठेविषयीं नमूद करावीं लागतील अशी परंपरा चढत्या

वाढत्या तोलानें फोफावतच गेली आहे, हें खरें; पण राष्ट्रीय-सभेच्या जन्माबरोबर तिचें रहस्य समजून राष्ट्रीयसभेचे पाईक होण्यांत ज्यांनीं धन्यता मानली त्यांत दादासाहेबांच्या बरोबरीनें बळवंतराव सहस्रबुद्धे (सातारा) बळवंतराव कोल्हाटकर (संदेशकार अच्युतराव कोल्हाटकर यांचे दत्तक घरच वडील) व विशेषतः गोविंदराव ऊर्फ रावसाहेब लिमये (अष्टे) यांचा प्रामुख्यानें निर्देश केला पाहिजे. सातारा जिल्ह्याच्या सुख-दुःखांना आणि ध्येय-धोरणांना कोणती चार अंगें असतील तर विलायतसरकारच्या हाताला हात लावणारें हिंदुस्थान सरकार, प्रांतिक ह्मणून मुंबईसरकार, स्थानिक ह्मणून जिल्हाधिकारी या सर्वांचे कारभार व लोकांच्या ह्मणून असणाऱ्या गरजा होत. तथापि ज्या हिंदी राष्ट्राच्या ऐहिक उद्धाराकरतां राष्ट्रीयसभेचा जन्म झाला, त्या हिंदी राष्ट्राचा सातारा जिल्हा हा एक घटक असल्या कारणानें, छत्रपतीघराण्याशीं झालेल्या इंग्रजी वर्तनाला परिचित असलेला सातारा जिल्हा राष्ट्रीय-सभेचा हुकूम — ठराव — सरकारी कायद्या इतक्याच प्रामाणिकपणानें पाळणारा होणें जरूर नाहीं काय? तसें झालें तरच १९२२ सालीं वीर वामनराव जोश्यांनीं इसला-मपूर येथील जिल्हासभेच्या अध्यक्षस्थानावरून "मराठी राज्याच्या इतिहासाचे शिवाजीपासून राजारामाच्या अंतकाळ-पर्यंतच्या काळांतलें — अनुकरण करणें इष्ट आहे" असें जें ह्मटलें होतें, तें ह्मणण्यांत कांहीं तरी तथ्य आहे. कारण "त्या दैदिप्य आणि वैभवशाली कालांत ज्यांचे पिंड याच महाराष्ट्रांत पोसले गेले व ज्यांचे मर्त्य परंतु कीर्तिशाली देह याच महाराष्ट्रभूमीच्या उदरांत एकजीव होऊन गेले अशा

तत्कालीन अनेकजातींच्या व पंथांच्या लोकांमध्यें ऐक्यभाव व स्वराज्यप्रेम पूर्णपणें नांदत होतें. ”

तथापि १८८५ सालीं राष्ट्रीय सभेचा जन्म झाला त्यावेळीं व पुढें जवळजवळ १९०६ सालापर्यंत राष्ट्रीय सभेचें धोरण सरकारी कारभाराच्या धोरणाशीं जुळतें घेण्याचेंच असल्याकारणानें त्या काळांत अर्जविनंत्यांचेंच साम्राज्य राष्ट्रीय सभेंत होतें ह्मटलें तरी चालेल. सूर्य कधींही न मावळेल असा इंग्लंडचा साम्राज्यविस्तार, इंग्रजी व्यापाऱ्याला लागणाऱ्याला कच्चया मालाचा पुरवठा, इंग्रजी यंत्रयुगानें निर्माण केलेल्या, लँकेशायरप्रभृति शहरांनीं उत्पन्न केलेल्या कापड वगैरे मालाचा उठाव होण्यास लागणारे बाजार, तात्पर्य इंग्रजी हितसंबंध अबाधित कसे राहतील आणि त्यांतून साधलें तर साधेल तेवढें भारताचें किंवा त्याच्या भागाचें थोडेंफार कल्याण साधून आपल्या साधुत्वाचा डांगोरा कसा पिटतां येईल, एवढेंच नागमोडी वळणाच्या इंग्रजी कारभाराचें लक्ष असल्याकारणानें, पडद्या-आडून लॉर्ड डफरीन अगर उघड ए. ओ. ह्यूम यांच्यासारख्या उदार मनस्क इंग्रजांबरोबर सगळे सरकारी यंत्रही राष्ट्रीयसभे-बद्दल प्रारंभीं सहानुभूती दाखवित असे. यद्यपि राष्ट्रीयसभेच्या जन्माबरोबर, ‘ देवाचें राज्य ’ हा इंग्रजी राज्याबद्दलचा भ्रम उतरूं लागला आणि दादाभाई नौरोजी, डिग्बी, गोखले-प्रभृतींनीं पुढें स्पष्ट ह्मणून दाखविल्याप्रमाणें परकीय राज्यामुळें हिंदुस्थानला जळवा लागल्याचा ध्वनि राष्ट्रीय सभेच्या विनम्र विनंत्यामधून प्रारंभापासूनच निघूं लागला. या ध्वनिचा पडसाद भारताच्या इतर भागाप्रमाणें सातारा जिल्ह्यांतही

वाढत्या तोलानें फोफावतच गेली आहे, हें खरें; पण राष्ट्रीय-सभेच्या जन्माबरोबर तिचें रहस्य समजून राष्ट्रीयसभेचे पाईक होण्यांत ज्यांनीं धन्यता मानली त्यांत दादासाहेबांच्या बरोबरीनें बळवंतराव सहस्रबुद्धे (सातारा) बळवंतराव कोल्हाटकर (संदेशकार अच्युतराव कोल्हाटकर यांचे दत्तक घरच वडील) व विशेषत: गोविंदराव ऊर्फ रावसाहेब लिमये (अष्टे) यांचा प्रामुख्यानें निर्देश केला पाहिजे. सातारा जिल्ह्याच्या सुख-दुःखांना आणि ध्येय-धोरणांना कोणती चार अंगें असतील तर विलायतसरकारच्या हाताला हात लावणारें हिंदुस्थान सरकार, प्रांतिक ह्मणून मुंबईसरकार, स्थानिक ह्मणून जिल्हाधिकारी या सर्वांचे कारभार व लोकांच्या ह्मणून असणाऱ्या गरजा होत. तथापि ज्या हिंदी राष्ट्राच्या ऐहिक उद्धाराकरतां राष्ट्रीयसभेचा जन्म झाला, त्या हिंदी राष्ट्राचा सातारा जिल्हा हा एक घटक असल्या कारणानें, छत्रपतीघराण्याशीं झालेल्या इंग्रजी वर्तनाला परिचित असलेला सातारा जिल्हा राष्ट्रीय-सभेचा हुकूम — ठराव — सरकारी कायद्या इतक्याच प्रामाणिकपणानें पाळणारा होणें जरूर नाहीं काय? तसें झालें तरच १९२२ सालीं वीर वामनराव जोश्यांनीं इसलाम-पूर येथील जिल्हासभेच्या अध्यक्षस्थानावरून "मराठी राज्याच्या इतिहासाचे शिवाजीपासून राजारामाच्या अंतकाळ-पर्यंतच्या काळांतलें — अनुकरण करणें इष्ट आहे" असें जें ह्मटलें होतें, तें ह्मणण्यांत कांहीं तरी तथ्य आहे. कारण "त्या देदिप्य आणि वैभवशाली कालांत ज्यांचे पिंड याच महाराष्ट्रांत पोसले गेले व ज्यांचे मर्त्य परंतु कीर्तिशाली देह याच महाराष्ट्रभूमीच्या उदरांत एकजीव होऊन गेले अशा

तत्कालीन अनेकजातींच्या व पंथांच्या लोकांमध्यें ऐक्यभाव व स्वराज्यप्रेम पूर्णपणें नांदत होतें. "

तथापि १८८५ सालीं राष्ट्रीय सभेचा जन्म झाला त्यावेळीं व पुढें जवळजवळ १९०६ सालापर्यंत राष्ट्रीय सभेचें धोरण सरकारी कारभाराच्या धोरणाशीं जुळतें घेण्याचेंच असल्याकारणानें त्या काळांत अर्जविनंत्यांचेंच साम्राज्य राष्ट्रीय सभेंत होतें ह्मटलें तरी चालेल. सूर्य कधींही न मावळेल असा इंग्लंडचा साम्राज्यविस्तार, इंग्रजी व्यापाऱ्याला लागणाऱ्याला कच्चया मालाचा पुरवठा, इंग्रजी यंत्रयुगानें निर्माण केलेल्या, लँकेशायरप्रभृति शहरांनीं उत्पन्न केलेल्या कापड वगैरे मालाचा उठाव होण्यास लागणारे बाजार, तात्पर्य इंग्रजी हितसंबंध अबाधित कसे राहतील आणि त्यांतून साधलें तर साधेल तेवढें भारताचें किंवा त्याच्या भागाचें थोडेंफार कल्याण साधून आपल्या साधुत्वाचा डांगोरा कसा पिटतां येईल, एवढेंच नागमोडी वळणाच्या इंग्रजी कारभाराचें लक्ष असल्याकारणानें, पडद्या–आडून लॉर्ड डफरीन अगर उघड ए. ओ. ह्यूम यांच्यासारख्या उदार मनस्क इंग्रजांबरोबर सगळे सरकारी यंत्रही राष्ट्रीयसभे–बद्दल प्रारंभीं सहानुभूती दाखवित असे. यद्यपि राष्ट्रीयसभेच्या जन्माबरोबर, 'देवाचें राज्य' हा इंग्रजी राज्याबद्दलचा भ्रम उतरूं लागला आणि दादाभाई नौरोजी, डिग्बी, गोखले-प्रभृतींनीं पुढें स्पष्ट ह्मणून दाखविल्याप्रमाणें परकीय राज्यामुळें हिंदुस्थानला जळवा लागल्याचा ध्वनि राष्ट्रीय सभेच्या विनम्र विनंत्यामधून प्रारंभापासूनच निघूं लागला. या ध्वनिचा पडसाद भारताच्या इतर भागाप्रमाणें सातारा जिल्ह्यांतही

१८८९ सालींच ऐकूं आला. त्या सालच्या सप्टेंबरांत ता. १७ ला दादासाहेब करंदीकरांच्या दैनंदिनींत नमूद आहे कीं " राष्ट्रीय सभेच्या चळवळीस मदत करूं नका ह्मणून कोरेगांवच्या मामलेदारांनीं खेड्यांतील अधिकाऱ्यांस सांगितलें. '

राष्ट्रीय सभेच्या अशा विनम्र पण ध्वनिक्षेपक कार्यक्रमांत सातारा जिल्ह्यानें मोठीच कामगिरी केली आहे. १८८६ पासून १९०६ पर्यंत राष्ट्रसभेला प्रातिनिधि निवडण्याच्या निमित्तानें आणि राष्ट्रसभेला जाऊन आलेल्या प्रतिनिधींचा सन्मान करण्याच्या निमित्तानें राष्ट्रसभेचें वजन जिल्ह्यांत वाढविण्याला सातारा जिल्ह्याच्या पुढाऱ्यांनीं मदत केलीच; पण संधि सांपडली तेव्हां तेव्हां दादासाहेब करंदीकरांनीं व विशेषतः बळवंतराव कोल्हटकरांनीं राष्ट्रीयसभेची माहिती करून देण्याकरतां, दौरे काढले. कृष्णाजी आबाजी गुरुजी यांचीही खटपट राष्ट्रसभेच्या प्रारंभींच्या वर्षांत मोठी जोराची आढळते. " राष्ट्रीय सभेकरतां आपण काय केलें पाहिजे? तर राष्ट्रीय सभेचें काम सतत चालावें म्हणून तालुकानिहाय ' मंडळी ' स्थापन केली पाहिजे " म्हणून पटविण्यासाठीं " तालुक्याचें गांवन् गांव " टिपण्याचें काम बळवंतराव कोल्हटकरांनीं १८८८ त केलें, दादासाहेब करंदीकरांनीं त्या सालच्या ता. १७ फेब्रुवारी रोजींच नानासाहेब वैद्यांच्या मदतीनें वाई तालुक्यांत राष्ट्रसभेचें काम करावयास ' मंडळी ' तयार केली, कऱ्हाडास २४ सप्टेंबर रोजीं तेंच काम गुरुजींनीं चांदशा काजी यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरवून केलें. राष्ट्रीयसभेनें विचारार्थ घ्यावयाच्या ठरावासाठीं सूचना करण्याचा उपक्रमही १८८८ सालापासूनच

झालेला आढळतो. त्यासालीं फ्रामजी मंचरजीचे अध्यक्षते-खालीं कृष्णराव महाजनींनीं "होमचार्जिस व मुलकी आणि न्यायखात्याच्या विभागणीबद्दल बऱ्याच सूचना केल्या होत्या." १८८९ सालापासून राष्ट्रीयसभेसाठीं वर्गणी गोळा करण्याचा उपक्रम सुरू झाला, इतकेंच नाहीं, तर त्या निमित्तानें जिल्ह्याच्या दक्षिणभागांत राष्ट्रीयसभेचा संदेश घरटीं पोचविण्याचीही व्यवस्था झाली. या संबंधांत ता. २९ जुलै १८८९ चें वृत्तसार लिहितें कीं:—"राष्ट्रीयसभेच्या संबंधानें आमचे जिल्ह्यापैकीं वाळवें तालुक्यांतील प्रसिद्ध व लोकप्रिय गृहस्थ गोविंदराव लिमये, केशवरावजी फडके, हरीभाऊ तळवळकर, पांडुरंग रावजी देसाई यांनीं वर्गणी गोळा करण्याची फारच चांगली व्यवस्था केली आहे. तालुक्यांतील प्रत्येक गांवाकडून घरापाठीमागें एकेक पैसा घेण्याची सुरवात केली आहे. पैसा घेणारा, घरवाल्यास आपण पैसा कशासाठीं देतो व यापासून उपयोग काय हें समजावून सांगतो. तसेंच प्रत्येक घरवाल्यानें तालुक्यांतून जाणारे डेलिगेटास आपली लेखी संमति दिली पाहिजे, अशी ही व्यवस्था केली आहे."

या प्रयत्नाचा उपयोग ह्मणजे वाळवें तालुक्यांतून राष्ट्रीय सभेसाठीं ३०० रु० जमले आणि इतर तालुक्यांनीं तें उदाहरण घेऊन तालुक्याच्या गांवांतच पैसे जमविले. त्यांतील प्रसिद्ध आंकडे ह्मणजे सातारा ९९, वाई ५० व कऱ्हाड ४० रुपये होत. तथापि गोविंदराव लिमये प्रभृतींचें खरें काम १८८९ च्या राष्ट्रीय सभेसाठीं प्रतिनिधी निवडण्याच्या निमित्तानें केलेली "छोट्या कॉंग्रेसची" स्थापना होय. वाळवें तालुक्यांत २४ नोव्हेंबर १८८९

अष्टें येथें सुरू झालेला हा उपक्रम १९०० सालापर्यंत मोठ्या उत्साहानें चालला होता, तरी १८९७ सालीं इसलामपुरास कऱ्हाडचे दत्तोबानाईक काळे यांच्या अध्यक्षतेखालील अधिवेशनानंतर त्यांत फारसें तेज उरलें नव्हतें. मात्र पहिलीं नऊ अधिवेशनें अशीं होतीं कीं राष्ट्रीयसभेचें काम कसें खेडेकऱ्यांना बरोबर घेऊन करावें, किंबहुना राष्ट्रांत निढळाच्या घामानें जो वर्ग अन्नादि जरूरीचीं जीवितसाधनें उत्पन्न करतो, त्याला वाचा फोडून त्याचें म्हणणें राष्ट्रीय सभेपर्यंत कसें पोंचवावें आणि राष्ट्रीय सभेंत ठरलेलें अखिल भारतीय धोरणाचें लोण शेतकऱ्यांपर्यंत कसें पोंचवावें याचा तो बिवलकरी कित्ता होईल.

या धोरणास अनुसरून संस्मरणीय झालेल्या पैकीं वाळवें तालुक्याची शिराळें येथील १८९० ची छोटी कांग्रेस होय. तिचें वर्णन थोडक्यांत असें. दोन मैलावरून पताका दिसत होत्या. "ह्यूम साहेबांचा विजय" अशीं अक्षरें सोनेरी शाईनें कमानीवर लिहिलेलीं आढळत होतीं. मुख्य पाहुण्यांस व सभाचालकांस पेशवाई थाटाचें दरबारीं आसन तयार केलें होतें. सभा ता. ३० नोव्हेंबर रोजीं भरली होती. गांवोगांवचे मुखत्यार, मुखत्यारपत्रांसह हजर होते. सुमारें दोन हजार लोक हजर होते. अध्यक्ष आप्पासाहेब देशमुख चिकुर्डेकर होते. बळवंतराव सहस्रबुद्धे यांनीं "राष्ट्रीय सभा ह्मणजे काय" हें समजावून सांगितलें. राष्ट्रीय सभेच्याद्वारां आपलीं दुःखें वेशीवर कशीं टांगावींत याचें वक्तृत्वपूर्ण विवेचन बळवंतराव कोल्हटकरांनीं केलें. आपली उन्नति करून घेण्यास इंग्रजापासून आपण काय

शिकलें पाहिजे तें गुरुजींनीं सांगितलें. " कायदे कौन्सिलांत सुधारणा झाली पाहिजे. जेथून कायदे तयार होतात तें स्थान शुद्ध झालें ह्मणजे बाकीच्या मागण्यास जोर येईल. " असें दादासाहेब करंदीकरांनीं प्रतिपादिलें. नंतर कायमधारा, १८८८ चा ७ वा कायदा जो वारसासंबंधीं झाला तो रद्द व्हावा ह्मणून मागणी आणि वाळवें तालुक्याला स्टँडिंग कमेटी ह्मणून लिमये, फडके, तळवलकर, तगारे यांची नेमणूक करून सभेचें काम संपलें.

१८९१ च्या २९ नोव्हेंबरला इसलामपूर येथें अण्णासाहेब मंत्री यांच्या अध्यक्षतेखालीं वाळवेंतालुक्याची छोटी काँग्रेस फिरून भरली आणि केशव रावजी फडक्यांनीं स्वागत केल्यावर गुरुजींनीं राष्ट्रीयसभेचें महत्त्व वर्णन करून दुष्काळासंबंधींचें भावी संकट, जंगलाच्या कायद्यापासून जुलूम, मिठावरील कर, प्राप्तीवरील कर यांविषयीं विचार मांडले. कोल्हापुरच्या श्रीपादशास्त्री देवधरांनीं देशी कपडे वापरण्यासंबंधीं ठराव मांडला. दादासाहेब करंदीकरांनीं " जमीनीचा सारा वाढत आहे याबद्दल राष्ट्रीयसभेनें विचार करावा " अशी शिफारस केली. कोंडोपंत सहस्रबुद्धे मास्तर, अष्टेकर, सुपनेकर यांचीही विषयानुसार भाषणें झालीं.

पुढील ह्मणजे १८९२ च्या बोरगांव येथील अधिवेशनांत ना. दादाभाई नौरोजी पार्लमेंटांत निवडून आले ह्मणून अभिनंदन करण्यांत आलें. पण वाळव्याच्या छोट्या काँग्रेसचें " माणिक अधिवेशन " ज्याला ह्मणता येईल तें १८९३ सालीं वाळवें येथेंच राष्ट्रीयसभेचे जनक ह्यूमसाहेब यांचे

नेतृत्वाखालीं २६ नोव्हेंबर रोजीं झालें. प्रतोद, वृत्तसार, केसरी, इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, यांच्या बातमीपत्रांचा सारांश असा देतां येईल:-

" ह्यूम साहेबांस वाळव्याच्या सभेची दाद 'इंडिया' मासिकांतून बरीच होती. दादासाहेब करंदीकर व रावसाहेब लिमये यांनीं खटपट केल्यावरून मार्गन ब्राऊन यांस घेऊन ह्यूमसाहेब आले. थोरातांच्या घरीं पानसुपारी झाली. इस्लामपूरचे मंत्री व निजामचे सरदार रायरभाराव दत्ताजीराव हजर होते. शेतकऱ्यांसह सरदार इनामदार कांग्रेसच्या कार्यास सहाय्य करीत असल्याबद्दल आपणांस आनंद होत असल्याचें ह्यूमसाहेबांनीं बोलून दाखविलें.

कांग्रेसचा मंडप कृष्णेचे दक्षिण भागास उभारला होता. क्षेत्रफळ दहा हजार चौरस फूट होतें. सातारा, वाई, तासगांव, इसलामपूर, कऱ्हाड, बेळगांव, इचलकरंजी, कोल्हापूर, पुण वगैरे ठिकाणाहून २०० मंडळी आली होती. त्यांत टिळक, गोखले, नामजोशी, आपटे, साने, कुलकर्णी, रानडे होते. ज्ञानप्रकाश, प्रतोद, विद्याविलास, वृत्तसार यांचे रिपोर्टर होते. दहा हजार शेतकरी समूह होता. रावसाहेब लिमये स्वागत करतांना म्हणाले " ही सभा राष्ट्रीयसभेचें चित्र आहे. आज जो शेतकरी येथें जमला आहे त्यावरून राष्ट्रीयसभा म्हणजे काय हें त्यांस कळलें आहे किंवा नाहीं हें कोणासही अनुमान करतां येईल.. " मग कुबेरांनीं सुचाविलें आणि देसायांनीं अनुमोदिलें तेव्हां सरदार भाऊसाहेब थोरात हे अध्यक्ष झाले. नंतर बोरगांवच्या चिटणीसांनीं राष्ट्रीय सभा शेतकऱ्यांचा फायदा कसा करते हें

कै. गोविंद धोंडदेव लिमये (अष्टे)



जन्म १८३३ मृत्यु ३-८-१९०९

कै. नानासाहेब वैद्य (वाई)



जन्म २३-१०-१८४५ मृत्यु ८-३-१९२४

सांगून ह्यूमसाहेबांस मानपत्र देण्याचा ठराव मांडला. त्याला का. व्यं. तगारे यांनीं अनुमोदन दिलें. मग वाळव्याचे लोकांचें मानपत्र गणेश हरी हर्डीकर यांनीं वाचलें. बळवंतराव सहस्रबुद्धे यांनीं सातारा जिल्ह्याचें मानपत्र वाचलें. नंतर तीं पारसनीसकृत "कीर्तिध्वज" पुस्तकासह अर्पण करण्यांत आलीं. बळवंतराव कोल्हटकरांनीं ह्यूमसाहेबांच्या उद्योगाविषयीं आवेशपर वाणीनें चांगला ग्रह उमटविला. मग ह्यूम म्हणाले "कांग्रेस श्रीमंत लोकांकरतां स्थापिली नाहीं. ती गरिबांकरितां कीं, ज्यांस खावयास पोटभर अन्न नाहीं अशांकरितां आहे...... ही सभा एक प्रकारें सरकार आहे. तिला मदत करा, कांग्रेसशीं एकनिष्ठपणानें वागत जा म्हणजे गरीब शेतकरी व मजूर यांचे दुःखनिवारणार्थ ती उपयोगी पडेल हें मी खात्रीनें सांगतों." टिळकांनीं सभेची प्रशंसा करून सांगितलें "कांग्रेस गरीबांकरितां आहे. आपल्या दुःखाचें निवारण करणारीं माणसें तिच्याद्वारें उत्पन्न होतील." नंतर साताराचे सहस्रबुद्धे, करंदीकर, व तासगांवचे नातू हे बोलले. दोघां शेतकऱ्यांनीं "महाराज आमचीं पिकें टोळांनीं खाल्लीं, आमचा सारा कमी करा;" अशी विनंति केली तेव्हां "ना. नातू कौन्सिलांत प्रश्न ठेवतील असें करंदीकरांनीं आश्वासन दिलें व लाहोर कांग्रेससाठीं दहा प्रतिनिधि निवडले."

कांग्रेसचें कार्य व धोरण बहुजनसमाजाच्या दाराशीं नेऊन पोचविण्याकरतां गोविंद धोंडदेव ऊर्फ रावसाहेब लिमये यांनीं काय परिश्रम घेतले याची सर्वसाधारण कल्पना वरील वर्णनावरून येईल. रावसाहेबांची ही पद्धति ठिकठिकाणीं इतकी पटली कीं वाळव्याच्या छोट्या कांग्रेसच्या नकला इतरत्र उठल्या

...३

१८९१ मध्यें ता, २२ नोव्हेंबर रोजीं भाऊसाहेब भागवत, विठ्ठलराव सुपनेकर वगैरेंनीं भरवलेली कऱ्हाड तालुक्याची छोटी कांग्रेस, आणि १८९२ व १८९३ सालच्या वाई येथील वाईतालुक्याच्या छोट्या काँग्रेसा या विशेष संस्मरणीय झाल्या. ५ दिसेंबर १८९२ रोजींची छोटी कांग्रेस खंडेराव सयाजीराव जाधव ( भुईंज ) यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडली आणि कांग्रेसच्या प्रतिनिधींमध्यें खंडेराव सयाजीराव जाधव यांची निवडणूक झाली. ता. ११ डिसेंबर १८९३ ची वाई-तालुक्याची छोटी कांग्रेस मात्र वाळवें तालुक्यांतील आपल्या बहिणींना शोभण्यासारखीच झाली. तीन हजार शेतकरी तिला हजर होते. इसलामपुराहून लिमये, तगारे, त्रिंबकशास्त्री रानडे, टेंभूचे किराणे, रहिमतपूरचे कान्हेरे, सातारचे प्रतिष्ठित वकील, लिंबचे आपटे, जमखिंडीचे गाडगीळ तिला आले होते. तात्यासाहेब काठावळ्यांनीं स्वागत केल्यावर बाळासाहेब नातू अध्यक्ष झाले. नातू ह्मणाले, “ तुम्हास काय हवें, हें सध्याच सरकार विचारत नाहीं. तुम्ही काय देतां, हें तें विचारतें. म्हणून तालुक्यासच काय पण प्रत्येक गांवाला अशा सभा होऊन पायरी पायरीनें वर सभा झाल्या पाहिजेत. ” मग हळब्यांनीं दादाभाई नौरोजींना मानपत्र देण्याचा ठराव मांडला. दादासाहेब करंदीकरांनीं मानपत्र स्पष्ट करून सांगितलें आणि १६ दिसेंबर रोजीं मुंबईस जाऊन महादेव वामन भट व रामचंद्र कृष्ण कोठावळे यांनीं तें द्यावें असें ठरलें. नंतर अमदाबादच्या प्रांतिक परिषदेंतील ठरावांना संमती देऊन मीठ, जंगल, कायमधारा, प्राप्तीवरील कर, हत्यारांचा कायदा,

म्युनिसिपल ॲक्ट दुरुस्ती असे मुख्य ठराव होऊन त्यावर बर्वे, सखाराम वर्धू सांवत, वे. भाऊशास्त्री देवकुळे, गंगाधरशास्त्री घाणेकर, केशवशास्त्री गाडगीळ, गणेश रामकृष्ण उर्फ भाऊसाहेब वैद्य यांची भाषणें झालीं. रिव्हिजन सर्वे, पोलिसजुल्म, राजिस्टरखात्यांत सुधारणा, वाठार स्टेशनवरील उतारूंची गैरसोय वगैरे खुद्द तालुक्यांतील गैरसोईबद्दल परचुरे, कृ. गं. रास्ते, हळबे, वाकडे, कृष्णाजी महादजी शिंदे, नरहर गोविंद रानडे, दत्तोपंत पंडित, कासम रोटीवाला, अबदुल कादर यांनीं कळवळ्यानें काय करावयास हवें तें सुचविल्यावर दाजी कृष्ण सहस्रबुद्धे यांनीं ब्रिटिश कांग्रेस काय करते याची माहिती जनतेस देऊन कांग्रेसनें ही व्यवस्था करावी अशी विनंति केली. शेवटीं नानासाहेब वैद्यांनीं आभार मानल्यावर काम संपलें.

१८९९ सालींही इसलामपूर व वाई येथें छोट्या कांग्रेसा झाल्या. त्यांना अनुक्रमें दोन व पांच हजार शेतकरी जमले. रावसाहेब लिमये आणि बेळगांवचे विष्णु रघुनाथ नातू वकील अध्यक्ष लाभले, इसलामपूर ताकारी रस्ता, कृष्णा कॅनाल वरील बागायती यासंबंधीं ठराव झाले, आणि अशा छोट्या आवृत्त्या पुढें निघत गेल्या. पण प्लेग, दुष्काळादि संकटांनीं जिल्हा ग्रासल्यामुळें सदर कामांत जें शैथिल्य आलें तें १९०७ पर्यंत टिकलें म्हणावयास हरकत नाहीं.

तथापि रावसाहेब लिमयांच्या जागृतीमार्गाचा एक परिणाम असा होऊन चुकला होता कीं तालुक्यातालुक्याला अशा छोट्या कांग्रेसा भरवून अवाढव्य खर्च व जिल्ह्यांतील तालुक्या तालुक्याच्या पुढाऱ्यांना ठिकठिकाणीं जाण्याचा तो उद्योग

करून ठेवण्यापेक्षां सबंध जिल्ह्याचीच एक "छोटी कांग्रेस" असावी व ती दरसाल फिरत्या पाळीनें तालुक्यातालुक्यांतून भरवावी. अशा तऱ्हेचा एक प्रयत्न १८९२ मध्येंच "जिल्हा-सभा" या नांवानें दादासाहेब करंदीकर प्रभृतींनीं सुरूं केला होता. त्या सभेच्या कामाचा अहवाल १८९३ साला लोकांपुढें मांडलाही होता. पण पुढें छोट्या कांग्रेसचें तालुकानिहाय स्वरूप असें ठरलें होतें कीं प्लेगदुष्काळांच्या मार्‍यानंतर साताऱ्यास १९०० सालीं प्रांतिक परिषद करतांना जिल्हासभेला आपलें अस्तित्व दाखविणें भाग पडलें. तथापि कार्याची दिशा ठरली असली तरी निष्ठेनें कार्य करणारीं माणसें न मिळाल्या कारणानें १९०४ सालीं मोठ्या उसळीनें गणपतराव फणसळकरांनीं जिल्हासभा पुनरुज्जीवित केली तरी तिला जोर लागला नाहीं.

हिंदुस्थानच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या इतिहासांत १८९५ सालचा काळ विचारजागृतीचा होता. "त्याच्या पुढचा काळ विचाराच्या घडणीबरोबर आचाराच्या चढणी-चाही आहे." या गोष्टीचा विचार केला तर छोट्या कांग्रे-सांच्या या काळांत सातारा जिल्ह्यानें राष्ट्रीयसभेची सेवा करून पुढील कार्याचा मार्ग बराच साफ केला असें म्हटलें पाहिजे. छोट्या कांग्रेसांनीं जिल्ह्यांत इतका आत्मविश्वास उत्पन्न केला होता कीं राष्ट्रीयसभेच्या मंडपांत सामाजिक परिषद भरूं द्यावयाची न द्यावयाची असा वांधा पडून पुण्यास १८९५ सालची राष्ट्रीयसभा भरते कीं नाहीं असा गोता झाला होता, तेव्हां करंदीकर लिमयांची संमति घेऊन नानासाहेब वैद्य प्रभृति वाईकर मण्डळींनीं त्या सालची राष्ट्रीयसभा

भरविण्याची तयारी दाखविल्याचा उल्लेख ता. २९ आक्टोबर १८९९ चा शुभसूचक देतो. पण या एकपरी सांगोवांगीच्या गोष्टी सोडून दिल्या तरी दुष्काळप्लेगांच्या माऱ्यांतून चेपून निघूनही १९०० सालची प्रांतिक परिषद साताऱ्यानें इतक्या यशस्वी रीतीनें पार पाडली कीं मतमतांतरांच्या सर्व लोकांनीं "सातारा ही ऐक्यभूमि आहे" असें धन्यतेचे उद्गार काढले.

---

## प्रकरण ५ वें

# "छोट्या कॉंग्रेस"च्या सुमारासच—

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत छोट्या कांग्रेसांनीं मूळ धरीपर्यंत "सार्वजनिक सभांचीं" कामें लोकजागृतीच्या दृष्टीनें आपआपल्यापरी चालूं होतींच. किंबहुना छोट्या कांग्रेसांनीं मूळ धरलें तरी स्वतंत्र वैयक्तिक प्रयत्न मुळींच थांबले नव्हते. यासंबंधांत १८८६ सालींच नमूद करण्यासारखी गोष्ट ह्मणजे मुनशी शेख वल्लद शेखचांद यांचा सातारा जिल्ह्यांतील लोकांस देशाभिमान जागृत ठेवण्याबद्दल, दारू न पिण्याबद्दल आणि बालविवाह न करण्याबद्दल उपदेश करीत करीत जो दौरा काढला तो. शिवाय "खर्च कमी करण्यासारख्या बाबी दाखल करून" साताऱ्च्या सार्वजनिक सभेनें त्याचसालीं फिनॅन्सकमेटीकडे अर्ज पाठविला, डेक्कन कॉलेज बंद न करण्याबद्दल अर्ज पाठविला आणि लायसेन्स

टॅक्सपेक्षां इन्कमटॅक्स फाजील असल्यामुळें सातारा, जावली, वाई, कोरेगांव इकडून तक्रारी आल्या होत्या त्या योग्य अधिकाऱ्यांकडे धाडल्या. पुढीलसालीं लोकांच्या अंगीं बराच धीटपणाही आलेला दिसतो. कऱ्हाड तालुका सडकेच्या कडेवर असलेल्या झाडांची मालकी रयतेची आहे असें सातारा कलेक्टरच्या नं. ८२ ता. १४ आक्टोबर १८६५ च्या ठरावानें सिद्ध असतां सरकार आपलीं झाडें ह्मणूं लागलें ह्मणून कऱ्हाडकरांनीं विदूषकांतून कलेक्टरास नोटीस दिली. १८८८ सालांत तर साताऱ्च्या वक्तृत्वोत्तेजक सभेनें चढाओढीकरतां "राष्ट्रीय सभा" हा एक विषय ठेवला होता, मग मिठावरील जास्त वाढलेल्या कराबद्दल सातारा व वाई येथील सार्वजनिकसभांनीं दाद मागितली असली तर तें साहजिकच नाहीं काय? १८८९ सालीं अधिकाऱ्यांची गैरमर्जी राष्ट्रीयसभेवर फिरली, म्हणूनच श्रीमंत नारोविठ्ठल घाट्यांनीं कऱ्हाडास कृष्णाजीपंत गुरुजीस आणवून त्यांचे चांदशा मनेशा काजी यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय सभेवर व्याख्यान करविलें, हेंही पुष्कळ दृष्टींनीं बोधप्रद उदाहरण आहे.

१८८७ सालीं विदूषकांतून कलेक्टरास नोटीस देऊन आणि कायदेशीर हातपाय हलवून, सडकेकडेचीं झाडें कऱ्हाडकरांना राहिलीं नाहींत तीं नाहींतच. या कटु अनुभवानें शहाणे होऊन ठिकठिकाणचीं जप्त केलेलीं गायरानें परत मिळावी म्हणून दाद मागण्याकरितां १८९१ च्या आगष्ट महिन्याचे शेवटच्या आठवड्यांत कऱ्हाड, पाटण वगैरे तालुक्यांतून हजारों शेतकऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी कलेक्टरसाहेबांच्या बंगल्या-

भोंवती जमा झाल्याचे ता. ४ सप्टेंबरचा १८९१ चा शुभसूचक नमूद करतों.

असल्याही प्रयत्नाला धूप मिळत नाहीं म्हटल्याबरोबर साहजिकच स्वावलंबनाकडे कल वळतो. पण दुबळ्यांच्या स्वावलंबनाला यश कशाचें ? हें ज्यांच्या लक्षांत आलें, ते बहात्तर रोगांवरील एक रामबाण औषधाचा प्रयोग करून पाहतात. त्याप्रमाणेंच कॉंग्रेसची कास धरल्यावरच आपलें कल्याण होईल अशी लाट त्यावेळीं जिल्ह्यांत उत्पन्न झालेली आढळते. म्हणूनच हिंदुमुसलमानांचे दंगे इतरत्र बोकाळले असतां, सातारा जिल्ह्यांत तो झोत फारसा शिरला नाहीं. उलट, १८९० चे राष्ट्रीय सभेला २०० मुसलमान प्रतिनिधी हजर होते, त्याबद्दल पत्रकारांनीं आनंद प्रदर्शित करून, " हिंदुमुसलमानांचें ऐक्य अशा सभा प्रत्येक शहरीं झाल्यास वृद्धिंगत होईल. " असें मत प्रगट केलें होतें. तेव्हां वाईचे दाऊदशा काजी हे राष्ट्रीय सभाभक्त झाले यांत नवल नाहीं. पण १८९१ च्या राष्ट्रीय सभेस गेलेल्या मुखत्यारांना ३१ जानेवारी १८९२ रोजीं साताराच्या घाटे थिएटरांत पानसुपारी झाली त्यावेळीं " कृ. आ. गुरुजीस मुसलमान मित्रांनीं रुप्याचें पदक लावलेला बनातीचा डगला दिला. " १८९२ च्या राष्ट्रीयसभेला दत्तोपंत पारसनीस प्रतिनिधी म्हणून गेले होते. त्यांनीं १० फेब्रुवारी १८९३ रोजीं आपलें " कांग्रेसचें व विशेष स्थलांचें वर्णन " प्रसिद्ध केलें, तेंच राष्ट्रीय सभेवरील सातारा जिल्ह्यांतील पहिलें प्रकाशन होय. शांतवृत्ती पारसनीसांच्या राष्ट्रीयसभेसंबंधींच्या आदरानें पुढील सालीं असा एक दृश्य परिणाम घडवून

आणली कीं १८९३ च्या राष्ट्रीयसभेहून करंदीकर, सहस्रबुद्धे, पारसनीस ही मंडळी परतल्यावर १४ जानेवारी १८९४ रोजीं त्यांना शिवाजीक्लबतर्फें जशी पानसुपारी झाली, तसेंच २१ जानेवारी रोजीं हिंदुमुसलमानांनीं मानपत्रही दिलें. १८९५ सालीं २६ जानेवारीस खानसाहेब वल्लीसाहेब खतीब यांनींच पुढाकार घेऊन साताऱ्यास राष्ट्रीयसभाप्रतिनिधींचें स्वागत केलें आणि एप्रिलमध्यें सातारा डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डानें टिळकांसच मत दिल्यामुळें लोकमान्य मुंबईकायदेमंडळांत निवडून आल्यावर आगष्टमध्यें त्यांना मानपत्र देतांना आपल्या जमातींनिशीं खतीबांनीं मोठ्या प्रेमानें भाग घेतला. कऱ्हाडास हसन मुजावर प्रभृती मुसलमान पुढाऱ्यांनीं तर गणपतींच्या पालख्या आपल्या खांद्यावरून, एक नव्हे, दोन नव्हे, पांच साल मशीदविरून नेल्या. हीच सर्वसाधारण दिलजमाईची वृत्ति हिंदुमुसलमानांमध्यें जिल्हाभर नांदत असल्याकारणानें भाऊसाहेब, सोमण रहिमतपूर येथील जिल्हासभेच्या अध्यक्षस्थानावरून मोठ्या अभिमानानें म्हणाले कीं, "सातारा जिल्ह्याचा एकीच्या व समेटाच्या बाबतींत जो पूर्वापार लौकिक आहे तो लक्षांत घेतां ब्राह्मण-ब्राह्मणेतर, हिंदु-मुसलमान व मागासलेले आणि पुढारलेले असल्या शुष्क प्रश्नास आमच्या जिल्ह्यांत मुळींच थारा मिळणार नाहीं"

छोट्या कांग्रेसांचें कार्य आणि सार्वजनिक सभांचें अगर. वैयक्तिक जबाबदारीवरील प्रगतिकार्य चालू असतां १८९५ सालीं या सर्व कार्याला संघटनक्षमतेची दिशा लागली. ता. ७ एप्रिल रोजीं नानासाहेब रास्ते यांच्या अध्यक्षतेखालीं वाई येथें सार्वजनिक सभा भरून समकालीन परीक्षेबद्दल पार्लमेंटास अर्ज करणें,

पुण्यास होणाऱ्या कांग्रेसला द्रव्यद्वारा मदत करणें व जंगल-संबंधीं झालेल्या ठरावांची लोकांस समजूत करून देणें हे विषय सर्वानुमतें पास झाले. त्यावेळीं पुणें सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी विष्णु हरी करंदीकर मुद्दाम आले होते. त्यांनीं जिल्ह्यांतील राष्ट्रीयसभेच्या प्रेमाबद्दल धन्योद्गार काढले, इतकेंच नव्हें तर पुढें ता. ३ आक्टोबर १८९५ रोजीं साताऱ्यास लोकमान्यांचें "राष्ट्रीयसभेची तयारी" म्हणून व्याख्यान झालें त्यावेळीं त्यांनींही राष्ट्रीयसभानिष्ठ सातारा जिल्ह्याबद्दल धन्योद्गार काढले.

याचें अपेक्षित पर्यवसान बुधवार ता. १८ डिसेंबर १८९५ रोजीं पहावयास मिळालें. त्या दिवशीं वाई, कऱ्हाड, वाळवें, जावली, कोरेगांव वगैरे ठिकाणाहून सातारा येथें वाड्यापुढील पटांगणांत म्हैसाळकर सर्कसच्या भव्य तंबूंत पुण्यास म्हणजे महाराष्ट्राच्या हृदयस्थानांत भरणाऱ्या कांग्रेसला जिल्ह्यातर्फें पैसा व प्रतिनिधी पुरविण्याचे उद्देशानें कृष्णराव महाजनी यांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली. त्या सभेंत दत्तो कृष्ण जोशी यांनीं स्वागतपर भाषण केल्यावर गणपतराव फणसळकर वकीलांनीं असा ठराव मांडला कीं साताऱ्यास जिल्ह्याची स्टँडिंग कमेटी ठेवून तिच्या तालुका निहाय शाखा ठेवाव्यात. सदर ठरावानंतर करंदीकर, घाणेकर, सहस्रबुद्धे, दिवेकर वकील, नजमुद्दीन बोहरी, रे. कासमभाई यांची राष्ट्रीय सभेच्या महत्वावर भाषणें झालीं. नंतर तात्यासाहेब केळकरांनीं पुण्याच्या राष्ट्रीय सभेस निवडलेल्या सव्वाशे प्रतिनिधींचीं नांवें वाचून दाखविलीं.

अशा प्रकारें सर्व बाजूंनीं उत्तेजक वातावरण असल्यामुळें

या वेळीं जी नवीन मंडळी पुढें आली त्यांत गणपतरावजी फणसळकरांच्या बरोबर ना. कृ. आगाशे, घाणेकर, पांडुआण्णा शिराळकर, सुपनेकर वकील, वगैरे मंडळी आढळतात.

म्हैसाळकरांच्या सर्कसतंबूमध्यें झालेली सभा ही पुढें झालेल्या जिल्हा सभांचा जसा श्रीगणेशायनमः होता, तसाच नव्या दमाची मंडळी कांग्रेसच्या कार्याला येऊन मिळण्याचा तो काळ होता. म्हणूनच सुपनें–रेठरेभागांतून पांडुआण्णा शिराळकर कांग्रेस फंड जमा करून आल्यावर कऱ्हाडास भाऊसाहेब भागवतांनीं जसे धन्योद्गार काढले तसे इतर ठिकाणच्याही दूरदृष्टी पुढाऱ्यांनीं खात्रीनें काढले असतील.

---

## प्रकरण ६ वें

# स्वावलंबनाचीं वळणें

हिंदुस्थानवरील परकीय अंमल हा सर्व बाजूंनीं शोषण करीत आहे, इतका कीं स्वाभिमानी माणसाला स्वावलंबनानें हें शोषण थांबविण्याचा प्रयत्न केल्याशिवाय गप्पच राहवूं नये. याची जाणीव जिल्ह्यांत हळूहळू होत होती. तोंच लोकमान्यांनीं १८९६ सालीं शिवाजी–गणपती–उत्सव सुरू करून त्या जाणिवेस तोंड फोडलें. सातारा, कऱ्हाड, वाई येथें गणपतीचे मेळे व उत्सव जोरांत झाले. पोलिसांची विशेष कटकट काय ती कऱ्हाडासच झाल्याचें २४ सप्टेंबरचा

चित्रगुप्त म्हणतो. पण स्वावलंबनाची शिडी उभारली पाहिजे ही घोषणा इसलामपुरास ता. २९ नोव्हेंबर रोजीं जिल्ह्यानें केली.

त्यादिवशीं 'गणपतराव फणसळकर वकीलांचे अध्यक्षतेखालीं वाळवे तालुक्याची छोटी कांग्रेस भरली होती. तींत गोरक्षण, जमीनीवर वाढलेला सारा, इन्कम्टॅक्स, दुष्काळस्थिति, जंगलखातें, वारणाव्हॅली रस्ता व ताकारी रस्ता, सुरूंगीदारूच्या परवान्याचा हक्क, राष्ट्रीसभेपासून फायदे, वगैरे विषयावर पांडुरंग कृष्ण पंढरपुरे ( कऱ्हाड ), कुबेर, सदाशिवराव ", नारायण रामचंद्र घमंडे ( पुणें ), रावसाहेब लिमये, रामचंद्र नारायण कशाळकर, बाळाजी दामोदर हसबनीस, गोविंद लक्ष्मण देसाई यांनीं जीं भाषणें केलीं तीं सर्व स्वावलंबनाचाच पाठ देणारीं आहेत. तथापि त्या हजारबाराशें समुदायाला देसाई आणि कुबेर यांनीं कांग्रेसचें काम वर्षभर चालविण्यासाठीं "कायमफंडाची व्यवस्था" केली पाहिजे ही जाणीव जी करून दिली तीच विशेष महत्त्वाची होय.'

तथापि १८९७ पासून स्वावलंबनाचें पाऊलच पडलें. तासगांवचे रामचंद्र विनायक कुलकर्णी यांनीं "सार्वजनिक काम करावयाचें नाहीं अशी वरिष्ठाची तंबी" मिळाल्यामुळें कुलकर्णीपणच सोडलें. या सालची प्रांतिक परिषद साताऱ्यास भरावयाचें ठरलें होतें. आणि ती झाली असती तर स्वावलंबी चळवळीचा प्रश्न कदाचित् त्यासालींच उचल खाता. पण प्लेग दुष्काळांनीं सतावल्यामुळें तें शक्य झालें नाहीं. तरी जिल्हासभा ऊर्फ शुभसूचक ( ३-१२ ) म्हणतो त्याप्रमाणें डिस्ट्रिक्ट कांग्रेस कमेटीचे प्रचारक म्हणून

नारायण रामचंद्र घमंडे हे कांग्रेसच्या प्रचारासाठीं ( सातारा तालुक्यांत ) हिंडूं लागले. प्लेग दुष्काळामुळें १९०० सालीं भरवावी लागलेली प्रांतिक परिषद संपताच दुसरें दिवशीं म्हणजे सोमवार ता. १४ मे रोजीं विष्णु गोविंद विजापूरकर यांचें " राष्ट्रीय शिक्षण " या विषयावर व्याख्यान सकाळीं झालें तर दुपारीं काळकर्ते परांजपे यांचें आगव्यांच्या राममंदी-रांत दुपारीं पुराण व सायंकाळीं शिवाजीक्लबांत " धर्म " या विषयावर व्याख्यान झालें. तीनही प्रवचनांचा निष्कर्ष म्हणजे स्वावलंबनाशिवाय मोक्ष नाहीं, मग तो ऐहिक असो कीं पारमार्थिक असो; आणि ऐहिक मोक्षाशिवाय म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्याशिवाय पारमार्थिक मोक्ष फोल होय, असाच होता.

पण आतां आकाशांत निराळेच ढग जमूं लागले. " कऱ्हाड तालुक्यांतील शेतसारा गैराशिस्त वसूल झाला व त्याचा दोष सरकारनें तांबेकारकुनाच्या माथीं मारला " अशी बातमी आगष्टमध्यें पुण्याच्या " मराठा " वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. त्यासुमारासच दत्तोपंत सुपनेकर वकील प्रभृतींनीं त्याचा छडा लावावयास सुरवात केली होती. तों तसल्याच रोगाचें एक गळूं १९०१ सालच्या जुलैच्या आरंभीं वाळवे तालुक्याच्या अंगावर फुटलें. ता. १२ जुलैचा शुभसूचक लिहितो कीं, " वाळवें तालुक्यांत जमिनीच्या साऱ्याची बाकी बरीच थकली आहे. पण अलिकडे त्या बाकीचा निकाल झपाट्यानें होऊं लागला आहे. सारा लवकर भरला नाहीं तर जमीन खालसा होईल अशी दवंडीही पिटण्यांत आली आहे. " त्यावर प्रतोद टीका करतो कीं " नवीन दुरुस्तीचा हा पूर्वरंग नव्हे काय ? "

हा पूर्वरंग ज्या संकटाचा होता तें संकट म्हणजे मुंबई-सरकारचें लँड रेव्हेन्यूबिल होय. लॉर्डकर्झन यांनीं हिंदी माणसाची सरासरीनें वार्षिक प्राप्ती वीस रुपयांची असल्याचें बोलून दाखविलें असतांही लँडरेव्हेन्यूबिलाचा तडाखा शेतकऱ्यांच्या डोक्याची सालडी सोलून काढण्याइतका कठोर आहे म्हणून अभ्यासू समाजसेवकांनीं सरकारकडे मेमोरँडमें धाडलीं. दत्तोपंत सुपनेकरांनीं कऱ्हाड तालुक्यांतील सर्व गांवच्या शेतकऱ्यांची सभा भरवून सरकारकडे शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींच्या सह्यांनीं मेमोरँडम धाडलें. ता. २१ जानेवारी १९०१ रोजीं फ्यामिन कमीशन पुढें बाळाजी दामोदर हसबनीस यांची साक्ष झाली. तींत भीति दाखविल्याप्रमाणें १९०१ चा जून व जुलै महिना तर सबंध जिल्हाभर लँडरेव्हेन्यूबिलाचा शंख सारखा वाजत होता. सांगाव ( वाळवें ), दुधगांव, लिंब येथून तीस तीस पन्नास पन्नास सह्यांचे अर्ज सभा भरून नंतर रवाना झाले. शिराळ्याला भवानराव देशमुख, साताऱ्याला वासुदेवराव थत्ते यांनीं कायदेकलमांचा कीस काढून लोकांतर्फे टाहो फोडला, पण सरकारच्या कानठिळ्या बसल्या असल्या कारणानें कशाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. गुजराथेंतील साऱ्याबाबत ना. परेख यांची कामगिरी अभिनंदनीय झाली होती. तिचें अभिनंदनही ता. १० फेब्रुवारी १९०१ रोजीं रा. ब. पाठकांचे अध्यक्षतेखालीं सातारकरांनीं केलें होतें आणि म्हणूनच मोठ्या आशेनें ते यावेळीं चळवळ करीत होते; पण १८९९ सालीं डिसेंबरच्या १२ तारखेपासून "म्युनिसिपल बिलानें फेरफार किती पिछेहाटीचे केले आहेत" हें विशद करण्यास

घाणेकर वकीलांनीं सुरवात केल्यापासून सव्वा वर्ष चळवळ होऊन जन्मबहिऱ्या पुढील सारंगी वादनाचा जसा प्रकार झाला, अगदीं थेट तोच नमुना, " मेथा प्रभृती लोकबाजू मांडणाऱ्या सभासदांच्या " सडेतोड विचारसरणीसही न जुमानतां रेव्हेन्यू बिल पास करण्याची घाई उडवून मुंबईसरकारनें केला. तेव्हां अर्थातच गुरुवार ता. ५ सप्टेंबर रोजीं वाई, कऱ्हाड प्रभृति तालुक्यांतून लोकांचे मुखत्यार जमून घाटे यांचे थिएटरांत डॉक्टर वासुदेवराव थत्ते यांचे अध्यक्षतेखालीं सरकारच्या कृत्याबद्दल नापसंती दर्शविण्यांत आली.

याच सुमारास तासगांव तालुक्यांत " उस्सेबी जादा " प्रकार चालूं होता. १९०१ चे ह्मणजे प्लेगचे कहराचे दिवस होते ते. माणसें बाहेर काढून घरें रिकामीं करण्याचा आणि लोकांच्या वनवासाबद्दल डोळेझांक करण्याचा सुकाळ नोकरशाहीनें चालविला होता. तासगांवला त्यावेळीं बळवंत गोविंद केळकर मामलेदार होते. अधिकाराच्या तोऱ्यांत माणुसकीचा मागमूस सांपडेना तेथें. तेव्हां रामभाऊ कुलकर्ण्यांनीं मुंबईच्या गव्हर्नरापर्यंत सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना पंधरा तारा ठोकल्या. शेवटीं लॉर्ड कर्झन यांनाही दोन तारा दिल्या. तेव्हां १९०२ च्या जून १६ तारखेपर्यंत सर्व सोपस्कार होऊन सदर मामलेदारांनीं रामभाऊ कुलकर्ण्यांची लेखी माफी मागितली.

एवढ्यावरूनच शहाणपणा शिकला, तर ती नोकरशाही कसली ? १९०३ सालीं असलाच एक प्रकार झाला असतां पण भाऊसाहेब भागवतांच्या चतुराईनें " आग तर

झाली पण बोंब मारायची सोय नाहीं " अशी नोकरशाहीची स्थिती झाल्याचें विदूषक वर्णन करतो. त्या प्रसंगाचें वर्णन २३ मार्चचा प्रतोद देतो तें असें " प्लेगच्यावेळीं घरें सोडून गेले नाहींत या आरोपावरून कऱ्हाडच्या आठ इसमांवर ' नमुन्या ' दाखल फिर्यादी देण्याबद्दल मि. चक्रवर्ती आसि. कलेक्टर यांणीं फर्माविलें होतें. परंतु सदर साहेब व मामलेदार यांखेरीज करून सर्व सभासदांनीं ' खर्च म्युनिसिपालिटीनें द्यावा ' असा ठराव केला.

अशा प्रकारें सहानुभूतिशून्य नौकरशाही आणि संकट–ग्रस्त जनता यांचा कलह चालला असतां मिठावरील कर दरमणी आठ आणे कमी केल्यानें आणि इन्कमटॅक्स हजाराचे आंत उत्पन्न असणारांना कमी केल्यामुळें, थोडासा जीव आल्यासारखें प्रजेला वाटलें. त्यांत ता. ३० मार्च १९०३ रोजीं सातारा युनियन क्लबचें मानपत्र घेतांना प्रो. रमेशचंद्र दत्त यांनीं खालीलप्रमाणें पाणी शिंपलें. त्यायोगें प्रजेला थोडी टवटवी आल्याशिवाय राहिली नाहीं. ते म्हणाले, " आमचें राष्ट्र चार हजार वर्षांचें आहे. आपली पूर्वी वाङ्मयांत, कलांत व शास्त्रांत पूर्ण प्रगति झालेली होती. आपलें राष्ट्र आजही मृत नाहीं. त्यास धुगधुगी आहे. व त्याचा जोम जशाचा तसा आहे. जसा आपण पाश्चिमात्य शिक्षणाचा व सुधारणेचा फायदा घेऊं तसें आशेस भरते येत आहे. "

स्वावलंबनाच्या कल्पवृक्षाशिवाय दुसरा इलाज नाहीं अशी दिवसेंदिवस खात्री पटविणाऱ्या घडामोडी होत असतां " कष्टेंविण फळ नाहीं " या समर्थ शिकवणीचा सातारा जिल्हा स्वस्थ कसा बसणार ? गुरुवार ता. ८

सप्टेंबर १८९२ रोजींच "देशी कापड वापरण्याचा निश्चय करावा व देशी कापडाचें एक दुकान वाईस स्थापन करावें म्हणून कोल्हापूरचे गणपतराव भुसारी यांनीं नानासाहेब गाडगीळ यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरवली होती. बळवंतराव कोल्हटकरांनीं परिणामकारक भाषण केल्यावर ५।५ रुपयांचे ६०० शेअर्स काढावयाचे ठरून तात्यासाहेब गाडगीळ खजीनदार नेमले. ९४ शेअर तावडतोब खपले." तथापि पुढें त्याला यावें तसें बाळसें न आल्या- कारणानें फिरून जिल्हाभर प्रयत्न करण्याची कल्पना दादासाहेब करंदीकरांस आली. १९०४ चे मे महिन्यांत पैसाफंड काळयांचा " राष्ट्रीय फंडासंबंधींचा " दौरा जिल्ह्यांत झाला, त्यानें करंदीकरांच्या कल्पनेचें मूळ खोल रुजलें. तत्राप त्या दौऱ्यापूर्वीच दादासाहेबांनीं स्वावलंबनाच्या शाखेपैकीं स्वदेशीचें बीं पेरावयास सुरवात केली होती. ता. २४ एप्रील १९०४ रोजीं शिवाजीक्लबाच्या शिवाजी उत्सवांत रा. ब. पाठकांच्या हस्तें एक प्रदर्शन उघडवून करंदीकरांनीं जाहीर केलें कीं "२० रुपये 'कळक अगर बांबूचा उपयोग' या विषयावर उत्तम निबंध लिहिणारास, ८० रुपये 'अति उपयोगी पण स्वस्त' अशा निरनिराळ्या वस्तु पाठविणारास आणि १०० रु. केळीच्या सोपटाचे कापड तयार करणारास, व गुळापासून साखर तयार करण्याच्या जुन्या पद्धतीस अनुसरून एकादी सोपी कृती शोधून काढणारास बक्षीस देऊं केले आहेत."

शंभर रुपयांचें बक्षीस देऊनही साखरेबाबत कांहीं झालें नाहीं, तरी फिरून दादासाहेबांनीं १९०५ सालीं

कै. दादासाहेब करंदीकर



जन्म २१-८-१८५७ मृत्यु २४-४-१९३५

दादाभाई नौरोजी



कै. बळवंतराव सहस्रबुद्धे



जन्म १८४८ मृत्यु ४-७-१९०४

ग्रंथ संग्रहालय

तीनशें रुपये देऊं केले. भरीला " वंगभंगरद्दीच्या " चळवळीं-तून उत्पन्न झालेल्या सर्वच सूक्तासूक्त मार्गाची छाया यावेळीं देशावर पडली असल्याकारणानें त्या छायेंतून सातारा जिल्हाही सुटून राहिला नाहीं. गणपत्युत्सवांत स्वदेशीवर व्याख्यानें बहरलीं त्यांत ता. ११ सप्टेंबरचे गणपतराव फणसळकरांचें व्याख्यान हृद्य आहे. 'सत्यविजय' समाजांतील मुलांस त्यावेळीं निर्भेळ स्वदेशी टोप्या देण्यांत आल्या. त्याच्या आदलेंच दिवशीं तासगांवीं माधव रघुनाथ कुलकर्णी हें स्वदेशीच्या प्रसारासाठीं सभा स्थापून श्रीनिवास लक्ष्मण चिपाडे यांचे अध्यक्षतेखालीं " बंगालला सहानुभूति " म्हणून ठराव करून बसले होते. गुरुवार ता. २६ आक्टोबर रोजीं विद्यार्थ्यांनीं स्वदेशीव्रत कसें आचरावें हें सांगण्यासाठीं कऱ्हाडास हाटकेश्वरमंदिरांत बहुलेकर वकीलांचे अध्यक्षतेखालीं आण्णासाहेब धोपाट्यांनीं व्याख्यान दिलें. पण वंगतरुणांशीं सहानुभूति प्रगट करण्याच्या बाबतींत जो हातचा राखून कारभार चालला होता, त्याचा खुंटन् खुंट कळंबे मास्तरांनीं साफ काढून टाकला. तरीपण बाळकृष्ण भाऊ जोशी, कळंबेमास्तर वगैरे 'ट्रेन्ड' तरुणांच्या उग्र तेजाचें कौतुक बहुलेकर वकीलांना वाटलें आणि म्हणूनच पुढें त्यांनीं, पांडुअण्णा शिराळकरांची स्वदेशी कारखान्याची कल्पना व्यवहारास लावली.

सदर म्हणजे आक्टोबरचे शेवटचे आठवड्यांतच वाई, खटाव, सोनी वगैरे ठिकाणीं स्वदेशीसंबंधीं सभा झाल्या, इतकेंच नव्हे तर त्या महिन्याचे पहिले तारखेस कोरेगांव येथें कुस्त्यांचा फड असल्याकारणानें त्यावेळीं स्वदेशीवर

व्याख्यान देण्यासाठीं दादासाहेब करंदीकरांना लोकांनीं पत्र (ता. २९-९) घालून नेलें होतें. साताऱ्यास त्यापूर्वी १७ सप्टेंबरला वामन गणेश घाणेकर, रामचंद्र गोपाळ राजोपाध्ये, वामन अनंत भिडे, परशुराम गंगाराम मारवाडी, विष्णु गणेश डिंगणकर, विष्णु लक्ष्मण रांगोळे यांनीं, व्यापाऱ्यांनीं देशी कापडच, आणावें म्हणून सभा भरविली आणि भगवानदास नरोत्तमदास गुजर यांनीं वरील मंडळींना पत्रानें लेखी संमति दिली.

मँचेस्टर—लँकेशायर येथून येणारे कापडावरील बहिष्कारानेंच जिल्ह्यातील स्वावलंबनवृत्तीचें समाधान त्यावेळीं झालेलें दिसत नाहीं. कऱ्हाड येथील बाबूराव अंगापूरकर प्रभृतिमंडळीनीं कांहीं माग आणविण्याची खटपट केली होती. तासगांवास मि. एकसंबेकर हे माहितगार गृहस्थ भांडवल मिळेल तसें साबण, मेणबत्त्या, आगपेट्यांचा कारखाना काढूं पहात होते. पण १८९९ पासूनच विद्यास मोरेश्वर विष्णु जोगळेकरांनीं शाईचा कारखाना यशस्वी केला होता आणि साताऱ्यास डॉक्टर सदाशिव रामचंद्र गोखले यांचा साबणाचा कारखाना चालल्यामुळें ते ता. ७ नोव्हेंबर १९०५ च्या बेतात मेंथाल तयार करीत होते.

"इंग्रजांनीं शिकवलेले इतिहासावरून अनुमानिलेले हे स्वदेशीच्या योगानें बहिष्काराचे मार्ग" कितीही अता हितकारक असले तरी, अंतरींची जाणीव बरीक ही की, जिल्ह्याचा शेतकरी म्हणजे जिल्ह्याचा प्राण, तो स्वावलंबी व सुखी झाला पाहिजे म्हणून दादासाहेब करंदीकरांनीं गणपतरावजी फणसळकरांच्या सहकार्यानें तालुकानिहाय शेतकरी

सभा १९०४ च्या मे २४ पर्यंत स्थापल्या, त्यांत कऱ्हाडची शेवटची होय. त्यावेळीं "शेतकीची सुधारणा करण्याबाबतच नव्हे तर शेतकऱ्याला स्वावलंबी करण्याच्या कामीं या सभेच्या द्वारा मी सेवा करीन." असें भाऊसाहेब भागवतासारख्या वृद्ध गृहस्थानें सांगतांच "चळवळीला मूठभर मांस चढलें." कारण १९०४ सालीं राष्ट्रीय सभा मुंबईस व्हावयाची असल्यामुळें "ती बरोबर शेतकी व औद्योगिक प्रदर्शनेंही व्हावयाचीं होतीं. त्याप्रीत्यर्थ ना. ह. शि. दिक्षीत आल्यावेळीं जिल्ह्यांत वर्गणी जमवून दिली होतीच. पण शिवाय डिस्ट्रिक्ट असोसिएशनची स्थापनाही झाली होती."

अशा प्रकारें सातारा जिल्हा स्वावलंबनाच्या निरनिराळ्या पुस्त्या व वळणें काढीत असतांच "औद्योगिक परिषदेच्या स्थापनेनें मंकरसंक्रमण साजरें करण्याबद्दलचे विचार" वातावरण भरून आणि भारून टाकूं लागले.

प्रकरण ७ वें

# शेतकरीसभा व स्वदेशी.

लिटनशहानें ऐन दुष्काळांत केलेले दरबार आणि अकारण लढायांचे खर्च यांच्यामुळें शेतकरी बंड करावयास केव्हां उठेल याचा नियम नाहीं, असे कांग्रेसच्या जन्माअगोदर ह्यूम साहेब उद्गार काढीत असत असें ह्यूमचे चरित्रकार वेडर्नबर्न यांनीं नमूद केलें आहे. घरोघर शेतकरी ज बोलतो तेंच आपण बोलून दाखवितों, असा ह्यूमसाहेबांचा आपल्या आक्षेपकांना आहेर असे. "राजकारणा" च्या अंतीं 'रण' आहे आणि ती 'रण' वृत्तीच शेतकऱ्यांतून ह्मणजे बहुजन समाजातून मारून टाकण्याचें काम राष्ट्रीयसभेनें आणि तिच्या निमित्तानें ह्यूमसाहेबांनीं केलें अशीं एक आत्यंतिक टीकाही प्रसिद्ध आहे. तिच्यावर भाष्य करण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि शेतकऱ्यांची संघटना करून, त्यांच्या हितसंबंधाबद्दल व प्रगतिबद्दल दक्षता बाळगून कालानुरूप आपला जीवनसंग्राम त्यांना यशस्वीपणानें करतां आला पाहिजे, हें ह्यूमचे उद्गार आणि त्यांचे टीकाकारांचें मन या दोहोंसही सारखेंच प्रमाणभूत असलेलें सत्य होय. हिंदुस्थानचा स्वातंत्र्यसंकोच ह्मणजे सामाजिक, औद्योगिक, आर्थिक सर्वतऱ्हेचें शोषण होय हें ठरल्यानंतर, तें शोषण थांबविण्यासाठीं स्वायत्ततेशिवाय उपाय नाहीं हें वंगभंगानंतरच्या अश्रुतपूर्व आंदोलनाबरोबर १९०५ च्या राष्ट्रीयसभेंत ना. गोखले यांनींच जाहीर केलें होतें. पण १९०६ सालीं

कलकत्त्यास स्वायत्ततेचा स्पष्ट अर्थ स्वराज्य आणि त्याच्या संपादनाचे मार्ग म्हणून स्वदेशी बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण असें राष्ट्रीय सभेनें ठरविलें. स्वावलंबन धर्माची हीं राजकीय वेदांगेंच त्यासालीं मानलीं जात. यांत शेतकरी आणि त्याच्या श्रमावर जगणारा समाज तयार पाहिजेत हें जाणूनच तरुण राष्ट्रीयपक्ष देशांत हातपाय हलवीत होता. १९०४ पासून दादासाहेब करंदीकरांनीं जे शेतकरी संघ स्थापन केले, ती त्यांतीलच एक चाल होती.

जावली तालुक्यानें शेतकीसभेचें कार्य अभिनंदनीय उत्साहानें केलेलें आढळतें. १९०६ च्या ११ नोव्हेंबरला जावलीची शेतकी सभा ८०० शेतकऱ्यांची झाली. नारायण गंगाधर देशपांडे हे जावली तालुक्याच्या शेतकीसभेचे स्वयंसेवक असल्याकारणानें, १९०७ च्या आक्टोबर १३ ला म्हसवें येथें दत्तात्रय काशीनाथ महाबळेश्वरकर यांच्या अध्यक्षतेखालीं आणि १९०८ च्या ५ एप्रिलास कसबें-कुडाळ येथें दादासाहेब करंदीकरांच्या अध्यक्षतेखालीं जीं जावलीच्या शेतकऱ्यांचीं अधिवेशनें अपूर्व उत्साहानें झालीं त्यांचें सर्व श्रेय देशपांडे यांनीं जागृति केली होती तिलाच आहे. या जागरूकतेच्या संग्रहीं गांववार कसें टिपण साधलेलें असें, हें येथें दाखविण्यासारखें आहे. १९०७ ला अहमदाबादेस शेतकी प्रदर्शन झालें. त्यानिमित्त जिल्हा सभेनें आपलें पहिलें वहिलें कार्य म्हणून जिल्ह्यांतून माहिती मागविण्याकरतां दादासाहेब करंदीकर व गणपतराव फणसळकर यांच्या सहींनीं एक ३६ प्रश्नांची यादी पाठविली होती. तासगांव व जावली तालुक्यांतूनच गांववार व डोळस माहिती

आली, तिचा नमुना अभ्यासूसाठीं देतों. "माहिती कामगार पाटील–कुलकर्णी यांचे हातून लिहून घेऊं नये" असा जिल्हा सभेचा दंडक होता. तेव्हां तासगांवांत रामचंद्र विनायक कुलकर्णी व जावलींत नरहरपंत जोशी खर्शीकर यांनीं माहिती मिळविली. हा एक नमुना पहा—

"कसबे कुडाळ

पर्जन्य बरा पडून खरीब ८८ व रबी ८८ पीक झालें. पिकाचा पुरवठा कमी आहे. शेतीसाठीं जनावरें अगदीं कमी असल्यामुळें शेतांत मेहनत व पेरणी वेळेवर होत नाहीं. घात संपल्यावरहि वारंगुळ्याचें साह्यानें पेरणी होते यामुळें पीक चांगलें होत नाहीं. गांव खालसा असून शेतसारा एकंदर ७५६७ रु० पैकीं इनामदाराकडे ३२६४. बाकी निव्वळ सरकारजमा रु० ४३०३ पैकीं इनामजुडी १६६४ व जमीनबाब २६३९ रु०. क्षेत्र एकर २६९७ पैकीं बागायत २३० (फारेस्ट १५६, पड ४४३) किरकोळ पड खेरीज करून निवळ लागवड होणारी जमीन २०५० एकर, लोकसंख्या १९००, घरें ३०७, बैल २४८ व एकंदर जनावरें ७१८. अबकारीपैकीं अफूगांज्याचा मक्ता ३१९ रु० दारूचा मक्ता ३००. गेल्यासालीं दारूचा मक्ता ५०० रु. चा होता. यासालीं मक्ता घेणार कोणी नव्हतें म्हणून कमी झाला. सालांत दारूचा खप २००० रु. चा होतो. तगाई रु. २५००. बाळा रामा तांबोळी यांस २० रु. इनकमटॅक्स द्यावा लागतो. कर भरण्यास लायख नाहीं. कर सुटण्याबद्दल अपीलें केलीं परंतु दाद नाहीं. लोकल फंड रु. ४७३. गांवांत शाळा असून मुलें १०२ व मुली ३ शिकत आहेत. प्राथमिक

शिक्षण मोफत व नीतिचें धर्माचें शिक्षण पाहिजे. (हेंच राष्ट्रीय शिक्षण) पैसाफंडाबद्दल दामोदर लक्ष्मण जोशी व्यवस्था पाहतात. धोंडी बुरकाचा मुलगा वय ६—७ चा अनाथ आहे. जत्रेवेळीं कुस्त्या होतात. बक्षीसें व्याख्यानें देण्यासारखें आहे. श्रीरामाची शिल्लक १००० रु. पंचामार्फत आहेत. रु. ४०० पिंपळेश्वर देवाच बिनव्याजी लोकांस दिली आहे. दस्तऐवज खरेदी-गहाणाचे पुष्कळ होतात. तगाईबद्दल १ पोटकुळाची जमीन खालसा झाली असोन नव्याशर्तीनें दुसऱ्या कुळास लागण. मोकळे असलेलें फारेस्ट १० वर्षांपूर्वी कापीव रानांत सामील केल्यामुळें चारणीस मोफत रान नाहीं. फारेस्टांत १ नंबर पास फीचा आहे. परंतु त्यांत गवत बिलकुल नसतें. यामुळें जनावरास चारण्याची सोंय बिलकुल नसल्यामुळें जनावरांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. हत्याराभावामुळें डुकरें व कोल्हीं ऊंस, शाळू, भुइमूग वगैरे पिकांचें नुकसान दरसाल ५०० रु. पर्यंत करतात. शेंकडा ५ ते ७ एकरास भरपूर खत घालण्यास पुरतें. गांवांत भुइमूग पुष्कळ पिकतो परंतु शेंगदाणा होऊन बाहेर विकण्यास जातो. या मुळें तेलाचा पुरवठा होत नाहीं. राकेल जाळावें लागतें. जनावरांस पेंड परठिकाणाहून आणावी लागते. कापडाच्या पेट्या जपान-स्वीडनच्या पैशास २ मिळतात. मुंबईच्याहि येतात. कोष्टीलोक पैशाचे कमतरतेमुळें धंदा सोडून शेतकरी होत आहे. व्यापारी वर्गहि शेतकींत सुख मानित आहे. जनावरांचीं हाडें व कातडी महारलोक परक्या ठिकाणीं पाठवितात. दर बुधवारीं बाजार भरतो. धने ३०००, भुइमूग, ५०००, बडी ३००, हळद २५००,

मूळ १००० रु. चा बाहेर जातो. मराठे कुणबी - सोनार वगैरे दारूबाज आहेत. जत्रा चैत्र शु॥. १५ व कृष्ण ५ स. दसरा मोठा उत्सव. आषाढ व. ११ पिंपळेश्वर उत्सव. रामनवमीचा-गणेशचतुर्थीचा व दशहारांत श्रीकृष्णोत्सव होतो. कुस्त्या करणार लोक आहेत. दिवाणी, फौजदारी, मुलकी दावे फार चालतात. लोकांस भिकारी व्हावें लागतें. राजाराम लक्ष्मण शिवदे, अबासाहेब देशमुख, वागरे, कृष्णाजी सदाशिव, विष्णु अनंत देशपांडे, अण्णाजी रावजी देशमुख, लक्ष्मण विठू मोरे, आप्पा कोष्टी, जोगु खंडु ननवरे, मोरू तेली, रघुनाथ लक्ष्मण पाटील वगैरे मंडळी अगदीं सचोटीनें वागणारीं आहेत."

हें टिपण स्वतःच इतकें बोलकें आहे कीं, त्याला कारण असलेलें प्रश्न अगर काळानुरूप अधिक घालण्याची भर यांचा उल्लेखही न करितां तें पुष्कळांस पुष्कळ तऱ्हेनें अजूनही उद्बोधक होईल. पण एवढ्या माहितीवरून गांवोगांव कामें करून शेतकऱ्यांच्या आणि गांवकऱ्यांच्या उत्पादनाचें प्रदर्शन हा एक सार्वजनिक शिक्षणाचा मार्ग आहे. त्याचा अवलंबही १९०६ त केलेला आढळतो. गोकुळअष्टमीस कऱ्हाड येथें असें संस्मरणीय प्रदर्शन झालें. जुन्या मामलेदार कचेरींत तें भरलें. दहा दिवस चालू होतें. शेतकरीसभेमध्यें पतपेढी, गोरक्षण, दारुबंदीसंबंधीं जशीं व्याख्यानें व्हावयाचीं तशींच व्याख्यानें निरनिराळ्या दिवशीं प्रदर्शनांत झालीं. त्यांतील मुख्य दोन. ता. ११ आगष्ट रोजीं शेतकीखात्याचे दांडेकर, शिंदे यांनीं 'कापूस व त्याची लागवड' यावर दिलें तें, आणि ता. १२ रोजीं भाऊसाहेब भागवतांचे अध्यक्षतेखालीं दादासाहेब करंदीकरांनीं "प्रदर्शनांतील बहुविध शेतजिन्नसां-

प्रमाणेंच शेतकऱ्यांना उपयुक्त असलेल्या बहुविध विषयांची समज देणारें." दुसरें. या व्याख्यानांत "शेतकरी सुखी तरच बहुजनसमाज सुखी आणि बहुजनसमाज सुखी तरच सुशिक्षितांच्या शहाणपणाचा उपयोग" (सुमंत) असें जें सांगितलें, तेंच सप्रमाण व साधार विवेचन व त्याप्रीत्यर्थ सरकारनें जरूरीनें केलेंच पाहिजे तें कर्तव्य, आपल्या शेतकी—कमिशन—पुढील साक्षींत साताराजिल्हासभेतर्फे व व्यापारीसंघातर्फे गणपतराव फणसळकर यांनीं १९१२ सालीं सांगितलें. शेतकीकमिशनचें काम साताऱ्यास सहा दिवस चाललें त्यांत सरदार फडणीस, रुद्राजीराव महाडीक, भाऊ पाटील (कासेगांव), तात्या पाटील, गणेश अंताजी जोशी वगैरेंच्या साक्षी झाल्या; पण त्यांत जिल्हासभेच्या धोरणास सोडून असें कांहीं नव्हतेंच.

"मोर्ले साहेब सुशिक्षितांस 'आमचे शत्रु' ह्मणत आहेत; यामुळें तरी इतःपर लोकनायक लोकसमुदायापासून फटकून वागणार नाहींत, व जिल्हा सभा चिरस्थायी होतील, अशी आशा आहे" असे उद्गार १९०७ सालच्या ता. ३० जून रोजीं पहिल्या सातारा जिल्हासभेच्या अध्यक्ष पदावरून दादासाहेब करंदीकरांनीं काढले आणि राष्ट्रीय सभेच्या हेतूचा प्रसार करणें, राष्ट्रीय सभेला लागणारी माहिती गोळा करणें, जिल्ह्याच्या औद्योगिक उन्नतिप्रीत्यर्थ झटणें, या उद्देशानीं जिल्हासभा स्थापन झाली. त्या जिल्हासभेंत ज्यांनीं ज्यांनीं काम केलें त्यांनीं त्यांनीं शेतकऱ्यांचे हितसंबंध क्षणमात्र नजरेआड न केल्यामुळें, १९०८ च्या उग्र दडपशाहीनंतर जिल्हासभेंतच कळकळीच्या देशभक्तांच्या शक्ती एकवटूं लागल्या.

आणि जिल्हा सभा हीच दिवसेंदिवस शेतकऱ्यांसुद्धां सर्वांची प्रातिनिधिक होऊं लागली.

जिल्हासभेचें स्वस्तिक चिन्ह घालतांनाच नानासाहेब आगाशे बोलले होते कीं, " स्वदेशी व बहिष्कार यांचे बद्दलची जागृति बहुजन समाजांत इतकी झाली पाहिजे कीं, शिंपी व परीट यांनींसुद्धां परदेशी कापड व कपडा यांस स्पर्शही करण्याचें नाकारलें पाहिजे." जिल्ह्यांमध्यें एवढी तयारी करावयाची तर स्वदेशीची व्याप्ति व परदेशीचा संकोच कसा व कितपत करावयाचा त्याची आंखणी करून समाजाच्या मनोवृत्तींतच तसा पालट घडवून आणला पाहिजे म्हणून पूर्वीपासूनच जी तयारी होत होती तिला १९०६ साला भरती आली. मकरसंक्रांतीलाच साताऱ्यास " औद्योगिक परिषद " स्थापन झाली. व तिचें लोकजागृतीचें कार्य म्हणून स्वदेशीच्या प्रचाराकरतां लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे आणि तात्यासाहेब केळकर यांना फेब्रुवारींतच निमंत्रिलें. ता. ११ फेब्रु. रोजीं वाईस केळकरांचें व कऱ्हाडास लोकमान्यांच्या अध्यक्षतेखालीं परांजप्यांचें ' स्वदेशी ' वर व्याख्यान झालें. खिशाला चाट बसली तरी स्वदेशीच माल प्रत्येक व्यक्तीनें खरीदला पाहिजे. कारण त्यांत फार तर एका व्यक्तीचे पैसे दुसऱ्या व्यक्तीकडे जातात. पण देशांतल्या देशांत सर्व पैसे राहतात. स्वदेशी मधील ' स्व 'चा विस्तार भारतवर्षाच्या मर्यादापर्यंत असून, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीतीनें परदेशी पैसा जाणार नाहीं, गेलाच तर तो सवाई वाढ होऊन परत येण्याची खात्री असेल तरच जावा, असाच त्या व्याख्यानांतील प्रतिपादनाचा रोख असून " असंतोषः श्रियो मूलम् "

या न्यायानें परांजप्यांनीं आपल्या उपहासगर्भ भाषणांत " ब्रिटिशसाम्राज्यानें हिमालयापासून कन्याकुमारी-पर्यंत पसरलेल्या सुखाच्या समुद्रांत, दुष्काळाच्या कामावर तुला सहा-सहा पैसे मजुरी दिली, तरी हिंदुस्थानांतल्या शेतकऱ्या तूं मरतोसच!" अशीं वाक्यें पेरून हिंदुस्थानची राजकीय कुचंबणा समाजाच्या मनावर बिंबवलीच. इतक्या तीव्रपणानें जिल्ह्यांतील कार्यकर्ता त्यावेळीं बोलत नसला तरी प्रत्येक जाणता वरील विचाराशीं सहमत होता. म्हणूनच मे महिन्यांत सदर्न मराठा रेल्वेच्या आसपास ओगले स्वदेशीवर व्याख्यानें देत हिंडले, जूनमध्यें कऱ्हाड येथें मॅच फॅक्टरी ( काड्याच्या पेट्यांचा कारखाना ) स्थापण्याचा विचार झाला, साताऱ्यास सप्टेंबर २७ ला डेक्कन ब्रास वर्क्स सुरु करण्यांत आलें, आणि दसऱ्याला वाईस स्वदेशी दुकान निघालें. १९०६ सालीं आणखी एक महत्वाची घटना म्हणजे मे महिन्यांत स्थापन झालेली स्वदेशी कंपनी होय. आण्णासाहेब चिरमुले यांच्या दक्ष नेतृत्वाखालीं ती अशी भंरभराटली कीं पहिल्याच वर्षीला भागीदारांना शेंकडा तीस नफा वाटतां आला. याच कंपनीच्या यशाच्या पायावर वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी १९१३ मध्यें सुरू करून ती चिरमुल्यांनीं जिल्ह्याचें व महाराष्ट्राचें भूषण करून सोडली.

स्वदेशीची चळवळ जिल्ह्यांत एवढ्यावरच थांबली नाहीं. जशीं स्वदेशीचीं दुकानें ठिकठिकाणीं निघालीं तसा पैसा-फंडाचा प्रचारही मोठ्या आस्थेनें करण्यांत आला. डॉ. भिडे-प्रभृति मंडळीनीं प्रसंग येईल तेथें तेथें म्हणजे जिल्हातालुका सभांपासून तों एकाद्या ब्राह्मणभोजनापर्यंत पैसाफंड जमवि-

लाच पण दसरा–पाडव्यांच्या दिवशीं औद्योगिक उन्नतीची ही राष्ट्रीय भिक्षा घरोघर नियमानें मागितली.

कलकत्त्याच्या १९०६ चे राष्ट्रीय सभेनंतर १९१४ पर्यंत म्हणजे महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत सातारा जिल्ह्यातील स्वदेशीच्या इतिहासांत कऱ्हाड येथें निघालेली मॅच–फॅक्टरी प्रामुख्यानें नमूद केली पाहिजे. पांडुअण्णा शिराळकरप्रभृती मण्डळींनीं या फॅक्टरींत पाण्यासारखा पैसा ओतला, बहुलेकर प्रभृतींनीं दादासाहेब करंदीकर व रावसाहेब काळे यांच्या सल्ल्यानें सर्व फॅक्टरीची आखणी केली, आर्थर कलेक्टर साहेबांच्या हस्तें ती सुरूं करण्यांत आली आणि अशा तऱ्हेनें हा लोकमान्य-राजमान्य स्वदेशी कारखाना सुरूं होऊन १९०९ पासून असा भरभराटला कीं १९११ सालीं त्याला शेंगा फोडण्याच्या यंत्राची जोड देण्यांत आली. १९१२ सालीं करवीर सरकारनींही सदर कारखान्याच्या मालास मान्यता दिली, रेलवेनेंही सवलती दिल्या. पण पुढें फारेस्टांतील लाकडाच्या सवलती नाहींत म्हणून, स्वदेशीच्या अभिमानाचा यंत्रज्ञ नाहीं म्हणून, तात्पर्य अनेक कारणांनीं तो कारखाना उतरणीस असा लागला कीं, पांडुआण्णा शिराळकर प्रभृतींनीं तो चालवावा म्हणून दीड तपाच्यावर अनेकांगांनीं खटपट करूनही तो तगला तर नाहींच, पण त्यानें बहुलेकर वकीलांस नऊ हजार व शिराळकरांस वीस हजारांच्या नुकसानींत आणलें, मग बाकीच्या भागीदारांना त्यांच्या त्यांच्या प्रमाणांत कशी तोशीस लागली असेल, याची कल्पनाच केलेली बरी !! भांडवलाचा, बुद्धिमत्तेचा आणि केसरीपासून सर्व महाराष्ट्राचा पाठिंबा असलेला हा प्रचंड उद्योग जेथे एक 'होम' होऊन बसला

तेथें इसलामपुरास १९०९ सालीं निघालेला सिसिपेन्सीलींचा कारखाना अगर त्यांचीं भावंडें तग धरूं शकलीं नाहींत, म्हणून कोणाला कसा बोल लावतां येईल ? सुरतेस १९०८ सालीं भरलेल्या तिसऱ्या औद्योगिक परिषदेंत फणसळकर वकीलांनीं 'पेपर' वाचल्याप्रमाणें सरकारी स्टोअर्ससाठीं स्वदेशी मालाची खरेदी होती, तर ..... पण बोलण्यांत राम काय ?

---

## प्रकरण ८ वें

# "ऐक्यवृत्ती" चें संरक्षण

कलकत्त्याच्या राष्ट्रीयसभेनें दिलेल्या चतुःसूत्रीपैकीं स्वदेशीच्या बरोबरील राष्ट्रीय शिक्षणाचा विचार करतां एक दोन ठिकाणीं प्राथमिक शाळांचा प्रयत्न झाला, ही गोष्ट खरी; पण त्यापेक्षां प्रो. अण्णासाहेब विजापूरकरांनीं सुरूं केलेल्या समर्थविद्यालयांत घरंदाज मुलें शिकावयास गेलीं हीच महत्त्वाची गोष्ट. आणि स्वराज्याच्या बाबतींत बोलावयाचें तर शिवाजीमहाराजांचा उत्सव सरकारी करड्या नजरेला न जुमानतां झाले आणि टिळकांचा आणि त्यांच्या मतप्रणालींचा अभिमान धरून, वरिष्ठांची लवथवती करण्याचा तिटकारा करणारे पण कर्तव्यनिष्ठ, आणि तेजस्वी विद्यार्थी उत्पन्न व्हावे म्हणून जिवापाड झटणारे कळंबे, बाळकृष्ण भाऊ जोशी, नारायण कृष्ण भावे अशा सारख्या ट्रेन्ड शिक्षकांना

पोलिसचा सिसेमेरा लागल्यामुळें नौकरीला रामराम ठोकावा लागून रानोमाळ भटकावें लागलें. नाशीक येथें घडलेल्या कटांत सामील असल्याच्या संशयावरून पोलीस जन्माचें वाटोळें करणार, त्यापेक्षां घरादाराला आपण स्वतांच परदेशी होऊन, आपल्या तेजस्वी कार्याच्या जोरावर परप्रांतांतून श्रेयाची चौथाई-सरदेशमुखी साधेल तशी महाराष्ट्रीय पुण्यां-ईच्या पायीं वहावी, अगर तपश्चर्येनें सामर्थ्यवन्त बनून 'महंती' च्या रूपानें महाराष्ट्राची सेवा करावी, म्हणून उमेदीचे तरूण लग्नमण्डपांतून पळूनही गेले.

सनदशीर चळवळीच्या दृष्टीनें पाहतां त्या दहशत-शाहीच्या काळांत जिल्ह्यानें स्वराज्याच्या चळवळींत एक दोन हात मारलेच आहेत. सन १९०७ सालीं व्हाइसरॉयच्या कौन्सिलपुढें सभाप्रतिबंधक कायदा असतां त्याचा निषेध घाणेकर वकीलांचे अध्यक्षतेखालीं ता २७ आक्टोबर रोजीं दादासाहेब करंदीकरांनीं ठराव मांडून केला व तो सभेचा ठराव ना. गोखले यांजकडे धाडला; १९०८ च्या मार्च ९ तारखेस बिपिनचंद्र पॉल सुटल्याबद्दल आर्थरहॉलमध्यें करंदीकरांच्या अध्यक्षतेखालीं एक पर्स [ ६०० रु. ] अर्पण करण्याचें ठरलें. ता. १२ एप्रिल रोजीं जिल्हासभेतर्फे सार्वजनिक हळदीकुंकवाचा समारंभ होऊन सौ. सत्यभामाबाई आगाशे, कु. मथुराबाई जोशी व सौ. सत्यभामाबाई काळे यांनीं स्त्रियांमध्यें "स्वदेशी-मुळें स्वराज्य" असें व्याख्यान दिलें. एप्रिल महिनाभर प्रामुख्येंकरून वाईला व इतरत्र थोडी फार मद्यपाननिषेधाची चळवळ झाली; निगडी, लिंब ( सातारा ), तासगांवसारख्या

जवळ लांबच्या ठिकाणीं मे जून महिन्यांत आगाशे, राजोपाध्ये, गोवईकर, फणसळकर, लक्ष्मणराव जोशी, घाणेकर, डॉ० भिडे, सोमण वगैरे जिल्ह्याच्या ठिकाणची मंडळी स्वदेशीच्या प्रचारार्थ हिंडली; जुलैमध्यें लोकमान्यांना शिक्षा झाल्यावर तर सर्वत्र हरताळ आणि सभा झाल्या; आणि या गोष्टींनीं आपआपल्यापरी त्या दहशतीच्या काळांत जनतेच्या मनोवृत्तीला पुष्कळच धीर दिला.

तत्राप महायुद्धापूर्वीची सातारा जिल्ह्याची 'स्वराज्य-विषयक' कामागिरी म्हणजे जिल्हासभेची स्थापना व तिचें दृढीकरण होय. १९०६ सालीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभेंत ठरल्याप्रमाणें राष्ट्रीयसभेच्या कामासाठीं जिल्हासभा स्थापण्या-करतां ता. २४ मार्च १९०७ रोजीं साताऱ्यास घाणेकर वकीलांचे अध्यक्षतेखालीं सभा भरून दादासाहेब करंदीकरांनीं जिल्हासभेचा वृत्तान्त सांगितला. तेव्हां भाऊसाहेब सोमणांचे सूचनेवरून दादासाहेबांनीं आठ लोकांच्या मदतीनें तालुक्यांतील लोकांचें सहाय्य मिळवावें असें ठरलें.

त्याप्रमाणें दादासाहेबांनीं खटपट केली, शंकर श्रीधर चितळे यांना प्रचारक नेमले आणि सगळीकडे तालुकासभा स्थापून जिल्हासभेची पूर्वतयारी केली. या तालुकासभा म्हणजे पूर्वीच्या "छोट्या कांग्रेसांच्या" आवृत्त्याच निघूं लागल्या. त्यांपैकींच ता. २७ मे १९०७ रोजीं तासगांव तालुकासभेचें अधिवेशन सदाशिवशास्त्री भिडे स्वागताध्यक्ष आणि श्रीनिवासराव चिपाडे अध्यक्ष यांनीं अपूर्वाईनें पार पाडलें. सदर सभेस पांचशें शेतकरी जमला होता. तासगांव बरोबरीनेंच विट्याच्या सभेचा उल्लेख केला पाहिजे. ही १८ जून रोजीं झाली आणि तिच्यांत

पांडुआण्णा शिराळकर, नरहर गोविंद रानडे, दत्तात्रय श्रीधर रानडे, गणेश आप्पाजी मारुळकर, दत्तो कृष्ण जोशी, करंदीकर आणि विशेष म्हणजे शिवराम महादेव परांजपे यांनीं प्रमुख भाग घेतला. विव्याच्या खालोखाल रहिमतपूर येथील शंकरशास्त्री महाजनी यांच्या अध्यक्षतेखालीं झालेली कोरेगांव तालुक्याची सभा होय. हिच्यांत शेटेशेट, गोपाळराव परांजपे, करंदीकर वकील, कानिटकर, एरंडे वगैरे गृहस्थांनीं उत्साहानें भाग घेतला होता. पण सभांत सभा म्हणजे १९०८ च्या २४ मे रोजीं झालेला दुसरी खटाव तालुका सभा. डॉ. भिडे अध्यक्ष होते. एक हजार शेतकरीमंडळी होती. " तालुकासभेचें महत्त्व, फारेस्ट, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य, ग्रामपंचायती, शेतकऱ्यांची स्थिति, धान्याचीं कोठारें, पैसाफंड यासंबधीं अध्यक्षांचें उद्बोधक भाषण झालें. " गायरांनें, स्वदेशी स्वराज्य बहिष्कार, जमीनीखालसा होण्याचा अन्याय, गांवपंचायती, दारूबंदी, पाणीसारा, यांवर ठराव झाले. बापूराव वैद्य, घोडके, दरुजकर, दर्भे, मोतीराम दयाभाई, बाळाजीपंत इनामदार यांनीं भाषणें केलींच पण सभेचें यश त्यांच्याच श्रमाचें फल होय. खटावच्या सभेचाच सही नमुना १९०९ ला पाटणची तिसरी तालुका परिषद नानासाहेब आगाशांच्या अध्यक्षतेखालीं भरली ती होय.

पण मागेंएकदां उल्लेख केल्याप्रमाणें सिडनहॅम कारकीर्दीचा वरवंटा इलाख्यावर आणि म्हणूनच जिल्ह्यावर फिरूं लागल्या कारणानें अशुभसा काळ आलेला पाहून तालुका सभांनीं "आपले

होत''आवरलें आणि कार्यकर्त्यांनीं जिल्हासभेच्या दृढीकरणावरच आपलें चित्त दिलें.

त्याचें असें झालें कीं, १९०७ च्या जून अखेर जिल्हा सभा स्थापन होतांना विशेष अडचण नव्हती; ती सुरतेच्या राष्ट्रीय सभेंतील मवाळ—जहाल बखेड्यानें उत्पन्न केली. टिळक आणि गोखले हे दोनही अग्रणी सातारा जिल्ह्याला पूज्य होते. त्यांचे तात्विक, सात्विक, राजस, तामस कसलेही मतभेद असले तरी दुफळीनें राष्ट्रीय प्रगतीचा गाडा अडूं नये अशी तीव्र इच्छा सातारा जिल्ह्याची होती. म्हणून १९०६ सालीं जिल्हासभा स्थापन होतांना स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य, आणि राष्ट्रीय-शिक्षण या धोरणावर ती स्थापन झाली होती, तें धोरण सोडण्याचा कदापि विचारही जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या मनांत आला नाहीं, तरी १९०८मध्यें मार्चांत झालेली जिल्हासभा फिरून आक्टोबरांत भरवून कन्व्हेन्शन कमेटीतर्फे पुण्याचे गोपाळराव देवधर आले होते, त्यांच्या समक्ष जिल्ह्यानें राष्ट्रीयसभेच्या पुढाऱ्यांना एकी करण्याची विनंति आपल्या ठरावानें केली. पुढें ता० २६ नोव्हेंबर रोजीं कन्व्हेन्शनला अनुसरून जिल्हा कांग्रेस कमेटी स्थापन करण्यासाठीं लक्ष्मण कृष्ण जोशी यांच्या खटपटीनें आर्थर हॉलमध्यें पाठकांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली असतां फणसळकर, आगाशे यांनीं प्रेक्षक म्हणून भाषण करून जिल्ह्यांतिल ऐक्याचें वातावरण बिघडवून दिलें नाहीं. १९०८ च्या आक्टोबरमध्यें भरलेल्या तिसऱ्या जिल्हासभेनें रा. ब. पाठक, आगाश, फणसळकर यांची कमेटी नेमून 'मद्रासला सर्व पक्षांची कांग्रेस व्हावी' म्हणून खटपट

करावी अशा अर्थाचा ठराव केला होता, त्याचा निर्देश करून कांग्रेसमधील नेत्यापक्षांचें ऐक्य आज शक्य नसलें तर निदान सातारा जिल्ह्यांतील परस्पर सहकार्याचा, सहानुभूतीचा आणि एकीकरणाचा लौकिक सातारा जिल्हा गमवूं इच्छित नाहीं असें सातारा जिल्ह्यानें त्या ऐनवेळीं जाहीर केलें आणि तें व्रत अखंडपणें पुढें पाळलें.

---

## प्रकरण ९ वें

# स्वराज्यसंघ आणि सहकार.

दहशतशाहीसारख्या संकटांची क्षिति नाहीं, पण एका विशिष्ट अंशाखालीं मनोवृत्तीचें तेज उतरतांच कामा नये, एवढी तरी काळजी प्रत्येक पतित राष्ट्राला घ्यावी लागते. "संघे शक्तिः कलौ युगे" हा सातारा जिल्ह्याचा नुसता विश्वासच आहे असें नव्हे तर एकीशिवाय तरणोपाय नाहीं असा सातारा जिल्ह्याचा जवळजवळ हट्ट आहे. राष्ट्रीयसभेंत सुरतेस दुफळी झाली तरी जिल्ह्यांत ती होऊं द्यावयाची नाहीं, किंबहुना विनवणी आणि प्रयत्न यांच्या जोरावर प्रांतांत व पर्यायानें राष्ट्रांत ती साधण्याचा शक्य तों प्रयत्न करावयाचा असा मनसुबा असल्याकारणानें राष्ट्रीयसभेंतील महाळ—जहाल पक्षांनीं एकी करून संयुक्त राष्ट्रीयसभा करावी म्हणून जिल्हासभेनें वेळोवेळीं ठराव तर केलेच, पण

१९१४ ची प्रांतिक परिषद भरवून राष्ट्रीयसभेंतील ऐक्याचा ‘ श्रीकार ’ साताराजिल्ह्यानें काढला. तथापि काळाचा ओघ कोणत्याही गोष्टीच्या परिपक्वतेला अनुकूल लागतो. तो तसा साधेपर्यंत देवघरांतील नंदादीपाप्रमाणें तेजस्वी मनोवृत्तीची वात अखंड तेवत ठेवावी लागते. मग तिचा प्रकाश जगाचे डोळे दिपवण्याची गोष्टच सोडा, तो कोणाच्या डोळ्यांत भरतो न भरतो हें सुद्धां कार्येच्छूनें पाहून चालत नाहीं. १९१३ पर्यंत जिल्हासभेचीं अधिवेशनें तेवढीं बिनचूक भरत गेलीं, त्याच्या पलिकडे कांहीं झालें नाहीं, १९०८ सालींच “ कार्यकारी मंडळाची सभा तालुक्यातालुक्यानिहाय सोईस्कर ठिकाणीं दर दोन महि–न्यांनीं तरी भरावी. ( २ ) एक दोन विशिष्ट कामें क्रमाक्रमानें करावीं. ( ३ ) प्रत्येक तालुक्याची औद्योगिक पहाणी करावी. अशा तासगांवकरांकडून आलेल्या सूचनांपैकीं एकही अमलांत आली नाहीं याबद्दल १९१३ च्या तासगांव येथील जिल्हा सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष नानासाहेब आगाशे यांनीं विषाद प्रदर्शित केला आहे. पण तो केवळ नंदादीपाची काजळी झाडण्याकरतां दिलेला झटकारा आहे.

तात्पर्य, महायुद्धापूर्वीच्या दहशतशाहीच्या काळांत कलकत्याच्या राष्ट्रीयसभेनें दिलेल्या चतुःसूत्री वरील विश्वास चळून न देतां नंदादीपाप्रमाणें शांत प्रकाशत राहण्याचें काम सातारा जिल्ह्यांत चाललें असतां १९१४ मध्यें महायुद्ध सुरू झाल्यावर मद्रासला जी राष्ट्रीय सभा झाली, तींत गांव–तालुका जिल्हा–सभांच्या अखंड साखळीनें राष्ट्रीयसभेची चळवळ वर्षभर व देशभर चालती बोलती करावी या उद्देशानें आप्पा–

साहेब आळतेकर व भाऊसाहेब सोमण मुद्दाम मद्रासला गेले होते, पण बड्याबड्यांच्या मतभेदप्रदर्शनांत आप्पासाहेबांच्या प्रयत्नांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यापूर्वींच प्रागतिक राष्ट्री यांची एकी कशी सन्मान्य तऱ्हेनें होऊं शकेल याचें सोपपत्तिक विवेचन बेझंटबाईच्या 'न्यू इंडिया' मधून आप्पासाहेबांनीं सुरतेपासूनच्या इतिहासाचें विहंगमावलोकन करून केलें होतें. त्याचा उपयोग अमृतबझार पत्रिकेच्या संपादकांनीं केला आणि अधिकारवाणीनें राष्ट्रीयसभेंत ऐक्याचें वातावरण निमाण केलें. तें कांहीं असलें तरी १९१४ च्या १६ जूनला मंडालेहून लोकमान्य सुटून आल्याबरोबर सर्व देशाप्रमाणेंच सातारा-जिल्ह्यांतही नवचैतन्याचा संचार झाला आणि फिरून तो कामास लागला तो दिवसेंदिवस वाढत्या उत्साहानेंच काम करीत राहिला आहे.

१९११ सालीं राज्यारोहण समारंभाच्या निमित्तानें वंगभंग रद्द करून बादशहांनीं हिंदुस्थानला 'स्वराज्य' देण्याचें जाहीर अभिवचन दिलें. हिंदुस्थानच्या राष्ट्रीयपक्षानें तत्त्वानिष्ठेनें जीं प्राणपणाची संकटें सोसलीं त्यांचा हा एक विजय होता. १९१४ सालीं जें जागतिक युद्ध झालें, त्याचे सूचक असे वादळी वारे एडवर्ड बादशहांच्या शेवटच्या वर्षांतच वाहू लागल्याकारणानें, पंचमजॉर्ज बादशहांनीं फार दूरदर्शीपणानें राज्यारोहणाच्यावेळीं धोरण आखलें असेंही कित्येक इतिहासदर्शकांचें म्हणणें आहे. तें खरें धरून चाललें तरी बादशहांच्या जाहीर घोषणेनें काळाच्या रंगपालटीचें तांबड फुटलें हें म्हणावयास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

काळाच्या अशा रंगपालटीस अनुसरूनच लोकमान्यांनीं

आपलीं पावलें धीरेंधीरें टाकावयास सुरवात केली. १९१९ च्या सप्टेंबर २० तारखेस त्याचा प्रसाद प्रथम साताराजिल्ह्यास मिळाला. त्यादिवशीं वाईस श्रीद्वारकागणपत्युत्सवांत शंकरराव लवाटे यांचें " वसाहतींचें स्वराज्य " या विषयावर व्याख्यान झालें. पुढें बेळगांवास लोकमान्यांनीं ' होमरूल लीगची ' स्थापना केल्यावर साताराजिल्ह्यांतील तालुकासभा जाग्या होऊन काम करूं लागल्या. फार काय, १९१६ सालीं लोकमान्यांची षष्ठ्यब्दि मोठ्या उत्साहानें साजरी करण्यांत येऊन त्यांना अर्पावयाच्या पर्सला जशी ठळक वर्गणी जमा करण्यांत आली तशी होमरूलसंबंधीं लोकजागृतीही करण्यांत आली. तथापि " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळवीनच. " हें लोकमान्यांचें निश्चयवाक्य घेऊन १९१७ सालीं आप्पासाहेब आळतेकर आणि दिगंबरपंत गोखले यांनीं तासगांव, इसलामपूर, कऱ्हाड, विटे भागांत दौरा काढला आणि होमरूललीगच्या शाखा स्थापन केल्या. त्या वर्षाच्या १९ फेब्रुवारीलाच तात्यासाहेब केळकरांनीं साताऱ्यास " होमरूललीग " वर व्याख्यान दिलें होतें आणि मार्चमध्यें अच्युतराव कोल्हटकर तर आगष्टमध्यें आळतेकर, अष्टपुत्रे आणि भाऊसाहेब सोमण यांनीं रहिमतपूर, माहुली, पाटखळ, बोरखळ, इसलामपूर, पाटण या भागांत होमरूलसंबंधीं जागृति उत्पन्न केली. ता. १७ सप्टेंबर रोजीं दादासाहेब करंदीकरांच्या षष्ठ्यब्दीच्या निमित्तानें खुद्द लोकमान्यांचा साताऱ्यांत मुक्काम झाला आणि त्यानिमित्तानें जिल्ह्यांतील मंडळी स्वराज्यस्फूर्तीचे शब्द लोकमान्यांच्या तोंडून ऐकण्यासाठीं दिवाळीदसऱ्याच्या आनंदानें जमली आणि

नवजीवन घेऊन गेली. लोकमान्यांनीं लिंब येथें दादासाहेब करंदीकरांचे अध्यक्षतेखालीं 'स्वराज्या' वर व्याख्यान दिलें आणि वाईसही तसाच लाभ देऊन नंतर ते पुण्यास गेले. या वेळेस म्हणजे २० सप्टेंबरला खाडीलकरांनीं वाईस आणि नोव्हेंबरच्या मध्यास चाफळ व कऱ्हाड येथें "स्वराज्याच्या तपश्चर्येत कितीही रंभामेनका आल्या तरी डळमळूं नका. किंवा तिलोत्तमांनीं भरीला घातलें म्हणून सुंदोपसुंदी करू नका" अशी जागृतीची ज्योत पाजळली. सांगलीचे छापखाने वकीलही १६ डिसेंबर रोजीं इसलामपूर येथें "राष्ट्रीयसभेच्या स्वराज्य योजनेला" पाठिंबा देण्याबद्दल व्याख्यान देऊन गेले. त्याच्या पूर्वीच तालुकासभांनीं राष्ट्रीय सभेच्या स्वराज्य योजनेला पाठिंबा देण्यास सुरवात केली होती व या तालुकासभांत थेट आरोग्यमंडळापासून सर्व कामें हातीं घेणारी, तात्यासाहेब भाटे यांच्या चिटणीशीखालीं चालणारी कऱ्हाड तालुका सभा विशेष गाजली. अशा तऱ्हेनें होमरूलच्या चळवळीनें १९१७ साल दुमदुमलें, तेव्हां जून महिन्यांत बेझंट व अरुंडेल यांच्या अटकेबद्दल तीव्र निषेध प्रदर्शित करण्यांत आला आणि नोव्हेंबराचे पहिले आठवड्यांत ना. श्रीनिवास शास्त्री कांग्रेस स्कीमवर व्याख्यान देण्यास आले तेव्हां सातारकरांनीं आस्था दाखविली, हें निराळें सांगण्याची काय अवश्यकता ? आणि लोकमान्य दादासाहेबांच्या षष्ठ्यब्दिसाठीं साताऱ्यास आले असतांच बेझंट व अरुंडेल व होमरूलर्सना सरकारनें सोडले हा लोकमताच्या प्रभावाचा शुभशकून वाटला असला तर काय नवल ! उभयतांच्या बिनशर्त सुटकेबद्दल आणि लोकमताच्या विजयाविषयीं जिल्ह्यांत जो उल्हास दिसला त्यांत वाई येथील नानासाहेब वैद्यांचे

अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेचा विशेष उल्लेख केला पाहिजे.

१९१७ सालांतील या चैतन्योद्बोधनाचा परिणाम पुढील सालच्या आरंभापासूनच आढळूं लागला. १९१२ पासून पांडुतात्या भाटे, वामन गणेश फडके, बळवंतराव जाधव हे चिटणीस आणि अप्पासाहेब आळतेकर व नानासाहेब देशपांडे हे अध्यक्षोपाध्यक्ष अशा कार्यकारी मण्डळाच्या नेतृत्वाखालीं नेटानें काम करणारी कऱ्हाड तालुका सभा ता. २ जानेवारी १९१८ लाच आपलें अधिवेशन नानासाहेब मुतालीक यांच्या अध्यक्षतेखालीं करती झाली. तींत "भाकरी कां करपते ? पानें कां कुजतात ? घोडा कां बुजतो ? तर फिरवला नाहीं म्हणून. तसेंच हिंदुस्थानवरील निरनिराळया आपत्ति या कां उद्भवल्या ? तर स्वराज्य नाहीं म्हणून" अशा तऱ्हेच्या लोकमान्यांच्या अनुवादानेंच शेतकऱ्यांच्या आणि एकंदर तालुक्याच्या गरजांचा विचार करण्यांत आला. तशाच तऱ्हेची विचारसरणी मे महिन्यांत रामचंद्र मोरेश्वर साने यांनीं आपल्या स्वराज्यावरील व्याख्यानांतून जनतेच्या मनावर ठसविली. डॉ. कुर्तकोटी शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखालीं कासेगांवास प्रांतिक सहकारी परिषद झाल्यावर, श्रींच्याच अध्यक्षतेखालीं ता. २२ मे रोजीं सान्यांचें झालेलें स्वराज्यावरील व्याख्यान अजूनही लोकांच्या कानांत दुमदुमत असतें.

जून महिन्यांत स्वराज्य संघाच्या कामाचा उठाव आदरणीय झाला. ता. २९ रोजीं वाई येथें कृ. ग. अभ्यंकर वकीलांचे अध्यक्षतेखालीं सभा होऊन (१) ता. १० जून रोजीं मुंबईच्या प्रांतिक युद्धपरिषदेंत अध्यक्ष ना. विलींग्डन यांनीं स्वराज्यवाद्यांच्या विरुद्ध जे निराधार आरोप केले

होते त्यांचा धिक्कार करण्यांत आला. ( २ ) लोकमान्यांवर पूर्ण विश्वास प्रगट करण्यांत येऊन लोकमान्य, जम्नादास द्वारकादास एम्. आर्. बम्मनजी, हार्निमन, तात्यासाहेब केळकर यांच्या वरील प्रसंगींच्या धैर्याबद्दल अभिनंदन करण्यांत आलें. ( ३ ) बॅ. जिनांनी स्वराज्यवाद्यांचा निष्कलंकपणा उत्तम रीतीनें सप्रमाण सिद्ध केला याबद्दल आभार मानण्यांत येऊन ( ४ ) लष्कर भरतीच्या जुलमी व सदोष पद्धतीबद्दल असमाधान व्यक्त झालें. कारण हत्यारांचा कायदा दुरुस्त करण्यासंबंधीं दीर्घसूत्रीपणा, लष्करी जागा हिंदी लोकांना न मिळणें, दिल्ली परिषदेंतील लष्करी कॉलेजचा ठराव दप्तरींच धूळ खात ठेवणें असे प्रकार चालले होते. वाईंचेंच पाणी खालीं जिल्ह्यांत सर्वत्र वाहिलें होतें हें सांगितलें म्हणजे वरील ठरावांवरून स्पष्ट होणारा सरकारी आचार व जिल्ह्याच्या अंतःकरणानें त्याचा घेतलेला समाचार दोनही प्रतीत होतील. होमरूल संबंधीं १९१६ ते १९२० पर्यंत सतत तनमनधनानें वाळवें तालुक्यांत खटपट करणारी डॉ. भाऊराव वैद्य प्रभृतीमण्डळी झटत हें लक्षांत ठेवलें म्हणजे जिल्ह्याची नाडी कळेल.

या सालच्या घडामोडींवर जिल्ह्याचें संकलित मत साला-बादप्रमाणें एकदां एप्रिलमध्यें व एकदां आगष्टमध्यें जिल्हासभेनें आपलें नेहमींचें व जादा अधिवेशन भरवून प्रगट केलेंच. पण नोव्हेंबरमध्यें महायुद्धांत दोस्तराष्ट्रांना जय मिळाल्यामुळें आनंद-प्रदर्शनाचा उमाळा जो जिकडे तिकडे आला होता, त्यांत स्वराज्य संघानेंही आपल्या परी भाग घेतला. महायुद्धांत "मराठा सैनिक व अंमलदार शौर्यानें लढले आहेत व मराठ्यांचें पाणी नाहींसें झालेलें नाहीं" असा कबूली जबाब जिल्हा दरबारांतून

# लोकमान्य टिळक

श्री. ग्रंथ संग्रहालय



जन्म २२ जुलई १८५६ मृत्यु १ आगस्ट १९२०

कलेक्टरसाहेब १९१६ पासून देत आलेच होते आणि रिक्रूटिंग ऑफीसरच्या आडदांड वर्तनाखेरीज सैन्यभरतीला सातारा जिल्ह्यांत कशानें अडथळाही उत्पन्न केला नव्हता; उलट "इंग्लंडची अडचण तेंच आपलें संधिसाधन" या लोकमान्यांच्या वचनाप्रमाणें युद्धकाळांत इंग्रजांना विजय मिळण्याबद्दलच्या प्रार्थनेपासून यावच्छक्य जिल्हा मदत करीतच होता. आर्थात् नोव्हेंबर मधील आनंदोत्सवांत भाग घेतांना आपल्या मागण्या पुढें रेटण्याचा संधि स्वराज्यसंघवाद्यांनीं बिनचूक साधली. त्याकरतां स्वराज्यसंघाच्या ज्या तालुका निहाय सभा झाल्या त्यांत भाऊसाहेब सोमणांच्या अध्यक्षतेखालीं ता. २७ नोव्हेंबर रोजीं इसलामपूरच्या विठ्ठलमंदिरांत झालेला वाळवे तालुकाहोमरूलर्स आनंदोत्सव सर्व जिल्ह्याचा प्रातिनिधिक समजावयास हरकत नाहीं. तांबवेकर वकीलांनीं दिग्दर्शित केल्याप्रमाणें त्या उत्सवांत, तह - परिषदत हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून लोकमान्यांना घ्यावें आणि राजकीय कैद्यांची बिनशर्त सुटका करावी अशा मुख्य मागण्या करण्यांत आल्या.

देशांतील अशा मागण्यांची परिपूर्तता तर राहोच, पण मायबाप म्हणवीणाऱ्या सरकारनीं 'गरज सरो वैद्य मरो' अशी वर्तणूक हिंदुस्थानशीं केली. हिंदुस्थानांत राजद्रोहानें तोंड काढूं नये म्हणून राजनिष्ठपणानें महायुद्धांत तनमनधनानें इंग्लंडला मदत करणाऱ्या हिंदुस्थानला रौलटॲक्टसारख्या काळ्या कायद्याचे शेलापागोटें आहेर म्हणून दिलें होतें. "धिक्कार मन साहिना" असेच धैर्यधरी तडाखे अखिल हिंदुस्थाननें त्या काळ्या कायद्याला सर्वत्र दिले. असाच तडाख्याचा प्रयोग अमृतसर येथें चालला असतां जनरल

डायरनें जालियनवाला बागेंत गोळीबाराचा असुरी अत्याचार केला. त्यासरसा राष्ट्रांतील इतर स्वराज्यवाद्यांप्रमाणेंच सातारा जिल्ह्यांतीलही स्वराज्यवादी इतके चिडले कीं अन्यायाच्या जखमेंत जणों अपमानाचें मीठ भरलें !! उघडच सातारा जिल्ह्यानें १९ एप्रिल हा सत्याग्रहदिन पाळलाच पण वाई येथील ता. २१ एप्रिल १९१९ च्या घाणेकर वकिलांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या स्वराज्यसंघपारिषदेंत स्वराज्यासाठीं त्याग करण्याची तयारी अहमहिकेनें जिल्ह्यांतील मंडळींनीं केल्याचें जाहीर झालें. त्यासालीं स्वराज्य संघाचे १६१९ सभासद जिल्ह्यांत होते आणि त्यांत १२५ शेतकरी स्वयंस्फूर्तीनें यंदा अधिक सभासद झाले होते. सातारा, बोरखळ, वाई, कऱ्हाड, इसलामपूर, विटें, तासगांव इत्यादि शाखांच्या मार्फत स्वराज्यावर ऐशीं व्याख्यानें झालीं. श्रीधर विठ्ठल सुपनेकर यांनीं दोनशें रुपये देणगी स्वराज्य-संघाला दिली होती तर बाळाजी दामोदर हसबनीस यांनीं आपली एक ( दहाहजाराची ) मिळकतच्या मिळकत स्वराज्य-संघाला अर्पण केली होती.

स्वराज्यासाठीं अशी मनोवृत्ति जिल्ह्यांत उत्पन्न होत असतांच, त्या अखिल भारतीय प्रश्नाबरोबर, लोकमान्यांनीं सरव्हॅलेंटाईन चिरोलवर केलेल्या अब्रुनुकसानीच्या दाव्यांत लोकमान्यांना जब्बर आर्थिक नुकसान आलें तें आपल्या मगदुराप्रमाणें भरून काढावें आणि लोकमान्यांच्या राष्ट्रसेवे-बद्दल कृतज्ञता व्यक्त करावी म्हणून ता. ३ एप्रिल १९१९ रोजीं काशीनाथ रामचंद्र माजगांवकर, वासुदेव विष्णु आठल्ये, गोविंद महादेव कुबेर, यांच्या सहीनें विनंतीपत्र निघालें आणि

त्याप्रमाणें साताराजिल्ह्यानें बरीच रक्कम जमवून चिरोल केस फंडास दिली.

याच बरोबर जिल्ह्यांत १९१८ सालीं जे इन्फ्लुएंझा व दुष्काळ यांचें संकट उद्भवलें होतें, त्याला तोंड देण्याकरतां फणसळकर वकीलादि जिल्ह्यांतील ठिकठिकाणच्या मंडळींनीं स्वयंसेवक जमवून आणि पैसे गोळा करून आपद्ग्रस्तांना मेहनतीनें मदत केली. त्यांत वाळवें तालुक्यात डॉ. भाऊराव वैद्य प्रभृतींचें काम शिस्तशीर आणि नांव घेण्यासारखें झालें. दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून रु. ३०५९८१४ खर्च केले. वाळव्याच्या खालोखाल दुष्काळाबाबत वाईस काम झालें सार्वजानिक सभेचे अध्यक्ष म्हणून नानासाहेब वैद्यांनीं ' कंट्रोल 'ची दुकानें लोकांस सोयीची होतील अशी खटपट केली; आणि त्या खटपटीचा उपयोग नुसत्या वाईसच न होतां सबंध सातारा जिल्ह्यास झाला.

हिन्दी स्वराज्यसंघाच्या जन्मसालीं म्हणजे १९१६ सालींच शेतकऱ्यांना उपयुक्त अशीं सहकारी चळवळही सातारा जिल्ह्यांत, विशेषता दक्षिण भागांत मूळ धरूं लागली. सातारा येथें ऑनररी ऑर्गनायझर म्हणून आण्णासाहेब चिरमुले यांनीं कामास सुरवात केली. २५ मार्चला सहकारी परिषद पार पाडली. ता.२० आगष्ट पासून गोपाळ कृष्ण देवधरांनीं सोसायट्यांचा क्लास चालविला; यशवंत बाळा पाटील यांचे प्रयत्नानें वाळवें तालुक्यांत व कऱ्हाड तालुक्यांत बऱ्याच सहकारी संस्था स्थापन झाल्या; आणि पेठ येथें तर जनावरांची पैदास सुधारण्याकरतां एक सहकारी मण्डळी स्थापन झाली. अशा प्रकारें महायुद्धाच्या सुरवातीपासून जालियनवाला

बागेपर्यंत जिल्ह्यांतील लोक सहकारानें साध्या गोष्टीपासून स्वराज्याच्या गोष्टीपर्यंत संघटित होत होते. या सहकार-संघटनेचा उपयोग पुढें झाल्याशिवाय राहिला नाहीं.

---

## प्रकरण १० वें

# मित्र-प्रवृत्ति.

" तेल्या तांबोळ्यांचे पुढारी " म्हणवून घेण्यांत लोकमान्य आणि लोकमान्यांचे अनुयायी भूषण मानून सरकार संघटनेच्या जोरावर बहुजन समाजाला स्वराज्याच्या मार्गावरून नेत असतां, जनरल डायर-ओडवायर यांनीं जालियनवाला बागेंत निष्पाप प्रजाजनांचें रक्तरंगण केलें आणि त्याचें प्रायश्चित्त म्हणून सरकारनें त्याला अपुऱ्या नौकरीचेंसुद्धां भरपूर पेन्शन देऊन स्वदेशी सुखरूप पाठविलें. मॉंटेग्युचेल्म्स-फर्ड सुधारणांची साखर हिंदुस्थानच्या तोंडावर पेरली जात असतां, वरील राष्ट्रीय अपमानाची सुरी हिंदुस्थानच्या अंतःक-रणांत खोल बसली आणि आतांपर्यंत चालत आलेल्या जनतेच्या विश्वासानें हिंदुस्थानावरील इंग्रजांचें राज्ययंत्र हें 'देवांचें राज्ययंत्र नसून सैतानाचें राज्ययंत्र आहे' असें महात्मा गांधींच्या मुखावाटें जाहीर केलें. सहजच, अपुऱ्या, असमा-धानकारक अशा असल्या तरी मॉंटफोर्ट सुधारणा राबवून घ्याव्यात आणि त्यांतून कांहीं सैतानी राज्ययंत्राच्या प्रति-

काराचा मार्ग काढावा कीं कांहीं अपूर्व उपायांनींच राष्ट्रीय प्रगतिरथ स्वराज्याच्या ध्येयाकडे दामटावा अशा विचारांत राष्ट्र असतां, 'गंडस्योपरि पीटिका संवृत्ता' या न्यायानें लोकमान्यांच्यासारखा राष्ट्रसूत्रधार हरपला !! त्यायोगें भांबावलेल्या राष्ट्रानें विचाराविनिमय कर-कर-केला आणि १९२० च्या सप्टेंबरमध्यें लाला लजपतराय यांचे अध्यक्षतेखालीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभेचें जादा अधिवेशन होऊन महात्मा गांधींनीं सुचविलेला नवा व तेजस्वी असा असहकाराचा मार्ग राष्ट्रानें चोखाळण्यास सुरवात केली.

या असहकाराच्या युगांत सातारा जिल्ह्यानें आपला वाटा कितपत आणि कसा उचलला, हें पाहण्यापूर्वी सहकारयुगांतील दोन सोबतीच्या मित्रप्रवृत्तींना मानाचा मुजरा करणें जरुर आहे. पैकीं पहिली म्हणजे प्रागतिकांची प्रकर्षैकरून अगतिक ते प्रागतिक अशी त्यांची कुचेष्ठा भावनेच्या भरांत अगर लब्धप्रतिष्ठितपणाखालीं कोणी करो आणि सातारा जिल्ह्या बाहेर कोणाला लागू असो नसो, अभिमानानें असें सांगतां येईल कीं, साताराजिल्ह्यांत जो प्रागतिक पंथ आहे तो प्रगति करणाराच आहे. १८९२-९३ पासून सातारा जिल्ह्यांत हा पंथ बीजरुपानें आहे, आणि जरूर तेथें व तेव्हां त्यानें आपलें स्वतंत्र अस्तित्व प्रगटही केलें आहे. पण त्याचें पहिल्यापासून अभिनंदनीय धोरण असें आहे कीं आपलीच शेखी मिरवण्याकरतां उगाच जिल्ह्याच्या चाललेल्या सरळ अथवा तेजस्वी कार्यक्रमांत विघ्न व्हावयाचें नाहीं. १९०७ सालीं सुरतेला

राष्ट्रीयसभेंत मवाळजहालांचे तट पडल्यानंतर साताराजिल्ह्यांत ती झोंडगिरी उठण्यास वेळ लागता ना. पण एकीच्या अभावीं स्वराज्य पारखें झालें हें प्रागतिक झाले तरी कसे विसरतील ? म्हणून १९०६ च्या राष्ट्रीसभेच्या ठरावाप्रमाणें १९०७ सालीं अस्तित्वांत आलेल्या जिल्हा सभेंत आणि इतर चळवळींत राष्ट्रीयांच्याबरोबर त्यांनीं शक्य तेवढा भाग घेतला, इतकेंच नव्हें तर ऐन असहकाराच्या युगांतही साताऱ्यास निघालेल्या राष्ट्रीय शाळेंत वाग्भट नारायण देशपांडे हे कांहीं काळ शिक्षक होते, असहकाराचे कार्यक्रम तत्वतः अमान्य असूनही ते राष्ट्रीय सभेचे शिस्तखोर सभासद कांहीं काळ राहिले आणि कांग्रेस कमेटींत राहणें आपल्या मर्यादेपलीकडचे झाल्यावरही मद्यपाननिरोधनासारख्या कार्यक्रमांत किंबहुना ऐन कायदेभंगाच्या चळवळींत १९३० व १९३२ सालीं लागेल ती कायदेशीर सल्ला व आपल्या ऐक्य पत्रांतून प्रसिद्धि त्यांनीं कायदेभंगाच्या तेजस्वी कार्यक्रमाला आणि त्यांत भाग घेणाऱ्या राष्ट्रीयांना दिली. आणि हें सर्व करीत असतांना गोखले-रानडे प्रणीत प्रागतिक सिद्धांतसूत्रावरील आपला विश्वास यत्किंचित् डळमळूं न देतां त्यांनीं एक बाजूनें सरकारच्या अरेरावींचा निषेध केला तर दुसऱ्या बाजूनें प्रागतिक पुढारी जनतेंत मिसळत नाहींत म्हणून दोष लावला. वाग्भट नारायणांचें हें उदाहरण सातारा जिल्ह्यांतील प्रागतिकांचें प्रातिनिधिक आहे.

तरीपण प्रागतिकांची स्वतंत्र म्हणून थोडी कामगिरी सातारा जिल्ह्यांत महत्त्वाची झाली आहे. असहकाराचा कार्यक्रम जिल्ह्यांतील बहुजनसमाजानें आणि राष्ट्रीयांनीं

उचलल्यामुळें, कायदेमंडळावरील बहिष्कारादि कार्यक्रमाचें वैय्यर्थ्य पटवावें आणि मॉटफर्ड सुधारणा राबवून दाखवून जास्तींत जास्त होईल ती सेवा करावी या हेतूनें सातारा जिल्हा प्रागतिकसंघ १९२० सालीं रावबहादूर काळे यांच्या अध्यक्षतेखालीं निघाला, आणि काळ मुंबई कौन्सिलांत निवडून आले. निवडून आल्यावर मुंबई सरकारचे लोकप्रतिनिधींतून नियुक्त झालेले डॉ० परांजपे, हिदायततुल्ला, सर चुनिलाल मेथा या दिवाणांना जिल्ह्यांत आणले, लोकांत मिसळाविले आणि सरकारी कारभाराचीं यंत्रें लोकमुखी करण्याचा प्रयत्न केला. १९२३ सालीं कऱ्हाडास प्रागातिक प्रांतिक परिषदही भरविली आणि देशांत कायदेभंगाचा मोहोर आला असतां भारतसेवक समाजाला सव्वा लाख रुपयांची देणगी देऊन गोखले एकॉनॉमिक इन्स्टीटयूट पुण्यास काढून अर्थशास्त्राच्या सखोल अभ्यासाची सोय उद्यांच्या राजकारण धुरंधरांसाठीं करून ठेवली. पुढें सर सॅम्युअल होअरांच्या कर्तबगारींचा 'पांढरा खलिता' प्रसिद्ध झाल्यानंतर हृदयनाथ कुंझरूंच्या अध्यक्षतेखालीं १९३४ मध्यें जें अखिल भारतीय प्रागातिक अधिवेशन पुण्यास भरलें त्याचे स्वागताध्यक्ष होऊन काळ्यांनीं सहकारसत्त्वाभिमान्यांनीं आपल्या कर्तबगारीचा गौरीशंकर चढून कसा प्रकाश पाडावा याचे मार्गदर्शन केलें.

या प्रासंगिक कार्यापेक्षांही सातारा जिल्ह्यांतील प्रागतिकांनीं अखंडपणें एक कार्य केलें आहे आणि तें म्हणजे न्यायमूर्ति रानड्यांच्या पुण्यतिथीपालनाचें होय. अखिल भारत वर्ष ज्या वेळीं बर्फाचा थंड गोळा होऊन पडला होता त्यावेळीं त्यांत नवचैतन्याची ऊब घालून राजकीय मोक्षाचा

आणि संस्कृतिसंदर्शनाचा ध्रुव ज्या महात्म्यानें दाखविला आणि त्याच्या दिशेनें राष्ट्राला प्रगतिपथावर नेलें, त्या न्यायमूर्तिबद्दल कोणालाही नितांत आदरच वाटतो. म्हणूनच १९०१ सालीं न्यायमूर्तींचा कैलासवास झाल्यावर त्यांच्याबद्दल दुःखप्रदर्शनाच्या सभा सातारा, वाई, कऱ्हाड, फलटण वगैरे ठिकाणीं झाल्याच पण न्यायमूर्तींच्या बंधूकडे जिल्ह्यांतून दुःखवट्याची पत्रेंही गेलीं. प्रागतिकांच्या तर्फे न्यायमूर्तींची पुण्यतिथी होत असली तरी त्या निमित्त अभ्यासू आणि अधिकारी वक्त्यांची जीं भाषणें होतात त्यांपासून आपले मार्ग व मतें कसाला लावून पाहण्याची संधि राष्ट्रीयांनीं कधींच दवडली नाहीं. फार काय सांगावें ! १९३१ सालीं दादासाहेब करंदीकरांच्या अध्यक्षतेखालीं कायदेभंगाच्या चळवळींत असलेल्या कऱ्हाडच्या बाबूराव गोखल्यांनीं साताऱ्यास न्यायमूर्तींच्या पुण्यतिथी दिवशीं त्यांच्या स्मृतिसमाधीवर वाक्सुमनांजली वाहिलीच; पण १९३२ सालीं ठिकठिकाणचे पुढारी बिगर चौकशी अडकवून ठेवल्यावर समाजांत " वरवंट्यांच्या कायद्यामुळें " जी भयमूलक शिथिलता आली ती श्रीकृष्णाबाईच्या घाटावर कऱ्हाडास तीनहजार समुदायापुढें वामनराव फडके यांचे अध्यक्षतेखालीं न्यायमूर्तींचें गुणगान तीन तास करून गोखल्यांनीं घालविली. न्यायमूर्तींच्या प्रमाणेंच नामदार गोखल्यांची पुण्यतिथि साताराजिल्ह्यांतील प्रागतिक पाळीत असतात, ती संबंधींही न्यायमूर्तींच्या प्रमाणेंच राष्ट्रीयांची वृत्ति आहे. १९१५ सालीं नामदार वारल्यावर साताऱ्यास काळ्यांच्या बरोबर करंदीकर पाठकांनीं स्मारकाकरतां वर्गणी दिली, भारतसेवकसमाजाचें कार्य साताराजिल्ह्यांत सुरूं झाल्यास दरसाल

## कै. महादेव गोविंद रानडे.



जन्म १८ जानेवारी १८४२ मृत्यु १६ जानेवारी १९०१

६० रु० देण्याचें अण्णासाहेब चिरमुल्यांनीं जाहीर केलें व कऱ्हाडास आप्पासाहेब आळतेकरांनीं:सार्वजनिक वाचनालयांत राजकीय ग्रंथाभ्यासाची सोय केली.

जिल्ह्यांतील प्रागतिक प्रवृत्तीला असा आदराचा मुजरा करून आतां "ब्राह्मणेतर" चळवळीकडे वळण्यास हरकत नाहीं. सातारा जिल्ह्यांत ही चळवळ 'सत्यसमाज' या नांवाखालीं गाजली. सत्यसमाजाचे मूळ उत्पादक जोतिराव फुले "यांचें मूळ गांव आमचे जिल्ह्यांतील कटगुण (खटाव तालुका) हें आहे." तथापि फुल्यांची हयात आणि कर्तबगारी पुण्यास झाल्यामुळें १९१०-११ सालीं कोल्हापुरच्या वेदोक्त प्रकरणानंतर छत्रपति शाहू महाराजांनीं सामाजिक समानतेचा जो प्रश्न हातीं धरला त्याचे वारे सातारा जिल्ह्यांत वहात होते. पण १९११ सालीं पुण्यास सत्यशोधक परिषद झाल्यावर सातारा जिल्ह्यांत शाहु छत्रपति व भास्करराव जाधव यांनीं सत्यसमाजाचें बीं रुजविलें. कामेरी, पेठ, काले, सोनी, भिलवडी, येडेमाच्छिंद्र, शिवथर, चितळी, वाई, केंजळ, वाळुंजे वगैरे गांवीं १९२५ अखेर सत्यसमाजाचें काम मोठ्या प्रमाणावर झालें. माणुसकीचे हक्क बहुजनसमाजाला मिळवून देण्यासाठीं निघालेल्या या समाजानें १९१७ सालीं मॉंटग्युसाहेबांचा जाहीरनामा प्रसिद्ध होईपर्यंत राजकारणांत लक्षही घातलें नव्हतें. १९१८ ची जादा राष्ट्रीय-सभा होऊन इंग्लंडांत डेप्युटेशनावर डेप्युटेशनें जाऊं लागलीं त्यांत १९१८ सालीं ब्राह्मणेतरांचें शिष्टमंडळ घेऊन भास्करराव जाधव गेले, मराठ्यांकरतां राखीव जागा मिळवण्याची त्यांनीं अनेक खाजगी भेटी घेऊन मुत्सद्यांजवळ खटपट केली आणि सिडनहॅम

साहेबांनीं ती कल्पना अर्थातच उचलून धरली. अशारीतीनें भास्करराव यश घेऊन परत आले. यानंतर राजकीय काम म्हणून जर कांहीं समाजानें जिल्ह्यांत केलें असेल तर राष्ट्रीय सभेनें बहिष्कार घातलेल्या कायदेमंडळापासून आतापर्यंतच्या सर्व कायदेमंडळाच्या निवडणुकींत भाग घेण्याच होय. सामाजिक 'जलसे' करून सामाजिक समानतेच्या प्रस्थापनेसाठीं "ब्राह्मणीवर्चस्व फेकून द्यावयाच्या" नादांत कांहीं अद्वातद्वा अत्याचार सत्यसमाजांतील कांहीं अचरटांनीं केले. यासंबधांत कोर्टकचेऱ्यांतून गाजलेली 'विट्याचें दत्तमंदीर प्रकरण' 'भिलवडीचें राममंदिर प्रकरण' बोरखळचें 'लोकमान्य पादुका स्थापना प्रकरण' हीं प्रमुख होत. गारवडें वगैरे पाटण तालुक्यांत, गोवें वगैरे सातारा तालुक्यांत, पेठ कामेरी वगैरे वाळवें तालुक्यांत आणि खटाव तालुक्यांतही विहीरी पाडणें, मारामाऱ्या करणें, घरें जाळणें वगैरे पुष्कळ अत्याचार झाले. ते लोकांना लवकर विसरतां आले नाहींत. त्याकरतां जिल्हासभेला एकदां चौकशी कमेटी नेमावी लागली. तथापि या गोष्टी आतां कानामागें पडल्या व तेंच योग्य होय. कारण जवळकरांनीं 'राष्ट्रीयसभेपासून सगळ्या चळवळी ब्राह्मणांच्या साठीं चालल्या आहेत.' असलीं बेछुट विधानें करतांच १९२५ सालीं साताऱ्यांस बाबूराव भिडे व कऱ्हाडास बाबूराव गोखले यांनीं त्यांचें डोळ्यांत झणझणीत अंजन घातलें. हेतु इतकाच कीं, गोविंदराव लिमयांच्या छोट्या कांग्रेसच्यापासून तारीख तागायत शेतकऱ्यांच्या आणि बहुजनसमाजाच्या हिताकडे डोळ्यांत तेल घालून सातारा जिल्ह्यानें जपलें असतां उगाच विपर्यास न व्हावा. सातारा

जिल्ह्याचा तो इतिहास अच्युतराव कोल्हटकरांनीं परिचित करून दिला, हें एक राष्ट्रीय सभेचा डिक्टेटर होऊन कायदे-भंगाच्या चळवळींत भाग घेण्याची आपणांस स्फूर्ती होण्यास कारण घडलें, असें १९३१ चें कराची येथील कांग्रेसचे वेळीं महाराष्ट्र कँपांत जवळकर बोलून दाखवित, हें लक्षांत ठेवण्या-सारखें आहे.

तात्पर्य घटकाभर उडालेलें चहाच्या पेल्यांतील वादळ जर सोडलें, तर बहुजनसमाज हा सुशिक्षितांच्या हातांत हात घालून एकोप्यानेंच राष्ट्रीय चळवळीच्या पीठावर उभा राहिला आहे. रघुनाथराव राणे, नलवडे प्रभृतींनीं आपल्या संवगड्यां-निशीं भाऊसाहेब सोमणांच्या १९३४ मधील निवडणुकीस सर्वथैव सहाय्य केलें हें त्याचें प्रत्यंतर होय. प्रागतिक असोत, राष्ट्रीय असोत, किंवा सत्यसमाजी असोत, समंजसपणानें राष्ट्रीय, तेजोवर्धनांत आपल्या जिल्ह्याच्या वाटणीचा भाग जिल्ह्याला पार पडतां यावा म्हणून एकोप्याचें वातावरण कोणी बिघडवू इच्छित नाहींत. याच सार्वत्रिक मनोवृत्तीमुळें सातारा जिल्ह्याला आपलें कर्तव्य वाढत्या उत्साहानें असहकारयुगांत देखील पार पाडतां आलें; तेंच आतां आपण पाहूं.

---



## प्रकरण ११ वें.

# असहकाराचा ऐन भर.

हिंदुस्थानवर कारभार करणारीं राज्ययंत्रें सैतानी म्हटल्याबरोबर त्यांच्यापासून जितकें दूर राहतां येईल तितकें रहावयाचें, स्वावलंबनाच्या जोरावर जितकें आपलें जीवन स्वतंत्र करतां येईल तितकें करावयाचें आणि ज्या लोकांच्या-साठीं लोकशाहीचें राज्य हिंदुस्थानांत उभारावयाचें त्या लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचा प्रश्न त्यांना सुखावह होईल अशा रीतीनें सोडवून त्यांच्या मतान लोकशाही उभारावयाची, हें असहकारयोगाचें रहस्य होतें.

असहकाराला उदंड आशीर्वाद देणारी जादा राष्ट्रीय सभा १९२० च्या सप्टेंबरांत झाली. त्यानंतर सातारा जिल्ह्यांत असहकाराच्या प्रचारासाठीं पहिली सभा ता. ११ आक्टोबर रोजीं पाठकहॉलमध्यें बाबा कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली. पण पुढें असहकारितेचा प्रचार करण्यासाठीं व त्या कार्याला फंड जमविण्याकरतां असहकाराचे जनक म. गांधीच नोव्हेंबरच्या ६ व ७ तारखांना सातारा जिल्ह्यांत संचार करून गेले आणि त्या संचारानें जनतेमध्यें एक तऱ्हेची गरमाई उत्पन्न केली. वाई, सातारा, कऱ्हाड, सांगली येथें हजारों हजार लोकांच्या सभा झाल्या. आणि छोट्या कॉंग्रेसांचा अगर लोकमान्यांच्या दौऱ्यांचा उत्साह पुनरुदित झालासें वाटलें. साहजिकच कल्पना पटल्याबरोबर अमलांत आणणारीं

माणसें निघालीं. घाणेकरबंधु सातारा न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक होते ते तेथून बाहेर पडले, आणि नोव्हेंबरच्या अखेरीस तर नाथ घाणेकरांनीं असहकाराचा प्रचार स्वतांच जिल्ह्यांतील गांवोगांव करण्याचें ठरवून डिसेंबरमध्यें ते त्या कामास लागलेही.

१९२१ सालीं असहकाराच्या आचरणाच फवारे जिल्ह्यांत जिकडे तिकडे इंद्रधनुष्यें उभारतांना आढळले. कायमचीं नसलीं तरी एक वर्षभर अगर तुटमुदतीनें कांहीं विद्यार्थ्यांनीं शाळा कॉलेजें सोडलीं. विनायकराव फणसळकरांनीं कऱ्हाडास राष्ट्रीय उत्थापनाची प्रभात फेरी सुरू केली व मग तोच उठाव गांवोगांवीं झाला. आप्पासाहेब आळतेकर, अष्टपुत्रे, टिळक, यशवंतराव देशपांडे, श्रोत्री, मारूलकर वगैरे वकीलांनीं कोणी आज, कोणी उद्यां अशी वकिली कांहीं मुदत तहकूब केली. या मुदतींत मारूलकर मुळशी सत्याग्रहांत शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या हस्तें तांबव्यास विदेशी कापडाची होळी करण्यांत आली. अष्टपुत्रे, आळतेकर, गोविंदराव श्रोत्री यांनीं ती अजिबात सोडली. जुलै अखेर जिल्ह्यांत राष्ट्रीयसभेचे ४३२५ सभासद झाले. टिळक स्वराज्य फंड १३००० रुपयांचेवर जमला. सातारा वाई, भुईंज, लोणंद, कराड, खंडाळे, औंध येथें मद्य—पानप्रतिबंधक निरोधन हिंदु—मुसलमान सर्वांनीं मोठ्या उत्साहानें केलें. रहिमतपूर, कऱ्हाड, मसूर येथें प्राथमिक राष्ट्रीय शाळा निघाल्या. साताऱ्यास घाणेकरबंधूंचे नेतृत्वाखालीं ता. १ मार्च रोजीं टिळक राष्ट्रीय विद्यालय निघून नरसिंहाचार्य गजेंद्रगडकर, वाग्भट देशपांडे, टिळक, गोखले, जोशी, राज्योपाध्ये ही मंडळी तेथें शिक्षकांचीं कामें करूं लागलीं

मुळशी सत्याग्रह व असहकारिता यांच्या प्रचारासाठीं मे महिन्यांत अष्टपुत्रे वकिलांनीं दौरा काढला आणि उंब्रजचे नारायण शिराळकर, कऱ्हाडचे मारूलकर वकील, खटावचे बा. वा. इनामदार, पालीचे र. म. वैद्य वगैरे मंडळी मावळयांच्या जमिनी जाऊं नयेत म्हणून सत्याग्रहास गेली व एक दीड महिना शिक्षाही भोगून आली. मुळशी सत्याग्रह २३ नोव्हेंबरपासून जोरांत आला होता त्याचे सातारचे चिटणीस डॉ. वा. वि. आठल्ये होते. ते स्वयंसेवक पुरविण्याचें काम करीत राहिले. मुळशीचें धरण म्हणजे जसा महाराष्ट्रीय हृदयावरील आघात, तसाच जालियनवाला बागेचा अत्याचार हिंदी राष्ट्राच्या अंतःकरणांत बोंचणारें शल्य होय. तो १९२१ सालीं तर ताजा होता. म्हणून " राष्ट्रीय सप्ताह " जिल्ह्यांत सगळीकडे पाळला गेला. त्यांत इसलामपूरचे वासुदेवराव मुंडले आणि डॉ. भाऊराव वैद्य यांनीं बहारीचा केला. कऱ्हाडास जाधव, बटाणें, शिराळकर, मौलवी, कोल्हापुरे प्रभृतीमंडळीवर १४४ खालीं नोटीसा असल्या-कारणानें कऱ्हाडची मंडळी कृष्णाबाईच्या वाळवंटांत सैदापूर कऱ्हाडच्या सरहद्दविर जमली व राष्ट्रीय सप्ताह गणपतराव आळतेकर आणि बाबूराव गोखले यांच्या नेतृत्ववक्तृत्वानें साजरा करती झाली.

वरील कऱ्हाडकर पुढाऱ्यांवर भाषणबंदी वगैरेची नोटीस असावयाचें कारण म्हणजे त्यांनीं कऱ्हाड-पाटण तालुक्यांतून असहकरितेच्या प्रचारानें वातावरण तापवून ठेवलें होतें. हें होय. आगष्टमध्यें चिंतामणराव वैद्य व प्रो. फडके हे स्वदेशी बहिष्कारावर व्याख्यानें देऊन

गेले, तेव्हां असहकाराचा पारा फारच वर चढला. खादीच्या वापराबरोबर चरख्याचा प्रसार एवढ्या मोठ्या प्रमाणावर करण्यांत आला कीं, जवळजवळ घरटीं एकएक चरखा जाणत्या माणसांच्या वस्तींत फिरत होता म्हटलें तरी चालेल. विठ्याच्या पेंडसे वकीलांनीं खादीची कफनी व त्यांच्या पत्नींनीं खादीचा ' लहंगा ' पेहरण्यास व फुरसतीचा क्षण न् क्षण सूत काढण्यांत खर्च करण्यास आरंभ केला. आपल्या विद्यार्थ्यांना आपण सूत कातण्याचें शिक्षण देत असतो हें सांगावयास कऱ्हाड टिळक हायस्कूलसारख्या शाळेला अभिमान वाटत असे. भरीला सातारा जिल्हा कॉं. कमेटीचे चिटणीस गोविंदराव कुबेर वकील यांनीं सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यांत स्वदेशी – खादीप्रचारासाठीं फिरती काढली. दसऱ्याच्या सुमारास खादीचा प्रसार एवढ्या मोठ्या प्रमाणांत आढळला कीं कऱ्हाडच्या हिंदुमुसलमानांची चार हजार लोकांची मिरवणूक खादी पोशाखांत दसऱ्यादिवशीं प्रेमानें सीमोल्लंघन करून आली. हिंदुमुसलमानांचें ऐक्य व असहकाराची चळवळ कऱ्हाडास यावेळीं शिगेला पोंचली होती.

ता. १६ फेब्रुवारीं रोजीं सातारा येथें शंकरराव देवांचें " नागपूर कॉंग्रेस " वरील व्याख्यान यशस्वी झालें होतें, तसाच आतां नोव्हेंबरमध्यें वाई, विटे, तासगांव, रहिमतपूर येथील दौरा यशस्वी झाला.

अज्ञान देशबांधवांतील दारूच्या प्रसारास आळा घालण्याचाही प्रयत्न जोरांत झाला. जुलै १० तारखेस गोविंदराव श्रोत्री वकीलांचे अध्यक्षतेखालीं दारूबंदीची सभा

मामा गोळवेलकरांनीं बोलावली. त्या सातारच्या सभेंत जिल्ह्यांतील सर्व मद्यपान-निरोधनाचा अहवाल सांगण्यांत आला. त्याचा विशेष म्हणजे वाई-भुइंज येथील गुत्ते १९ जून पूर्वींच ओस पडल्याचें आणि सातारच्या गुत्त्यांना ता. ८ जून पूर्वींच रोज १०० ते २०० रु. नुकसान येऊं लागल्याचें जाहीर झालें.

शांत रीतीनें पिकेटिंग करणाऱ्या स्वयंसेवकांना बास्कर-व्हिले यांनीं कडक शिक्षा दिल्या व त्यांस अत्याचारी ठरविलें. म्हणून ता. १६ जून रोजीं निषेधपर भाषणें केल्यावरून हुजूरडेप्युटी मि. डोमिंगो यांनीं सोमण, अष्टपुत्रे, नाथ घाणेकर, हकीम नज्मुद्दीन यांस दोन महिने भाषण बंदी केली. तरी पिकेटिंगचे कार्यक्रम चालूंच होते, आणि खटल्यांना कोणी बिचकत नव्हता. तेव्हां नौकरशाही गोंधळली. तथापि एवढ्यांत प्रिन्स ऑफ वेल्स १७ नोव्हेंबरास हिंदुस्थानांत यावयाचें जाहीर झालें. पण राष्ट्रीयसभेनें युवराजांच्या आगमनावर बहिष्कार घातला. तो साताऱ्यांत यशस्वी होऊं द्यावयाचा नाहीं, या ईर्षेनें सोमण अष्टपुत्रे प्रभृति नऊ इसमांवर १६ नोव्हेंबर रोजीं भाषण बंदीची नोटीस लागली. तरीपण अव्हानपूर्वक कायद्याच्या मर्यादेंत सोमण अष्टेकर प्रभृतींनीं भाषणें करून १६ ची सभा पार पडली. तिचा परिणाम होऊन १७ नोव्हेंबरचा हरताळ कल्पनातीत यशस्वी झाला.

असहकारचा प्रताप अन्य तऱ्हेनेंही या सालीं जिल्ह्यांत दिसून आला. पोलीस-सुपरिंटेंडंटच्या ऑफिसांतील कारकून

वा. ........ सं.
ता. ..........
दा. जं.

त्र्यंबक बापूराव कंटक यांनीं आपली नौकरी सोडली. व गोरक्षणादि विषयांस वाहून घेतलें.

असहकारिता हाणून पाडण्याकरतां सरकारनें खटले करून बघितले, भाषण बंदी केली, मॉयसीसाहेब कलेक्टर होते त्यांनीं बोटचेप्या सरदार इनामदारांना आर्जवून गुलाम-सभेचे सभासद वाढविण्याची विनंति केली पण कांहीं उपयोग झाला नाहीं. सप्टेंबर १९२१ मध्यें कोंकणमधील श्यामकवींना कऱ्हाड येथें भाषण बंदी केली तरी ते पेठेंतून व्याख्यान देत चालले! तर मामलेदार–पोलीसांनीं तें व्याख्यान ऐकूं नये असा व्यवहार–विसंगत हुकूम सोडला. परिणाम असा झाला कीं, कऱ्हाडच्या वाळवंटांतील मारुतीचे देवळाजवळील श्यामकवींची सभा मोडतां मोडतां पोलीस टेकीला आले.

सातारा जिल्ह्यांत अष्टपुत्रे जसे कॉंग्रेसकमेट्या स्थापत गेले, तशा एकट्या तासगांव तालुक्यांत २४ कांग्रेस कमेट्या स्थापन झाल्या, १२ लवाद कोर्टें ऊर्फ ग्रामपंचायतीं अस्तित्वांत आल्या, ग्रामसंघटनाच्या उद्योगाला चितोपंत काळे व दातार डॉक्टर लागले, कुलकर्णी व शंकरराव करंदीकर खेड्याखेड्यांतून खादीप्रसार करूं लागले आणि तात्या शिंद्यासारखा म्युनिसिपल शिपाई तरुण पोरें हातीं धरून दारू दुकानावर निरोधन करूं लागला. लोकांच्या संघटित व स्वावलंबी सामर्थ्याची चुणूक अशी सरकारी यंत्रांना झणझणल्यामुळेंच १९२२ च्या मार्चमध्यें जिल्हा कॉं. कमेटीचे अध्यक्ष अष्टपुत्रे कऱ्हाड तालुक्यांत फिरकूं नयेत म्हणून त्यांची तीनवार मुस्कटदाबी करण्यांत आली आणि तोच प्रसाद रायबागचे मौ. अबदुल महंमद युसफ यांस साताऱ्यास मिळाला. कारण १९२२ च्या

१९ जानेवारीला " अगारा " दिन पाळण्यांत आला त्यांत श्रोत्री वकीलांच्या अध्यक्षतेखालीं साताऱ्यास झालेला विशेष परिणामकारक होता आणि फेब्रुवारीच्या महिन्यांत खादीप्रसारार्थ जो दौरा सौ. इंदिराबाई देवधर आणि श्री. आनंदीबाई जोगळेकर यांनीं जिल्ह्यांत केला त्यानें खात्री पटविली होती कीं, लोकांच्या उत्साहाचा कढ अजून चढता होता. ता. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजीं खटाव येथें सब्‌रजिस्टर उस्मानशा आणि मांजगांवकर यांच्यामध्यें सरकारी मनोवृत्ती व राष्ट्रीय सभावाल्यांची प्रवृत्ति या व्यासभिन्नतेमुळें कटकट झाली. दुसरें दिवशीं भाऊसाहेब सोमण खटावला गेले व आव्हानपूर्वक सायंकाळच्या सभेंत सब्‌राजिस्टरवर आदले दिवशीं रजिस्टरनीं केलेल्या अतिप्रसंगाबद्दल भाऊसाहेबांनीं टीका केला. पुढें रजिस्टरला नोटीस देऊन वृत्तपत्रांतून आनावृत पत्र कलेक्टरांस लिहिलें त्याचा परिणाम सरकारी प्रकोपांत भर घालण्यांतच झाला. नौकरशाहीनें असहकारी मंडळीवर आतां उडाणटप्पूपणाचे खटले भरण्याचें ठरविलें आणि पहिला बळी गणेश हरी साठे यांचा घेऊन त्यांस विसापूरास धाडलें. पण तेवढ्यानें नौकरशाहीचें समाधान नव्हतें; जालियनवाला बागेचा राष्ट्रीयसप्ताह दिसत होता. तेव्हां नाथ घाणेकर, हकीम, आपटे यांचीं तोंडें चालू होतीं. तीं बंद केल्याशिवाय राष्ट्रीयसप्ताहाची चेतना बंद पडावयाची नाहीं, अशा समजुतीनें सातारा मामलेदारांनीं १४४ कलम त्यांस लाविलें. पण दादासाहेब करंदीकर, आगाशे, सोमण, वा. वि. आठल्ये, श्रोत्री, निळुभाऊ घाणेकर, वा. वा. अतीतकर, फाटक, बाबासो

शालगार हे इसलामपूर, मसूर, शिराळ, कऱ्हाड वगैरे भागांतून जागृति करून आलच.

एव्हांना राष्ट्रांत एक प्रश्न जोरांत उसळी मारीत होता सरकारी वा सरकारमान्य शाळा, कोर्टें व कायदेमंडळें यांवरील बहिष्कार हा असहकाराचा जो कार्यक्रम तो खण— खपीत यशस्वी करावयाचा तर कणखरपणानें लोकांनीं आपल्या शाळा व पंचायती काढून अशा चालवल्या पाहिजेत कीं, जुलूमशाहीनें एक संस्था नेस्तनाबूद केल्याबरोबर तिच्या मातींतून दुसरी मूर्तिमंत उठली पाहिजे. समर्थ विद्यालयाच्या विनाशांतून तसें विधायक विद्यालय उद्भवलें नाहीं कीं, सावजानिक काकापासून लवाद कोर्टें चालवून सुद्धां सरकारी कोर्टांवरची रीघ कमी झाली नाहीं. हा जुना अनुभव असल्यामुळें, लोकमान्यांची चतुःसूत्रीचीं तत्त्वें असहकारांत पाहूनसुद्धां शाळा-कोर्टांवरील बहिष्कारादि तपशील करंदीकर सोमण प्रभृतींना मान्य नव्हता, तथापि पाणी तोडूं पाहणाऱ्या उमेदीला अटकावणें हें सातारा जिल्ह्याला वावडें असल्याकारणानें तेजस्वी पाऊलटाकीला पुढाऱ्यांनीं हातभारच लावला. तरी देखील शाळा— कोर्टांवरील बहिष्कार यशस्वी झाला नाहीं. त्या प्रमाणेंच कायदे मंडळाच्या बहिष्काराची कथा. हा बहिष्कार तेव्हांच यशस्वी म्हणतां येईल कीं, जेव्हां कायदेमंडळें एक खरोखर ओस पडतील अगर भरलींच तर निदान स्वाभिमानी सभासदांनीं तरी भरतील. विलिंग्डनसाहेबांच्या युद्धपरिषदेंतून टिळक प्रभृति होमरूलर्स उठून आल्यावर जिनांनीं जो नमुना उठवला तो तरी उठावा, पण तेंही शक्य झालें नाहीं.

१९२० मध्यें ज्या कायदेमंडळावर राष्ट्रीयांनीं बहिष्कार घातला होता तीं नादानपणें काम करीत होतीं, तेव्हां जेथून लोकमताच्या नांवावर कायदे होतात तीं कायदेमंडळेंच आपण बहिष्कृत म्हणून सोडतां कामा नयेत. कायदे-मंडळावरचा बहिष्कार नुसता तोंडी राखण्यांत व व गबाळ्यांच्या हुकमी बहुमतानें सरकारी लहरींचे कायदे निमूट लादून घेण्यांत असहकाराच्या शद्बनिष्ठेपेक्षां काय साधतें ? तेव्हां असहकार जसा बाहेरील चळवळीनें करावयाचा तसा कायदेमंडळांत मूळ कायद्याची भट्टी तापवूनही करतां येईल. म्हणून कायदेमंडळें काबीज करावीं असें आंदोलन आतां सुरू झालें. १९२० सालीं लोकमान्यांनीं डेमॉक्रॅटिक स्वराज्यपार्टी – लोकशाहीस्वराज्यपक्ष काढला, त्याच्यातर्फे सातारा जिल्ह्याला भाऊसाहेब सोमण, कडूसकर आाणि नरसिंहपूरचे बाळा पाटील मुंबई कौन्सिलकरतां उभे राहण्याचें ठरलें होतें. निवडणुकीच्या खटपटीलाही सुरवात झाली होती. इतक्यांत लोकमान्यांच्या मृत्युनंतर राष्ट्रीयसभेनें असहकाराचा जो पुरस्कार केला त्यांत कायदेमंडळाचा बहिष्कार असल्यानें राष्ट्रीयसभेच्या इज्जतीसाठीं वरील मंडळींनीं आपली उमेदवारी परत घेतली होती. पण आतां कायदे-मंडळाच्या बहिष्काराचा कटु अनुभव आल्यावर त्यांनीं स्वाभाविकपणच कौन्सिलप्रवेशाला तोंड फोडलें. तथापि एकदां सरकारी यंत्राशीं असहकार करावयाचें ठरल्यावर, स्वावलंबनानें आपलें सामर्थ्य, आणि आपल्या शद्बापाठीमागील जनतेचा दुजोरा खडाखंब केल्यावर सुलता-नांचे सुलतान लटपटतील, मग पांगळ्या आमदार-खासदारांचा

मळवट भरून नौकरशाहीचें अखंड सौभाग्य कितीसें तग धरील? म्हणून असहकाराला धर लागतों न लागतों तोंच सरकारी यंत्रांत आपला हात अडकवून घेण्याच्या फंदांत पडूं नये अशी दुसरी विचारसरणी पहिली इतकीच तीव्र होती. जून महिन्याचे शेवटीं गंगाधरराव देशपांडे व शंकरराव देव हे या दुसऱ्या विचारसरणीलाच खतपाणी घालून वाई भागांतून गेले आणि पहिल्या विचारसरणीचा पुरस्कार करीत सप्टेंबर महिन्यांत दा. वि. गोखले आणि रावबहादूर काळे वाई भागांतच मोहीम करून आले. आप्पासाहेब आळतेकर व इसलामपूरचे कौजलगी राष्ट्रीयसभेचा प्रचार जिल्हाभर करीत होते पण वाईचे गणेश हरी खरे, बाबासाहेब शिंदे हे जुलै व आगष्ट महिन्यांत जावली व पाटण तालुक्यांत राष्ट्रीयसभेच्या प्रचाराबरोबर कोयनाव्हॅलींत होणार होणार म्हणून गाजत असलेल्या व मुळशीप्रमाणेंच शेतकऱ्यांच्या मुळावर येणाऱ्या धरणाची माहिती शेतकऱ्यांना देत फिरत होते. इतके कीं अधिकाऱ्यांनीं त्यांच्यामागें जमानतीचें लकडें लावलें!! आगष्ट महिन्यांतच तात्यासाहेब करंदीकर मुळशीसत्याग्रहाचा व प्रो. दत्तोपंत घारपुरे राष्ट्रीयशिक्षणाचाही "सांगावा" सांगून गेले, अतीतकरांनीं मुळशीफंड गोळा केला, बाबासावरकरादि सुटले म्हणून सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत आनंद प्रदर्शित करण्यांत आला; सर्व कांहीं झालें; पण कायदेमंडळाच्या प्रवेशाचें जें भिजत घोंगडें पडलें होतें त्याबद्दल सातारा जिल्ह्यांत सरसालांतही बहुजन समाजानें प्रश्न काढला नाहीं. कारण बहुजन समाजाला कायदेमंडळांत शिरणारांना

मतें देतां आलें, एखाद्या लायक उमेदवाराबद्दल खटपट करतां आली, तरी निवडणुकीच्या घटकेपुरतीच उमेदवार लोकमताची आराधना करतो. तेव्हां, सैतानी सरकारच्या कसल्याही मोहिनी अस्त्राला बळी पडणार नाहीं अशी आपल्या बद्दल जनतेची खात्री पटवील इतकी तपश्चर्या संभवनीय उमेदवारांच्या हातून घडावी या रोखा व्यतिरिक्त कायदेमंडळाचा प्रश्न कानामागें टाकण्यांत बहुजनसमाजाचा हेतु नव्हता. हा जनतेचा रोख हेरूनच माधवराव साठे, गंगाधरशास्त्री सोहना, काशीनाथपंत कोल्हटकर, गोविंदराव परांजपे, मुर्शीत हिदायत अल्ली, गणेश नरसिंह जोशी, केशवराव गोडबोले, विष्णुपंत कान्हेरे वगैरे वाईकर सुबुद्ध मंडळींनीं जुलैपासून वाई तालुका खादीमय करून सोडला होता. शेवटीं " आळीमिळी " घालून ठेवलेल्या कौंसिल प्रवेशाच्या प्रश्नानें इसलामपुर येथें जिल्हा सभेंत तोंड वर काढतांच, त्याला पाय म्हणून टेकतां आला नाहीं. तसें जगास व सरकारी अधिकाऱ्यांस कळून चुकलें कीं, जिल्ह्यांत विचाराचे ओघ दोन असले तरी राष्ट्रीय सभेच्या ठरावास आपण हरताळ फासण्यास कारणीभूत होऊं नये याबद्दल सातारा जिल्हा अत्यंत दक्षता घेतो. राष्ट्रीय सभेच्या इज्जतीची दक्षता म्हणजे मॉयसी साहेबासारख्या कलेक्टराला तो आपल्या कारभारा वरील अकारण कलंक वाटे आणि म्हणूनच कीं काय अनेक खटलेखोकले करूनही दमचक्कीला न येणाऱ्या जनतेला दबावण्यासाठीं वाईच्या काकाराव पंडितांचें व कऱ्हाड तालुक्यांतील अनंत हरी येळगांवकरांचें इनाम जप्तींत काढलें

आणि कारण काय दाखविलें ? तर म्हणे १९२१ सालीं युव–राजांच्या आगमनावर बहिष्कार घातल्याच्या निमित्तानें जी सभा भरली होती, तिचे काकाराव पंडित अध्यक्ष होते; आणि खादी वगैरे वापरणारे अनंत हरी लोकांना " सारावंदी " चा उपदेश करीत असल्याची दखल सरकारलाच होती !!

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. ........ नं. ........
ता. ............
ठाणे.

## प्रकरण १२ वें

## उतरण.

राष्ट्रीयसभेचे ठराव हे अज्ञापक कीं अनुज्ञापक ? लष्करीशिस्तीनें रणांगणावरील सैनिकांप्रमाणें अमलांत आणावयाचे कीं आपल्या विवेचक-बुद्धीला पटेल, शाळेच्या नांवलौकिकाला कमीपणा आणणार नाहीं आणि तत्त्वाचें आटोकाट आचरण होईल ( मग बाह्य देखाव्यांत जरा इकडे तिकडे झालें तरी चालेल ) अशा निकरानें शिक्षकाच्या " सांगीस " अनुसरावयाचें ? विचारवंतांचें उत्तर एकच कीं, पहिला क्रम लढ्याच्या वेळचा प्रासंगिक, तर दुसरा निरंतरचा. यावर आक्षेप असा कीं, हिंदुस्थानचा स्वराज्याशीं लढा कांहीं घटका दोन घटकांचा नाहीं कीं वर्ष सहा महिन्यांचा नाहीं, तेव्हां स्वराज्य मिळेपर्यंत कडक लष्करी शिस्त लोकांनीं पाळली पाहिजे. पण हें मत अत्यंतिक नाहीं का ? स्वराज्याचा लढा १८१८ तच सुरू झाला असें

सातारा जिल्हा मानतो. पण अंगठीवरील खड्यासारखें चौदा लक्षांचें राज्य प्रतापसिंह महाराजांना ठेवणारा आणि तेंही दत्तकाच्या फुसक्या निमित्तानें पुढें गिळणारा महोदर जर आपली वर्तणूक हिंदुस्थानच्या कल्याणाची भासविण्यासाठीं सामदंड - भेदादि उपाय अमलांत आणणार तर हिंदुस्थानानेंही तेच आणावयास नकोत काय? राजकारणांत बहात्तर रोगावर एकच औषध सांपडल्याचा दाखला जगाच्या इतिहासांत तरी नाहीं. तरी पण या सर्व बाबतींत राष्ट्रीयसभेचे ठराव आज्ञा म्हणून लष्करी कडकपणानें पाळावयास नकोत काय? राष्ट्रीयसभा म्हणजे एकच एक शिवाजी असती तर तसें करणें एकवेळ बुद्धीवादाला धरून झालें असतें. पण शिवाजी झाला तरी संग्रामानंतरचे शांतीच्या काळांत अगर खलबतखान्यांत आपल्या मातोश्रींचा आणि सख्यासंवगड्यांचा सल्ला घेत नव्हता आणि त्यांच्या विचारांना मान देत नव्हता असें थोडेंच आहे? राष्ट्रीयसभा तर बोलून चालून कोटीमुखी हिंदी राष्ट्राचें तोंड. तेंव्हां स्वराज्यविकासक्षम विचारस्वातंत्र्याचा दृढभाजक तेथें निघावयास हवा, म्हणून सातारा जिल्ह्यानें आतांपर्यंत आपल्या वर्तनानें तरी दिलेला निर्णय असा कीं, एरवींच्या काळीं राष्ट्रीयसभेचे ठराव अनुज्ञापक स्वरूपाचे मानावेत आणि लढ्याला तोंड लागते त्या वेळीं कसलाही विचार न करतां ते लष्करीशिस्तीनें आज्ञापक स्वरूपाचेच मानावेत. कायदेमंडळाच्या प्रश्नावर १९२२ सालीं अनुज्ञापकतेचें सदर टाकावयास सातारा जिल्हा तयार झाला नाहीं याचें कारण "कायदेमंडळांत शिरावें" असे म्हणणारे लोक असहकाराचें तत्त्व चिरडीत होते म्हणून

नव्हे तर असहकारानें लढ्याला लागलेलें तोंड इतक्यांतच फिरवण्याची जरूर नाहीं असा सातारा जिल्ह्याचा कयास होता म्हणून.

पण पुढें राष्ट्रीयसभेंतच निर्माण झालेल्या स्वराज्यपक्षानें कायदेमंडळांत शिरण्याची राष्ट्रीयसभेची अनुज्ञा मिळविली, एप्रिल १९२३ च्या पहिल्या आठवड्यापासून स्वराज्यपक्षाकडे कांग्रेसकमेट्याही कारभारासाठीं गेल्या, तेव्हां आपलीच "एकांडे शिलेदारी" गाजवून सातारा जिल्ह्याला अर्थ तरी काय होता? व दुफळीपासून दोन हात दूर असणें हें तर सामान्यतः सातारा जिल्ह्याचें धारण. तेव्हां स्वराज्यपक्षानें सातारा जिल्ह्याकरतां भाऊसाहेब सोमणांना आपले मुंबई कौन्सिलसाठीं उमेदवार म्हणून पसंत करतांच, केवळ पहिल्या नंबरानेंच नव्हे तर प्रचंड बहुमतानें जिल्ह्यानें त्यांना निवडून दिलें.

असहकारितेच्या ऐन भरांत खिलाफतीच्या प्रश्नामुळें एकदिल झालेला मुसलमान समाज चंचल झाला, असहकाराचा कार्यक्रम तत्त्वतः कबूल असला तरी "तपशील नाकबूल" करणारा एक विभाग राष्ट्रीयांतच पडला, राष्ट्रीयसभेचा सभासद होण्याबद्दल असणारी वर्गणी सूतरूपानेंच दिली पाहिजे असा निर्बंध असल्यामुळें त्या सांप्रदायसमाधानाकरतां अनेक पर्यायप्रकार पडद्यामागें झाले; ही राष्ट्रीय मनमोकळ्या जीवनाची एक तऱ्हेनें कुचंबणा होती, म्हणून बहुजनसमाजांत आंदोलन करण्यानें आणि करून बहुजनसमाजाच्या पाठिंब्यानें जो स्वराज्याचा लढा चालावयाचा त्याला मंदी आली आणि जो काय लढा दिला गेला तो

कायदेमंडळाच्या आवारांतच होय. त्यामुळें सरकाररोखें वळलेली सातारा जिल्ह्यांतील बहुजनसमाजाची चळवळ म्हणजे प्रथम कायदेमंडळांत राष्ट्रीय दृष्टया कोणाला निवडून द्यावयाचें इकडे लक्ष ठेवून योग्य तोच प्रतिनिधी निवडून द्यावयाचा आणि त्याच्याकडून काम करवून घ्यावयाचें, किंवा तो करतो कीं नाहीं हें डोळ्यांत तेल घालून पहावयाचें. या दृष्टीनें १९२४ च्या जून २२ तारखेला एम्. एल्. सी. सोमणांच्या अध्यक्षतेखालीं कृष्णाकॅनॉलच्या बागाइतदारांची सभा झाली अगर १९२५ च्या नोव्हेंबर २३ तारखेस वाढलेल्या शेतसाऱ्यासंबंधीं तारळ्याच्या शेतकऱ्यांनीं सरकारप्रमाणेंच सोमणांच्याकडेही अर्ज पाठविला हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. " १९२२ सालचे कॅनॉलसंबंधींचे नियम कॅनॉलखालच्या बागाइतदारांस लागूं करणें अन्यायाचें आहे, वीस गुंठ्यावर दसकडी पाठीमागें आकारणी करणें, अर्जांत लिहिलेल्या क्षेत्राचा भरपूर आकार घेणें, जास्ती जमीनीस चुकून पाणी दिलें गेल्यास तिप्पट दंड करणें वगैरे बाबींबद्दल असमाधान व्यक्त करणारे " ठराव बागाइतदाराच्या सभासदांनीं केले. अगर १९२६ च्या निवडणुकींत प्रतिसहकारवादी म्हणून निवडून आलेले नानासाहेब देशपांडे " तुकडेपट्टी बिला " बद्दल सर्व जिल्हाभर १९२७ सालीं हिंडून लोकमत पडताळून आले, त्याचा उपयोग कायदेमंडळाच्या आंतील लढ्याकरतांच होता. इतकें कशाला ? तरमवाढीसंबंधांत सप्टेंबर १९२३ मध्यें भाऊसाहेब सोमण यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेली खटाव-तालुका सभा, नानासाहेब देशपांडे यांचे खटपटीनें तरमवाढीसंबंधांतच पांडुरंगराव मोहिते यांच्या अध्यक्षतेखालीं

भरलेली कऱ्हाड—तालुका—शेतकरी—परिषद आणि त्यांचीं भावंडें हीं कायदेमंडळांतील चकमकीकरतांच होतीं.

प्राप्त परिस्थितीचें पाणी अशा रीतीनें सातारा जिल्हा तोंडींत असतां राष्ट्रीयांमधील दुभागणी सातारा जिल्ह्याला बोंचत होती, व म्हणूनच १९०० व १९१४ सालाप्रमाणेंच १९२५ सालींही प्रांतिक परिषद भरविण्याचें धाडस करून सांप्रदायिक म्हणूनच जाचक वाटणारी सुताच्या वर्गणीची अट कमी करावी असा ठराव करून साताऱ्यानें एकीचें वातावरण उत्पन्न केलें. ही एकीची मनोवृत्ती जिल्ह्यांत जागृत रहावी, सामुदायिक अशा राष्ट्रीय संचालनेचा पारा उतरला तरी एका विशिष्ठ अंशाखालीं येऊंच नये, म्हणून सातारा जिल्ह्यानें या कायदेमंडळ-प्रवेश-वादाच्या काळांतही काळजी घेतली.

तासगांवचे शंकर दिनकर करंदीकर हे १९२१ साला-प्रमाणेंच १९२३ सालींही खादीप्रचारार्थ दौरा करीतच होते; सूत कातणारासाठीं बक्षीसें लावून खादीचा प्रचार करणारे श्रोत्री एप्रिल १९२५ च्या दुसऱ्या पंधरवड्यांत भाऊसाहेब सोमणांसमवेत जिल्ह्याच्या पूर्वभागांतून राष्ट्रीयसभेवरील निष्ठा आणि प्रांतिक परिषदेंत होणें जरूर असलेली एकी, यासंबंधीं दौरा काढून आले. १९२६ सालीं युनिव्हर्सिटीतर्फे डॉ० देशमुखांना निवडण्याविषयीं गोसावी वकीलांनीं पदवीधर-मतदारांस विनंति केली. ता. २१ जून रोजीं प्रतियोगी सहकारितेवर साताऱ्यास तात्यासाहेब केळकरांचें व्याख्यान आण्णासाहेब मुतालिकांच्या अध्यक्षतेखालीं झालें; परचुरेशास्त्री पांडुअण्णा शिराळकरांच्या प्रेरणेनें कऱ्हाड तालुक्यांत दीड

एक वर्ष हिंडलें; ता. ८ आगष्ट १९२५ रोजीं रा. ब. काळ्यांचें सुरेंद्रनाथ बानर्जींच्या दुःखप्रदर्शनार्थ सातार्‍यास हृदयस्पर्शी व्याख्यान झालें; हे व असले प्रसंग म्हणजे समाजाची राष्ट्रीय वृत्ति विशिष्ट धारणेखालीं न येऊं देण्याचेच प्रयत्न होते.

---

## प्रकरण १३ वें

# बहुरंगी तीन वर्षें.

लांब उडी घेणाराला किंचित् मागें पळत जावें लागतें त्याप्रमाणें असहकारावरून दोन वर्षें किंचित् मागें उडी घेऊन मोठ्या उडीच्या तयारीसाठीं हिंदुस्थान हातोपे सावरूं लागला आणि अर्थातच सातारा जिल्ह्यानेंही तेंच केलें. तत्त्वज्ञान, मग तें धार्मिक मोक्षाचें असो नाहींतर आधिभौतिक मोक्षाचें ऊर्फ राष्ट्रीय स्वातंत्र्याचें असो, तें जनतेच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवून "सुखाचे संसार" थाटण्यास मदत करीत नसेल तर त्याचा कांहीं एक उपयोग नाहीं. म्हणून राष्ट्रीयसभेंतील मतभेद टाळून निर्भेळ राजकारणच करावयासाठीं राष्ट्रीयसभेला मोकळी केली तरी असह-काराच्या बुडाशीं असलेलें स्वावलंबनपूर्वक बहुजनसमाजाच्या जीवनाला रूप आणणारें खादीचें तत्त्व रुजविण्याकरतां खादीसंघ महात्माजींनीं स्वतंत्र काढला, आणि आपलें प्रचार-कार्य करीत करीत ते फेब्रुवारी १९२७ च्या अखेरीस

ग्रं. क्र. ५३३९.



सातारा जिल्ह्यांत आले. महात्माजींनीं देशसेवा आणि " खादी हेंच स्वदेशीचें शुद्ध स्वरूप " या त्यांच्या वचनांतील तत्त्व बहुजन समाजास कसें पटलें होतें याचें प्रत्यंतर २५ फेब्रुवारी पासून सातारा जिल्ह्यानें खालीलप्रमाणें दिलें:—

| गांव | सभा | थैली रु. | हार वगैरेंचा लिलांव |
|---|---|---|---|
| सांगली | ४००० | ९९० | ४९१ |
| दुधगांव | २००० | २०० | २९ |
| अष्टें | ३००० | ३५० | ४२ |
| इसलामपूर | ९००० | ९०१ | १०० |
| कऱ्हाड | ६००० | ५०१ | ४१ |
| सातारा | १०००० | ९०० | |

दुधगांव येथें २९ रु. ढवळीचे, इसलामपूर येथें ३२॥ रु. रेंठरेंहरणाक्ष येथील, सांगलीला खादीचा लिलांव ३०० रुपये, अष्टयाला करंडकाचा लिलाव ३० रुपये आणि रेठरेहरणाक्षच्या हारांचे लिलांव १९ रुपये हें लक्षांत घ्यावयांस पाहिजेत. यावेळीं अष्टें, इसलामपूर, कऱ्हाड, सातारा येथें म्युनिसिपालिट्यांचीं मानपत्रें झालींच; पण इसलामपूर आणि सातारा येथें लोकलबोर्डाचींही मानपत्रें झालीं. अष्टयाला एका ९।६ वर्षांच्या मुलानें स्वागत केलें, तर कऱ्हाडास खादी-भांडार उघडलें व मातंग समाज विठ्ठल मंदिराचा महात्माजींच्या हस्तें पाया घातला. साताऱ्यांत छत्रपति विद्यार्थीवसातिगृह महात्माजींच्या हस्तें सुरू केलें व हरिजनांनीं महात्माजींना मानपत्र दिलें, या गोष्टीं महात्माजींच्या या दौऱ्यांतील ठळक म्हणून सांगतां येतील.

महात्माजींनीं दिग्दर्शित केलेल्या या मुख्य खादी प्रचाराचा विकास ज्यांत व्हावयाचा तें ग्रामसंघटन करतां यावें म्हणून सातारा तालुक्याच्या " खेड्यांतील यात्रा " करावयास परचुरे शास्त्रींनीं ता. ११ सप्टेंबर १९२७ रोजीं सुरवात केली आणि त्या यात्रेंतील पहिली फेरी केवळ रु. २३ मध्यें २१ जानेवारी १९२८ ला संपविली. या अवधींत, मुसलमान, खिस्ती, पारशी, जातवारीनें हिंदूची लोकसंख्या, बागायत व जिरायत असलेलें लागणीचें क्षेत्र, पड, गांवठाण, आकार, लोकलफंड; बंदिस्त अगर खुलें जंगल; आकारी अगर बिन आकारी गायरान; शिक्षणाची सोय, शाळकरी व बिनशाळकरी अशीं जातवार मुलें; गांवांतील अगर आसपासच्या कारखान्याची माहिती; बैतेदार; बलुतेदार व गांवकरी यांचेसंबंध, मुंबईस मजुरीसाठीं जाणारे लोक; गांवांतील कुशल कारागीर वगैरे लोकांची माहिती, धर्मव्यवस्था; भिक्षेकरी व भिक्षा; तेलघाणे; कोष्टी, सैंनगर होते व आहेत किती, सरकारी यंत्राचे मतदार वगैरे माहिती परचुरे शास्त्रींनीं १९०७ सालच्या शेतकरीसभेपेक्षां अधिक अशी प्रत्येक गांवांतून मिळवली आणि ती प्रसिद्ध करून " परत खेड्यांत " जाऊन खेडीं जिवंत करणारासाठीं कुदळ काम करून ठेवलें. १९२९ पासून कऱ्हाड तालुक्यांत विनायकराव फणसळकर आणि बाबुराव गोखले वरचेवर सामाजिक आणि राष्ट्रीय जागृति साठी हिंडत. हेतु इतकाच कीं, कोणी बाहेरच्या उपद्व्याप्यांनीं हिंदु मुसलमानांत तेढ उत्पन्न करतांच कांहीं अप्रबुद्धांनीं मूर्ति फोडाव्या आणि हिंदूंच्या भावनेबद्दल बेफिकीर असावे, असा जो पायंडा मुनशी मामलेदारांसारख्या अधिकाऱ्यांच्या कारकीर्दींत अकारण पडत

होता त्याला आला बसावा. १९२८ सालीं हीच " तालुक्यांतील तराळकी " पांडुआण्णा शिराळकर व कऱ्हाड तालुका कांग्रेस कमेटी यांच्या आज्ञेनें थोडीफार परचुरेशास्त्र्यांच्या धर्तीवर बाबुराव गोखले यांनीं केली. शिवाय, गांवगरजांच्या बरोबर नेहरू रिपोर्टाचा प्रचारही गोखले त्या साला करीत होते.

पंधरापंधरा वीसवीस खेड्यांच्या मध्यवर्ती ठिकाणीं मधून मधून मुख्य सभा भरवून तेथें शिराळकर, गणपतराव आळतेकर, मारूलकर, आबासाहेब घोपाटे ही मंडळी ग्रामसंघटनेचें महत्त्व, नेहरू रिपोर्ट, राष्ट्रीयसभेचें धोरण यांची समजावणी देत. पाल ( खंडोबाची ), सुपनें, सुर्ली ( १९२२ पासून गोविंद विनायक कुळकर्ण्यांनीं सेवा करून हेवा करण्यासारखी बनविलेली ), कोळें, शेणोली येथील सभा वरील दृष्टीनें संस्मरणीय झाल्या. लाटणें, बोरगांव, अतीत, अपशिंगें, भरतगांव, नागठाणें, धावडशी, कण्हेर, अंकलें, आंबेवाडी वगैरे ठिकाणीं बेडेकर ( कोरेगांव ), डॉ. आठल्ये, सोमण, राजाभाऊ पालकर, बाबूराव भिडे, रामभाऊ मोडक, गोपाळराव जोशी, बुवा गोसावी वकील प्रभृती सातारकर मंडळीही खेडेगांवातून १९२८ सालीं हिंडली. परचुरेशास्त्र्यांना तर खंड नव्हताच. सातारा तालुक्यांतील परचुऱ्यांच्या अखंड यात्रेमुळेंच १९२९ सालीं २ मार्च रोजीं सातारा तालुका खेडकरी परिषद् भरली. त्यावेळीं ५० पेक्षां अधिक शेतकरी हजर होते. सातारा न्यू स्कूलमधील त्या सभेस पुण्याचे शंकरराव भागवत, ठेंगडी, फुले, आचार्य रवडे, श्रीमती काशीबाई देवधर, श्रीमती डॉ. साठे वगैरे मंडळी मुद्दाम आली होती. विट्याचे

पुढारी जोगळेकर, बापट हे हजर होते अगर रा. ब. काळे, कुदळे यांचीं भाषणें ह्या सभेंत झालीं अगर सातारा ग्रामसेवासंघाचे सततोद्योगी चिटणीस गोपाळराव जोशी यांनीं अहवाल वाचला या गोष्टींपेक्षां सातारा तालुक्यांतील ऐशी शेतकऱ्यांनीं आपलीं गाऱ्हाणीं जाहीर तऱ्हेनें सांगितलीं, हेंच त्या सभेचें कौतुकास्पद वैशिष्टय. कारण असाच धीटपणा अंगीं मुरला, बाणला म्हणजे राष्ट्रीयतेनें पुलकित झालेला कोणी धीर पुरुष शेतकऱ्यांचें आणि खेडकऱ्यांचें पुढारीपण नेटानें करीत राहील. अशी तेजस्वी परंपरा त्या बहुजनसमाजांत उत्पन्न होण्यांतच राष्ट्राचा उद्धार आणि लोकशाहीच्या तळमळीनें देशसेवेसाठीं धडपडणाऱ्या आजकालच्या पुढाऱ्यांच्या श्रमाचें चीज आहे हें सोमणांनीं १९२९सालीं प्रांतिक परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून काढलेले उद्गार सार्थ नाहींत असें कोण म्हणेल ? म्हणूनच झालें तरी सातारा ग्रामसेवा संघाचें अभिनंदन विलेपार्ले येथील प्रांतिक परिषदेंत केलें.

असो ग्रामसंघटनेला ज्याप्रमाणें १९२७ सालीं सुरवात झाली त्याप्रमाणें त्यावेळीं मुंबई कायदेमंडळाच्या पुढें सर चुनिलाल मेथांनीं मांडलेल्या "तुकडेपट्टी" च्या बिलानें शेतकऱ्यांच्या मिळकतीलाच हात घालावयाला काढल्यानें जाणत्यांना प्रथम तिकडे लक्ष देणेंच भाग पडलें. मागें सांगितल्याप्रमाणें कडेगांव, विटें, मायणी, चितळी, खटाव, कऱ्हाड, शेणोली, तासगांव, कोळे, सातारा, चरेगांव, उंब्रज, चाफळ वगैरे जिल्ह्याच्या बहुतेक सर्व भागांतून नानासाहेब देशपांडे हिंडले आणि त्यांच्या बरोबर बाबुराव गोखले

हेही हिंडले. मधूनमधून पांडुआण्णा शिराळकर, गणपतराव आळतेकर वगैरेही येत असत. या सर्व मंडळींना शेतीचे बारीक बारीक तुकडे झाल्याकारणानें "जान देईन पण जमिन देणार नाहीं." या शेतकऱ्यांच्या म्हणण्यांत आतां जीव उरला नाहीं, हें बिलाच्या जनकांप्रमाणें अगर पुरस्कर्त्यांप्रमाणें दिसत नव्हतें असें नाहीं; पण गांव नमुनेदार करण्याकरतां बारीक सारीक तुकड्यांच्या जमिनी उडवून मोठमोठे जमीनदार उत्पन्न करण्यांत, हजारोहजार शेतकऱ्यांच्या तोंडचा अर्धामुर्धा घांसही काढून घेऊन राष्ट्रांत बेकारांची भलती भर होईल आणि फायदा झालाच तर फक्त सरकारला आपला सारा बिनधोक वसूल करण्यांत होईल. तेव्हां, "हिंदी शेती ही राष्ट्रीय संपत्ति आहे हें जाणून त्या शेतीची आणि शेतकऱ्यांची सुधारणा करण्याकरितां, ठराविक प्रमाणाखालीं जमिनीचे तुकडे होऊन देतां कामा नयेत हें अंतःकरणपूर्वक मान्य असेल तर पहिल्या प्रथम या गोष्टी करा. कमींत कमी दोन पिढ्यांपर्यंत तरी हल्लींच्यापेक्षां शेतसारा एक कपर्दिकेनेंही वाढणार नाहीं याबद्दल खात्री करा. त्यायोगें शेत कसण्यास उत्तेजन येऊन शेतकऱ्यांस जरा तरी हातपाय हालविण्यास सवड सांपडेल. त्याचबरोबर तुमचें जें कांहीं जमिनीनिहाय व गांवनिहाय ठराविक प्रमाण ठरेल तें कमींत कमी पण भरपूर मुदतीनंतर अमलांत येईल असें जाहीर अगाऊ करून ठेवा म्हणजे ठराविक प्रमाणाइतकी जमीन पैदा करावयाची अगर आहे ती जमीन सोडून दुसराच उद्योग करावयाचा याची निश्चिती शेतकऱ्यांस करतां येईल. सदरच्या कमींतकमी पण भरपूर

मुदतींत शेतकऱ्यांच्या मुलांना तरी साक्षर करून पुस्तकी पोपटपंचीपेक्षां कांहीं विधायक आणि उत्पादक अशा धंद्याचें वळण लावा, आणि शेतीची सुधारलेली कला हिन्दी परंपरेशीं मिळती घेऊन शिकवा." सरकारला करावयाच्या खड्या सवालाची हीच विचारसरणी नाथ घाणेकर, भाऊसाहेब सोमण आदिकरून जिल्ह्यांतील सर्व राष्ट्रीयांची तर होतीच, पण ता. २ मे १९२८ रोजीं पुणें सार्वजनिक सभेच्या दिवाण-खान्यांत भरलेल्या सातारा जिल्हा सभेच्या कार्यकारी मण्डळानें-ही त्यावर आपल्या पसंतीचें शिक्कामोर्तब केलें होतें.

एवढयानेंच काय झालें! नोव्हेंबर, डिसेंबर १९२७ पासून शेतकऱ्यांला आपल्या डोक्यावर टांगलेल्या तुकडेपट्टी बिलाच्या तलवारीचें पाणी कळून चुकूं लागल्यामुळें १९२८ सालीं गांवागांवांतून निषेधाच्या सभा भरूं लागल्या. त्यांत भोंवतालच्या २०-२२ गांवचे लोक जमून गोगवे येथें ता. १ जानेवारी १९२८ रोजीं झालेली बाबासाहेब जगदेवराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील, मौजे विरमाडें येथें वामनराव कुलकर्णी, माधवराव साठे, गणपतराव सोनावणे, विष्णुपंत दुदुस्कर यांनीं साजरी केलेली, गोविंद रामजी गायकवाड व व माणिकचंद शेटजी यांची कळंबे येथील, बळवंत तुकाराम जगताप यांच्या अध्यक्षतेखालीं विनायकराव भुस्कुटे व मानसिंगराव जगताप यांनीं ता. २६ रोजीं बोलवलेली केंजळची, व सुरली ( कोरेगांव ) मधील केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखालील केशवराव विचारे, जवळकर, नारायणराव गुंजाळ हे एकत्र मिळालेली, अशा सभा महत्त्वाच्या होत्या.

देव भलें करो, या गांवगन्ना सभांपेक्षां तालुकासभा

अधिक परिणामकारक होतील अशी कल्पना १९२८ च्या एप्रिलमध्यें उद्भवली आणि अगदीं प्रथम वाळवें तालुका शेतकरी परिषद भरली. बाबासाहेब देशमुखांच्या अध्यक्षतेखालील या सभेचें अनुकरण अन्यत्र झालें. बाकी झालेल्या तालुका परिषदांत १४ मे रोजीं कोळ्याचें नारायणराव देशपांड्यांनीं बोलावलेली नारायणराव गुंजाळ यांच्या अध्यक्षतेखालील व पुढें रामभाऊ घाटग्यांनीं काले येथें केलेली जवळकरांच्या अध्यक्षतेखालील, अशा दोनही कऱ्हाड तालुक्याच्या शेतकरी परिषदा, व ता. १० जून रोजीं तात्यासाहेब नित्सुरे यांच्या अध्यक्षतेखालील वाई तालुका परिषद, या विशेष परिणाम-कारक आणि खळबळ उडविणाऱ्या झाल्या. अशा तालुका सभांचा नैसर्गिक विकास सर्व जिल्ह्याची एक शेतकरी परिषद् भरविण्यांत व्हावा हें साहजिक होय. आणि त्याप्रमाणें तीं ता. ८ जुलै रोजीं इसलामपूर येथें झालीहि.

सदर सातारा जिल्हा शेतकरी परिषद इसलामपूर येथें अहमदनगरचे नामदेवराव एकनाथराव नवले यांच्या अध्यक्षते-खालीं भरली. धोंडजी पांडुरंग पाटील हे स्वागताध्यक्ष होते. शंकर आबाजी बोगर आणि संभाजी मल्हारजी पाटील हे चिटणीस होते. सभेस ५००० शेतकरी हजर होते. भाऊ पायगौंडा पाटील, आरवाड्याचे बाबासाहेब शिंदे, नलवडे ही मंडळी सोमण, शिराळकर, आंळतेकर, देशपांडे, बटाणे यांच्या शेजारींच हजर होतीं. ती सभा पाहून तुकडे पट्टीबिलाच्या दुष्परिणामावर पुस्तक लिहिणारे तिखे उद्गारले कीं, शेतकरी असा जागा झाल्यावर सरकार नमल्याशिवाय कसें राहील ?

आणि झालेंहि तसेंच. जिल्हा शेतकरीपरिषदेनंतर लिंब

येथील मंडळींनीं तुकडेपट्टीबिलाविरुद्ध आठवडाभर सह्या घेऊन अर्ज पाठविले आणि २२ जुलैला कोरेगांव तालुका-शेतकरीपरिषदही पण झाली. अशा सर्व सोसाट्याचा शेवट ता. २९ जुलै रोजीं पुणें येथें भरलेल्या मुंबई इलाखाशेतकरी-परिषदेच्या झंझावातानें झाला आणि ता. २९ जुलै रोजीं सदर बिल माघारी घेण्यांत आल्याचें कायदेमंडळांत जाहीर झालें. वरील इलाखा परिषदेला सातारा जिल्ह्याचे १५० प्रतिनिधि गेले होते.

या तुकडेपट्टीच्या सभासत्रांतून आणखीही एक मागणी सातारा जिल्ह्यानें अंतःकरणापासून केली होती. ती म्हणजे सातारा जिल्हा दारूच्या बाबतींत कोरडा ठणठणीत करण्याची फॉरेल साहेबानेंच म्हटल्याप्रमाणें दारूच्या व्यापारानें दगल-बाजी, व्यभिचार, चोऱ्या, खून, रोगप्रसार, अकाली मरण, दारिद्र्य आणि नपुंसकत्व या हिडीस वातावरणाचा हिंदुस्था-नांत जारीनें प्रचार होत असल्याकारणानें १९२७ च्या डिसेंबर महिन्यांत ८००० सह्यांचा अर्ज दारूचें उच्चाटन जिल्ह्यांतून करण्याबद्दल झाला. पण दरसाल शेंकडा ५ टक्के दारू कमी करण्याचें जें धोरण चुनीलाल मेथांनीं सुरू केलें होतें तेंही मुंबई सरकारनें पुढें बंद केलें. मग सातारा जिल्हा "सुका" करण्याची गोष्ट कोठल्या झाडाचा पाला ?

शेतकरी जीवनाशीं निगडित असा दुसराहि एक प्रश्न १९२७ सालीं धसाला लावण्यांत आला. तो म्हणजे कोयनाधरणासंबंधाचा, मुळशीच्या धरणासारखाच हा प्रश्न होता व आहे. महाबळेश्वराच्या पश्चिम अंगापासून जावली तालुक्यांतून पाटण तालुक्यांतील हेळवाकपर्यंत ५० मैल

लांब, ८ मैल रुंद असें हें कोयनेचें धरण व्हावयाचें आणि १६०० फूट उंचीवरून पाणी पडून ३ लक्ष अश्वशक्ति वीज तयार व्हावयाची अशी ही योजना आहे. १९२६ पासूनच ही वीज सातारा जिल्ह्यापुढें काजवे चमकवीत होती. त्या सालच्या जून अखेर टाटा कंपनीनें आपली योजना सरकारपुढें मांडली. त्या अगोदरच भाऊसाहेब सोमणांनीं प्रश्न विचारून सर्व कांहीं लोकपसंतीनेंच होईल असें सरकारकडून आश्वासन घेतलें होतें. तथापि लोकमताची तयारी करण्याकरतां १९२७ मध्यें मुख्यतः परचुरेशास्त्री व बाबा बहुलेकर आणि शाहीर एकबोटे यांनीं कोकणांत दौरा काढला, आणि १९२२ सालींच वाईच्या गणेश हरी खऱ्यांनीं ज्या कोयना धरणासंबंधांतील जागृति बद्दल सरकारी रोष पतकरला होता, तेंच कार्य पुरें केलें. या कामीं धरणाखालीं सांपडणाऱ्या गांवच्या लोकांच्या तीन सभाही झाल्या. त्यांत ता. १३ मे १९२८ रोजीं तळोशीच्या पायथ्याशीं देवघर नांवाच्या खेड्यांत १२०० लोकांची झोळाईच्या वनांत सभा झाली ती महत्त्वाची ठरली. कारण तिला गणेश हरी साठे, बटाणे, पाटण - उंब्रजचे बापूसाहेब आगाशे, पांडुअण्णा शिराळकर, नानासाहेब देशपांडे, गणपतराव आळतेकर, परचुरे, तात्या गोडसे, आबा घोपाटे, सोमण, शंकरराव गोडसे, बाबुराव वैद्य, गोसावी, बाबुराव गोखले, चाफळचे विष्णुपंत देशपांडे, पुण्याचे नारायणराव गुंजाळ वगैरे मंडळी हजर होऊन सहानुभूति दाखवीत होती, त्यामुळें त्या कोंकण्या शेतकऱ्यांना मोठा धीर होता. १९२९ च्या फेब्रुवारीचे कौन्सिलबैठकींत देशपांडे यांनीं

फिरून प्रश्न टाकून लोकमताला मान देऊनच टाटाकंपनीच्या धरणाची योजना सरकार मुक्रर करील असें आश्वासन घेतलें. फिरून ता. ३ जून रोजीं देशपांड्यांनीं पत्र लिहिल्यावर सरकारनें उत्तर दिलें; काळव्याच्या कामासाठीं अगर वीज निर्माण करण्यासाठीं कोयनेचें धरण तूर्त लवकर होणेचा संभव नाहीं. तथापि जेव्हां होईल तेव्हां लोकांना तक्रारी मांडण्यास पूर्ण संधि देण्यांत येईल. ($\frac{२४०७}{२७}$ एम्. मुंबई कॅसल ११-७-२९.)

अशा प्रकारें शेतकऱ्याच्या जीवनांशीं निगडित असलेल्या प्रश्नासंबंधीं सारखी चळवळ चालली असतां त्यांच्या आर्थिक जीवनाशीं आणि विशेषतां शेतकऱ्यांना पोटधंदा देणाऱ्या खादीविषयीं जिल्हा गप्प बसला नव्हता. इसलामपूरचे कौजलगींचा दौरा महात्मा गांधींच्या अनुवादानें होतच होता. आप्पासाहेब आळतकर आाण परचुरे राष्ट्रीय सभेचे सभासद नोंदतां नोंदतां आपल्या खांद्यावरून विक्रीसाठीं खादी नेतच होते. १९२७ तील या प्रयत्नानंतर १९२८ च्या जानेवारींत सोलापूरच्या सुमंतांनीं खादी प्रचाराकरतांच म्हसवड भागांत दौरा केला. पुणें सार्वजनिक सभेचे चिटणीस सदाशिवराव बापट हे " स्वदेशी व स्वराज्य " यावर व्याख्यानें देत १९२९ सालीं जिल्ह्यांतून हिंडले, आप्पासाहेब आळतेकरांनीं तर खादी विक्रीचा धुमधडाका असा उडविला कीं १९-१९ दिवसांत ९०० रुपयांची खादी विक्री झाली. स्वावलंबनाचा पीळ जनतेंत उत्पन्न करणाऱ्या चळवळीही १९२७ ते १९२९ या अवधींत आणखी झाल्या. १९२७ च्या एप्रिल २८ तारखेस प्राज्ञपाठशाळेतर्फे वाईस चवथी राष्ट्रीय

शिक्षण परिषद ताल्यासाहेब करंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. तेव्हां स्वागताध्यक्ष नारायणशास्त्री मराठे म्हणाले:— " नैसर्गिक गुणांना प्रदीप्त करणारें जें शिक्षण त्यालाच राष्ट्रीय शिक्षण म्हणतात. अशा राष्ट्रीय शिक्षणाचा विचार करतांना सरकारी शाळांतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणदोषांचेंही आविष्करण करणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें प्रत्यक्ष कार्यांत येणाऱ्या संकटासही तोंड कसें दिलें पाहिजे याचाही विचार होणें इष्ट आहे " या नंतर अध्यक्ष बोलले:— " राष्ट्रीय शिक्षण दाबून टाकतां येणें सरकारास शक्य नाहीं. राष्ट्रीय शिक्षणाचें महत्त्व मुलांच्या संख्येवर अवलंबून नसून त्यांच्या कार्यकर्तृत्वावर अवलंबून आहे. विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांत ज्याच्यायोगानें मुलगा स्वावलंबी बनेल अशाच प्रकारचें शिक्षण दिलें पाहिजे. स्वराज्य हें सर्वांचें ध्येय आहे; त्याला राष्ट्रीय शिक्षण हें मोठें साधन आहे. " त्यानंतर येवलें, तळेगांव, अकोला, सातारा, खामगांव, नगर, वाई येथील अनुभव सांगण्यांत आल्यावर प्राथमिक शिक्षण आवश्यक आहे, धंदेशिक्षण उदरनिर्वाहास समर्थ करणारें असावें, शारीरिक व धार्मिक शिक्षणाकड लक्ष द्यावें, शिक्षक विद्यार्थ्यासंगी असावा, स्वदेशी व्रताचें आचरण, शिक्षकसंघटन वगैरे ठराव पसार झाल्यावर क्रमिकपुस्तकमंडळ व ग्रामसंघटनमंडळ नेमून राष्ट्रीयशिक्षणपरिषदेचें काम संपलें.

प्रत्यक्ष राष्ट्रीयसभेच्या दृष्टीनें पाहतां, १९२७ च्या मे ९ तारखेला राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष श्रीनिवास अय्यंगार यांचाच दौरा झाला. राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष जनतेंत सातारा

कराड, वाई, महाबळेश्वर, पांचगणी इतक्या आडवळणीं यण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळें उत्साह वाढून राष्ट्रीयसभेच्या शिस्तीचें स्वयंसेवकदल सातारा राष्ट्रीय शाळेच्या पटांगणावर ता. २६ डिसेंबर १९२७ रोजीं राजाभाऊ मोडक यांच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालें. मार्च १९२८ पर्यंत सेवादलांत ६०।६९ स्वयंसेवक नोंदलेले होते. ता. २२ मार्च रोजीं आपल्या साखवळकर गोसावी यांनीं तासगांवास सेवादलाची शाखा स्थापन केली तिला शंकरराव कुलकर्णी वकील यांनीं आशीर्वाद दिला. वाईस कुशाभाऊ अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १० जुलै रोजीं सेवादलाची शाखा स्थापन होऊन नारायणशास्त्री मराठे सहाय्यक झाले. ता. ११ सप्टेंबर १९२९ रोजीं सेवा-दलाचें काम पाहण्यासाठीं डॉ. हर्डीकर हे सातारा, वाई, तासगांव येथें चक्कर मारून आले आणि चिरमुले, सोमण, श्रोत्री, जोगळेकर, दिगंबरपंत गोखले, भिडे यांच्या तोलाची मंडळी युनिफार्ममध्यें सहाय्यक म्हणून वावरतांना पाहून डॉक्टरसाहेबांस समाधान वाटलें. याची परिणती ७ नोव्हेंबर १९२९ रोजीं साहाजिकच अशी झाली कीं महाराष्ट्रप्रांतिक सेवादलाचे अध्यक्ष भाऊसाहेब सोमण यांच्या सल्ल्यानें डॉ. आठल्ये, साखवळकर, मोडक यांनीं साताऱ्यास स्वयंसेवकांना शिक्षण देण्याकरतां एक शिबीर उघडलें. उद्‌घाटनसमारंभाचे अध्यक्ष अण्णा-साहेब भोपटकर म्हणाले:—

“ शरीर हा राजा आहे व कसब हा प्रधान 'आहे. दुसऱ्याशीं लगट करण्याचें धैर्य प्रत्येकांत निर्माण व्हावयास

पाहिजे......आपल्या देशाबद्दल जर कोणी कमीअधिक बोलला तर तें ऐकून आपल्या अंगाची लाही झाली पाहिजे. राष्ट्रीयसभेनें निशाण तयार केलें आहे. त्या निशाणाची इज्जत आपण राखली पाहिजे. सर्व देशांत निशाणाला अत्यंत महत्त्व आहे.” साखवळ-कर यांच्या आधिपत्याखालीं चाललेल्या या शिबिरांत शिक्षण घेणाऱ्या स्वयंसेवकांना मुंडले, देवगिरीकर, नानासाहेब देशपांडे, वासुदेवराव भावे, दिगंबरपंत गोखले, गोसावी, बाबुराव भिडे, मोडक, लेले, नाथ घाणेकर, दिनकरशास्त्री कानडे, डॉ. आठल्ये वगैरे अधिकारी अभ्यासूंनीं आपल्या ज्ञानाचा फायदा दिला आणि शेवटीं शिक्षणमुदती-नंतर पुण्याच्या शंकरराव देवांनीं समारोप केला तो असाः- “ हिंदुस्थानला स्वराज्य मिळवून देण्याचें व स्वातंत्र्य स्थापन करण्याचें कार्य महाराष्ट्रांतील या सातारा शहरींच झालें आहे. तीनशें वर्षांपूर्वींप्रमाणेंच आजही आपण पारतंत्र्यांत असतांना स्वातंत्र्य मिळविण्याच्या चळवळीची आघाडी महाराष्ट्रांत सातारनेंच मारली आहे.” सदर शिबिरास परचुरेशास्त्री, नारायणशास्त्री मराठे, पांडुआण्णा शिराळकर प्रभृतींची सक्रीय मदत होती. शिवराम चिंतामण लेले व वैद्य गोपाळराव फाटक यांनीं ड्रिलचें शिक्षण देऊन शिबिराला स्वरुप आणलें.

राष्ट्रीयसभेच्या शिस्तीचे स्वयंसेवक वरीलप्रकारें तयार होऊं घातले होते तोंच १९२८ च्या आरंभीं “ हिंदुस्थानला नव्या सुधारणा देण्याच्या मिषानें ” सायमन सप्तक आलें या सप्तकावर सर्व राजकीय पक्षांनीं

एकजात बहिष्कार घातला. ता. ३ फेब्रुवारी हा या सप्तकाच्या बहिष्काराचा सार्वजनिक दिवस जिल्ह्यांत दक्षिणे-पासून उत्तरेपर्यंत कडकरीतीनें पाळण्यांत आला. इस्लामपूर कोरे-गांव, पाटण, वाई येथें हरताळ आदि कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पडले, तर तासगांवास कुलकर्णी वकील, कऱ्हाडास नानासाहेब देशपांडे, आणि साताऱ्यास रा. ब. काळे, करंदी-कर, सोमण, चिरमुले, हकीम, रामभाऊ ढोर यांचीं व्याख्यानें सरकारी प्रयत्नांचा पोकळपणा सिद्ध करणारीं झालीं. मिरजेस रानडे वकीलांनीं तोच बार भरला. सांगलीस चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे व्यापार बंद होता व विद्यार्थ्यांनीं कॉलेजवर बहिष्कार घातला होता. याच सप्तगृहीचें काळ्या निशाणांनीं शांतपणें स्वागत- करीत असतां लाला लजपतराय यांना लाठीचा मार बसला व त्यानेंच पुढें दुखणाईत होऊन लालाजी कैलासवासी झाले. तेव्हां अर्थात् लालाजींच्या बद्दल कृतज्ञ अश्रू गाळतां-गाळतांच पारतंत्र्याबद्दल असंतोष फुंकता आला तेवढा फुंकण्यांत आला. साताऱ्यास हें कार्य सोमणांचे अध्वर्युत्वाखालीं हकीम, नाथ घाणेकर, बाबूराव भिडे, मुतालिक, नलावडे, गोसावी, यांनीं केलें तर तासगांवास राष्ट्रीयसभेचे प्रचारक लेले, अध्यक्ष शंकरराव कुलकर्णी, मुरारराव पाटील, मनराजुरीकर यांनीं केलें; कोरेगांव, कऱ्हाड येथें तोच कित्ता गिरवण्यांत आला. लालाजीवरील लाठी हल्ल्याचा निषेध रा. ब. काळे व वाग्भट देशपांडे यांनीं निकरानें केला.

१९२८ सालीं बारडोलीच्या शेतकऱ्यांवरील शेतसा-ऱ्याची फेर तपासणी होण्याचें ठरलें. हा विजय सरकारवर

मिळवावयास वल्लभभाई पटेल यांनीं संघटनात्मक तपश्चर्या केली व करवली होती. तेव्हां वल्लभभाईंना तात्विक विजय मिळतांच आगष्ट १९२८ भर सातारा जिल्ह्यांत बारडोली दुमदुमली. कऱ्हाडास नानासाहेब देशपांडे, गणपतराव आळतेकर व बाबुराव गोखले, पण त्यापेक्षांही तासगांव व सातारा येथें अनुक्रमें आप्पासाहेब आळतेकर व बाबा बहुलेकर प्रभृती वल्लभभाईंचें काम प्रत्यक्ष पाहून आलेली मंडळी यांनीं शेतकरी कसा स्वावलंबी झाला पाहिजे हें ठसविलें. कालें येथें जिल्ह्यांतील प्रमुख मंडळी जमा होऊन बारडोलीच्या शेतकऱ्यांची स्तुती करतां करतां स्वतांच्या जिल्ह्याची हलाखी अशी उमटली कीं वेळ पडल्यास व सरकारनें तशी पाळी आणल्यास सारा बंदीची तयारी करावी कीं काय येथवर चर्चा झाली; पण तो विषय तितकाच राहिला व १९२९ सालीं ११ जानेवारीलाच वाईस भावे वकीलांचे अध्यक्षतेखालीं कलकत्ता कांग्रेसचा संदेश सांगून बाबुराव वैद्य व भाऊसाहेब सोमण यांनीं नेहरू रिपोर्टांत मागितलेलें स्वराज्य आम्हांस पाहिजे असें शिंग फुंकलें. ता. २ फेब्रुवारीं रोजीं तीच टिपरी आण्णासाहेब परांजप्यांनीं साताऱ्यास खेळली. मार्च ता. १० रोजीं कऱ्हाडास गणपतराव आळतेकर तोच निनाद घुमवून राहिले. ता. २८ मे ते १ जून सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागांत नेहरूरिपोर्ट, खादी व बहिष्कार यांच्या प्रचारार्थ सोमण, शिराळकर, बाबुराव वैद्य हिंडून आले. जुलैच्या ४ तारखेस बाळुकाका कानिटकर यांनीं साताऱ्यास “ राष्ट्रीय स्वातंत्र्य व १९३० साल ” याच विषयाचें वेड लावलें.

ता. ....... नं.
ता. .......

यावेळीं आणखी दोन गोष्टी उत्तेजक घडल्या. पैकीं एक अशी कीं पाटण व तासगांव तालुक्यांत राष्ट्रीयसभेच्या प्रचारासाठीं हिंडणाऱ्या वाळिंब्यांनीं मुसलमानांस एवढ्या प्रमाणांत राष्ट्रीयसभेचे सभासद केले कीं १९२१ ची आठवण आली पण आतां प्रगती अशी कीं चिंचणीसारख्या गांवीं मुसलमान स्त्रियाही सभासद झाल्या होत्या.

सभासदांची आपल्या वाट्यास आलेली संख्या उपनगरप्रमाणें सातारा जिल्ह्यानेंच पुरी केल्याचें महाराष्ट्र प्रां. कॉ. कमेटीनें जाहीर केलें होतें. कमीत कमी २५०० सभासद हवे होते ते ४२४३ लोक सभासद झाले होते.

दुसरी उत्तेजक गोष्ट म्हणजे ता. ९ सप्टेंबर रोजीं साताऱ्यास "काँग्रेसचा कार्यक्रम" या विषयावर बोलतांना स्वातंत्र्याची तुतारी काकासाहेब गाडगीळांनीं वाजविली. त्याचे अगोदर 'दडे बसलेल्या नौकरशाहीला शुद्धीवर आणण्याकरतां म्हणून असेंब्लींत बॉंब टाकणाऱ्या भगतसिंगाचा दिन वाईला ता. २१ आगस्ट रोजींच साजरा झाला होता. वरील सर्व आवाज जनतेच्या कानांत घुसत-घुसत असतांच लोकोत्तर प्रायोपवेशनानें देशासाठीं देह ठेवणारा जतींद्र, तरुण अंतःकरणांचा उत्थापन द्यावयास कारणीभूत झाला. प्रचंड मिरवणूक काढून साताऱ्यास सोमणांचे अध्यक्षतेखालीं डॉ. आठल्ये, गोसावी, गोडसे, बाबुराव भिडे यांनीं अगर वाईस गोविंदराव वैद्यांच्या अध्यक्षतेखालीं भय्याशास्त्री वाटवे व राजाभाऊ भावे यांनीं व कऱ्हाडास बाबुराव गोखले यांनीं जीं भाषणें केलीं तीं स्वातंत्र्याची तळमळ उत्पन्न करणारीं होतीं. इतक्यांत "काळा"च्या काळ्या कभिन्न चेहऱ्यावर

" स्वातंत्र्य " हीं अक्षरें महाराष्ट्रीय तरुणांस वाचावयांस शिकविणारे 'काळ'कर्ते परांजपे कालवश झाले! तशी २९ सप्टेंबर रोजीं त्यांच्या दुःखप्रदर्शनार्थ भरलेल्या सातारा जिल्ह्यांतील सभांतून " हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीनेंच आणासाहेबांच्या आत्म्याला मोक्ष मिळो " अशी प्रार्थना करण्यांत आली. योगायोग असा कीं १९२९ च्या राष्ट्रीय सभेनेंच " स्वातंत्र्य " हेंच हिंदुस्थानचें ध्येय जाहीर केलें.

---

## प्रकरण १४ वें

# जिल्ह्यांतील शांतिसंग्राम

[ केसरी, ज्ञानप्रकाश, समर्थ, ऐक्य, भारतमाता, टाइम्स, वरून ]

१९२९ सालच्या राष्ट्रीयसभेनें ठराव संमत केला, पण स्वातंत्र्याकरतां लोकांची लोकांनीं खटपट नको का करावयाला ? जनतेला तो मोका महात्मा गांधींनीं १९३० सालींच दिला. लांबच्या लांब समुद्र किनारा, खाऱ्या पाण्याच्या विहीरी ओढे व खाऱ्यामातीच्या खाणी असलेल्या हिंदुस्थानांत अत्यंत जरूरीची वस्तू जी मीठ तिला देखील सामान्य जनता सरकारीकरानें महाग झाली आणि म्हणून " खाण्याच्या मिठाकरितां " ( Salt on the table ) महात्माजींनीं " दांडीस " जाऊन कायदेभंग करण्याचें

ठरविलें आणि अहिंसाव्रत घेणाऱ्या राष्ट्रीयसभेच्या अनुयायांस तसें करण्याची परवानगी दिली.

त्यासरसा एक तऱ्हेचा विद्युतसंचार होऊन जबाबदार लोकांच्या हालचाली होऊं लागल्या. प्रांतिक हिंदुस्थानी सेवा-दलाचे चिटणीस डॉ॰ आठल्ये. तेव्हां ता. २१ फेब्रुवारी रोजीं त्यांना पुण्यास पाचारण होऊन त्यांस महाराष्ट्र कायदेभंग मंडळावर नेमण्यांत आलें. तेथून पुढें शांतिसंग्रामार्थ सातारा जिल्ह्याचा हात हलूं लागला म्हणावयास हरकत नाहीं. मार्च उगवतांना सातारा जिल्हाधिकारी म्हणून गोसावी नेमून आले. १९०६ सालापासून राष्ट्रीय शिक्षण हें एक स्वराज्याचें साधन आहे अशी लोकमान्यांची शिकवण होती, ती यावेळीं पटली. वाईची प्राज्ञपाठशाळा आणि साताऱ्चे टिळक राष्ट्रीय विद्यालय यांतील शिक्षक व जाणते विद्यार्थी मार्च अखेरीस आपलीं दप्तरें गुंडाळून स्वयंसेवकांच्या विजारी आणि पिशव्या घेऊं लागले. सातारा जिल्हा सभा ४ व ५ एप्रिल रोजीं होतांच टिळक राष्ट्रीय विद्यालयाच्या आवारांत स्वयंसेवकां-करतां गोसावी वकिलांचे नेतृत्वाखालीं शिबीर उभारलें. पुढें गोसावी कुलाब्यास २१ एप्रिलला गेल्यावर परचुरेशास्त्री व नंतर बाबा लेले व त्यांचे हाताखालीं म. कृ. आठल्ये काम करूं लागले. हणमंतशास्त्री महाजनी कायदेभंगाच्या प्रचारासाठीं जिल्ह्यांत निघाले ते ३१ मार्चपर्यंत तासगांव तालुक्यांत धडकले सुद्धां. साताऱ्च्या शिबिरांत दोघांनीं, पांचांनीं, स्वयंसेवकांची नोंद सुरू झाली ती १४ एप्रिलपर्यंत २०० पर्यंत गेली. एप्रिलच्या आरंभालाच कायदेभंग कमेटीनें ठाण्याचे पुढारी दामले यांस साताराजिल्ह्यांत प्रचारासाठीं धाडले होते. इसलांपूर,

अष्टें, रेठरेंहरणाक्ष, येल्लूर, शिराळें, कासेगांव, कऱ्हाड, सुपनें, कोळें, उंब्रज, चरगांव, पाल, मेढें, कुडाळ अशीं गांवें दामल्यांनीं घेतलीं आणि ७ एप्रिल रोजीं त्यांना पहिला रुपाया एका मुसलमानानें दिला तर अष्ट्यास बाबूराव लिमयांनीं ३९ रु. दिले. याच एप्रिल महिन्यांत प्रो. मोहनलाल व खाडिलकर महाबळेश्वर टापूंत हिंडले आणि १०० रु. घेऊन आले. म्हसवड भागांत कान्हेरे-हिंगमिरे यांनीं प्रचार केला, म. कृ. आठल्ये, रायरीकर कराड तालुक्यांत, पं. सातवळेकर खटाव तालुक्यांत, महाजनीशास्त्री, चाफळ पाटण भागांत कायदेभंगाचे रंगरूट व त्यांचा दाणागोटा जमविण्यासाठीं चक्कर मारीत होते. मसूर भागांत बळवंतराव आफळे पण विशेष म्हणजे बी. जी. जगदाळे, पाशुसाहेब पीरजादे; उंब्रजकडे नारायणराव शिराळकर, केशवराव फडके, बाबूराव जोशी; चरेगांवीं बाळारामशेट गुजर, शंकरराव तेली; सातारा जिल्ह्याचे पूर्व भागांत व शिराळ्याचे बाजूस अंत्रोळीकर, बाबूराव गोखले; दक्षिण आणि पूर्व व पश्चिम भागांत तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, पांडुअण्णा शिराळकर, बटाणे, गणपतराव आळतेकर, राघुअण्णा धोपाटे, बळवंतराव जाधव, वडूजकडे सातवळेकर, कान्हेरे वगैरे मंडळी एप्रिल महिन्याच्या उत्तरार्धांत "सत्याग्रहाची आवश्यकता" प्रतिपादन करीत होती. या सवात तर्कतीर्थांनीं आपल्या अमोघ वक्तृत्वानें जिल्हा असा हालविला कीं चरणबिळाशीकडे बापूसाहेब देशमूख, बाबूराव चरणकर प्रभृती मंडळींच्या देखरेखीखालीं, तांबव्यास काशिनाथराव देशमुख यांच्या नेतृत्वाखालीं, आबा फाटक, राघुअण्णा

लिमये, सिताराम पंत गरुड व विसनशेटजी यांच्या पुढाकारानें मसुरास, खटाव भागांत कचरे – सिंहासने यांच्या खटपटीनें, थोडक्यांत म्हणजे गांवागांवांनीं असे संघ झाले कीं कायदेभंगाचे प्रचारक गांवोगांवीं निर्माण झाले. तासगांवचे माळी, अल्लाबक्ष, लतीफ, काळे, अभ्यंकर, पोंक्षे, आबासाहेब जोग, चरेगांवचे मारुतराव डुबल इनामदार, उंब्रजचे बाबूराव कुलकर्णी, भार्गवराम तांबोळी, यशवंतराव जोशी, बाळबुवा गोसावी, लक्ष्मणराव निलाखे, विट्याचे पांडुरंग कृष्णाप्पा कोरे; फार काय परशुराम थोरातासारखा मजूरदेखील कायदेभंगाचा प्रचारक बनला आणि एप्रिल अखेरीस जिल्ह्याच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत आणि पश्चिमेपासून पूर्वेपर्यंत एक प्रकारचें वारें असें संचारून राहिलें कीं "गांव करील तें राव काय करील ?" याचा प्रत्यय घडोघडीं येऊं लागला.

परचुरेशास्त्री, रामभाऊ मोडक, कोल्हापूर विद्यापीठाचे मुर्के, शिवराम बाळकृष्ण ऊर्फ बाबूराव जोशी, रमाबाई जोशी, हकीमसाहेब, शाहीर खाडीलकर, भय्याशास्त्री वाटवे, जाखलेकर, कॅ. कान्हेरे, रंगराव मारुती माने, रा. वा. पाटणकर, कौजलगी, शंकर कृष्ण जोशी, वासुदेव गोपाळ देव, महादेव यशवंत ब्रह्मनाळकर, महादेव गणेश सत्तीकर, शिवराम कोल्हाटकर, कत्ते, मेथे मास्तर, धर्माधिकारी, किसनवीर, सातपुते, गाडेकर, गुलाब बागवान, आबासाहेब फाटक, भास्कर तुकाराम कुलकर्णी, नानासाहेब नागपूरकर, जोग, करंदीकर, विठ्ठलराव पागे, वासुदेवराव मुंडले, गौतमशाहा, भाईचंद, बापू नेने, धोंडजीराव पाटील, मुरारराव पाळी, क्षीरसागर, अझीजसाहेब, शंकरराव तेली, वामन गोविंद कुलकर्णी, बाबूराव पेडकर,

आत्माराम पाटील, कृष्णा गोविंदा बोगर, निवृत्ति आकाराम पाटील, बाळा भाऊ कोरे, नाना रामचंद्र पाटील, नोकरीचे राजिनामे दिलेले बर्डेमास्तर, दत्तात्रय वासुदेव कुलकर्णी, लक्ष्मणराव हसबनीस हीं सातारा जिल्ह्यांतील अशीं नांवें आहेत कीं ज्यांनीं कमीत कमी एक तरी स्वयंसेवक आपल्या शब्दानें शांतिसंग्रामांत सामील केला. याशिवायही अशीं कित्येक माणसें आहेत कीं, ज्यांनीं पुष्कळ मदत सत्याग्रहाला केली पण त्यांचीं नांवें केवळ स्मरणानें देणें शक्य नाहीं. या सर्वांत बालवीर बापू नेने याची कामगिरी प्रबोधक व वेचक झाली.

अशा तऱ्हेनें आणि स्वयंस्फूर्तीनें जे स्वयंसेवक शांतिसंग्रामासाठीं साताऱ्या शिबिरांत दाखल झाले त्यांची संख्या २ जून पर्यंत ३५० वर गेली. त्यावेळीं १६० सत्याग्रहाकरतां पाठविले होते आणि १०० प्रचाराकरतां निरनिराळ्या तुकड्यांनीं हिंडत होते. अशाच वाढत्या क्रमानें साताऱ्या शिबिरांत स्वयंसेवक शेवटपर्यंत नोंदले गेले. दरम्यान सातारा शिबिराचें काम हलकें करण्या करितां उंब्रज येथें ता. २२ जून रोजीं बाबुराव गोखले यांचे हस्तें एक शिबिर उघडलें होतें. त्याच सुमारास मुळशी सत्याग्रहांतले र. म. वैद्य यांनीं पाल येथें दहा सत्याग्रहींचें शिबीर सुरू केलें. मसूरासही कायदेभंग मंडळाचें एक दल स्थापण्यांत आलें. तासगांवास सातारा शिबिराचें भावंड निर्माण झालें. कऱ्हाडास लाड बटाणे यांनीं तसलाच उठाव करून ४५० स्वयंसेवक नोंदले व ११० सत्याग्रहाकरतां रवाना केले. याच्याही उप्पर जिल्ह्यांत सर्व साधारण अशी व्यवस्था होती कीं शांतिसंग्रामाचे स्वयंसेवक ऊर्फ " गांधीचे लोक " दिसले कीं,

लोक त्यांच्या गरजा तर भागवीतच, पण ते सांगतील तें निदान कमींत कमी करीत. " कोंकण भागांत मीठ सत्याग्रह साठीं जातांना कऱ्हाड ही तर स्वयंसेवकांची उतारपेठ झाली होती. तेव्हां बटाणे व जाधव यांच्या मोटारी स्वयं-सेवकांच्या अगदीं घरच्यासारख्या झाल्या हात्या. " त्याचप्रमाणें जिल्ह्यांतील सर्व मोटारवाल्यांनीं स्वयंसेवकांसाठीं सदासर्वदा मोटारीची मुक्तहस्तानें सोय ठेवली होती. कित्येक " बुवा-बैराग्यांनीं " भिक्षा मागून स्वयंसेवकांना अन्नपाणी पुरवलें आणिं सदर भिक्षा एवढ्या प्रमाणांत केवळ शांतिसंग्रामाच्या स्वयंसेवकांकरितां मागण्यांत येते अशी मनोमन साक्ष: असूनही सत्ताधाऱ्यांच्या बायकांनीं अभिवादनपूर्वक ती भिक्षा घातली. अशी वस्तुस्थिती असल्याकारणानें, ऑगष्टचे २१ तारखे-पासून शांतिसंग्रामाशीं निगडित असलेल्या संस्था बेकायदेशीर ठरविल्यावर वरील तऱ्हेच्या कोरान्नावरच स्वयंसेवकांची पुष्कळशी गुजराण झाली.

शांतिसंग्रामाशीं संबंधित असलेले हे घटक एकच प्रतिपादन करीत; माणुसकीचें कायदे पाळणें हें जसें कोणाही प्रामाणिक माणसाचें कर्तव्य, तसेंच अन्याय्य कायदा अवमानणें हेंही त्याचें कर्तव्य. लोकांतील अशा वृत्तीशिवाय लोकशाही म्हणजे केवळ थट्टा होईल. हीच शिकवण पद्यांच्या रूपानें प्रभात फेऱ्यांतील मुलेंमुली आणि व्याख्यानानें व कृतीनें " गांधीचे लोक " देत.

या शिकवणीचा परिणाम सामान्य झाला नाहीं. सातारा जिल्ह्यांत ठोकळ हिशेबानें २००० स्वयंसेवकांनीं तुरुंगांत जाण्याची तयारी दाखविली; त्यांतील कांहींनीं तर आपल्या

घरादाराची कसलीच फिकीर केली नाहीं. प्रत्यक्ष बंदीवास भोगणारे सुमारें ९०० लोक होते व त्यांत वारकऱ्याच्या निष्ठेनें दोन दोन, तीन तीन वाऱ्या करणारेही आहेत. एवढ्या-साठीं साताऱ्च्या शिबिरामार्फत मंजूरीनें १०००० रुपये इतका खर्च झाला. शिवाय खंडोगणती धान्य व कपडे वगैरे लागले ते पैशाप्रमाणेंच लोकांनीं स्वयंस्फूर्तिनें दिले. शिवाय सत्याग्रहींना न विचारतांच त्यांच्यापैकीं ज्यांचीं कुटुंबें असहाय्य स्थितींत होतीं त्यांना अयाचित मदत देण्यांत आली.

अशा प्रकारें शांतिसंग्रामाच्या जादूनें जनता भारून गेल्याकारणानें मे महिन्याच्या आरंभीं खेड्यापाड्यांतून सुद्धां मोकळ्या हाताच्या अगर कराडसारख्या लाठीबंद अशा प्रभातफेऱ्या सुरू झाल्या. यामध्यें मुलेंमुली भाग घेत राहून लोकांना सूर्योदयाच्या आंत स्वराज्याची हांक देत. अशा प्रभातफेऱ्यामध्यें तासगांवच्या चिंतोपंत काळयांची व सातारा येथील विठ्ठलराव सोमणांची आणि श्रीमती गोदुबाई ची ' स्त्रीयांची प्रभात फेरी ' शिस्तीच्या व ठोक्याच्या दृष्टीनें विशेष असून रुबाबाच्या दृष्टीनें सांगलीची सायकल प्रभातफेरी, उडतरें, भुईंज, पांचवड, खरशां सपाट्यांत मारणारी ती खेडकऱ्यांची प्रभातफेरी या मुख्य गणल्या पाहिजेत.

राष्ट्रीयसभेच्या झेंड्याचें वंदन करणें हा तर या प्रभात फेऱ्यांचा नित्य कार्यक्रम होतांच पण नैमित्तिक होता. शांति-संग्रामाचा कोणताहि कार्यक्रम असो, त्याला झेंडावंदनानेंच सुरवांत व्हावयाची. सर्वांत ता. १२ मार्च रोजीं महात्माजी दांडीस निघाले त्यावेळीं साताऱ्यास झालेलें झेंडावंदन अनुपमेय

झालें. अष्टे येथील प्रचंड समुदायानें केलेलें झेंडावंदन संस्मरणीय झालें. फार काय, कोणत्याही निमित्तानें मिरवणूक निघो, नाहींतर ' हरताळ ' पाळण्याबद्दल विनंति करणारी ' चमू ' निघो, राष्ट्रीय झेंडा अग्रभागीं मिरवावयाचाच.

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत राष्ट्रीय झेंड्यानें आपला झेंडा सगळीकडे, विशेषतां स्थानिक स्वराज्य संस्थावर आणि शाळांवर फडकाविला. जिल्ह्यांत सहसा एकही प्रमुख गांव नव्हतें कीं जेथें राष्ट्रीयसभेचे झेंडे प्रमुख चौकांत फडकत नव्हते. मॉंटफर्ड सुधारणांनीं स्थानिक स्वराज्याचे हक्क जर लोकांच्या स्वाधीन केले म्हणावयाचे, तर लोकांचा झेंडा त्या स्थानिक स्वराज्याच्या संस्थांनीं कां आपल्या शिरावर मिरवूं नये ? असा प्रश्न त्यावेळीं निघाला आणि ठिकाठिकाणीं तसा नेटाचा प्रयत्न झाला. या सर्व प्रयत्नांत वाईचा, साताऱ्याचा व त्यापेक्षांही तासगांवचा प्रयत्न संस्मरणीय होय. निशाण लावण्यांत आम्ही राष्ट्रीयशिक्षण देतो आणि शिक्षण म्युनिसिपालिटीचें कर्तव्य आहे. तेंव्हां झेंडा लावलाच पाहिजे ;" असा नेट अबदुल कादर यांनीं धरला म्हणून मनोळकरांच्या अध्यक्षतेखालीं ही अभिमानास्पद गोष्ट घडली, व इतरांच्या मानानें बराच टिकाव धरूनही राहिली.

शिक्षण संस्थांपैकीं वेलिंग्डन कॉलेजवर ( सांगली ) विद्यार्थ्यांनीं झेंडा लावण्याचें ठरविल्यावर जो झगडा झाला तो अपूर्व होता. द्रविड हायस्कूल, ( वाई ) न्यू इंग्लिश स्कूल ( सातारा ), टिळक हायस्कूल ( कऱ्हाड ), व सिटीस्कूल ( सांगली ) या संस्थावर कांहीं काळ विद्यार्थ्यांच्या चिकाटीनें झेंडा टिकला. तांबवे येथील लोकलबोर्डाच्या मराठी शाळेवर

विद्यार्थ्यांनीं झेंडा लावल्यामुळें शाळा सहा महिने बंद पडली होती. तशी चिकाटी अन्यत्र क्वचितच दिसली.

सातारा जिल्ह्यांत हें झेंडा प्रकरण आणखीही एका तऱ्हेनें गाजलें. तांबवे किंवा चरणबिळाशी येथील झेंडे हे भोंवतालच्या पांच दहा गांवांचें संरक्षित राष्ट्रीयनिशाण होतें. मसूरच्या बाजारपेठेंत लावलेला एक झेंडा हा तेथील राष्ट्रीय भावनेच्या तरुणांच्या एकदिल चळवळीमुळें जर भोंवतालच्या दहापांच गांवांना अभिमानास्पद वाटे तर बिळाशीच्या दहा गांवाचा तो एक झेंडा किती अभिमानास्पद वाटत असेल बरें ? बिळाशीच्या रामेश्वर देवालयांतील झेंड्या भोंवती राष्ट्रीय प्रार्थना करावयास जमणाऱ्या मंडळींचें एक शिबीरच होतें. जेथें तेथें आणि वेळेस पांच पांच, दहादहा गांवांचे असे राष्ट्रीय झेंडे फडकलेले पाहून, नौकरशाहीनें झेंडे काढून टाकण्या-साठीं सशस्त्र पोलीस आणि किचनेर पलटण यांचा उपयोग सप्टेंबरच्या ता. ४ ते १४ पर्यंत ठिकठिकाणीं केला असला तर त्यांत अनपेक्षित काय? पण अशाही प्रसंगीं मसूरास दत्तु महाजन यांस लाथा मारून २७ माणसें शाळेंत कैद करीपर्यंत अगर तांबव्यास बारावर्षांचा शंकर देशमुख, महंमदभाई, शंकरराव माळी, काशीनाथ देशमुख यांनीं अटक होईतों झेंड्यास हात लावूं दिला नाहीं. बिळा-शीला तर राजू कदम या स्त्रीनेंच झेंडा कवटाळला होता. तिला संगीनीचे ठोसे देऊन फरफटत ओढल्यावरच झेंडा सुटला. तासगांवांत सिद्धेश्वराचे देवळावर सरकारी लोकांदेखत उभारलेला झेंडा पोलिसांनीं रात्रौ उतरला.

खरोखर जनतेंत ही जी दुर्दमनीय वृत्ति संचारली तीच खरोखर नौकरशाहीला 'नष्टपणा'ची वाटली. मीठ आणि जंगल यांच्या बाबत अन्याय्य कायदे तोडण्याइतका कायदेभंग करण्याची राष्ट्रीयसभेची परवानगी असल्यामुळें, जुलैच्या पहिल्या पंधरवड्यांत जंगलसत्याग्रहाची खळबळ जिल्ह्यांत जास्त उडाली. खेडीं आपआपल्या जबाबदारीवरच कामें करूं लागलीं जेथें जेथें म्हणून जंगल आहे तेथें तेथें जंगलसत्याग्रह करण्यांत आला. काल्याचा प्रयत्न यावेळीं मोठ्या प्रमाणांत बहुसंख्यांक पण विस्कळित झाला. तेवढा अपवाद सोडला तर "जंगल का कायदा तोड दिया" हाच ध्वनि त्यावेळीं सगळीकडे निघाला तांबव्याच्या सत्याग्रहाचे दुसरे दिवशीं फॉरेस्ट ऑफीसर व ३९ पोलीस शिपाई तांबव्यास येऊन खाजगी शेतांत चरत असलेली जनावरें फॉरेस्टांत धरून नेऊं लागले पण आपली जमीन फॉरेस्टापासून वेगळी असल्यामुळें त्या रानांचा मालक व ९ स्त्रियांनीं त्या गोष्टीस धैर्यानें मज्जाव केला. ऑफिसर निघून गेले. पण भुमका उठली कीं, पोलीस सैन्यानिशीं ते परतणार. तेव्हां भोंवतालच्या १५ गांवचे १५०० लोक त्या गरीब शेतकऱ्यांशीं सहकार करण्यासाठीं रात्रभर खिंडींत बसून राहिले.

सत्याग्रहींच्या या कामगिरीपेक्षां अफाट जनतेचा सत्याग्रह " वनचराईची फीही द्यावयाची नाहीं आणि राखीव जंगलांतील गवताचा लिलांव घ्यावयासही पुढें यावयाचें नाहीं " या गोष्टींत दिसून आला.

पण यापेक्षांही यावेळीं जोरांत मद्यपान निरो-धन. दारू दुकानावर एवढ्या शांतपणें जूनच्या मध्यापासून

एक महिनाभर निरोधन चालल कीं, दिवसा गिऱ्हाइकाचा सगळा शुकशुकाट असावयाचा. मग "मागीलदारानें" काय खप झाला असेल तो होवो!! तारळ्याचा आणि मसूरचा गुत्ता त्यावेळीं विशेष ठरला. नवाकाळचा बातमीदार ता० २३ जूनला लिहितो कीं "दारूची विक्री शून्यापर्यंत येऊन पोंचली असतां, उंब्रज ठाण्यावरील कोणा उपद्व्यापी माणसानें तारळ्याच्या गुत्तेवाल्याकडून दारू मुद्दाम विकत घेऊन सहा स्वयंसेवकांवर निष्कारण खटला भरला." मसूरच्या निरोधकांपैकीं शंकरराव काटकर व विष्णुपंत निगडीकर प्रभृतींवर एकदां एक नंदीबैलही घालण्यांत आला, पण शांतिसहनशीलतेचें आपलें व्रत निरोधकांनीं सोडलें नाहीं.

वरील गोष्टींवरून जनतेची एकंदर मनोवृत्ति लक्षांत घेतली, तर जुलूमशाहीबद्दल लोकांचीं मनें कशीं विटलीं असतील याची कल्पना येते. फलाणा अधिकारी सत्याग्रह्यांकडे येत आहे अशी नुसती समजूत झाली तरी तांबव्यासारख्या ठिकाणीं कोयना ओलांडावयास नांव सहा सहा महिने मिळत नसे. बारीकसारीकांची ही अवस्था असेल यांत नवल नाहीं. खुद्द गव्हर्नरसाहेबांचें आगमन साताराजिल्ह्यांत ता. १२ व १३ जुलैला अनुक्रमें सातारा व कऱ्हाड येथें ज्या थाटानें झालें, तो काळ्या निशाणांचा थाट सर फ्रेडरिक साइक्स व जनता यांच्या लक्षांतून जाण्यासारखा नव्हता व नाहीं. या सुमारास साताऱ्यांतून पलटणींची परेड काढण्याची प्रथा पाडण्यांत आली. पण त्यांच्याकडे जनता काणा डोळा करी तर प्रभात फेऱ्यांकडे सादर कौतुकानें पाही. गव्हर्नर साहेब जिकडे फिरकावयाचे होते तिकडे


तीन तीन तास पोलीस बंदोबस्त ठेवूनही आयत्या वेळीं काळया निशाणांच्या माळाच्या माळा गव्हर्नरसाहेबांच्या स्वागतास सज्ज दिसल्या,

सातार्‍यांत गव्हर्नरसाहेबांना प्रथम गुरुवारच्या बाजारांत परजावर एका ठिकाणीं पानसुपारी होती म्हणून तेथेंच २०० स्वयंसेवकांनीं रांगेंत उभे राहून काळया निशाणांनीं साहेबांचें स्वागत केलें. पुढें साहेब म्यु. टींत मानपत्रासाठीं यावयाचें होतें. नौकरशाहीनें तर पोस्टाच्या कोपर्‍यापासून व्हिक्टोरिया लायब्ररीच्या कोपर्‍यापर्यंत लाठीबंद पोलिसांची साखळी करून रस्ते रोखले होते पण त्या साखळीच्या बाहेर कमीत कमी दहाहजार लोकांचा समुदाय कांहीं काळीं निशाणें घेऊन गव्हर्नरसाहेबांच्या स्वागतासाठीं सज्ज होता. मध्यंतरी राजवाड्यापुढील बागेजवळील राष्ट्रीय झेंड्यांचें रक्षण करीत सहा स्वयंसेवक हजर होते त्यांना पकडून नेण्यांत आले. तेव्हां समोरच उभे असलेले भाऊसाहेब सोमण झेंड्याच्या संरक्षणार्थ जाऊन उभे राहिले तशी त्या झेंड्याबाबत नौकरशाहीची सर्व हालचाल स्तब्ध झाली. पुढें गव्हर्नरसाहेब म्यु० टीकडे आले आणि तेथून परत गेले तेव्हां "गांधी महाराज कीं जय" असा गगनभेदी आवाज झाला.

शनिवार ता० १२ जुलै रोजीं जिल्ह्याच्या राजधानींत असें स्वागत स्वीकारून दुसरें दिवशीं साहेब कर्‍हाडास गेले.

ता. १३ जुलै रोजीं कर्‍हाडास काळया निशाणांच्या स्वागताची कोणी एक फिल्म घेतल्याची बोलवा असून १९ जुलै रोजीं "नवा-काळ"चा बातमीदार लिहितो "मानपत्र देण्याचा टेंभा मिरवणार्‍या म्यु० सभासदां-

# महात्मा गांधी



अनत्याचारी असहकाराचे प्रणेते

पैकींच श्री. बळवंतराव जाधव हे मानपत्र समारंभास हजर नव्हते; अधिकारी कक्षेंतील, कांहीं भोळे बापडे असे वेचक सव्वादोनशे लोक तालुक्यांतून बोलावलेले असून, निमंत्रितांपैकीं अवघे एक पंचमांश लोक हजर राहिले....म्यु० ऑफीस शेजारीं गव्हर्नर साहेबांचें आगमन होतांच काळ्या निशाणांनीं त्यांचें स्वागत करून महात्माजींच्या नांवाचा लोकांनीं एवढा जयजयकार केला कीं म्यु. त मानपत्र-वाचन चालू असतां, तो मानाचा देखावा सोडून खुद्द डी. एस्. पी. ना बाहेर यावें लागलें !.....कऱ्हाडच्या सरहद्दीवरील कोयनेच्या पुलापासून गव्हर्नरची स्वारी कृष्णेच्या फरशीपर्यंत ज्या ज्या मार्गें गेली त्या त्या सर्व ठिकाणीं दुतर्फी लोक 'शेम ! शेम !!' "महात्मागांधी की जय" वगैरे आरोळ्यांनीं आणि काळया निशाणांच्या गर्दीच्या प्रदर्शनानेंच गव्हर्नर साहेबांचें स्वागत करीत होते." राघुआण्णा धोपाव्यांच्या सेनापत्याखालीं आणि काळें व मसूरकर मंडळींच्या प्रोत्साहनानें हें सर्व घडून आलें.

महाबळेश्वराला जातां येतां केव्हांतरी गव्हर्नर साहेबांना गांठून मानपत्र देणाऱ्या सातारा म्युनिसिपॅलिटीच्या एकाही मानपत्राच्या वेळीं १९३० सारखें स्वागत नव्हतें; किंवा चाळीस वर्षांनीं गव्हर्नर साहेबांनीं कऱ्हाडास भेट दिली म्हणून लोक आपलें हृद्गत दाखवायला बिचकले नाहींत. गव्हर्नरांच्या आगमनाचे दिवशीं व्यापाऱ्यांनीं पाळलेला हरताळही इतका कडक होता कीं बंदोबस्ताकरतां आलेल्या पोलिसांना सत्याग्रह्यांच्याकडे येऊन जेवावें लागलें. असें कडक हरताळ जवाहिरलाल नेहरू, अब्बास तय्यब्जी यांच्या सारखे लहान थोर

अक्कलखोपनें चहाबंदी केली, भिक्षुकांनीं अभिषेक धरले, तात्पर्य युद्धमान राष्ट्रांत जे प्रकार दृष्टीस पडतात ते सर्व सातारा जिल्ह्यांत दिसत होते.

अर्थात् पराक्रमाच्याही गोष्टी जिल्ह्यांत घडल्या. रत्नागिरी शिरोड्यांकडून मिठाचा सत्याग्रह करून आलेले स्वयंसेवक, कोल्हापुरचे माने, हविरे व कुलकर्णी, साताराचे एकबोटे, वगैरे अंगावरील लाठीमाराच्या जखमा दाखवीत, त्यानें दबून जाण्यापेक्षां येथें चळवळीला उसळीच आली. घरची परिस्थिति सर्वथैव प्रतिकूल असतां ता. २२ एप्रिल रोजीं बाबूराव भिडे, महाजनी, पंडित कुलकर्णी, शिवानंद यांनीं "बेकायदेशीर" मीठ विकून कायदेभंगाला सुरवात केली, आणि रत्नागिरीस बटाणे व पुण्यास पांडुअण्णा शिराळकर अनुक्रमें मिठाचा कायदा तोडून व बेकायदेशीर मीठ विकत घेऊन कऱ्हाडास दाखल झाले. त्यासरसा मिठाचा कायदेभंग जिल्ह्यांत उसळला.

विटें येथें बेहेरे यांचें "१८५७" पुस्तक तीन तीन वेळा भरसभेंत जप्तही झालें! अशा उसळलेल्या कायदेभंगाच्या कांहीं विशिष्ट लाटा लक्षांत भरण्या सारख्या आहेत. मसूर येथें ता. २७ एप्रिल रोजीं तर्कतीर्थ जोशांनीं विदेशी कापडाची होळी पेटविली. ता. ६ मे रोजीं तासगांवास विदेशी कापडाची लादी एका गाढवावर करून मिरवणूक ओढ्यांत नेली व तेथें परांजपे वकीलांनीं होळी पेटवली. गणपतराव क्षत्रियांनीं व पांडोबा जाधवांनीं एकदम १९० स्वयंसेवकांनिशीं बेकायदा मीठ विकलें व विकत घेतलें. आणि ता. १९ जून रोजीं तांबोळी, नेमाने, भस्मे यांनीं तारळे गुत्त्यावर पिकेटिंग

पैकींच श्री. बळवंतराव जाधव हे मानपत्र समारंभास हजर नव्हते; अधिकारी कक्षेंतील, कांहीं भोळे बापडे असे वेचक सव्वादोनशे लोक तालुक्यांतून बोलावलेले असून, निमंत्रितांपैकीं अवघे एक पंचमांश लोक हजर राहिले....म्यु० ऑफीस शेजारीं गव्हर्नर साहेबांचें आगमन होतांच काळ्या निशाणांनीं त्यांचें स्वागत करून महात्माजींच्या नांवाचा लोकांनीं एवढा जयजयकार केला कीं म्यु. त मानपत्र-वाचन चालू असतां, तो मानाचा देखावा सोडून खुद्द डी. एस्. पी. ना बाहेर यावें लागलें !......कऱ्हाडच्या सरहद्दीवरील कोयनेच्या पुलापासून गव्हर्नरची स्वारी कृष्णेच्या फरशीपर्यंत ज्या ज्या मार्गें गेली त्या त्या सर्व ठिकाणीं दुतर्फी लोक 'शेम ! शेम !!' "महात्मागांधी की जय" वगैरे आरोळ्यांनीं आणि काळ्या निशाणांच्या गर्दीच्या प्रदर्शनानेंच गव्हर्नर साहेबांचें स्वागत करीत होते." राघुआण्णा धोपाव्यांच्या सेनापत्याखालीं आणि कालें व मसूरकर मंडळींच्या प्रोत्साहनानें हें सर्व घडून आलें.

महाबळेश्वराला जातां येतां केव्हांतरी गव्हर्नर साहेबांना गांठून मानपत्र देणाऱ्या सातारा म्युनीसिपॅलिटीच्या एकाही मानपत्राच्या वेळीं १९३० सारखें स्वागत नव्हतें; किंवा चाळीस वर्षांनीं गव्हर्नर साहेबांनीं कऱ्हाडास भेट दिली म्हणून लोक आपलें इद्दत दाखवायला बिचकले नाहींत. गव्हर्नरांच्या आगमनाचे दिवशीं व्यापाऱ्यांनीं पाळलेला हरताळही इतका कडक होता कीं बंदोबस्ताकरतां आलेल्या पोलिसांना सत्याग्रह्यांच्याकडे येऊन जेवावें लागलें. असें कडक हरताळ जवाहिरलाल नेहरू, अब्बस तयब्जी यांच्या सारखे लहान थोर

प्रसिद्ध पुढारी शिक्षा पावले म्हणजे जसे पडत तसेच स्थानिक सत्याग्रह्यांच्या वेळींही पडत. पण गव्हर्नरसाहेबांचे वेळीं जो कडक हरताळ होता त्यावरून ब्रिटिश दडपशाही किती असंतोष निर्माण करूं शकली हें एकप्रकारें स्पष्टपणें जगाच्या निदर्शनास आलें. इतकें कीं साईक्स-साहेबही अस्वस्थ झाल्याचें टाइम्सनें नमूद केलें होतें.

सत्याग्रही सत्याग्रहासाठीं निघो, सत्याग्रहाहून परत येवो, त्याला तुरुंगांत पोंचता करावयाचा असो अगर तो तुरुंगांतून परत येवो, सत्याग्रह्यांचें अभिनंदन आणि सरकारी दडपशाहीचा धिक्कार हे कार्यक्रम नित्यवळणाचे इतके होऊन बसले होते कीं त्यासालीं नुसत्या "सभा" म्हटल्या तर हजारों झाल्याचा दाखला सांपडतो. त्यांपैकीं कित्येक प्रसंगीं दहादहा हजारांच्याही असत. गव्हर्नरवरील बहिष्कारासंबंधीं कऱ्हाड येथें भरलेली ता. १२ जुलैची सभा २५००० स्त्री पुरुषांची होती; व इसलामपुरास राजबंदीदिनाची सभा १५००० श्रोत्यांची झाली. वाईस तर राजाभाऊ भाव्यांनीं बेकायदेशीर संस्थांचा प्रतिनिधी म्हणूनही सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळ्यां-देखत कित्येक सभा बेदरकारपणें केल्या. भुयाचीवाडी, खोकलेवाडी असल्या कान्याकोपऱ्यांतसुद्धां शांतिसंग्रामानें आपला प्रभाव दाखविला. मग वाईच्या रंगुताई निमकर, सबुताई पुरोहित, काशीताई पर्वते यांनीं कीर्तनें करून, साताऱ्च्या यशोदाबाई गोखले, गोदुबाई दामले यांनीं बहिष्कार-व्रतानें चातुर्मास्य साजरा करावयाचें व करवावयाचें ठरवून किंवा तासगांवच्या विद्यार्थ्यांनीं 'बजरंगव्रत' आचरून शांति-संग्रामाला आशीर्वाद दिले असले तर काय वलन?

अक्कलखोपनें चहाबंदी केली, भिक्षुकांनीं अभिषेक धरले, तात्पर्य युद्धमान राष्ट्रांत जे प्रकार दृष्टीस पडतात ते सर्व सातारा जिल्ह्यांत दिसत होते.

अर्थात् पराक्रमाच्याही गोष्टी जिल्ह्यांत घडल्या. रत्नागिरी शिरोड्यांकडून मिठाचा सत्याग्रह करून आलेले स्वयंसेवक, कोल्हापुरचे माने, हविरे व कुलकर्णी, साताराचे एकबोटे, वगैरे अंगावरील लाठीमाराच्या जखमा दाखवीत, त्यानें दबून जाण्यापेक्षां येथें चळवळीला उसळीच आली. घरची परिस्थिति सर्वथैव प्रतिकूल असतां ता. २२ एप्रिल रोजीं बाबूराव भिडे, महाजनी, पंडित कुलकर्णी, शिवानंद यांनीं "बेकायदेशीर" मीठ विकून कायदेभंगाला सुरवात केली, आणि रत्नागिरीस बटाणे व पुण्यास पांडुअण्णा शिराळकर अनुक्रमें मिठाचा कायदा तोडून व बेकायदेशीर मीठ विकत घेऊन कऱ्हाडास दाखल झाले. त्यासरसा मिठाचा कायदेभंग जिल्ह्यांत उसळला.

विटें येथें बेहेरे यांचें "१८५७" पुस्तक तीन तीन वेळा भरसभेंत जप्तही झाले ! अशा उसळलेल्या कायदेभंगाच्या कांहीं विशिष्ट लाटा लक्षांत भरण्या सारख्या आहेत. मसूर येथें ता. २७ एप्रिल रोजीं तर्कतीर्थ जोशांनीं विदेशी कापडाची होळी पेटविली. ता. ६ मे रोजीं तासगांवास विदेशी कापडाची लादी एका गाढवावर करून मिरवणूक ओढ्यांत नेली व तेथें परांजपे वकीलांनीं होळी पेटवली. गणपतराव क्षत्रियांनीं व पांडोबा जाधवांनीं एकदम १५० स्वयंसेवकांनिशीं बेकायदा मीठ विकलें व विकत घेतलें. आणि ता. १९ जून रोजीं तांबोळी, नेमाने, भस्मे यांनीं तारळे गुत्त्यावर पिकेटिंग

करून, कायदेभंगाचा मामला फारच पुढें रेटला. त्याचें उदाहरणच द्यावयाचें तर जवाहिरलालांच्या शिक्षेमुळें तासगांवास भरलेल्या सभेचें देतां येईल. पोलीस अध्यक्षांना पकडतें असें म्हटल्यावर १०५ माणसें आपण होऊन त्या सभेची अध्यक्ष झालीं. फार काय ऑगष्टमध्यें जोग–जोगळेकरांना बेकायदेशीर संस्थांचे चालक म्हणून पकडल्यावर लाठी–चरखा–ज्ञानेश्वरी--खादीप्रदर्शनाचा सप्ताह झाला आणि कु० शांता कासार सारखी एक मुलगी कायदेभंगाची प्रचारक बनली.

ऑगष्टमध्यें २२ तारखेला कांग्रेसकमेट्या व टिळक-राष्ट्रीय विद्यालयांतील शिबीर बेकायदेशीर ठरविलें. त्यावेळीं कांग्रेससंस्थांशीं संबंधित असलेले लोक जसे पकडले तसे शिबीरांतील झेंड्याच्या रक्षणार्थ उभे राहिलेले तेरा सत्याग्रहीही पकडले. शिबीर उध्वस्त झाले पण कांग्रेस कमेट्यांच्या संस्था बेकायदेशीर ठरल्यावर सप्टेंबर पासून “ सर्वाधिकारी ” म्हणून सर्वत्र कायदेभंग होऊं लागले. असा एकाला उचलून तुरुंगांत घालावा तों जणूं दुसरा त्याच्या पायधुळींतून तयार ! पण सातारा जिल्ह्यानें सामुदायिक, सार्वत्रिक, सर्वसंमत, आणि एकाच वेळीं जर कोणता परिणामकारक सत्याग्रह केला असेल तर एकदां जवळजवळ ५० हजार लोकांनीं ता. २८ आगस्ट रोजीं ऋषिपंचमीच्या सुमुहूर्तानें केलेला १ पाडळी [ कराड ] २ उरूल, ३ इटकरें ४ करंजखोप ५ अंतवडी ६ विटें ७ कणेगांव ८ कोरेगांव ९ मसूर १० बिळाशी ११ मांगले १२ कांदे १३ देववाडी १४ कडेगांव

१५ किवळ १६ पेठ १७ येलूर १८ रेठरेहरणाक्ष १९ बोरगांव २० वाळवें २१ घागेवाडी २२ ऐतवडेबु॥ २३ कुरळप २४ कापूसखेड २५ चिकुर्डे २६ करंजवाडी २७ कार्वे २८ देवर्डे २९ रेठरेंधरण ३० निगडी तर्फ कराड ३१ वशी ३२ तारळें अशा ठिकाणचा जंगल-सत्याग्रह होय. सदर सत्याग्रहाला बाबा लेल्यांची स्फूर्ती होती. त्यांतही तांबवे, रेठरेहरणाक्ष व विशेषतः चरण बिळाशी येथील जंगल-सत्याग्रह एवढया मोठ्या प्रमाणांत झाले कीं टाइम्सच्या बातमीदारास बिळाशीला 'दाक्षिण शेतकऱ्यांचें बंड ' दिसलें. तांबव्याच्या सत्याग्रहांत कासाबाई परटीणीनीं सरकारी अधिकाऱ्यास थक्क केलें तें याच वेळीं.

मीठ सत्याग्रहाच्या आवृत्त्या, सर्वाधिकाऱ्यांची मालिका आणि 'बंड' वाटण्याइतका जंगलसत्याग्रह या विशिष्ट गोष्टींशिवाय ता. २२ मे हा सोलापूरदिन, ता. २७ जून हा मुंबईदिन, ता. १० ऑगष्ट हा राजबंदीदिन, ता. १६ नोव्हेंबर हा जवाहरलालदिन आणि १३ जानेवारी १९३१ हा सोलापुर फाशीदिन म्हणून जंगल सत्याग्रहासारखेच जिल्ह्यांत मोठ्या-प्रमाणावर साजरे करण्यांत आले. सोलापुर फांशीदिनादिवशीं कऱ्हाड व सातारा येथें लाठीबंद पोलिसांच्या गराड्यांत एक सोडून पांच पांच सभा झाल्या आणि तासगांव येथें थोडक्यांत लाठीमाराचा प्रसंग टळला. नेहरूदिनादिवशीं तासगांवास विकत-फुकट कसेंही मिळवून प्रत्येक घरावर राष्ट्रीय निशाण फडकविण्यांत आलें. त्याच दिवशीं कऱ्हाडास पोलिसपार्टीची पळतां भुई थोडी झाली. कारण एकेठिकाणीं सभा आहे म्हणून ती मोडावयास जावें तों तेथील सभा आटोपून दुसरीकडे सभा सुरूही असावयाची. याशिवाय राजबंदीदिनापासून स्वदेशी

बहिष्कार सप्ताहही जिल्ह्यांत साजरा झाला. त्यांत, केसरी म्हणतो, "प्रत्येक दिवसाचें व सभेचें वैशिष्ठ्य राखण्यांत आलें होतें. राजबंदीदिन, धर्मदिन, स्वदेशीदिन, बहिष्कारदिन, शेतकरी राजकारणदिन म्हणून आठवडाभर एकसारखी जागृति करण्यांत आली." हा सप्ताह आणि राजबंदीदिन कऱ्हाडांत विशेष ठसा उमटविणारा झाला.

ता. ३० आक्टोबर पासून नेहरूसप्ताहहि पाळण्यांत आला होता. तो बेकायदा ठरविलेल्या कऱ्हाड तालुका कांग्रेस कमेटीमार्फत लक्ष्मणराव अटकेकर व जगन्नाथ तेली यांनीं केल्यामुळें पुण्याचे काकासाहेब गाडगीळ व राघुआण्णा धोपाटे यांनीं घेतलेल्या भागाबद्दल त्यांस शिक्षा देण्यांत आल्या. त्यावेळीं धोपाट्यासह काकासाहेब गाडगीळ बिळाशीकडे सांत्वनार्थ जाणार होते.

---



मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. ५७११
ता. ३

## प्रकरण १५ वें

# बिळाशी भागांत.

[ केसरी, ज्ञानप्रकाश, समर्थ, ऐक्य, भारतमाता, टाइम्स, नवाकाळ, इसलामपूर कोर्टांतील बिळाशी केसमधील जबान्यावरून ]

टाइम्सच्या बातमीदाराला दक्षिण-शेतकऱ्यांचें बंड वाटण्याइतका जंगल सत्याग्रह तरी बिळाशीकडे कसला झाला होता ? आणि तिकडील लोकांच्या सांत्वनार्थ काकासाहेब गाडगीळ तरी कां जाणार होते ? या प्रश्नांच्या खोलांत आतां थोडेसें शिरूं.

जुलै १९३० च्या दुसऱ्या पंधरवडयांत खेडेगांवें आपआपल्या जबाबदारीवर जंगलसत्याग्रह करूं लागलीं. त्यांत बिळाशीकडील खेडींही होतीं. ता. १५ जुलै रोजीं बिळाशीस शिबीर सुरूं होणार असल्याचें घाटत होतें. "सत्याग्रही होणारांनीं शांततेनें वागावयाचें व सत्य बोलावयाचें अशा अटी त्यावर लागूं होत्या." ता. १८ जुलै रोजीं गांवकऱ्यांनीं जंगलांतून एक मोठा सोट आणून त्या ३४ फूट लांबीच्या सोटावर रामेश्वरमंदिराचे नंदीचे देवळाजवळ राष्ट्रीय निशाण उभारलें. याबाबतींत पोलिस-पाटील जो लक्ष्मण पाटील, त्यानें वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या. साहजिकच जुलैच्या शेवटच्या आठवड्यांत बिळाशीकडे पोलीस नेण्यांत आले. त्यांनीं झेंडा काढण्याचा प्रयत्न केला.

पण " पोलील जमा झाल्यावर हजारों माणसेंही (स्त्री-पुरुष) झेंड्यांचे संरक्षणासाठीं जमली. एकंदर समाज ८-१० हजार असावा. परंतु इतका जरी समाज होता तरी त्यांच्यावर महात्माजींच्या अनत्याचारी तत्त्वाचा प्रभाव झालेला दिसत होता." तेव्हां त्या समुदायापुढें पोलिसास परतावें लागलें.

यासंबंधीं शिराळ्याचे सब्. इन्स्पेक्टर बंकटासिंग यांनीं तपशील सांगितला आहे तो असा. "२१ जुलै रोजीं बिळाशीस गेलों. त्यावेळीं माझे बरोबर ५।६ निःशस्त्र शिपाई होते. ता. २२ जुलै रोजीं तेथून परत आलों. ता. २१ रोजीं गांवकऱ्यांकडून आम्हांला तकलीफ पडली. आम्हांला जेवण-खाण मिळालें नाहीं. आम्हांला धक्काबुक्की झाली नाहीं किंवा आमचे सामानही कोणी हालविलें नाहीं. बाजारचे सामानसुमान आम्हांला मिळूं दिलें नाहीं. गांवकामगारांकडूनही आम्हांला कांहीं मिळूं दिलें नाहीं. आम्ही पोलीस गेलों म्हणजे सामान नेहमीं फुकट मिळतें. पण यावेळेस घोड्यास गवतही मिळालें नाहीं.

" ता. २४ रोजीं इन्स्पेक्टर, डी. एस्. पी. व इतर शेपन्नास माणसें असे आम्ही सायंकाळीं पोंचलों. सोबतचे पोलिसांपैकीं लाठीवाले शिपायी १९ होते. उरलेल्या ३९ शिपायांजवळ बंदुका होत्या. त्या एकेका गोळीच्या होत्या. बांझबाराची काडतुसें मुळींच नेलीं नव्हतीं. माझी मनाची तयारी गोळीबार करावा अशीच होती. ता. २१ पासून बिळाशीचे लोक बंडखोर आहेत असें माझें मत झालें. बिळाशीचे प्रकारास बंड हें नांव मीच ता. २२।८ चे रिपोर्टांत सुचविलें होतें, "

याच्या पुढची हकीकत अशीः— ता. २८ आगष्ट रोजीं

जो ठिकठिकाणच्या शिबिरांमार्फत व कायदेभंगमंडळा-मार्फत सातारा जिल्ह्यांतील सुमारें ५० हजार लोकांनीं शांतपणें सार्वत्रिक जंगलसत्याग्रह केला त्यांत इसलामपूर तालुक्यांतील धरणाचें रेठरें, चरण - बिळाशी वगैरे गांवेंही अर्थातच होतीं. दोनही ठिकाणीं भोंवतालच्या ५।२५ खेड्यांतील दहादहा हजार समुदाय होता. बाबा लेले यांच्या पुढाकाराखालीं तो सत्याग्रह शांतपणें पार पडला. " ती हकीकत समजतांच साताऱ्याहून कलेक्टर मि० अमीनुद्दीन हे बरोबर दोनतीनशें पोलिसांची तुकडी घेऊन इस्लामपुरास आले." इसलामपूराहून रेठरें धरणाचें येथें जाऊन तेथें ज्यानें गांधीटोपी घातली असेल त्यास धरणें व मारहाण करणें हा प्रकार सुरू झाला. पेठ येथेंही दुसरें दिवशीं असाच हल्ला करण्यांत आला. शिबिराची नासधूस करण्यांत आली व झेंडा काढून तो तोडून फेंकून देण्यांत आला. ...... नेर्ल्यांत पोलिसांनीं लाठी चालवून बऱ्याच जणांस अटक केली. बोरगांव येथेंही मारपीट झाली. जंगल सत्याग्रहांत जंगलचें नुकसान झालें त्याची भर-पाई म्हणून गांवकऱ्यांपासून १०-५-१५ याप्रमाणें रुपये वसूल केले. ता. १ सप्टेंबर रोजीं इसलामपूरास पोलिसांनीं नाकेबंदी केली व झेंडा काढून टाकून त्याचा सोटा कले-क्टरच्या तंबू पुढें उभा केला व त्यावर युनियन जॅक उभारलें....... पुढें अष्ट्याची पाळी आली. अष्ट्याहून दुसऱ्यादिवशीं हें सैन्य (?) शिराळ्याकडे जाण्यास निघालें. ता. ५ सप्टेंबर रोजीं शिराळ्याहून पोलिस फौज सकाळींच बिळाशीस निघाली. शिराळ्याहून बिळाशीचा रस्ता लोकलबोर्डाचा असून तो पूर्वींपासूनच नादुरुस्त

होता व तो दुरुस्त व्हावा याबद्दल लोकांनीं पूर्वी अर्जही केले होते. अशाच रस्त्यानें मोटारीस १२ मैलांचा प्रवास करण्यास एक तास लागला, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. बिळाशीस डी. एस्. पी. च्या नेतृत्वाखालीं २५० हत्यारी पोलीस होते. त्यांत पुण्याहून आलेली १०० लोकांची किचनेर पलटण होती. कोल्हापुराहून सुमारें १५० पायदल बिळाशी, रेळे व मंगरूळ यांचा कोंडमारा करण्यांस ठेवले होते. बिळाशी येथें बंड झालें असून इंग्रजी सत्ता तेथील लोकांनीं झुगारून दिल्याच्या बातम्या बाहेर आल्या होत्याच. तेव्हां बाहेरचे सर्व रस्ते रोखून कोणीही "गांधींचा माणूस" आंत जाऊ न देण्याची अगर आंतील बाहेर येऊं न देण्याची खबरदारी घेण्यांत आली होती हें निराळें सांगण्याचें कारणच नाहीं.

शुक्रवारीं ७ वाजतां सकाळीं पोलिस आले त्यावेळीं गांवचे कित्येक लोक बाहेरही पडलेले नव्हते. रामेश्वराचे देवळांत मात्र सप्ताह चालू होता. आणि गांवचे व परगांवचे शेंकडो पुरुष, शेदोनशे बायका व मुलें मिळून ७००।८०० मंडळी देवळांत व बाहेर बसून होतीं. पोलीस आले व इन्स्पे-क्टर नाईक यांच्या हुकमानें त्यांनीं झोडपावयास सुरवात केली. ५० पोलिसांची एक टोळी झेंडा काढण्यासाठीं गेली. झेंड्याच्या संरक्षणार्थ ६० स्वयंसेवक व २० स्त्रिया धावल्या. राजू कदम नांवाच्या एका धीट स्त्रीनें झेंड्याला हातांनीं विळखा घातला होता. तिच्या नाकाडावर लाठीचा तडाखा बसून तोंड रक्तबंबाळ झालें तरी तिनें झेंडा सोडला नाहीं. अखेर पोलिसांनीं हिसकाहिसकी करून

तिला फरफटत ओढून काढलें नंतर झेंड्याचा चौथरा पाडून काठी तोडून पाडण्यांत आली !! देवालयांतही घुसलेल्या पोलिसांनी सांपडेल त्यास धोपटण्यास कमी केलें नाहीं. मृदंगतंबोरा फोडून व मखर फोडून मोडून टाकलें !

दोन तासांत हें कृत्य आटोपून पोलीस शिपाई तेथून निघून गेले. परत जातांना कोणी दगड मारले अशा सबबींवर चार पांच पोलिसांनीं कलेक्टरांच्या हुकमावरून एक एकच गोळी झाडली. त्यांतील दोन गोळ्यांनीं मेलेल्या सिताराम भाऊ चांभार व धोंडी संतु कुंभार या १०-१२ वर्षांच्या पोरांना कुत्र्याप्रमाणें फरफटत मोटारी पर्यंत नेलें असें ती स्थिती प्रत्यक्ष पाहिलेल्या स्त्रिया सांगतात "

बंकटसिंग इन्स्पेक्टरनीं संबोधलेलें तें बिळाशीचें बंड वरील तऱ्हेनें मोडून ३९ लोकांना अटक करून कलेक्टर साहेब व डी. एस्. पी. शिराळ्यास आल्याच्या वार्ता सातारा कऱ्हाडकडे गेल्यावर, साताराहून डॉ. कोल्हटकर आपल्या आर्यांग्ल वैद्यक शाळेंतील तेरा विद्यार्थ्यांसह व कऱ्हाडहून डॉ. कोल्हापुरे-गुणे-गोगटे-दिवेकरवैद्य प्रभृति मण्डळी जखमी लोकांच्या शुश्रुषेकरतां रवाना झाली. आपल्या हेतूची खातर-जमा करून दिल्यावरच शिराळ्याहून त्यांना अधिकाऱ्यांनीं पुढें जाऊन दिलें. शुश्रुषापथकांतील डॉ. कोल्हटकर यांनीं आपल्या पत्रांत म्हटलें आहे कीं:—

"मांगरूळ या गांवीं बंदुकीची जखम झालेला एक १०-१२ वर्षांचा मुलगा होता. जखम मांडीस झाली आहे. त्याचप्रमाणें लाठीच्या माराचे ७८ लोक सांपडले. रेठे या गांवीं ५-६ लोक लाठीच्या माराचे होते. मार मुख्यतः पाठीवर

फार होता. २।३ जणांच्या पाठीवर १०।१९ तरी लाठ्याचे मार होते. कित्येकांचीं मनगटेंही सुजलीं होतीं. बिळाशी येथें सर्व गांवांतील लोक रडत होते. त्या गांवांतील बायका व म्हातारीं माणसें यांनाच जास्त मार लागला होता. ७० वर्षांचा एक म्हातारा होता त्याच्या डोक्यावर लाठीचा मार बराच बसला होता. शिवाय पाठ व दंडही सुजले होते. २।३ जणांच्या डोळ्यांवर मार होता. दोन बायकांच्या हातास ओपन वुंडस् दिसल्या. एका बाईचें नाक फुटलें होतें. बिळाशी पलिकडच्या वाडींत पायाचें हाड मोडलेला एक गृहस्थ दिसला. सर्व गांवांचे लोक भ्यालेले दिसले. आम्हांला रडत रडत त्यांनीं सर्व गोष्टी सांगितल्या. ''

दोन तासांत पोलिसांचे हातून दुखावलेल्या लोकांची आंकडेवारी नवाकाळच्या रिपोर्टप्रमाणें अशी आहे:— " ४२ जखमी आहेत. ते सर्व अंथरुणाला खिळले आहेत. ४ लोक बेपत्ता झाले आहेत. पोलिसांच्या बुटांचा मार लागल्याची तक्रार सुमारें ९० बायकांकडून करण्यांत येत आहे. मंगरूळ येथें ७ अत्यवस्थ असून लाठ्यांच्या मारानें जखमी झालेले २९।३० जण आहेत. रेळें येथें २९ पुरुष व ६ बायका यांनां जखमा झाल्या आहेत. या व किरकोळ मार बसलेलीं या दंगलींतील एकंदर माणसें १००० एक असावींत ''

बिळाशी भागांतील या दुःखित बांधवांच्या समाचारासाठीं डॉक्टर वैद्य मंडळी जशी शनिवारीं सातारा कऱ्हाडहून गेलीं होती, त्याचप्रमाणें राघुआण्णा लिमये आणि कऱ्हाडचे चार स्वयंसेवक आडवळणांनीं जाऊन आले इतकेंच नव्हें तर

सातारा जिल्ह्याचे पुढारी दादासाहेब करंदीकर, हे सरदार मुतालिक व बॅरिस्टर करंदीकर यांच्यासह रविवार ता. २७ सप्टेंबर रोजीं बिळाशी भागाकडे समाचारार्थ जाऊन आले. त्याच दिवशीं मलकापूरच्या बाजूनें कापशीभेंडस गांवाहून वारणा नदी ओलांडून कोल्हापूरचे माने, धर्माधिकारी व मेथेमास्तर हेही बिळाशीच्या लोकांस औषधपाणी करण्यासाठीं धांवले होते. याशिवाय कऱ्हाड येथें आण्णासाहेब आळतेकर यांच्या अध्यक्षतेखालीं सभा होऊन " बिळाशी येथें पोलिसांनीं केलेल्या अत्याचारांची चौकशी करण्याकरतां न. चिं. केळकर, रा. ब. काळे, सरदार मुतालीक, गुंजाळ, रामराव शिंदे यांची कमेटी नेमावी " असा ठरावही झाला.

कारण बिळाशीसंबंधीं टाइम्सनें विपरीत बातम्या पसरविण्याचा नुसता सपाटा चालविला होता. उगाच नमुना म्हणून असा:— " शिराळें ता. ६:— आपल्या ' देवतांच्या रक्षणासाठीं ' सरकारविरुद्ध उठलेल्या शेतकऱ्यांच्या उपयोगांतील रानटी शस्त्रें व त्यांचे डावपेच याच योगानें साताराजिल्ह्यांतील बिळाशी खेड्यावर सशस्त्र पोलिसांकडून करण्यांत आलेल्या हल्ल्याची हकीगत मध्ययुगीन काळाच्या इतिहासांतील वाटते. बऱ्याच नेटाच्या लढाईनंतर व लोकांवर सहा गोळ्या झाडल्या गेल्यावरच पोलिसांना यश मिळालें. दोन गांवकरी ठार झाले व कित्येक जखमी झाले. कित्येक पोलिस अंमलदारांना व शिपायांनाही उंचावरून लोटण्यांत आलेले मोठाले दगड अथवा सुऱ्या यांपासून कमी अधिक गंभीरस्वरूपाच्या जखमा झाल्या आहेत.

गांवकऱ्यांची संख्या सुमारें पाच ते आठ हजारांइतकी होती व त्यांची शिस्तहि चांगली होती. भोंवतालच्या डोंगरावर चांगल्या माऱ्याच्या जागा धरून ते दगड खालीं लोटून देण्याच्या तयारीनें बसलेले होते."

---

### प्रकरण १६ वें

## स्वाभिमान संरक्षणार्थ.

[केसरी, ज्ञानप्रकाश, सत्यशोधक, बळवंत, ऐक्य, भारतमाता, यांवरून]

१९३० चा शांतिसंग्राम मागील भागांत थोडक्यांत सांगितल्याप्रमाणें सातारा जिल्ह्यानें लढविला आणि जिल्ह्याच्या सुपुत्रांनीं व सुकन्यांनीं त्यांत जसा भाग घेतला तसा जिल्ह्याच्या बाहेरही घेतला. ता. ३ एप्रिल रोजींच इनामदार, नर्दे, हकीम हे विलेपार्लें येथील मीठ सत्याग्रहासाठीं रवाना झाले होते. २१ एप्रिलला गोसाव्यांना म्हाराष्ट्रसत्याग्रहमंडळाचें पाचारण झालें. त्याच महिन्याच्या तिसऱ्या आठवड्याचे आरंभीं रत्नागिरीस प्राज्ञपाठशाळेच दहा विद्यार्थी, आणि मालवणास वीस व विलेपार्लें येथें एकवीस स्वयंसेवक निघून गेले. ता. १९ एप्रिलला रत्नागिरी कँपचे आधिपत्य डॉ. आठल्ये यांचेकडे आलें. पुरते दोन दिवस गेले नाहींत तोंच साखवळकर, गणपतराव साठे व

येलूरचे कुलकर्णी यांना सत्याग्रहांत शिक्षाहि झाल्या. गोसावी "राष्ट्रीय सभेच्या विधायक कार्यक्रमावर" व्याख्यानें देतां देतांच पेण येथें ता. २७ एप्रिल रोजीं पकडले गेले. तीन दिवसांनीं रत्नागिरीस नाथ घाणेकरांस तोच मान मिळाला. उघडच उत्साहानें परचुरेशास्त्री ता. ३ मे रोजीं शिरोड्याला गेले देखील ! अशा एकट्या दुकट्याचें कशास बोलावयास हवें ! ता. ९ मेपर्यंत मिठाच्या कायदेभंगास १२० स्वयंसेवक सातारा शिबीरांतून धाडले. त्यानंतरच्या एका पत्रांत डॉ. आठल्ये कळवितात कीं, "रत्नागिरी, मालवण, शिरोडें, वेंगुर्लें प्रत्येक केंद्रावर सातारा जिल्ह्यांतील लोक आहेत. त्यांचें चोख काम होतें. पोलिसांनीं पाय फासटलें तरी स्वयंसेवकांनीं हात टाकला नाहीं; पण मीठ मात्र सोडलें नाहीं." ता. १९ मे रोजीं शिरोडें मिठागरांतील १९०० मणांवर यशस्वी हल्ला झाला त्यांत डॉ. आठल्ये, परचुरे, बा. वा. इनामदार, ना. रा. नरदे, त. जि. कोडाचिवाड, ना. र. वाडवेकर, ल. ना. हसबनीस, अ. बा. आडके, ना. अ. सोहनी, आ. प. मोरे, वामनराव कुलकर्णी, रत्नगौडा पाटील, विष्णु भाऊ पाटील, दिवेकर, भिडे अशी सातारा जिल्ह्यांतील मण्डळी प्रामुख्यानें होती. संख्येनेंच बोलावयाचें तर शिरोड्याच्या शेवटच्या सत्याग्रहांत सातारा जिल्ह्याचे १५० लोक होते. व त्यांतले ६५ पकडले गेले. त्यांत खरी कर्तबगारी नागठाण्याचे श्रीपाद हरी कुलकर्णी यांचीच होती. ती अशी. शेवटच्या दिवशीं पोलिसांच्या आठ रांगांतून ते एकटेच तीरासारखे गेले व मीठ घेऊन आले.

ता. २९ मे चे सुमारास धारासनाला सत्तर महाराष्ट्रीयांनीं हल्ला केला त्यांतही साताऱ्याचीं दोन माणसें होतीं. जून महिन्यांत सोलापुरास जो झेंडा सत्याग्रह झाला त्यांत दामूअण्णा एकबोटे, अ. ग. देशपांडे, श्री. ह. जोशी, शुक्ल, भोसले बर्डे मास्तर प्रभृती अठराजणांनीं भाग घेतला होता.

परजिल्ह्यांत सत्याग्रह करून तुरुंगांत गेलेल्या सत्याग्रहींनीं स्वयंसेवक मिळवले होते व सत्याग्रहाकरितां पैसेही गोळा केले होते. "रत्नागिरींत तर सगळा सातारा भरला होता." असें तिकडील माणसें व पत्रें म्हणत.

अशाप्रकारें सातारा जिल्ह्यांतील मंडळींनीं जिल्ह्यांत व जिल्ह्याबाहेर शांतिसंग्रामांत भाग उचलला असला तरी ता. २८ एप्रिल पूर्वींच अकारण हातझोंबीनें नोकरशाही लोकांस चीड आणीत होती. सोमणांनीं जिल्हाधिकाऱ्यांना पोलिसांच्या त्या लीलेबद्दल ता. २८ एप्रिल रोजींच्या समर्थांतून अनावृत्त पत्र लिहिलें आणि त्यापासून बोध घऊन लोकांची सहानुभूती उत्पन्न करण्याइतका आपल्या वर्तनांत बदल करण्याऐवजीं ता. ६ मे रोजीं साताऱ्यास कोणा माथेफिरूनें दगडफेंक केल्या मुळें कलेक्टरसाहेब व डी. एस्. पी. साहेब यांनीं अनत्याचाराची व शांततेची जबाबदारी समजावून सांगण्याबद्दल सोमणानांच उलट सांगितलें. तें सोमणांनीं अर्थातच केलें. पण निर्वाळा दिला कीं कोणीही सत्याग्रही अत्याचारी नाहीं.

या साध्या गोष्टींतून मधेंच डोकें वर करणारी जी नोकरशाहीची मनोवृत्ति तीच ता. ५ मार्च १९३१ रोजीं गांधीं-आर्विन करार होऊन चळवळीची तहकुबी झाली तरी कायम होती.

पण गांधी-अर्विन-करार आपण निष्ठेनें पाळावा म्हणून जनता दक्षता घेत होती. मात्र राष्ट्रानें ज्या राजकीय विचारापर्यंत प्रगति केली होती, तो दृढमूल करावा अशी काळजी घेण्यांत येई. बाबुराव भिडे यांनीं १९३१ च्या वाईवसंत-व्याख्यानमालेंत " महाराष्ट्राच्या राजकीय संघटनेची अवश्यकता." या विषयावर दिलेलें व्याख्यान म्हणजे " आजन्म-सेवकसंस्थे " ची कल्पना गृहीत धरून शांतिप्रगति कशी साधावी याविषयींच होतें. तेवढ्याच दृष्टीनें ता. १ जून रोजीं जिल्हा कांग्रेसकमेटीचे चिटणीस बाबूराव भिडे, बटाणे, तर्कतीर्थ, गणपतराव आळतेकर, वाटवेशास्त्री, वामन गणेश फडके, वैशंपायन, चरणकर, हकीम, आत्माराम पाटील, पंढरीनाथ घाणेकर, विष्णुपंत आठल्ये, डॉ. आठल्ये, बा. वा. इनामदार यांच्या सह्यांचें एक पत्रक निघून सेनापति बापटांना महाराष्ट्र प्रांतिक कांग्रेस कमेटीचे अध्यक्ष करावे, अशी विनंति करण्यांत आली. त्याप्रमाणें पुढें बापट प्रांतिकचे अध्यक्ष झालेही. लोकमान्य वारल्यानंतर त्यांच्या धडाडीचा, कर्तृत्वाचा आणि चैतन्योत्पादक कार्यक्रमाचा प्रणेता सेनापति बापटांशिवाय कोणी दिसेना. तेव्हां एकपरी त्यांच्याबद्दल आदर दाखवण्याकरतां ही योजना असली, तरी दुसरेपरीही ती योजना सहेतुक होती. महात्मागांधींच्या चळवळींत महाराष्ट्र पडला तो १९२१ पासून अगदीं महात्माजींचें तत्त्वज्ञान महाराष्ट्राला पुरें पटलें होतें म्हणून नव्हे, तर महात्माजींच्या इतका तेजस्वी कार्यक्रम राष्ट्रापुढें दुसरा नव्हताच, तेव्हां " निर्वाह: प्रतिपन्नवस्तुषु " म्हणूनच. आणि आतां बापट म० प्रा० कां. कमेटीचे नेते झाल्यावर महाराष्ट्राचा कुर्रेबाज कार्यक्रम कांहीं निघेल आणि

टिळक गोखल्यांच्या काळचें महाराष्ट्राचें अग्रेसरत्व पुन्हां महाराष्ट्राला प्राप्त होईल, अशीही आशा पुष्कळांनीं बाळगली होती. सेनापती बापट महाराष्ट्रप्रांतिक कांग्रेसकमेटीचे अध्यक्ष म्हणून जुलैच्या शेवटच्या दिवसांत सातारा जिल्ह्यांत आले असतां, ते आपली "भारतीय प्राणयज्ञदलाची" कल्पना घेउन एक लक्ष माणसांची मागणी करीत आले, तेव्हां पुष्कळांना हुरूप चढला. पंधरा मंडळींनीं प्राणयज्ञदलासाठीं आपली नांवें दिलीं. सातारा जिल्ह्यांतील दौऱ्यांत सेनापतींचा सूर असा होता कीं, "लोकांत जागृति पुष्कळच झाली आहे. लोकांना स्वातंत्र्याचें वेड बरेंच लागलें आहे, असें मला वर्तमानपत्रांतून कळत होतें. स्वातंत्र्याकरितां एक लक्ष प्राणयज्ञदलाची कल्पना सुचली व त्या दृष्टीनें प्रयत्न करावयाचा असें मीं ठरविलें. भरपूर किंमत दिल्याशिवाय कोणताही चांगला माल मिळत नाहीं, तसेंच स्वातंत्र्य मागून मिळणार नाहीं तर त्याकरितां बऱ्याच प्राणांचें मोल दिलें पाहिजे."

महर्षि बापटांचा प्राणयज्ञदलाचा मनसुबा निघतांच स्वयंपूर्ण स्वराज्याच्या दृष्टीनें आपण महर्षींच्या कार्यक्रमांत बराच टप्पा चाल करूं शकूं, अशी आशा कांहींना वाटत होती. पण रत्नागिरीस महर्षींना बंदींत पडावें लागल्या-कारणानें, ती सर्व आशा जेथल्या तेथेंच राहिली.

उज्वलतर मार्गदर्शन नाहीं म्हणून हात जोडून बसावयाचें हें मात्र सातारा जिल्ह्यास माहीत नाहीं. एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यांतच साताऱ्यास परदेशी कापडावर साष्टांगनमस्काराचें अनुष्ठान मामा गोळवलकर,

अंबादास कुलकर्णी, वाळिंबे, जयकुमार यांनीं बसविलें होतें. त्याचा सुपरिणाम होऊन सातारचे व्यापारी परदेशी कापड सीलबंद करून ठेवूं लागले. तासगांवींही दारूबंदी, परदेशी कापड व साखर यांवर निरोधन सुरू झालें. ता. २१ जून पासून इसलामपूरास वाळवें तालुका कांग्रेस कमेटीनें बहिष्कार सप्ताह सुरू करून तेंच कार्य केलें. परदेशी कापड सीलबंद न झाल्यास प्राणपणाला लावून अन्नसत्याग्रह करण्याचें आत्माराम पाटलांनीं जाहीर केलें व शेट पोपटलाल शहांच्या हस्तें निरोधनाला सुरवात झाली. बापूसाहेब देशमुख, बाबूराव चरणकर, बर्डेमास्तर, ताराचंदशेट, हिरवे, आण्णा ढबू, प्रेमजी रणछोडदास यांचें निरोधनमंडळ तयार झालें. माधवराव बागल, फलटणे, धोंडजी पांडुरंग पाटील, गुलाबभाई बागवान, बाबुराव गोखले, नाना वाळवेकर, द. वा. कुलकर्णी, ज्ञानु नारायण पाटील, भाऊराव पाटील, हकीम, अहंमदभाई मुंजावर यांचीं भाषणें झालीं. आणि इसलामपूरचें विदेशी कापड सीलबंद झालें. त्याचप्रमाणें कऱ्हाड तालुका कां. कमेटीनेंही परदेशी कापड-निरोधन त्याच सुमारास यशस्वी केलें.

इसलामपूरचा उपरिनिर्दिष्ट बहिष्कार—सप्ताह चालू असतां, वाईच्या गोवर्धनसंस्थेच्या निमित्तानें प. मदनमोहन मालवीय यांचें सातारा जिल्ह्यांत आगमन झालें. तेव्हां सातारा, वाई, कऱ्हाड येथें त्यांची (ता. २२ ते २४ जून) राजकीय व्याख्यानेंही झालीं. “म. गांधींनीं सरकारला वठणीवर आणण्याकरतां जी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली, तें शस्त्र अमोघ आहे. तथापि बिजलीबत्तीसारखा लखलखाट गांधीजीसारखे पुढारी उठवून दाखवीत असले तरी, त्या

बिजलीबत्तीचें पॉवरहाऊस — शक्तिसंचय अफाट जनता होय." पंडितजींच्या अशा व्याख्यानानें "हृदया हृत्संदेश मिळाला."

अफाट जनतेला शक्तिसंचय करण्याच्या दृष्टीनें मे महिन्यांत कऱ्हाड, सातारा, वाई, वाठार येथें तासगांवच्या गजानन व्यायामशाळेनें लाठी प्रचार केला या गोष्टीला विशेष राजकीय महत्त्व नसलें तरी म्हसवड भागांत "कांग्रेसचा संदेश" सांगत जूनच्या पहिल्याच पंधरवडयांत व्हावळ हिंडले किंवा पुढें आक्टोबरचे शेवटच्या आठवडयांत कऱ्हाड तालुक्यांत देशमुख, आत्माराम पाटील, लिमये, गरुड, अबा फाटक, निगडीकर, बाळाराम शेट, गुजर, अटकेकर, लाड यांनीं कांग्रेसचा प्रचार करून "कराची कांग्रेसचा मूलभूत हक्कांचा ठराव समजाविला" या गोष्टी जरूर लक्षांत घेतल्या पाहिजेत. आणि यापेक्षांही १४ जुलै रोजीं बोरगांवास वाळवें तालुका परिषद विठ्ठल रामजी ऊर्फ आण्णासाहेब शिंदे याच्या अध्यक्षतेखालीं भरली या गोष्टीला विशेष महत्त्व आहे. अध्यक्ष १९३० च्या शांतिसंग्रामांत सरकारी पाहुणचार चाखून आलेले आणि हयातीचीं चाळीस वर्षें हरिजनसेवेंत घालविलेले, व स्वागताध्यक्ष माधवराव बागल यांनीं खादीप्रसाराचे निमित्तानें वाळवे तालुक्यांतील खेडें न् खेडें टिपलेलें. तेव्हां बहुजन-समाजाला आणि विशेषतां शेतकऱ्याला "राजशक्तिचें अधिष्ठान" होण्याचें व्यवहार्य शिक्षण मिळालें, हें ओघानेंच आलें.

राष्ट्रीयसभेशीं केलेला समेट मोडण्याचा नोकरशाहीचा

बेत असल्याबद्दल इतर ठिकाणची ओरड वर्तमानपत्रांतून आढळत होतीच. पण जून जुलैमध्यें सातारा जिल्ह्याला तो चटका चांगलाच बसला. बिळाशी प्रकरणांतील दत्तोपंत कुलकर्ण्यांना गांधी--आर्विन कराराप्रमाणें जून उगवला तरी सोडलें नव्हतें आणि त्यापेक्षांही नौकरशाहीनें पांचगणीचें " झेंडाप्रकरण " गर्जविलें. त्याचा थोडासा तपशील असा:—१९३० च्या मार्च १२ ला ॲडव्होकेट मुनशींनीं म्युनिसिपल दीपस्तंभावर राष्ट्रीयझेंडा लावला. ६ एप्रिलास तो कायमपणें फडकला. ता. १४ मे रोजीं गव्हर्नरसाहेब तेथें आले असतां गाडेकर, उमंग देसाई, अजित कपिल जोशी आणि मिसेस समर्थलाल ऊर्फ सौ. गुणवंतीबाई या त्या राष्ट्रीय झेंड्याचें रक्षण करीत होत्या. गव्हर्नर साहेबांनीं हॅट काढून त्या निशाणाचा मानही राखला. पण पुढें आगस्टचे शेवटीं ३० सालीं फर्मानी कायद्यांचें राज्य सुरूं झाल्यावर जो झेंडा निघाला तो १९३१ च्या पाडव्याला पुन्हां लावण्यांत आला. पण महालकऱ्यांनीं तो ७ जुलै १९३१ रोजीं काढला ! ! नौकरशाहीच्या या अशा वृत्तीमुळेंच " बहुजनसमाजाला शक्तिसंचय करण्याचा आपण चालविलेला क्रम " यथायोग्य असल्याची सातारा जिल्ह्याला खात्री पटली आणि पुढें डिसेंबर महिन्याच्या १६ तारखेस हुबळीच्या वाटेवर म्हणून जवाहरलाल नेहरूंचा जो स्टेशन दौरा अपरात्री झाला अगर ता. २९ डिसेंबर रोजीं सुभाषचंद्र बोस यांनीं जो दौरा केला त्यानें सातारा जिल्ह्याला थोडी बळकटी आली. लोणंद, वाठार, सातारा, कोरेगांव, पुसेसावळी, रहिमतपूर, कऱ्हाड, ताकारी, मिरज, सांगली,

तासगांव, कोल्हापूर, बुधगांव, जयसिंगपूर आणि त्या भोंवतालच्या गांवांनीं रेल्वेलाईनीवर जवाहिरलालांकडून संदेश मिळवला कीं " स्वराज्याची लढाई आतां सर्वत्र सुरू होईल, तेव्हां त्यासाठीं करावयाच्या त्यागाला तयार व्हा " सातारा, कराड, लिंब, वाई, येथं सुभाषचंद्र खणखणले, " या वेळचा शांतिसंग्राम अत्यंत घनघोर असा होणार आहे. तरी त्यामध्यें तरुणस्त्रीपुरुषांनीं भाग घेऊन वटहुकूम म्हणजे नौकरशाहीनें आपल्या हातांनीं आपल्याला गाडून घेण्याचा खड्डा तयार करण्याचें साधन होत, असें सरकारला दाखवून दिलें पाहिजे. योग्य किंमत दिल्याशिवाय स्वातंत्र्य प्राप्त होणार नाहीं. "

असो. जिल्ह्यांतील ताकारी स्टेशनवरील आपल्या स्वागतांतील उत्साहाचें जवाहरलालांना जसें कौतुक वाटलें, तसेंच आपल्या सातारा जिल्ह्यांतील दौऱ्याचें स्मरण पुढें तुरुंगांतही सुभाषबाबूंना वरचेवर होई.

दुसऱ्या गोलमेज परिषदेहून परत येणाऱ्या महात्माजींना भेटावयास येत असतां जवाहरलालांना अटक झाली. तेव्हां बंगाल, संयुक्तप्रांत व वायव्यसरहद्द येथील बाबींबद्दल महात्माजींनीं व्हाइसरॉयसाहेबांना मुलाखती मागितल्या, पण त्यांना सफा नकार मिळाला. सदर गोष्टींबद्दल एक शब्द बोलावयाला व्हाइसरॉयसाहेब तयार नाहींत, असें पाहिल्यावर तो राष्ट्रीयसभाभक्तांच्या स्वाभिमानाला डंख होता आणि म्हणून तें आव्हान स्वीकारून कायदे-भंगाची चळवळ जाहीर झाली.

नौकरशाही १९३० च्या चळवळीमुळें झालेल्या गांधीं-

इर्विन-करारानें चिडली होती, कारण दिल्लीच्या त्या करारांत राष्ट्रीयसभेला हिंदुस्थान सरकारइतकें महत्त्व आहे, ही अप्रत्यक्ष कबूली होती. तेव्हां ती कबूली हाणून पाडण्या-कारतां, १९३२ सालीं कायदेभंगाची चळवळ राष्ट्रीयसभेवर नौकरशाहीनें लादली. या वेळीं नौकरशाही आपल्या फर्मान-शाहीच्या काळ्या कायद्यानिशी अगाऊच सज्ज होती. लोकांनींही पण तितकीच तत्परता दाखविली. १९३१ डिसेंबरांत विलेपार्लें येथें हिंदसेवादलाचें जें शिक्षणशिबिर होतें, त्यांत शिक्षण घेऊन आलेल्या सातारा जिल्ह्यांतील तरुणांना कर्तव्याची जाणीव स्वस्थ बसूं देईना. जानेवारी १९३२ चे आरंभीं कांग्रेस-कमेट्या संपुष्टांत आणण्यांत आल्या.सर्वाधिकाऱ्यांव्यतिरिक्त त्यांचें अस्तित्व आवरण्यांत आलें. ता. ४ जानेवारी १९३२ रोजीं महात्माजींच्या अटकेचे निषेधार्थ सातारा, कऱ्हाड, वाई, सांगली, मिरज, कोल्हापूर येथें कडक हरताळ पडले आणि सायंकाळच्या सभांतून " बोलायाच्या नोहे स्वातंत्र्याच्या गोष्टी । वीरप्राणज्योती मालविती ॥ " असें सांगण्यांत आलं.

ता. ७ जानेवारी १९३२ रोजीं सातारचे सोमण, परचुरे, नाथ घाणेकर, डॉ. आठल्ये; कऱ्हाडचे गणपतराव व आप्पासाहेब आळतेकर, पांडु अण्णा शिराळकर; तासगांवचे आबासाहेब जोग; वाईचे भय्याशास्त्री वाटवे, फार काय मसूरचे विनायक महाराज यांना डेटेन्यू म्हणून येरवड्यास लांबविण्यात आले; आणि सगळ्या तालुका कांग्रेस कमेट्या, जिल्हा कांग्रेस कमेटी, हिंदुस्थांनी सेवादल यांच्या बरोबर सातारचे टिळक राष्ट्रीय विद्यालय, इस्लामपूरचे पिकेटिंग मंडळ, सातारचा ग्रामसेवासंघ, लाठी शिक्षण वर्ग, एकसळचा

शेतकरी संघ, तासगांवची गजानन व्यायाम शाळा, भरील मसूरचा ब्रह्मचर्याश्रमसुद्धां बेकायदेशीर संस्था ठरविण्यांत आल्या. त्यासरसा या धोरणाला विरोध करण्याला सुरवात झाली. सोमण वगैरेना पकडल्याबरोबर सरकारच्या निषेधाची सभा वाड्यापुढें सातारा जिल्ह्याचे पहिले सर्वाधिकारी म्हणून करून नाथ घाणेकर घरीं गेले तोंच सकाळीं ८ वाजतांच म्हणजे सोमणांच्या मागून तासाभरानें नाथ घाणेकर डेटेन्यू म्हणून पकडले होते. पुढें सातारा जिल्हा कांग्रेस कमेटीचे सर्वाधिकारी साखवळकर आणि महाराष्ट्र युवक संघाच्या सर्वाधिकारी यमूताई केतकर यांनीं दौरे काढले. पहिले व्याख्यानें देत सांगलीपर्यंत गेले तर दुसऱ्या सोलापूर करून कऱ्हाडपर्यंत आल्या. तेव्हां सभा, राष्ट्रीय निशाण, "वन्देमातरम्" ही आराळा कांहीं कीं कांहीं राष्ट्रीय सभेचे सार्वजनिक प्रदर्शन होऊन द्यावयाचें नाहीं; अशा पोलादी निश्चयानें नोकरशाही वागूं लागली आणि तसेंच जनतेचें उत्तर येऊं लागलें.

"वाई, कऱ्हाड, सातारा, तासगांव, वाळवे, येथील कांग्रेस कमेट्यांचें डिक्टेटर सारखे चळवळ करीत होते. या सबंधांत सरसाल अखेर जिल्हा कांग्रेस कमेटीचे ४८ सर्वाधिकारी झाले, आणि तालुका निहाय निरनिराळे झालेच. पैकीं एप्रिल १९३२ नंतर एकंदर चळवळ कमी झाल्यावरही कऱ्हाडनें व विशेषतां वाईनें २४ सर्वाधिकारी दऊन ती परंपरा जिल्हा कांग्रेसकमेटीच्या इतकीच शेवटपर्यंत निष्ठेनें चालूं ठेवली. जिल्हा सर्वाधिकाऱ्यां-मध्यें सांगलीच्या कृष्णाताई कुलकर्णी, तांबव्याच्या कासाबाई

परटीण व मसूरच्या पार्वतीबाई काटकर यांच्या सारख्या स्त्रियाही होत्या. त्यांतही विशेष म्हणजे पार्वतीबाई काटकर सर्वाधिकारी झाल्या त्यावेळीं अवघडलेल्या होत्या आणि अर्थातच तुरुंगांत बाळंत झाल्या.

१९३२ चे दुसऱ्या वटहुकमाच्या ४ थ्या कलमाप्रमाणें सोमवार ता. १८ जानेवारी पासून "कांग्रेसच्या चळवळीशीं कसलाही संबंध न ठेवण्याच्या आणि पोलीसठाण्यावर आठवड्यांतून अगर दिवसांतून एकदां हजेरी देण्याच्या" नोटीसा लागण्यास सुरवात झाली. नोटिसांचें सत्र पुढें दोन महिन्यांनीं डेटेन्यू सुटून आल्यावर त्यांना, अगर सर्वाधिकारी या नात्यानें किंवा केवळ कांग्रेसच्या सभेचे श्रोते म्हणून शिक्षा झालेले लोक पहिल्या शिक्षा भोगून आल्यावर त्यांना सतावून सोडीतच होते. अशा तऱ्हेनें जिल्ह्यांत सुमारें ८०।८५ नोटीसा लागल्याचा अंदाज लागतो. राष्ट्रीयसभेच्या इज्जतीसाठीं हजेरीच्या, स्थलबद्धतेच्या वा मुस्कटदाबीच्या त्या नोटीसांना चिठोऱ्याची किंमत देऊन कित्येकांनीं एकदम बंदीवास पतकरला, तर त्या नोटीसांचें वैयर्थ्य अधिकाऱ्यांच्या नजरेस आणूनही उपयोग होत नाहीं असें पाहून दुसऱ्या कांहींनीं बंदीवास स्वीकारला.

या शिवायही, झेंडावंदन, स्वातंत्र्यदिनादि नेहमींचे कार्यक्रमही या काळांत सातारा जिल्ह्यानें केलें. मसूर येथें १९३२ ता. ४ फेब्रुवारीस जंगल-सत्याग्रहाची पकडापकड झाल्यावर सरकारानीं झेंडा काढला, पण सतत दोन महिने पोलिस झेंडा उपटून टाकीत तर नवा झेंडा तेथें येऊन फडके. झेंड्याप्रमाणेंच सातारा जिल्ह्यानें कांग्रेसबुलेटिनें काढलीं, जिल्हाभर वाटलीं पण त्यांच्या उत्पादकांचा पत्ताही नौकर-

शाहीस लागला नाहीं. मसूरास गुलामसभा पोलिसांच्या कडक-बंदोबस्तांत चालू असतां गोटाखिंडीचे नारायण जोशी यांनीं गांधींचा जयजयकार करून कांग्रेस बुलेटिन्स सभेंत उधळ-ळींच पण मसूरास त्यादिवशीं काळी निशाणेंही जिकडे तिकडे फडकत होती. ३१ जुलै रोजीं सातारच्या गांधीमैदानांत मराठ्याचे सम्पादक शंकरराव आगाशे यांच्या अध्यक्षतेंखालीं महाजनीशास्त्रींनीं स्वागताध्यक्ष होऊन जिल्हासभा केली आणि बंडोपंत कुलकर्णी, बेंद्रे, श्रोती, पवार, सांगलीचे सांवत अशी जिल्ह्यांतील प्रतिनिधी मण्डळीही हजर होतीं. नेहमींच्या मानानें हीं जिल्हा सभा अत्यंत तोटकी वाटेल, पण उघड्या मैदानांत नौकरशाहीच्या डोळ्यांदेखत जिल्हासभा पार पडली हेंच तिचें महत्व व कौतुक. याच सालीं दिल्लीस भरलेल्या अशाच स्वरुपाच्या कांग्रेसमध्येंही थेट काशीनाथराव देशमुख, लक्ष्मराव गाडगीळ, गणपतराव बेंद्रे वगैरे सातारचे प्रतिनिधी प्रत्यक्ष कार्यक्रमाला हजर होतेच.

आगष्ट ३१ तारखेस सातारला गव्हर्नर साहेबांचें आगमन झालें त्यावेळीं त्यांना १९३० प्रमाणें काळीं निशाणें स्वागतार्थ दिसलीं नाहींत खरीं; पण गव्हर्नर साहेबांच्या मोटारी पुढें मोहिते छत्रीला काळ निशाण व अंगावर काळी घोंगडी फडकावून गर्दींतून आडवे पडले आणि त्यांच्या पाठिमागील स्फूर्ति म्हणून आत्माराम पाटील, नाना पाटील, हिंगमिरे यांना येरवड्याच्या यात्रा घडल्याच.

मद्यपान निरोधन, परदेशी कापड बहिष्कार या बाबत अटका होण्याचें काम वर्षअखेर चाललेंच होतें " पण जंगल


सत्याग्रहाबाबत नौकरशाहीची तारांबळ झाली." निगडी, अंतवडी, चरेगांव, किवळ, तांबवे, उरूल, पाडली येथें जंगल सत्याग्रह ता. ४ फेब्रुवारी रोजीं करण्याबद्दल नोटिसा दिल्या होत्या पण त्यापूर्वी ता. २४ जानेवारीपासून पोलीस व सत्याग्रही व्याख्याते यांची गांवोगांव सारखी नाठाशिवणी चाललीच होती. ता. ४ फेब्रुवारी रोजीं काशिनाथराव देशमुखांच्या तांबव्यावरच प्रथम पालास पलटणीनें मोर्चा वळविला. आणि अशी जंगलें तपाशीत व निराश होत मसुरला आले तो निगडीला जंगल सत्याग्रह केलेले महाराष्ट्र युवकसंघाचे सर्वाधिकारी कोळसे व सातारा जिल्हा कांग्रेस कमेटीचे सर्वाधिकारी गरूड वगैरे स्वयंसेवकांची मिरवणूक चालली होती.

सातारा जिल्हा आस्तेकदम आपला कर्तव्याचा वाटा शक्य त्या नेटानें उचलत असतांनाच कऱ्हाडचा २० वा सर्वाधिकारी लक्ष्मण गणेश जोशी हा येरवड्याच्या तुरुंगांत १९३२ च्या सप्टेंबर २९ ला स्वर्गवासी झाला. १९३० सालीं भेडसगांवचे शंकर नारायण देवरूखकर व सांगलीचे शंकर नारायण जोशी हे जसे तुरुंगाच्या हालअपेष्टांनीं वारले तसेच १९३२ च्या तुरुंगातूनच कऱ्हाडचे बाबुराव गोपाळ कुष्टे बळी पडले. असो. ऐन चळवळीच्या भरांत पुण्याची कांहीं माणसें साताऱ्यांत व साताराचीं कांहीं माणसें पुण्यास कायदेभंगाचा कार्यक्रम करून शिक्षा पावलींच.

शिवाय कुलाबा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काशिनाथराव देशमुख व चिरनेर स्मारक पुनर्रचना सत्याग्रही म्हणून पांडुरंग तात्या पाटील व गोविंदराव पाटील या तांबव्याच्या मंडळींनीं कामगिरी केली.

असा क्रम चालला असतां १९३३ च्या जुलमध्यें पुण्यास कॉंग्रेसचे सर्वाधिकारी माधवरावजी अणे यांनीं पुढारी-परिषद भरवली. तिला डॉ. आठल्ये, दादासाहेब करंदीकर, आप्पासाहेब आळतेकर, गोसावी, शिराळकर अशी जिल्ह्यांतील मंडळी हजर होतीं. त्या पुढारी-परिषदेनें सामुदायिक कायदे-भंग बंद केला. तरी "व्हाइट-पेपरवर" कऱ्हाडास व्याख्यान द्यावयास ता. १२ जानेवारी १९३४ रोजीं आलेले देवगिरीकर व तळेगांवकर कायदे-भंगाला उत्तेजन देतात म्हणून नौकरशाहीनें तुरुंगात खेचलेच. त्याच्याही पुढें १९३४ च्या एप्रिलमध्यें कायदेभंगाची चळवळ बेमुदत थांबविल्याचें महात्माजींनीं जाहीर करूनसुद्धां कीर्तनकार डॉ. पटवर्धनांना चाफळहून पकडून आणून नौकरशाहीनें वाई येथें स्थलबद्ध करून ठेवले. जून १९३४ पर्यंत नौकरशाहीचा हा खेळ चालला असला तरी आगष्टमध्येंच कांग्रेससंस्थांचा बेकायदेशीरपणा उठून पुनर्घटनेला सुरवात झाली.

---



मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. ......... नं. .........
ता. .........

## प्रकरण १७ वें

# पाठीमागील जपणूक.

१९३०-३४ चा शांतिसंग्राम ज्याकरितां झाला ती लोकशाही आणि स्वातंत्र्य यांच्यासंबंधीं राष्ट्रीयसभेच्या म्हणून विशिष्ट कल्पना आहेत आणि त्या म्हणजे सर्वधर्मांचे, सर्व पंथाचे व सर्व जातीचे लोक बंधुभावानें वागून त्यांच्या प्रतिनिधींनीं लोकसंमतीनें व लोकांच्या हिताकरितां कारभार करावयाचा आणि करवून घ्यावयाचा. आणि हें सर्व बाहेरील कोणत्याही देशाच्या दडपणाव्यतिरिक्त चालावयाचे. हा भाव व्यक्त करण्याकरितां राष्ट्रीयसभेनें एक निशाण तयार केलें आहे. कारण काळाच्या धावेबरोबर स्वराज्याची व्यक्तिनिष्ठ कल्पना जाऊन लोकनिष्ठ कल्पना झाली तरी तें राज्य " देवाचें व धर्माचें " पाहिजे ही कल्पना जशी कायम तशीच निशाणाच्या बाबतींत तत्त्वनिष्ठाही कायमच. अर्थात हा निशाणाचा अभिमान जागृत ठेवावा म्हणून १९२९ सालीं दर महिन्याच्या शेवटच्या रविवारीं झेंडावंदनाचा कार्यक्रम करण्याबद्दल राष्ट्रीयसभेन फर्मावलें. याप्रमाणें ता. ३० जून रोजीं म्हसवड येथें आणि आप्पासाहेब आळतेकर यांचे अध्यक्षतेखालीं खटाव येथें बाबूराव इनामदार व दत्तोपंत मळेकर यांनीं केलेलें झेंडावंदन स्फूर्तिदायक झालें.

ज्या १९२९ च्या राष्ट्रीयसभेनें स्वातंत्र्याचा ठराव संमत केला, त्या राष्ट्रीयसभेच्या तारखास म्हणजे २७।२८।२९

डिसेंबर रोजीं राष्ट्रीयसभेचा उत्सव सातारा जिल्ह्यांत सातारा, इसलामपूर, वाई, तासगांव, कऱ्हाड, कुंभारगांव, कोळेवाडी, कोळें येथें उल्हासाचा झाला. कऱ्हाड तालुक्यांत तेवढ्यासाठीं शिराळकर, आबा धोपाटे, गणपतराव आळतेकर, बाबूराव गोखले,लक्ष्मणराव डोईफोडे, कोल्हापुरे असे फिरले.

यावेळीं म्हसवड भागांत कान्हेरे आणि तारळे भागांत साताऱ्च्या खादीभांडाराचे गोवेकर राष्ट्रीयसभेचा प्रचार करीत होते. इतक्यांत राष्ट्रीयसभेचा हुकूम आला कीं, " पूर्ण स्वराज्य दिन " म्हणून ता. २६ जानेवारी हा दिवस पाळावा. तसा तो कोरेगांव, खटाव, कुरोली, खातगूण, बुध, कोल्हापूर, सांगली ( कूपवाडमाळ ) आंबवडें, वडगांव, दुधगांव, अष्टें, इसलामपूर, बागणी, पेठ, शिराळे, आणि विशेष म्हणजे म्हसवड येथें नारायणशास्त्री, मराठे, सातारा येथें नाथ घाणेकरांचें अध्यक्षतेखालीं डॉ. आठल्ये, औंधास पं. सातवळेकर, कासेगांवास लक्ष्मणराव कुलकर्णी, तासगांवीं पोक्षे व मोघे, कोळयास डोईफोडे व कऱ्हाड येथें आप्पासाहेब आळतेकर, आबा धोपाटे आणि मारूलकर वकील यांनीं मोठ्या दमदारीनें साजरा केला.

महत्त्वाकांक्षेची झेप घेणाऱ्या तरुणांच्या कर्तबगारीनें राष्ट्राची प्रगती होत असते. या तरुणांचे पाय समाजांतील दुबळ्या, अज्ञान, बहकलेल्या अगर करून करून भागलेल्यांच्या बुद्धिवादानें ओढूं नयेत म्हणून फार जपावें लागतें. वरील प्रसंगीं दिसलेल्या दमदारीनेंच

१९३० ते ३४ च्या चळवळींत हें जपणुकीचें काम सातारा जिल्ह्यात झालें.

लोकमान्यांची पुण्यतिथि निष्ठेनें साजरी होई; गांधि-जयन्तिनिमित्त सातारा येथें स्वदेशीप्रदर्शन १९३० पासून सुरू करण्यांत येऊन त्या निमित्तानें लोकमान्य पुण्यतिथिप्रमाणेंच अधिकारी स्त्रीपुरुषांचा स्वदेशीस्वराज्यावरील स्फूर्तिदायक व्याख्यानें होत; सरकारी अवकृपेचा काळ वजा केला, तर मासिक झेंडावंदनें सुद्धां कायम राहिलीं. सर्व कांहीं झालें, चाललें.

"लाहोर कांग्रेस व महाराष्ट्र" या विषयावर ता. ४ फेब्रुवारी व १ मार्च १९३० रोजीं गजाननराव केतकर यांनीं तासगांव, म्हसवड, कोरेगांव येथें दिलेलीं व्याख्यानें; अमदाबादेच्या तुरुंगांतून सुटून आलेल्या खाडीलकरांनीं सांगली; लिंब, सातारा, कऱ्हाड येथें सांगितलेलीं स्वराज्याचीं दर्शनें, दांडीकडे मिठाचा सत्याग्रह करण्यासाठीं गेलेल्या महात्माजीना अटक झाल्यावर कासेगांवास लक्ष्मणराव कुलकर्णी व गोपाळ विश्वनाथ देशपांडे, कोळ्यास डोईफोडे, खटावास स. वा. इनामदार, अष्टयास बाबूराव लिमये, वाळव्यास देशिंगकर वैद्य यांनीं सरकारच्या निषेधार्थ भरविलेल्या सभा; ता. १७ जून १९३१ रोजीं सातारा येथें अच्युतराव कोल्हटकरांच्या निधनानिमित्त बाबुराव वैद्य, हकीम, बाबुराव भिडे, सोमण यांचीं झालेलीं भाषणें; ता. २२ ऑगष्ट १९३२ रोजीं तात्यासाहेब केळकरांचा ६१ वा वाढदिवस साजरा झाला; ता. १७ सप्टेंबर शनिवार रोजीं आचरेकर वकिलांचे अध्यक्षतेखालीं सातारा जिल्हा हरिजन संघानें बाबूराव

भिडे. भाऊराव पाटील, पी. के. शिवदास यांच्या भाषणा-नतर " संयुक्त मतदार संघ व राखीव जागांची " मागणी केली; या सर्व गोष्टींनीं ओकझाडाच्या मुळांप्रमाणेंच स्वराज्याची कल्पनाच जनतेच्या मनांत खोल रुजविली.

स्वराज्याच्या तपश्चर्येचा महामंत्र म्हणून स्वदेशी आणि स्वदेशीचें शुद्ध-स्वरूप प्रतीक ' खादी ' असल्याकारणानें त्याप्रीत्यर्थही बराच प्रयत्न झाला. तारीख १६ फेब्रुवारी सन १९३० रोजीं सोमणांचे येथें जिल्ह्यांतील कार्यकर्ते मिळाले आणि काँग्रेसचे ९००० सभासद करण्याचें जसें ठरलें तसेच ५१५ रुपयांचे शेअर काढून खादीच्या पैदाशीसाठीं २५०० रुपयांचें भांडवल उभारावयाचें ठरलें. ता. १७ रोजीं पांचवड ( वाई ) येथें गोसावी व सोमण, तर मेच्या तोंडाशीं सांगली व कऱ्हाड येथें एकटेच सोमण, जूनच्या पहिल्या आठवड्यांत साताऱ्यांत रा. ग. हर्षे व सत्यभामाबाई कुळवेकर आणि विद्यास बापूराव बापट—रायरीकर—रानडे यांच्या सहाय्यानें आप्पा-साहेब आळतेकर, ता. १२ रोजीं कवठें ( वाई ) व ता. १९ जुलै १९३२ रोजीं वाई येथें आनंदीबाई जोगळेकर यांनीं " परदेशी कापड आणि बहिष्कार " यांवर व्याख्यानें दिलीं, व खादीविक्रीही केली.

स्वदेशींतून निर्माण होणारें अर्थातच संपूर्ण - स्वयंपूर्ण स्वावलंबी स्वराज्य जनतेचें जनतेनें संस्थापावयाचें आणि चालवावयाचें असल्याकारणानें तसें वळण लावण्याकरतां " आजन्मसेवकांच्या संस्थे " विषयीं सोमणांचे येथें भरलेल्या ता. १६ फेब्रूवारी १९३० च्या सभेंतच चर्चा झाली होती.

पण पुढें चळवळीचा ओघ लोटला तशी ती विरली आणि विखुरली यांत अकल्पित कांहीं नाहीं. तथापि पोहणारानें भरतीच्या लाटेबरोबर आपण वाहवणार अशी खात्री असतांहि, जसा मोहरा साधून इष्ट किनारा गांठण्याची दृष्टि ठेवावी लागते; त्याचप्रमाणें चळवळीचे आणि सरकारी अंमलदारीचे धक्केचपाटे बसत असतांहि आपल्या ध्येयावरील दृष्टि चळूं न देण्याची समाजाच्या कप्तानांनीं काळजी घ्यावी लागते. वृद्धांचा अनुभव यावेळीं विशेष जोखमीचा असतो. सगळेच शेलारमामा कोंडाणा सर करण्या-इतक्या तकव्याचे नसतात. म्हणून धकवा अगर भपका न करतां त्यांनीं " भले भले " करीत मिळालेल्या तारेवर आणि आलेल्या लाटेवर ताज्या दमाच्या तरुणांकडून योग्य तीच कसरत करवून घ्यावयाची असते. सातारा जिल्ह्यानें हें कर्तव्य पार पाडलें आहे.

मुंबई कायदेमंडळांत " तुकडेपट्टी " चें बिल १९२९ त आल्यापासून सातारा जिल्ह्यांत " लँडलीग्ज " स्थापन झाल्या. ता. ७ सप्टेंबर १९२९ रोजीं खटावास वासुदेवराव इनामदार यांच्या अध्यक्षतेखालीं सोमणांनीं स्थापन केलेला शेतकीसंघ किंवा आगष्ट १९२९ मध्यें वाईचे माधवराव साठे, गोविंदराव वैद्य, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं तात्यासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखालीं शेतकीसंघ भुईंज येथें स्थापला तो, हेच काय ते नेटानें चालले. १९३० च्या एप्रिल महिन्यांत वाईकरांनीं आपल्या कार्याला व्यवस्थित स्वरुप देण्याचा प्रयत्न केला. माधवराव साठे, वैशंपायन वकील ग्रामसंघटनेसाठीं बाहेर पडले; मारुतीशेट कढणे, मामा

आगाशे, केळकर, शंकरराव कान्हेरे यांनीं मद्यपान-निरोधन हातीं धरलें; गोगटे, रानडे, डॉ. महाबळेश्वरकर, डॉ. देशपांडे यांनीं खादीप्रचार पतकरला; गणपतराव वैद्य यांनीं प्रभातफेरी शिरावर घेतली. १९३१ मध्यें गांधी-अर्विन तडजोड झाल्यावर साखवळकरांनीं एकसळ येथें जो शेतकरी सेवासंघ काढला त्याचा दवाखाना उघडण्याचा समारंभ ता. १७ जून रोजीं सोमणांच्या हस्तें झाला. पुढें त्याच सेवाश्रमातर्फे केशवराव पेठकर व रंगनाथ मारुती भोंसले हे खेड्याखेड्यांतून खादीफेरी करूं लागले. ता. २ नोव्हेंबर रोजीं सुपनें येथें आत्माराम पाटलांचे हस्तें बंडोपंत कुलकर्ण्यांनीं खादीभांडार उघडलें. ता. २० डिसेंबर रोजीं वाई-तालुका-शेतकरी-परिषद् केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. त्याचप्रमाणें धोम येथें ९ जानेवारी १९३९ रोजीं आण्णासाहेब लठ्ठे यांचे अध्यक्षतेखालीं त्याच परिषदेचें दुसरें अधिवेशन झालें. सारा व सेस ही ५० टक्के तरी कमी झालीच पाहिजे असें सरकारास बजावणारी ता. १३ जानेवारी १९३४ रोजीं रा. ब. काळे यांचे अध्यक्षते-खालीं सर्वपक्षीय सातारा-जिल्हा-रयतसभा इसलामपुरास भरली. या सर्व प्रसंगीं स्वयंनिर्णयाचें स्वदेशींतून निर्माण होणारें स्वराज्य बहुजनसमाजांत जीवनाशीं एकरूप करण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

१९३२ सालीं ज्यावेळीं मॅक्डोनाल्डसाहेबांनीं आपलें कम्युनल अवार्ड ऊर्फ जातिनिर्णय प्रसिद्ध केला, त्यावेळीं अस्पृश्याकरितां निराळे मतदारसंघ निर्माण करून हिंदुस्तानच्या राजकीय छकलांत भर टाकण्याचा डाव पडला. आपल्या प्राणांतिक उपवासाच्या जोरावर ती अनिष्टापत्ति येरवड्याच्या

तुरुंगांमधून महात्माजींनीं सर्व समाजाच्या मनावर ठसवितांच १९२१ सालापासून ज्या समाजाला सार्वजनिक अशा राजकीय व सामाजिक प्रसंगींच माणुसकीचे हक्क द्यावयास सुरवात झाली होती, त्याला इतर कोणाही इतकेच खाजगी व सार्वजनिक हक्क देऊन त्याला जो आपल्या राजकीय अस्तित्वाचा विश्वास वाटूं लागला आहे त्याचा हिंदी स्वराज्याच्या सेवेला उपयोग झाला पाहिजे, ही जाणीव सर्वत्र पसरली. १९३० च्या चळवळींत तासगांव येथील " चहाचें दुकान " महारांनीं परदेशी बहिष्कारासाठीं बंद केलें तें फिरून सुरूं केलें नाहीं अशी त्या समाजाची निष्ठा लोकांना पटली आणि अशा गोष्टींचा परिणाम म्हणून ता. २० सप्टेंबर १९३२ रोजीं पुष्कळच ठिकाणीं व ओगलेवाडी येथें हरिजनांला मंदिर-प्रवेश मिळाला; ता. १ जानेवारी १९३३ रोजीं कऱ्हाड येथें श्रीकृष्णा घाटावर बटाण्यांच्या अध्यक्षतेखालीं "कवि व वीर राजे बापुसाहेब पाटील" [ मुसलमान ] यांचें " अस्पृश्यता निवारणावर " व्याख्यान झालें. ता. १८ जानेवारीस आण्णासाहेब शिंदे यांचे अध्यक्षतेखालीं वाई तालुका अस्पृश्यता निवारक परिषद झाली. भावे यांचें श्रीशंकराचें देवालय ‘ हरिजनां ’ करितां खुलें झालें. कोळे येथें कऱ्हाड-तालुका हरिजनपरिषद के. आर. इनामदार यांच्या अध्यक्षतेखालीं बापूराव तुकाराम हिवाळे यांनीं ता. ३० जानेवारी रोजीं भरविली; पांडुरंगराव देशपांडे, गोविंदराव जोशी व कांबळेमास्तर हे १९३४ च्या एप्रिल महिन्याचे शेवटल्या आठवड्यांत धोम, आरफळ ओझर्डे, बावधन, एकसळ, बोपर्डी येथील हरिजनवस्तीची पाहणी करीत

आगाशे, केळकर, शंकरराव कान्हेरे यांनीं मद्यपान-निरोधन हातीं धरलें; गोगटे, रानडे, डॉ. महाबळेश्वरकर, डॉ. देशपांडे यांनीं खादीप्रचार पतकरला; गणपतराव वैद्य यांनीं प्रभातफेरी शिरावर घेतली. १९३१ मध्यें गांधी-अर्विन तडजोड झाल्यावर साखवळकरांनीं एकसळ येथें जो शेतकरी सेवासंघ काढला त्याचा दवाखाना उघडण्याचा समारंभ ता. १७ जून रोजीं सोमणांच्या हस्तें झाला. पुढें त्याच सेवाश्रमातर्फें केशवराव पेठकर व रंगनाथ मारुती भोंसले हे खेड्याखेड्यांतून खादीफेरी करूं लागले. ता. २ नोव्हेंबर रोजीं सुपनें येथें आत्माराम पाटलांचे हस्तें बंडोपंत कुलकर्ण्यांनीं खादीभांडार उघडलें. ता. २० डिसेंबर रोजीं वाई-तालुका-शेतकरी-परिषद् केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. त्याचप्रमाणें धोम येथें ९ जानेवारी १९३९ रोजीं आण्णासाहेब लठ्ठे यांचे अध्यक्षतेखालीं त्याच परिषदेचें दुसरें अधिवेशन झालें. सारा व सेस ही ५० टक्के तरी कमी झालीच पाहिजे असें सरकारास बजावणारी ता. १३ जानेवारी १९३४ रोजीं रा. ब. काळे यांचे अध्यक्षते-खालीं सर्वपक्षीय सातारा-जिल्हा-रयतसभा इसलामपुरास भरली. या सर्व प्रसंगीं स्वयंनिर्णयाचें स्वदेशींतून निर्माण होणारें स्वराज्य बहुजनसमाजांत जीवनाशीं एकरूप करण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

१९३२ सालीं ज्यावेळीं मॅक्डोनाल्डसाहेबांनीं आपलें कम्युनल अवार्ड ऊर्फ जातिनिर्णय प्रसिद्ध केला, त्यावेळीं अस्पृश्याकरितां निराळे मतदारसंघ निर्माण करून हिंदुस्तानच्या राजकीय छकलांत भर टाकण्याचा डाव पडला. आपल्या प्राणांतिक उपवासाच्या जोरावर ती अनिष्टापत्ति येरवड्याच्या

तुरुंगांमधून महात्माजींनीं सर्व समाजाच्या मनावर ठसवितांच १९२१ सालापासून ज्या समाजाला सार्वजनिक अशा राजकीय व सामाजिक प्रसंगींच माणुसकीचे हक्क द्यावयास सुरवात झाली होती, त्याला इतर कोणाही इतकेच खाजगी व सार्वजनिक हक्क देऊन त्याला जो आपल्या राजकीय अस्तित्वाचा विश्वास वाटूं लागला आहे त्याचा हिंदी स्वराज्याच्या सेवेला उपयोग झाला पाहिजे, ही जाणीव सर्वत्र पसरली. १९३० च्या चळवळींत तासगांव येथील " चहाचें दुकान " महारांनीं परदेशी बहिष्कारासाठीं बंद केलें तें फिरून सुरूं केलें नाहीं अशी त्या समाजाची निष्ठा लोकांना पटली आणि अशा गोष्टींचा परिणाम म्हणून ता. २० सप्टेंबर १९३२ रोजीं पुष्कळच ठिकाणीं व ओगलेवाडी येथें हरिजनांला मंदिर–प्रवेश मिळाला; ता. १ जानेवारी १९३३ रोजीं कऱ्हाड येथें श्रीकृष्णा घाटावर बटाण्यांच्या अध्यक्षतेखालीं " कवि व वीर राजे बापुसाहेब पाटील" [ मुसलमान ] यांचें " अस्पृश्यता निवारणावर " व्याख्यान झालें. ता. १८ जानेवारीस आण्णासाहेब शिंदे यांचे अध्यक्षतेखालीं वाई तालुका अस्पृश्यता निवारक परिषद झाली. भावे यांचें श्रीशंकराचें देवालय ' हरिजनां ' करितां खुलें झालें. कोळे येथें कऱ्हाड–तालुका हरिजनपरिषद के. आर. इनामदार यांच्या अध्यक्षतेखालीं बापूराव तुकाराम हिवाळे यांनीं ता. ३० जानेवारी रोजीं भरविली; पांडुरंगराव देशपांडे, गोविंदराव जोशी व कांबळेमास्तर हे १९३४ च्या एप्रिल महिन्याचे शेवटल्या आठवड्यांत धोम, आरफळ ओझर्डे, बावधन, एकसळ, बोपर्डी येथील हरिजनवस्तीची पाहणी करीत

हिंडले आणि ता. १४ जून रोजीं साताऱ्यास रा. ब. काळे यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून ठरल्याप्रमाणें जिल्ह्यांत हिंडून तर्कतीर्थांनीं हरिजन-फंडही गोळा केला. याशिवायही असहकाराच्या काळापूर्वीपासूनच नाथ घाणेकर, परचुरेशास्त्री, पांडुअण्णा शिराळकर, नारायणराव कुलकर्णी व माधवराव साठे हरिजनांची सेवा करीत राहिले आहेत.

अशा प्रकारें लोकशाही स्वराज्याची जी कल्पना फक्त सुशिक्षितांतच पन्नास वर्षांपूर्वी वावरत होती, तिला आडाण्यांतल्या अडाण्यांत रुजवून त्यांना त्या कल्पनेशीं एकजीवानें समरस करण्याचा हा पिछाडीचा प्रयत्न चालू असतां, १९३० तें १९३४ पर्यंत आघाडीवर स्वदेशी स्वराज्याशीं समरूप झालेला समाज कसा शांतिसंग्राम करीत होता, तें मागें सांगितलेंच आहे.

त्यावरून दिसून येईल कीं अनत्याचार-व्रताच्या सांगतेकरतां प्रत्येक प्रसंगीं म्हणजे शांतिसंग्रामांतील चढावाच्या आणि बचावाच्या वेळीं प्रत्येकानें डोळ्यांत तेल घालून जपलें आहे. १८९३ च्या वाळवें येथील छोट्या कांग्रेसमध्यें ह्यूमसाहेबांनीं कांग्रेसवर निष्ठा ठेवून वागल्यास शेतकऱ्यांचें कल्याण होईल असें सांगितलें होतें. १९३०-३४ च्या संग्रामांत सातारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसुद्धां सर्वांनीं कांग्रेसच्या नांवाकरतां सतीचें व्रत घेतलें होतें. तेव्हां त्यांच्या सुखी संसाराचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी आतां राष्ट्रीयसभेनें घेऊन आपला कार्यक्रम करावयास पाहिजे. ज्या राजकीय तत्त्वज्ञानानें किंवा स्वराज्यानें सुखी संसाराचा प्रश्न सुटून राजकीय हक्क गाजवतां येतील तेंच तत्त्वज्ञान वा स्वराज्य उपयोगाचें,

ही जाणीव पुरेपूर पटली असल्याकारणानें, राष्ट्रीय सभेनें जो ग्रामोद्धाराचा कार्यक्रम हातीं घेतला आहे तो सातारा जिल्ह्यांतही सुरू झाला आहे. नेमीनाथ अण्णा कत्थे यांनीं नाठवड्यास १९३५ च्या ९ जानेवारी पासून ग्रामोन्नति कार्यालय काढलें असून ते त्याला वाहिलेले आहेत. सातारा जिल्ह्यांतील कर्त्या तरुणांचा जो समाजसत्तावादाकडे कल झुकलेला आढळतो, तो, स्वावलंबी, स्वदेशी, स्वयंपूर्ण आणि सामान्यांसुद्धां सर्वांच्या पुष्टीतुष्टीचें स्वराज्य हिंदुस्थानला मिळावें, ही अंतरीं आंच असल्याचाच परिणाम आहे.

स्वावलंबी स्वयंपूर्णतेकडे लक्ष लागणें ही १९३०-३४ च्या शांतिसंग्रामानें दिलेली बोधसंजीवनी असेल ! पण फर्मानी कायद्यांनीं चेचलेल्या जनतेचा तो मानासिक पीळ आजच्या जाहिरातीच्या जगांत काय होय ? तेव्हां काळ्या कायद्यांनीं नोकरशाहीनें कांहीं आभास उत्पन्न केला असला तरी जनता राष्ट्रीयसभेची हें सातारा जिल्ह्यानें रोखठोक सरकारी मापानें दाखवून दिलें आहे. मुंबई सरकारांत कूपर समाविष्ट झाल्यावर, त्यांच्या जागेकरितां जी पोटनिवडणूक ४ आगष्ट १९३४ रोजीं मुंबई कौन्सिलकरतां झाली, तींत कांग्रेसचे उमेदवार भाऊसाहेब सोमण विरोधी उमेदवारापेक्षां ३००० मतें जादा मिळवून निवडून आले. आणि १४ नोव्हेंबर १९३४ ला असेंब्लीची निवडणूक झाली, तींत कांग्रेसचे उमेदवार जेधे-गाडगीळ यशस्वी झाले. त्यांना सातारा जिल्ह्यानें प्रचंड बहुमत देऊन आपलें कर्तव्य केलें.

अशा तऱ्हेनें राष्ट्रीयसभेवर निरतिशय प्रेम करणाऱ्या

सातारा जिल्ह्यांत राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष येण्याचा योग खेड्यानिहाय तरी १९३५ पूर्वी आलाच नव्हता. तो योग सौजन्यमूर्ति राजेंद्रप्रसाद राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष होतांच आला. ता. १४ मे पासून दोन दिवस सातारा जिल्ह्यांत राजेंद्रबाबू हिंडले, तेव्हां "संत येती घरा तोचि दिवाळीदसरा" असा निरुपम सोहळा सातारा जिल्ह्यांत झाला. १९३०-३४ चे शांतिसंग्रामांत भाग घेतलेल्या सत्याग्रह्यांना खेड्यापाड्यांतून राष्ट्रीयसभेचा अध्यक्ष राष्ट्रीय संदेश सांगत हिंडतांना पाहून जो आनंद झाला व जिल्ह्यानेंही आपण राष्ट्रीयसभेविषयीं कसे निष्ठ आहोंत हें जें दाखविलें त्याची आणखी थोडीशी कल्पना अशी:—

आर्थिक हलाखीच्या परिस्थितींत कांग्रेसच्या कार्या-करतां १७६७८१२ ची थैली जिल्ह्यानें राजेंद्रांना अर्पण केली. ४२३ मैलाच्या प्रवासांत पांच मिनिटांचीही खोटी न करतां जिल्ह्यानें इतक्या आपुलकीनें स्वागत केलें कीं "राजा प्रजा-नुरंजनात्" हें वचन सार्थ वाटलें. कोल्हापूर, उंब्रज, सातारा येथें नागरिकांतर्फे, इसलामपूर वाई येथें म्युनिसिपालिट्यांतर्फे, वडूजेस तालुकालोकलबोर्डतर्फे, रेठरेंहरणाक्ष येथें को ऑ. क्रेडिटसोसायटीतर्फे आणि साताऱ्यास नामदेव व हरिजन-समाजातर्फे राजेंद्राना मानपत्रें अर्पण करण्यांत आलीं; संस्था-नच्या राजधानीस शोभेल असें कोल्हापूरचें स्वागत, बोरगांवच्या चार हजार शेतकऱ्यांची शिस्त, वाळव्याच्या छोट्या कांग्रेसची आठवण देणारा तांबड्याचा थाट, खातगूण येथील खादीभांडाराचें उद्घाटन, कातरखटावचा नैसर्गिक साधेपणा आणि साताऱ्याची खानदानी गंभीरता, हें राजेंद्रांच्या आदर-

प्रदर्शनांतील विशेष म्हणून नमूद करण्यासारखे होतें. तेव्हां कोल्हापूर, बोरगांव, इसलामपूर, रेठरेंहरणाक्ष, कऱ्हाड, तांबवें, मसूर, उंब्रज, वाई, सातारा कोरेगांव, पुसेगांव, बुध, खातगुण, खटाव, वडूज, कातरखटाव, म्हसवड येथें सभांमध्यें व कामेरी, विहें, इंदोली, माहुली येथें नुसतेच संदेश देतांना हजारोंहजार लोकांना राजेंद्रांनीं हद्दत सांगितलें तें हें कीं–" महाराष्ट्रांतील भारतभूमीच्या कणाकणांतून ऐतिहासिक तत्त्वें व संघटना भरली आहे. लोकमान्य व देशपूज्य गोखले यांच्या महाराष्ट्रांत स्वराज्यप्राप्तीच्या मार्गासंबंधींचा उपदेश करण्याची जरूर आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. मी या दौऱ्या-निमित्त खेड्यापाड्यांतून व जंगलांतून हिंडलों तेव्हां स्वराज्यप्रेमी बंधुभागिनींनीं माझा सन्मान केला. यावरून हिंदुस्थानच्या कोनाकोपरांतील गांवांतून स्वराज्य मिळविण्याबद्दलची भावना उत्पन्न झाली आहे हें दिसून येत आहे. कांग्रेसनें स्वराज्याचें स्वरूपही निश्चित केलें आहे. प्रत्येकास अन्नवस्त्र व घर मिळणें असें त्याचें स्वरुप आहे. हें स्वराज्य समतेचें आहे व त्यासाठीं एकतेची अत्यंत अवश्यकता आहे. त्याखेरीज स्वराज्य मिळणार नाहीं व मिळालें तरीही टिकणार नाहीं. स्वार्थ व स्वदेशार्थ एकच समजून भारतांत आलेल्या इंग्रजांनीं इंग्लंडला स्वराज्य मिळवून दिलें आणि आपणही जर स्वार्थ व स्वदेशार्थ एकच समजूं, त्यांत भेदभाव करणार नाहीं तर स्वराज्य खास दूर नाहीं. या देशांतील लोकांचें बुद्धिबलही भरपूर आहे. आमच्या तरुणांनीं परभाषांतून विद्या संपादन करून विदेशीय विद्यार्थ्यांच्यावरही मात केली आहे. महायुद्धाचे वेळीं हिन्दी सैन्यानें अपूर्व

युद्धनैपुण्य दाखवून जगाकडून वाहावा मिळविली आहे. बुद्धिचातुर्यही विपुल आहे. निरनिराळ्या खेळांत क्रीडाप्राविण्य दाखवून जगांत उच्च तऱ्हेची खेळाडू वृत्तीहि दर्शविली आहे. आमच्या देशांतील मजूर बरोबरीनें यशस्वी व चढाऊ वृत्तीनें काम करतात म्हणून इतर देशांतील लोक त्यांना हाकलून देतात. व्यापारांत सुद्धां आमचे देशबांधव सरस असून व्यवहारचातुर्यावर ते यशस्वी झाले आहेत. एकंदर हा देश ईश्वरानें सुसंपन्न व सुंदर बनविला आहे परंतु परिस्थितीमुळें, जगाच्या दृष्टीनें हा देश पतित ठरून जग त्याकडे बेपर्वाईनें व तिरास्कारबुद्धीनें बघत आहे. याचें कारण काय ? या देशाला स्वातंत्र्य नाहीं, स्वराज्य नाहीं !

---



# जागृत सातारा.

भाग २ रा

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.
ता.

## प्रकरण १ लें.

## राजकारणीं वृत्तपत्रें.

ब्रिटिश रियासतीबरोबर पाश्चात्य संस्कृती, संस्कृती-बरोबर तिचीं उपकरणें आणि उपकरणांबरोबर तीं वापरावयाची विद्या हिंदुस्थानांत मूळ धरून बसली. वृत्तपत्रांचा संसार हा एक त्यांतील भाग असून लोकशिक्षण, लोकमत प्रदर्शन आणि सार्वजनिक जीवनाची दैनंदिनी या दृष्टीनें वृत्तपत्रें ह्मणजे आजकाल एक शस्त्रशक्ति किंवा सत्तादंड होऊन बसलीं आहेत. सातारा जिल्ह्याला वृत्तपत्रांनीं काय राष्ट्रीय वळण लावलें तें पाहिलें ह्मणजे जिल्ह्यांतील लोकशक्तीची चिकित्सा ज्याची त्यास करतां येईल.

सातारचें राज्य खालसा झाल्यावर आणि १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध पार शमत आल्यावर ता. १० डिसेंबर १८५८ रोजीं सातारा जिल्ह्याचें पहिलें वृत्तपत्र निघालें त्याचें नांव शुभसूचक. नांवाभोंवतीं बाण लावलेलें धनुष्य काढून संपादक

रामचंद्रपंत चितळ्यांनीं शुभसूचक काय व कसें कार्य करूं इच्छितों; हें दाखविलें. कदाचित् ' रामराज्याला ' तशी तयारी हवीही असेल. त्याच्या पूर्वींही " बोधामृत " नांवाचें एक पत्र होतें ह्मणतात. कांहीं असलें तरी १८९५ पर्यंत तरी शुभसूचक हें सातारा जिल्ह्याचें निर्विवाद प्रातिनिधिक पत्र राहिलें यांत शंकाच नाहीं. पुढें तेंच काम इसलामपूर व सातारा या दोनही ठिकाणीं प्रसिद्ध होणाऱ्या कशाळकर–मुंडल्यांच्या "प्रतोद" नें व फणसळकरांच्या "प्रेक्षक" नें केलें. १९०६ च्या अखेरीपासून भाऊसाहेब सोमणांच्या " प्रकाशा " नें ती धुरा १९२४ पर्यंत खांद्यावर घेतली. यापुढें भिडे–गोडशांचा ' प्रकाश ' व वाग्भट देशपांड्यांचें ' ऐक्य ' यांनीं १९३० पर्यंत तर ऐक्य, आणि समर्थ, भारतमाता, व श्रीशाहू या चतुष्टयानें आजचा सातारा जिल्हा प्रतिबिंबित झाला आहे.

१८५८ च्या शुभसूचक पासून १९३४ ला निघालेल्या हंसापर्यंत अनेक वर्तमानपत्रें सातारा जिल्ह्यांत निघालीं. साताऱ्यास १८७२ च्या जुलैंत बोधसुधाकर, १८८१ त महाराष्ट्रमित्र, १८९९ मध्यें श्रीशाहू, १८९९ चे २४ आक्टोबराला प्रेक्षक, १९०६ त प्रकाश, १९०८ त प्रतोद, ( सातारा ) १९२३ त ऐक्य, १९२६ मध्यें समर्थ, आणि १९३४ त हंस; वाईला १८८५ त वृत्तसार व १८९० चे ७ आगष्ट रोजीं भाऊशास्त्री लेले यांचें मोदवृत्त; कऱ्हाड येथें १८८४ त

विदूषक, १८८७ त चित्रगुप्त, आणि १८९६ त सुमंत व १९२४ सालीं कळंबे यांचे "कैवारी" व १९२८ मध्यें अभ्युदय; विटे येथें १८९४ त "विटावृत्त," तासगांव येथें १८८१ मध्यें विनायकराव कौलगीकरांचा "चंडांशु" व सदाशिवशास्त्री भिड्यांचा "आर्यभानु," इसलामपूर येथें १८८३ ला प्रतोद, १९१० त भारतमाता, १९२७ त सातारा, अशी कितीतरी वृत्तपत्रें राजकीय गोष्टींचा खल करणारी अशीं उत्पन्न झालीं. शिवाय कऱ्हाडास पंचानन, व १८९० पासून सुमारें दोन तपें वृत्तसुधा व महाराष्ट्रवृत्त हीं दोन पत्रें साताऱ्यास चालू होतीं. १९२० सालानंतर तासगांव येथें कांहीं दिवस व सातारा येथें कांहीं दिवस सत्यप्रकाश आणि कांहीं दिवस सातारा-विजय, आणि इसलामपुरास भारत-विजय अशीं हीं पत्रें निघत असत.

काँग्रेसच्या राजकीय धोरणाविरुद्ध सामान्यत: कोणत्याच पत्रानें आपली दिशा आखली नाहीं. मग चितळ्यांच्या शुभसूचक सारखें एकादें कांग्रेसला सत्तावीस वर्षांनी वडील, वैद्यांच्या वृत्तसारासारखें बरोबरीचे अगर वाग्भट देशपांड्यांच्या ऐक्यासारखें अगदीं लहान, कसलेंही पत्र असो.

अगोदर १९०६ च्या राष्ट्रीय सभेपासून, आणि विशेषत: सुरतेच्या राष्ट्रीय सभेंतील बखेड्यानंतर, मतमतांतराच्या हातोडीनें राष्ट्रीयसभेच्या राजकीय धोरणाला धक्का बसला, तसा

तो सातान्यांत बसावयाचा! पण एका टोंकाला जाणें, तरवारी-च्या धारेवर नाचणें, ज्वलज्जहालपणा करणें, हें बियाणेंच साताऱ्च्या थंड स्वभावभूमींत रुजत नसल्याकारणानें वृतपत्रांच्या संसारांतूनही तें आढळलें नाहीं, तर नवल नाही. लोकांच्या लायकीप्रमाणें त्यांची राज्यपद्धती असते अशी एक ह्मण आहे. पण लोक तसा प्रत्येक गोष्टीचाच झोक असतो, आणि दुरति-क्रम स्वभाव वृत्तपत्रावर तरी कसा बहिष्कार टाकील? अर्थात् फटकविला तर चमक देणारा पण वरून अगदीं थंड अशा चकमकीच्या धोंड्यासारखा सातारा जिल्ह्याचा स्वभाव सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या बेसुरानंतरही वृत्तपत्रांतून एकसारखा ओघ राखून राहिला. वासुदेवरावजी मुंडल्यांच्या प्रतोदनें 'यद्यदा-चरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः' या न्यायानें जनता जहाल होण्याकरतां पुढाऱ्यांनीं व लोकमताला वळण लावणाऱ्या पत्रांनी प्रथम जहाल अगदीं लवंग्या मिरचीसारखें झालें पाहिजे ह्मणून जंग जंग पछाडले; पण उपयोग झाला नाही. दैववशात् १९०६ पासून १९२४ पर्यंत सातारा जिल्ह्याचे लोकमत-निदर्शक व लोकमत प्रवर्तक होऊन राहण्याचें ज्यांच्या वाट्यास आलें त्या सोमणांच्या 'प्रकाश' पत्रानें १९०६ सालीं स्वदेशी, स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार यांनीं चेतविलेला अग्नि विझू दिला नाहीं, तर वेळेला थोडा फार फुलविलाच; पण प्रतोदच्या अपेक्षेप्रमाणें चेतविला नाहीं, हेंहि तितकेंच खरें

आहे. अगदीं तोच नमुना पुढें ऐक्याच्या व हंसाच्या बाबतींत आढळून येतो. १९२१ सालच्या असहकारातील बहिष्कार-सत्राचा मार्ग हा एकांगी आणि आत्मघातकी असा वाटल्यामुळें विशेषत: कौन्सिल–बहिष्कार अगर अडवणुकीच्या धोरणाचा कौंसिल प्रवेश अमान्य असल्यामुळं जनतेला प्रागतिक तत्त्वज्ञान शिकविण्याकरितां अवतरलेल्या ऐक्यानें १९३०–३४ ची कायदेभंगाची चळवळ नापसंत असूनही, त्यायोगें दिसणाऱ्या तरुणांतील लढाऊ वृत्तीचा तेजोभंग तर केला नाहींच, पण उलट सरकारी दडपशाहीलाच चपराका दिल्या. दुसऱ्या गोल-मेज परिषदेपासून मुसलमानांना विशेष सवलतीनें वागविण्याचें जें धोरण राष्ट्रीय सभेनें स्वीकारलें त्याबद्दल ढवळे यांचा 'श्रीशाहू' आणि हरिजनांच्या मंदिरप्रवेशादि बाबींबद्दल वेलणकरांचा 'हंस' गांधींना व गांधींची छाप असलेल्या कॉंग्रेसला धुडकावून लावीत असले, तरी स्वातंत्र्योन्मुख राजकीय चळवळीला त्यांनीं हातभार आणि आशीर्वादच दिले आहेत. विष्णुपंत आठले यांची भारतमाता, बाबूराव वैद्यांचा समर्थ आणि कोल्हापुऱ्यांचा अभ्युदय हीं वृत्तपत्रें तर यथाशक्ति नेहमींच राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाच्या यशासाठीं प्रयत्न करीत असतात.

पारतंत्र्याबद्दल तिटकारा हाच कालखंडांना आणि पक्षोप-पक्षांना गोवणारा धागा वरील विवेचनावरून आढळेल. राष्ट्रीय सभेच्या जन्मापूर्वीपासून वृत्तपत्रांची ही वृत्ति आपल्याला पहा-

वयास सांपडेल ता. २३ सप्टेंबर १८७० चा शुभसूचक "इंग्रज लोक आमच्या देशाविषयीं योग्य ती काळजी बाळगतात काय?' असा अग्रलेख लिहितो. १८७१ जानेवारी २७ ला "कायद्याना पूर व लोकांचा चूर" असाही लेख आला आहे. "इंग्रज लोकांस आमच्या लोकांचा पाय पुढें पडलेला पाहवत नाही, किंवा ते केवळ आह्मांस पाण्यांत पाहतात, हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईल. ' (इंग्रजी न्यायाचा मासला—शुभसूचक १० नवं. १८७१) असे स्पष्ट अभिप्राय त्यावेळीं प्रगट झाले आहेत. ही शुभसूचकचीच परंपरा पुढें महाराष्ट्रमित्रानें व विशेष ती बोधसुधाकरानें चढत्या सुराला लावली, व आजही ती कायद्याच्या कमीअधिक कचाट्याप्रमाणें अखंड चालू आहे.

पारतंत्र्याविरुद्ध चाल करण्यांत बंडखोरी नाही पण अंगचोरींही नाही, अशी शिकवण शुभसूचक देई. "प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या आगमनानंतर त्यांस संतोष होऊन आपणांस फारसें गोत्यांत यावें लागणार नाही अशी योजना करावी" (२।४।७५) या प्रकारची राजनिष्ठा शिकवणारा शुभसूचक लॉर्ड नॉर्थब्रुकच्या कारकीर्दीत नेटिव वृत्तपत्रांचें स्वातंत्र्य नाहीसें झाले तसें (१७।३।७६) लिहितो. "असें केल्याने इंग्रज अधिकाऱ्यांच्या जुलमी व अन्यायी वर्तनानें लोकांत जो असंतोष उत्पन्न होईल, त्याचा वर्तमानपत्रांत परिस्फोट न होतां तो आंतल्या आंत धुमसत राहील. पण लोकांचा असंतोष

५११ ३

आंतल्या आंत धुमसत राहणें हे भयंकर आहे."

तात्पर्य तडजोडीच्या राजकारणाची ही परंपरा " मँचेस्टरचे व्यापारीच आमचे राजे आहेत काय?" ( १३।८।७७ ) असा सवाल टाकून "डाग लावते पण आग लावीत नाही." इतक्याच तीव्रतेनें ह्मणजेच कायद्यानें दिलेल्या शेवटच्या सवलतीच्या परिसीमेंत नांदण्याची शिकवण शुभसूचकनें प्रथम जिल्ह्याला दिली आणि ती जिल्ह्याच्या वृत्तपत्रांनीं अखंड पाळली.

कायद्याच्या परिसीमेवर " तारेवरील नाच " करावयाचा ह्मणजे पाय घसरणीचे व आपटी खाण्याचे प्रसंग यावयाचेच. त्याचेच थोडेसें पर्यालोचन करूं. शुभसूचकवरच असा प्रसंग " धारा ! धारा ! धारा !! " या शेतकऱ्यांच्या कळकळीनें ता. १४ जानेवारी १८८१ रोजीं लिहिलेल्या लेखामुळें आला. त्या लेखाबद्दल कलेक्टरसाहेबांची नोटीस येऊन धडकली.

१८८२ मध्यें बर्वे प्रकरणांत केसरी मराठाकर्त्यांची बाजू महाराष्ट्रमित्रानें उचलून धरल्यामुळें, अब्रुनुकसानीच्या दाव्याचे कचाट्यांत महाराष्ट्रमित्र सांपडला होता.

१८८८ मध्यें चित्रगुप्तकर्त्यांस डि. डे. क. माजि. स्कॉट यानीं ७ जून रोजीं सहा महिने सक्तमजूरी व रु. ५०० दंड अशी शिक्षा ठोठावली. कऱ्हाडच्या सब रजिस्टर साहेबांनीं लाचलुचपती घेण्याचा सपाटा चालविल्याबद्दल चित्रगुप्तानें हल्ला केला होता. शिक्षेवर अपील करण्यांत आलें तेव्हां सेशन

कोर्टांतून निर्दोषी होऊन ता. ३० जून रोजीं चित्रगुप्तकर्ते सुटले.

वाईच्या मोदवृत्तांतील लेखांबद्दल ता. २९ आक्टोबर १८९१ रोजीं ताकीद झालीच. पण १८९७ चा मोदवृत्तावरील खटला साऱ्या महाराष्ट्राचें लक्ष वेधून बसला. काशीनाथ वामन ऊर्फ भाऊशास्त्री लेले हे मोदवृत्ताचे संपादक असल्यामुळें त्यांच्या घराची व कचेरीची झडती ता. ३० आगष्ट रोजीं झाली. ता. १३ मे व ३ आणि २४ जूनचे अंक जप्त केले. १२४ कलमाखालील ह्मणजे राजद्रोहासाठीं वारंट लावून भाऊशास्त्र्यांस सातारा येथें रवाना केले. ' बघा तापापासून फायदा ' व " राज्यपद्धतीचें धोरण " या लेखांबद्दल खटला होता. पोलीससुपरिंटेंडंटनीं फिर्याद दाखल केल्यावर, तशी फिर्याद करण्यास मंजुरी मिळाली होती. शास्त्रीबुवांनीं तशी तक्रार केली, उपयोग झाला नाहीं. पुढें हायकोर्टाकडून पांच हजारांचा जामीन व तितकाच जातमुचालका घेऊन लेले खुले झाले. त्यांचे बॅ. रॉबर्ट्सन् यांनीं आरोपीच्या आजारीपणामुळें खटल्याची तहकुबी मागितली तीही न्यायमूर्ति रानड्यांनीं दिली, तथापि खटला चालवयाचा तो ७ युरोपियन व २ नेटिव यांच्या ज्यूरीपुढें चाललाच. " आमचा सरकारवरचा विश्वास अगदीं उडाला " व " अमर शिवाजी " असे जादा दोन लेख पुराव्यांत दाखल करण्यांत आले. मोदवृत्त हें राजकीय वृत्तपत्र अगर लेखांतील अमुक एक वाक्य राजद्रोही असल्याचें सरका-

रला दाखवतां आलें नाहीं. पण भाऊशास्त्री दोषी ठरले आणि त्यांना नऊ महिन्यांची साधी कैद झाली.

मोदवृत्तकारांच्या अगोदरच अशी धाड इसलामपूरच्या प्रतोदावर आली होती. १८८७ च्या २६ एप्रिल रोजींच सदर पत्रावर सरकारचा रोष होऊन ५०० रुपयांच्या गोत्यांत तें पत्र आलें होते असें ह्मणतात. पण खरा जबर तडाखा प्रतोदला १८९२ त बसला. जूनच्या पहिल्या पंधरवड्यांत सातारचे फॉरेस्ट ऑफीसर मि. फॅगन जावली तालुक्यांतील पाली-जुंगटीकडे शिकारीस गेले असतां, त्यांचे हांतून एका जाळीचे तोंडाशीं पाठीवर केस सोडून बसलेली धनगरीण मारली गेली. पण ती अस्वल असावी असें समजून फॅगन साहेबांनीं मारली अशी बातमी आली. ही बातमीच प्रतोदचे फॅगन साहेबांवरील सणसणीत टीकेस ' कारणीभूत ' झाली. त्या टीकेबद्दल खटला होऊन २७ आगष्ट रोजीं सहा महिने शिक्षा व ५०० रु. दंड प्रतोदचे संपादक कशाळकर यांना झाला.

प्रतोदवरील दुसरा व राजद्रोहाचा खटला १८९७ सालीं झाला. त्या सालांत " स्वतंत्र होण्याची तयारी " हा लेख प्रतोदमध्यें आला. सदर लेख १२४ अ खालीं येतो ह्मणून पोलिस सुपरिंटेंडंट म्याक्टिअर यांनीं डि. मॅजिस्ट्रेटकडे फिर्याद गुदरली व मि. आस्टन यांच्या सेशन कोर्टांत खटल्याची सुनावणी झाली. हरमलकर प्रकाशक व कशाळकर संपादक या आरो-

पींतर्फे बॅ. कोला व दादासाहेब करंदीकर यांनीं काम चालविलें. ता. २० ते २७ आगष्टपर्यंत काम चालून ता. ३० रोजीं आरोपी हरमंलकर यांस ७ वर्षे स. म. व संपादक कशाळकर यांस जन्मठेप काळेपाणी झालें. या अमानुष शिक्षेबद्दल हायकोर्टांत अपील करण्यांत आलें, तेव्हां वरील शिक्षा अनुक्रमें ३ महिने व १ वर्षावर आली.

अर्थातच प्रतोदची तांबडी चिंधी पाहून सरकार दबकून जाऊं लागलें. १९०६ सालीं महाडास मुंबईच्या गव्हर्नरांचें भाषण झालें; त्यावर प्रतोदांत टीका येतांच कुलाब्याच्या कलेक्टरांची नोटीस येऊन बिलगली ह्मणून प्रतोदची वादी तुटली नाहीं कीं फाटली नाहीं. पुढें १९०८ सालीं टिळकांना ६ वर्षांची शिक्षा झाल्यावर प्रतोदनें न्या. दावरच्या निकालावर कडकडून टीका केली. २६ जुलैच्या या लेखाबद्दल १९ आक्टोबर रोजीं दिलगिरी दाखवून प्रतोदचे छोटे कशाळकर बिलामतींतून रिकामे झाले खरे; पण १९०९ ला फेब्रुवारी २५ रोजीं प्रतोद सरकारी हातांत चांगलाच गवसला. वंगभंगानंतर हिंदुस्थानांत झालेली अभूतपूर्व चळवळ आणि विशेषत: त्यांतील स्वराज्याची मागणी ह्मणजे 'आकाशांतील चांदोबा' आहे अशी हेटाळणी करून, भरीला हिंदु हिंदुस्थान व इस्लामी हिंदुस्थान अशी भारताचीं दोन छकलें करून ज्या मोर्लेमिंटो सुधारणा इकडे अवतरूं लागल्या त्यावर प्रतोदानें " आमच्या

देशाची सांप्रतची स्थिति " वर्णन करून सवाल टाकला कीं
" प्रचंड मातला वडवानळ । प्राणी होती अतिविव्हळ ॥
उपाव ह्मणुनी बिंदुमात्र जळ । वर्षतां काय निष्पत्ति ? ॥ "
या सवालाबरोबर १२४ अ संपादक मुंडल्यांला घेरून बसलें आणि ८ एप्रिल १९०९ रोजीं दीडवर्ष सक्तमजूरी व ५०० रु. दंड हा सरकारी प्रसाद मुंडल्यांस मिळाला.

अशा सारख्या कराव्या लागणाऱ्या दिव्यामुळें प्रतोदचा अवतार संपला. त्याच्यानंतर सोमणांचा प्रकाश हा सरकारचें ' लक्ष्य ' झाला. १९१० ला प्रकाश पत्रास प्रतोदप्रमाणेंच प्रेस ॲक्टखालीं सरकारमान्य संस्थांतून बंदी करण्यांत आली. फार काय ? आगष्ट १९०७ मध्यें सावरकरांच्या "म्याझिनी"चें परीक्षण तीन लेखांमधून प्रकाशमध्यें आलें त्यांचा संबंध औंध बॉंब केस व त्या केसमधील आरोपी चालवूं पहात असलेली अभिनवभारत संस्था यांच्याशीं जोडण्याचा सी. आय. डी. इन्स्पेक्टर छबी यांनी आपल्या जबानींत प्रयत्न केला; इतकेंच नव्हे तर त्या खटल्याचा निकाल देणाऱ्या पर्सीव्हलनीही माझिनीवरील लेख गुप्त कटास उत्तेजन देणारे आहेत तेव्हां योग्य अधिकाऱ्यांनी योग्य तरतूद करावी अशी औंध बॉंब केसच्या निकालपत्रांत शिफारस केली. तसें कांहीं झाले नाही हा भाग वेगळा. तथापि होमरूल लीगची चळवळ घुमुं लागतांच सरकारमान्य सार्वजनिक वाचनालयांतून केसरी आदि

पत्रांबरोबर प्रकाशलाही मज्जाव झाला.

यशिवाय १९३० ते १९३२ सालच्या दहशतशाहीच्या तडाक्यानें 'प्रकाश' गारद होऊन शुभसूचक, वृत्तसार आणि अभ्युदय यांना ताकिदी मिळाल्या होत्या. आणि समर्थपत्रास पांचमहिने विराम पावावे लागलें होतें. इतकेंच नव्हे तर ३१ जुलै १९३२ रोजीं जिल्हासभेचें जें अधिवेशन वाड्यापुढें पोलिसपहाऱ्यांत झाले त्याचें अध्यक्ष आगाशे यांच्या भाषणाच्या प्रती आनंद छापखान्यांत छापल्याच्या संशयावरून ता. १ आगष्ट रोजीं आनंद प्रेसची तीन तास झडती झाली पण आक्षेपार्ह कांहीं सांपडलें नाहीं. १९३० च्या शांतिसंग्रामाचे वेळीं ऐक्यामधून जीं गीतें अभंगांनीं प्रसिद्ध केलीं ती "मेजवानी" या पुस्तकरूपानें प्रसिद्ध होतांच १९३२ सालीं प्रेसॲक्टला ती बळी पडली,

याप्रकारें आपल्या मगदुराप्रमाणें कायद्याच्या अंतीम सीमेवर तारेवरला नाच करतांना सातारा जिल्ह्यांतील वृत्तपत्रांना वरीलप्रमाणें सराकरी रोषास पात्र व्हावे लागले. तरी पण वृत्तपत्रसंचालनाच्या शास्त्राच्या कसोटीला सर्वथैव उतरल असें उदाहरण जिल्ह्यांत नाहीं. १९०० पूर्वी काहीं वृत्तपत्रें लिथोवर व काहीं टाईपावर निघत व त्यापुढें विशेषतः १९०२ नंतर सर्व पत्रें टाइपावर निघू लागली. संपादक हा एका लेखक समूहाचा प्रतिनिधि असून शुभशूचकमध्यें गोळे व अनंतशास्त्री

पेंढारकर, विदूषक मध्यें पांडुरंगराव देसाई वगैरे आणि प्रेक्षक-मध्यें चिरमुले, द्रवीड, फणसळकर, ठाकूर, केळकर, देशपांडे ' चिद्रफटाकेदे ! ' अशी त्या संपादकवर्गाची प्रसिद्धी आहे. आणि पुढें प्रामुख्यानें नानासाहेब आगाशेहि लिहीत असत. प्रथम प्रथम इहवृत्ताच्या सदरांत जिल्ह्यांतील सर्व बातम्या असाव-याच्या आणि घरच्यापेक्षां दारच्या व बाहेरच्या गोष्टीवर आर्टिकलें लिहिण्याचा प्रघात होता. ह्या वृत्तीवरून हळूंहळूं दारच्या व बाहेरच्या विषयाबरोबरच सातारा जिल्ह्यातील पत्रें अलिकडे घरच्या विषयांचा उहापोह अधिक करूं लागली. अच्युतराव कोल्हटकरांसारख्या लेखकाचा पहिला लेख शुभ-सूचकनें प्रसिद्ध केला व श्रीशाहूत तर त्यांचे अनेक इंग्रजी व मराठी चुरचुरीत लेख आले. तसेंच कै. कृष्णाजी आबाजी गुरुजी हे अखेरपर्यंत साताराच्या कोणत्या ना कोणत्या पत्रांत लिहीत, इत्यादि गोष्टींना आपआपल्या परी महत्व आहे. पण जिल्ह्याच्या वृत्तपत्रांनीं जिल्ह्याच्या कारभारावर व प्रगतीवर लक्ष ठेवून जागरुकतेनें अधिकाऱ्यांवर टीका व जनतेला मार्गदर्शन केलें पाहिजे. हे काम आपआपल्याकाळीं बोधसुधाकर, महा-राष्ट्रमित्र, वृत्तसार, आर्यभानु, विशेषत: प्रतोद, विदूषक, प्रेक्षक आणि प्रकाश यांनीं केलें. वर्तमानपत्रें ही लोकांचे कोतवाल होत असें विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्मणत. " या कोतवालांनीं सर्वत्र गस्त घालीत असावें" हे खरें. पण तसे भाग्य सातारा

जिल्ह्यास अजून लाभले नाहीं. तरी पण तरुणांच्या राष्ट्रीयत्वाचा तेजोभंग न होऊ देतां आपापल्या मगदुराप्रमाणे आजची वृत्तपत्रें श्रमविभागणीच्या तत्त्वानेंच जणुं जिल्हा प्रगतीमार्गावर ठेवण्याचें काम करीत आहेत.

---

## प्रकरण २ रें.

# सार्वजनिक खटले.

" पलटणींतील हुद्याच्या नोकऱ्या हिंदु लोकांना कां न द्याव्या ? " ' हिंदुस्थानच्या प्रतिनिधींची पार्लमेंटांत अवश्यकता ' " निरर्थक खर्चाचा बोजा बिचाऱ्या रयतेवर विनाकारण पडणार " अशी टकळी तोंडानें व लेखणीनें चालवून अर्ज विनंत्यांच्या चळवळीचा काळ सातारा जिल्हा घालवीत असतां, कृतीचा काळ आपले किरण फेकीत होता. हिंदुस्थानच्या द्रव्यशोषणावर " हिंदुस्थानांत यांत्रिक विद्येची अवश्यकता " वाईचे वृत्तसार प्रतिपादित आहे. त्याच्या पूर्वींच साताऱ्यास पोलिसच्या " अघटित कृत्यां 'चा प्रसाद मिळत होता. १८८५ चा ५ फेब्रुवारीचा महाराष्ट्रमित्र ह्मणतो कीं, वाई, मांढरदेव, वांळघर, कोडोली, वासली, शेंदुरजन, केंजळ, आब्रापुरी, दुमाला अटींटा,

नगलोटी, दुमाला करंजावडी, खंडाळा, विंग, अगोली, खानापवडी, दुमाला धाओडी, गोळेवाडी अशा गांवावर एक वर्षाचे आंत प्युनिटिव्ह पोलिसचे १२८४० रु. बसले. गव्हर्नर साहेब महाबळेश्वरास जात असतां सार्वजनिक सभेतर्फे त्यांना मानपत्र देऊन नानासाहेब वैद्यांनीं त्या भुर्दंडाबाबतचा अन्याय निदर्शनास आणला आणि वाईकरांवरील किटाळ व जाच कमी करून घेतला.

पण १८९४ च्या सप्टेंबरांत नवीनच वादळ उठलें. मुंबई, येवले वगैरे ठिकाणीं हिंदु-मुसलमानांचे दंगे झाले, आणि तसे सातारा जिल्ह्यांत नाहींत; हें कांहीं सैतानी डोक्यांना खपेना असें दिसते. तेव्हां गणपतीउत्सवाचें निमित्त करून तो देखावा उभारण्याचा प्रयत्न झाला. गणेश चतुर्थीपूर्वी वाईला ‘ द्वारें ’ निघतात. द्वार ह्मणजे चार दिशेनें मुलें यात्रेस बाहेर जाऊन गांवात परत येतात. त्या वेळीं त्यांच्या मिरवणुकी निघतात. गांवचे लोक या मुलांना सामोरे जातात व त्यांस वाजत गाजत गांवांत आणतात. मिरवणुकीच्या वाटेवर एक मशीद आहे. आदल्या वर्षी वहिवाटीप्रमाणें मशीदीवरून ‘ द्वारें ’ वाजत गेलीं. यंदा गाडें उलटलें, व ठराविक जाहीरनामा लागला. तो रद्द होईपर्यंत मानला पाहिजे, ह्मणून पुढाऱ्यांनीं मशीदीपुढें वाद्यें थांबविलींही. पण कोणा एका बेजबाबदार मनुष्यास बेसुमार हौस येऊन त्यानें एकट्यानें झांज वाजविली. अर्थात् खटला

पत्रांबरोबर प्रकाशलाही मज्जाव झाला.

यांशिवाय १९३० ते १९३२ सालच्या दहशतशाहीच्या तडाक्यानें 'प्रकाश' गारद होऊन शुभसूचक, वृत्तसार आणि अभ्युदय यांना ताकिदी मिळाल्या होत्या. आणि समर्थपत्रास पांचमहिने विराम पावावे लागलें होतें. इतकेंच नव्हे तर ३१ जुलै १९३२ रोजीं जिल्हासभेचें जें अधिवेशन वाड्यापुढें पोलिसपहाऱ्यांत झालें त्याचें अध्यक्ष आगाशे यांच्या भाषणाच्या प्रती आनंद छापखान्यांत छापल्याच्या संशयावरून ता. १ आगष्ट रोजीं आनंद प्रेसची तीन तास झडती झाली पण आक्षेपार्ह कांहीं सांपडलें नाहीं. १९३० च्या शांतिसंग्रामाचे वेळीं ऐक्यामधून जीं गीतें अभंगांनीं प्रसिद्ध केलीं ती "मेजवानी" या पुस्तकरूपानें प्रसिद्ध होतांच १९३२ सालीं प्रेसॲक्टला ती बळी पडली.

याप्रकारें आपल्या मगदुराप्रमाणें कायद्याच्या अंतीम सीमेवर तारेवरला नाच करतांना सातारा जिल्ह्यांतील वृत्तपत्रांना वरीलप्रमाणें सराकरी रोषास पात्र व्हावे लागले. तरी पण वृत्तपत्रसंचालनाच्या शास्त्राच्या कसोटीला सर्वथैव उतरल असें उदाहरण जिल्ह्यांत नाहीं. १९०० पूर्वी काहीं वृत्तपत्रें लिथोवर व काहीं टाईपावर निघत व त्यापुढें विशेषतः १९०२ नंतर सर्व पत्रें टाइपावर निघू लागली. संपादक हा एक लेखक समूहाचा प्रतिनिधि असून शुभसूचकमध्यें गोळे व अनंतशास्त्री

पेंढारकर, विदूषक मध्यें पांडुरंगराव देसाई वगैरे आणि प्रेक्षक-मध्यें चिरमुले, द्रवीड, फणसळकर, ठाकूर, केळकर, देशपांडे ' चिद्रफटाकेदे ' अशी त्या संपादकवर्गाची प्रसिद्धी आहे. आणि पुढें प्रामुख्यानें नानासाहेब आगाशेहि लिहीत असत. प्रथम प्रथम इहवृत्ताच्या सदरांत जिल्ह्यांतील सर्व बातम्या असाव-याच्या आणि घरच्यापेक्षां दारच्या व बाहेरच्या गोष्टीवर आर्टिकलें लिहिण्याचा प्रघात होता. ह्या वृत्तीवरून हळूंहळूं दारच्या व बाहेरच्या विषयाबरोबरच सातारा जिल्ह्यातील पत्रें अलिकडे घरच्या विषयांचा उहापोह अधिक करूं लागली. अच्युतराव कोल्हटकरांसारख्या लेखकाचा पहिला लेख शुभ-सूचकनें प्रसिद्ध केला व श्रीशाहूत तर त्यांचे अनेक इंग्रजी व मराठी चुरचुरीत लेख आले. तसेंच कै. कृष्णाजी आबाजी गुरुजी हे अखेरपर्यंत साताऱच्या कोणत्या ना कोणत्या पत्रांत लिहीत, इत्यादि गोष्टींना आपआपल्या परी महत्व आहे. पण जिल्ह्याच्या वृत्तपत्रांनीं जिल्ह्याच्या कारभारावर व प्रगतीवर लक्ष ठेवून जागरुकतेनें अधिकाऱ्यांवर टीका व जनतेला मार्गदर्शन केलें पाहिजे. हे काम आपआपल्याकाळीं बोधसुधाकर, महा-राष्ट्रमित्र, वृत्तसार, आर्यभानु, विशेषतः प्रतोद, विदूषक, प्रेक्षक आणि प्रकाश यांनीं केलें. वर्तमानपत्रें ही लोकांचे कोतवाल होत असें विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्मणत. " या कोतवालांनीं सर्वत्र गस्त घालीत असावें" हे खरें. पण तसे भाग्य सातारा

जिल्ह्यास अजून लाभले नाहीं. तरी पण तरुणांच्या राष्ट्रीयत्वाचा तेजोभंग न होऊ देतां आपापल्या मगदुराप्रमाणे आजची वृत्त-पत्रें श्रमविभागणीच्या तत्त्वानेंच जणुं जिल्हा प्रगतीमार्गावर ठेवण्याचें काम करीत आहेत.

---

## प्रकरण २ रें.

# सार्वजनिक खटले.

"पलटणींतील हुद्याच्या नोकऱ्या हिंदु लोकांना कां न द्याव्या ?" 'हिंदुस्थानच्या प्रतिनिधींची पार्लमेंटांत अवश्यकता' "निरर्थक खर्चाचा बोजा बिचाऱ्या रयतेवर विनाकारण पड-णार" अशी टकळी तोंडानें व लेखणीनें चालवून अर्ज विनं त्यांच्या चळवळीचा काळ सातारा जिल्हा घालवीत असतां, कृतीचा काळ आपले किरण फेकीत होता. हिंदुस्थानच्या द्रव्य-शोषणावर "हिंदुस्थानांत यांत्रिक विद्येची अवश्यकता" वाईचे वृत्तसार प्रतिपादित आहे. त्याच्या पूर्वीच साताऱ्यास पोलिसच्या "अघटित कृत्यां 'चा प्रसाद मिळत होता. १८८५ चा ५ फेब्रुवारीचा महाराष्ट्रमित्र ह्मणतो कीं, वाई, मांढरदेव, वाळेघर, कोडोली, वासली, शेंदुरजन, केंजळ, आब्रापुरी, दुमाला अटीटा,

नगलेटी, दुमाला करंजावडी, खंडाळा, विंग, अगोली, खानी-वडी, दुमाला धाओडी, गोळेवाडी अशा गांवावर एक वर्षाचे आंत प्युनिटिव्ह पोलिसचे १२८४० रु. बसले. गव्हर्नर साहेब महाबळेश्वरास जात असतां सार्वजनिक सभेतर्फे त्यांना मानपत्र देऊन नानासाहेब वैद्यांनीं त्या मुर्दंडाबाबतचा अन्याय निदर्शनास आणला आणि वाईकरांवरील किटाळ व जाच कमी करून घेतला.

पण १८९४ च्या सप्टेंबरांत नवीनच वादळ उठले. मुंबई, येवले वगैरे ठिकाणीं हिंदु-मुसलमानांचे दंगे झाले, आणि तसे सातारा जिल्ह्यांत नाहींत; हें कांहीं सैतानी डोक्यांना खपेना असें दिसते. तेव्हां गणपतीउत्सवाचें निमित्त करून तो देखावा उभारण्याचा प्रयत्न झाला. गणेश चतुर्थीपूर्वी वाईला ‘ द्वारें ’ निघतात. द्वार ह्मणजे चार दिशेनें मुलें यात्रेस बाहेर जाऊन गांवात परत येतात. त्या वेळीं त्यांच्या मिरवणुकी निघतात. गांवचे लोक या मुलांना सामोरे जातात व त्यांस वाजत गाजत गांवांत आणतात. मिरवणुकीच्या वाटेवर एक मशीद आहे. आदल्या वर्षी वहिवाटीप्रमाणें मशीदीवरून ‘ द्वारें ’ वाजत गेलीं. यंदा गाडें उलटले, व ठराविक जाहीरनामा लागला. तो रद्द होईपर्यंत मानला पाहिजे, ह्मणून पुढाऱ्यांनीं मशीदीपुढें वाद्यें थांबविलींही. पण कोणा एका बेजबाबदार मनुष्यास बेसुमार हौस येऊन त्यानें एकट्यानें झांज वाजविली. अर्थात् खटला

फार तर या एकावर व्हावा, पण इतर लोक साथीदार मानण्यांत तेरा संभावित पुढाऱ्यांवर खटले भरून त्यांना वाईहून साताऱ्यास एकवीस मैल बेड्या घालून पायीं चालत नेले. ' खटला भरणार दुल्लखा इन्स्पेक्टर व संमती देणार रँड साहेब असिस्टंट कलेक्टर ! ही दोन नांवें महाराष्ट्रांत महशूर आहेतच. ' झांज वाजविण्याचा प्रकार झाला त्या वेळीं दुल्लखाबरोबर देशमुख मॅजि. हजर होते. यापुढील हकीकत इंदुप्रकाश देतो ती अशी कीं, ' फौजदारानें देशमुखास ह्मणजे मॅजिस्ट्रेटास असें सांगितले कीं, केनेडी साहेबांच्यापुढें खटल्यांत साक्ष देतांना आरोपीवर गुन्हा शाबीत होइल अशी साक्ष द्या. मी सांगतो त्याप्रमाणें तुह्मी वागला नाहीं तर परिणाम आपणांस भोगावा लागेल. पण ज्या पवित्र जागेवर आपण आहों तिची नापत करण्यापेक्षां आपलें नुकसान झालें तरी पतकरेल असा मॅजि. मि. देशमुख यांनीं फौजदारास जबाब दिला. इतकें झाल्यावर ते स्वस्थ बसले नाहींत, तर आपले वरिष्ठ जे मामलेदार यांस त्यांनीं ही गोष्ट कळविली व परंपरया ती केनेडी साहेबांच्या कानावर घातली. ' अनुभव नसल्यानें तरुण असि. कलेक्टर केनेडी साहेबांनी ' हिंदु साक्षीदार तेवढे बेभरंवशी असा शेरा मारून ' झांज प्रकरणाच्या वेळीं हजर नसलेल्यांसही संभावितास शिक्षा दिल्या. ता. २७ सप्टेंबर रोजीं झालेल्या शिक्षा अशा:—

तात्यासाहेब गाडगीळ २१ दिवस.

त्रि. अ. उर्फ तात्यासाहेब पंत २१+२१

वाई म्यु.चे चेअरमन हरी बाबाजी पुरोहित २१ दि.

म्यु. कौन्सिलर व न्यूस्कूलचे चालक अंताजी गंगाधर जोशी २१ दिवस.

वासुदेव बाबुराव पंडीत २१ दिवस.

लो. बो.. चेअरमन व कन्सिलिएटर नानासाहेब वैद्य ३० दिवस

वामन बजाजी कुलकर्णी २१+२१ + ४० रु. दंड.

जनार्दन अप्पाजी एरंडे २१ दिवस

कृष्णा तात्या ढवळीकर ३० दि. + ४० रु. दंड.

अशा शिक्षा केनेडी साहेबांनीं दिल्या खऱ्या. पण पुढें देशमुखांची ग्रेड तोडण्याचा प्रसंग आल्यावर लाटकर मामलेदारांसकट ज्या कांहीं साक्षी झाल्या, त्यावरून निराळाच प्रकाश पडला. त्याच्यायोगें 'अखेरपर्यंत वांई हा शब्द उच्चारलेला ऐकला कीं, ते (केनेडी साहेब) लज्जेनें खालीं मान घालीत.' कारण अपीलाससुद्धां आरोपींना जागा न राहण्यासारखी शिक्षा साहेबांच्या हातून झाली होती. तें कांहीं कां असेना, २८ आक्टोबर १८९५ चा प्रतोद लिहितो कीं, 'गतवर्षी वाईकर मंडळीवर जो प्रसंग गुदरला त्याचे मुळाशीं केवळ झांजेचा खटला असेल असें वाटत नाहीं. त्यास कांहीं तरी पोलिटिकल कारणें असावीं व तीं हींच कीं, वाईंतील बरींच मंडळी सार्वजनिक

कामांत असतात. तीं एकदा डँबीस ठरवून टाकलीं ह्मणजे इतर ठिकाणच्या लोकांसही तें एक प्रकारचें उदाहरण होईल व अलीकडे सरकारी अधिकाऱ्यांवर जो ओरडा होत असतो तोही नष्ट होईल.

प्रतोदचें हें प्रवचन खरें दिसतें. कारण 'शिक्षा भोगून झाल्यावर साताराचे लोक त्यांचा जाहीर सन्मान करतील ह्मणून साताराच्या अधिकाऱ्यांनीं त्याविरुद्ध आधींच जाहीरनामे काढून ठेविले!' पण नऊ जण सुटले त्यावेळीं ह्मणजे बुधवार ता. १७ आक्टोबर १८९४ रोजीं जें साताऱ्यास होऊं शकलें नाहीं तें ता. १७ नवंबर रोजीं वाईस घडलें रा. ब. जनार्दन सखाराम गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालीं त्या तेरा जणांच्या सन्मानार्थ सभा झाली. मुंबई व धारवाडहून सांत्वनपर पत्रें आलीं होतीं. सभेच्या शेवटीं नानासाहेब वैद्यांनीं आभार मानतांना सांगितलें कीं, 'आह्मी सार्वजनिक कामें करीत असतांना कारागृहवासासारखे जरी प्रसंग आले तरी आह्मी देशहिताच्या कामापासून कदापि परांङ्मुख होणार नाहीं.' ( प्रतोद )

सार्वजनिक हिताकरितां कसल्याही आपत्तीची पर्वा न करण्याइतकी बेपर्वाई १८९६ च्या दुष्काळांत कऱ्हाडास दिसून आली. ता. १० नवंबर रोजीं सकाळीं ८ पासून ११ पर्यंत कऱ्हाडची पेठ लुटून गोरगरीबांना नेववतील तितकें जोंधळे वस्ताद हसन मुजावर प्रभृति मंडळींनीं दिलें. पेठ

लुटण्याचें कारण असें घडलें होतें कीं, दुष्काळामुळें अन्न कसें तें मिळण्याची रोजच्या रोज पंचाईत होऊं लागली. व्यापाऱ्यांनीं या वेळीं नफेबाजी करण्याचेंच जणु ठरविलें. आणि रामनाथ, दरू, आशाराम प्रभृति मारवाड्यांनीं धान्याच्या राशीच्या राशी विकत घेतल्या व पोत्यांच्या थडीच्या थडी जेथें तेथें लावून ठेवल्या होत्या. आणि मग रुपयास चार शेरप्रमाणें जोंधळे विकावयास काढले. हसन मुजावर हे इनामदार होते व वस्ताद होते. त्यांनीं व्यापाऱ्यांस रुपयास ८ शेर धारण करून परोपकार करण्यास विनविलें. पण व्यापाऱ्यांनीं ऐकलें नाहीं. उलट गाड्या भरून कराडबाहेर दुसऱ्या बाजारांत विकावयास सुसज्ज झाले. हसन साहेबांना व्यापाऱ्यांच्या गुर्मीचा सात्विक संताप आला; आणि त्यांनीं व्यापाऱ्यांस सांगितलें कीं आपण बाजार लुटणार, मग काय व्हायचें असेल तें होवो ! पण व्यापारी नमते घेईनात. फक्त तलुकचंद गुजर, ज्ञानोबा बटाणे आणि भागवत भुसार कंपनी यांनीं वस्तादांच्या शब्दाप्रमाणें रुपयास ८ शेराप्रमाणें धान्य विकण्याचें कबूल केलें, ह्मणून तेवढीं दुकानें व त्यांचीं कोठारें सोडून वस्तादांनीं आपल्या साथीदारांसह पेठ लुटण्यास सुरवात केली व गोरगरीबास धान्य पुरविलें. लुटीला आरंभ होतांच मोतिराम रेवचंद गुजरांनीं ५० रु.चीं दाण्याचीं पोतीं देऊं केली, छोटुमल मारवाड्यांनीं ५० रु. नफा देतो व शिवलिंग शेठनीं १०० रुपये नफा देतो, अशी

लालुच दाखविली. परंतु एवढ्याकरितां कां वस्ताद लूट करीत होते ! वस्ताद व त्यांची मंडळी मुळींच बोटचेपी लागेनात, तेव्हां व्यापारी सहजच पोलिसकडे धावले.

किंबहुना लुटीची बातमी लागतांच, जमादार दुदुस्कर व येरगट्टी फडणीस पेठेंत आले. किल्लेदार मामलेदार आणि प्रांतसाहेब मि. क्लेमेंट पाटणकडे असल्याकारणानें जमादारां-वरील जबाबदारी दुप्पट वाढली. पण ते पेठेंत आले तों एकच तोबा उठला होता. लूट थांबविण्याचें त्यांच्यानें जमेना, तेव्हां त्यांनीं पाटणाकडे निरोप पाठविला. अकरा वाजतां लूट संपत आली, रस्ते जोंधळ्यांनीं व धान्यांनीं आणि ते वेचून नेणाऱ्यांनीं फुलून गेले. त्यांतला ओसरता भाग क्लेमंट साहेबांच्या निदर्श-नास आल्यावर, त्यांनीं दोन दिवसांत सुमारें दोनशे माणसें मामलेदार कचेरींत पकडून कोंडलीं.

हसन मुजावर साहेबांना पकडतांना साहेबांना फारच अवघड गेलें. लूट झाल्यावर वस्ताद घराजवळील पिंपळाखालीं खुर्ची टाकून स्वस्थ बसले होते. पोलिसांचा फेरच्या फेर भोंवती उभा राहिला, पण वस्तादांना पकडण्याची कोणाची छाती नव्हती. शेवटीं 'कायद्याप्रमाणें गुन्हा होत असल्याकारणानें अधिकाऱ्यांच्या स्वाधीन व्हावयास पाहिजे' असें बाबा कुल-कर्णी यांनीं सांगितलें. त्यावर घराची झडती घेऊन लुटींपैकीं एकही दाणा मजजवळ नाहीं अशी खात्री करून घ्या, ह्मणजे

बाबांच्या शद्बाकरितां स्वाधीन होतो, असें वस्तादांनीं साहेबास सांगितले. याप्रमाणें सर्व विधी झाल्यावर वस्ताद आपण होऊन सरकारच्या स्वाधीन झाले.

शनिवार ता. १३ नोव्हेंबर रोजीं पकडलेले लोक परोपकारी व निर्दोष असल्यामुळें साहेबांनीं त्यांना सोडून द्यावें ह्मणून खुद्द साहेबांच्याकडे बळवंतराव नवाथे यांनीं अर्ज दिला. पण त्यानें कांहीं एक पाझर न फुटतां ४९ लोकांवर रीतसर लुटीबद्दल खटले चालले आणि त्या 'टोळी'चे पुढारी ह्मणून चार वर्षें सक्तमजूरी वस्तादांस व वस्तादांचे सहाय्यक कोंडी काटकर, इंगवले, सीताराम ठाकूर प्रभृतींना २।२ वर्षें सक्त-मजुरीची शिक्षा झाली.

या शिक्षांविरुद्ध नानासाहेब आगाशे, दादासाहेब करं-दीकर यांनीं अपील लावलें. पण उपयोग कांहीं झाला नाहीं.

यावर एक तप गेलें, आणि सार्वजनिक सेवेसाठीं शिक्षा साहण्याचें व्रत कोरेगांव तालुक्यांत उमटलें. ता. १८ जानेवारी १९०९ चें वृत्तसार सांगतें कीं देऊर गांवीं गुजर–मराठे मिळून ११ इसम व कोरेगांव शाळेंतील तालीम मास्तर गुरव यांनीं मागील भाऊबिजेदिवशीं पारावर व्याख्यानें देऊन पिकेटिंग केलें. ह्मणून इं. पी. को. क. १५१ व २९१ व खाली अबकारी इ. मि. गॉर्डन यांनीं वाई मॅ. वर्ग २ कडे खटला दिला. आरोपीतर्फे २४ साक्षीदारांची यादी कुडेकर, पाटणकर, भट

वकील यांनीं दिली. २५ जानेवारी व पुढें खटला चालून पिकेटर्सपैकीं तिघांस २५ रु. दुसऱ्या तिघास १० रुपये दंड झाला. बाकीचे ६ निर्दोषी सुटले.

देऊरचा खटला पिण्याच्या दारूवर निरोधन करण्यासंबंधीं झाला. पण १९१० ला स्फोटक दारूचा खटला औंधांत उद्भवला. औंध येथील बॉंबच्या खटल्याचा पूर्वरंग आणि उत्तररंग निरनिराळे आहेत. पण हरिदासाची कथा जशी मूळपदावर, तशी औंध बॉंबप्रकरणालाही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं सशस्त्र प्रयत्न करणाऱ्या नाशीकच्या "अभिनव भारतसंस्थेकडे" संबंध सिद्ध झाला. आतां याचा पूर्वरंग असा कीं औंध हायस्कुलांतील ड्राइंगमास्तर हिंगे या गृहस्थांनीं एक बॉंब तयार करून तो माळावर उडवून पाहिला ह्मणे! पण त्याचा आवाज औंधास ऐकूं येण्याऐवजीं पुण्याच्या न्यू, इंग्लिश स्कूलच्या वसतिगृहाच्या सुपरिंटेंडेंटच्या कानीं गेला. (ता. १७ मे १९१० मंगळवार) सदर हिंगे हे आपल्या वसतिगृहांतील भाऊसाहेब पंतांचे एक वेळ मित्र असल्याकारणानें त्या विद्यार्थ्याच्या आणि आपल्या वसतिगृहाच्या पाठीमागें कांहीं लचांड पुढें मागे लागूं नये ह्मणून आपल्या कानीं आलेली बातमी सदर वसतिगृहाचे सुपरिंटेंडेंट प्रो. गोविंदराव भाटे यांनीं साताराच्या कलेक्टरसाहेबास कळविली. (१८ मे १९१० रजिस्टर पत्रानें) झालें, सरकारीं सूत्रें हलूं लागलीं. कलेक्टर साहेब हे औंधचे पोलिटिकल एजंट

असल्याकारणानें त्यांनीं औंधचे दरबारकडे हिंग्यांची हकिगत कळवितांच तेथेंही चक्रें फिरूं लागली. औंधच्या गादीसंबंधीं जी १९०८ सालापूर्वींच भानगड उपस्थित झाली होती; तिच्याशीं हिंग्यांच्या बॉंबचा कांही संबंध आहे कीं काय अशा संशयानें कांहीं दिवस संशोधन चाललें होतें कारण हिंग्यांच्या बरोबर गुप्तपोलिस खात्याने हिंगे, मेहेंदळे व आठल्ये असे तीन विद्यार्थी सामील असल्याचा शोध लावला होता आणि त्यापैकीं पहिले दोघे औंधचेच होते. पण कारभारी जेकब बापू यांना प्रारंभीं तसा वास आला, तरी साधा ओशटपणादेखील औंधच्या गादीशीं बिलगण्यासारखा हिंग्यांच्या बॉम्बला नसल्याकारणानें औंध संस्थानला सरळ तो खटला ब्रिटिश अधिकाऱ्यांच्याकडे सुपूर्त करावा लागला.

तथापि या पूर्वरंगाला रंग यावयास तेथील पोलिसांनीं हिंग्याना पकडण्यासाठीं केलेली क्लृप्ति कारण झाली. शाळेला मे महिन्याची सुट्टी असल्याकारणानें औंध सोडून गेलेले हिंगे सहज पकडतां यावें ह्मणून, हिंग्यांच्या घराची ( २४।२५ मे ) व शाळेंतील खोलीची झडती (२३ मे) रोजीं घेऊन हिंग्यांच्या भावाला ओलीस ह्मणून अडकवून ठेवले. ( २३ मे ) कोल्हा-पुरास आठल्ये यांना भेटावयास गेलेल्या हिंग्यांना सदर गोष्ट कळली. त्यासरसा ते एकदम औंधास दाखल झाले, मॅजिस्ट्रेट-पुढें उभे राहिले व पकडले गेले. ( २६ मे ) घराची झडती

झाली, कांहीं कागदपत्र जप्त झाले, पोलीसनें " न विसरेल अशी समज " दिली, तरी आपणां स्वतांशिवाय कोणी कटांत असल्याचें हिंगे सांगेनात, आणि इकडे मेहेंदळ्यांनीं तर पुष्कळच बाबतींत पोलिसच्या होस हो ठेवून दिलें होतें.

या पूर्वरंगानंतर सदर खटला ज्यावेळीं ब्रिटिश पोलिसांच्या हवाली साताऱ्यास झाला त्यावेळीं हिंग्यांचे बंधूंचा पाश सुटला. ब्रिटिश पोलिसापुढील व कमिटिंग मॅजिस्ट्रेटपुढील जबानींत हिंगे पूर्ववतच अढळ राहिले व मेहेंदळ्यांनी पूर्वीसारखाच होस हो दिला. दरम्यान कलकत्त्याला शिकत असलेल्या आठल्यांच्या कानावर साताऱ्चे पडसाद गेले, तेव्हां तेही परत कोल्हापुरास दाखल झाले आणि पोलिसांनीं त्यांना पकडले व करावयाचे ते सर्व विधि केले.

ता. १९ सप्टेंबरपासून डि. मॅजिस्ट्रेटपुढें चौकशी सुरू झाली, तेव्हां अष्टपुत्रे वकील, आरोपीतर्फे काम पहात होते. ता. २४ आक्टोबर रोजीं १२१ ते १२४ अ सर्व कलमांप्रमाणें सर्व आरोपींवर चार्ज ठेवला. हिंग्यांना मेहेंदळ्यांनी, मेहेंदळ्यांना बर्वे यांनीं व आठल्यांना गणेश दामोदर सावरकर यांनीं शपथा देऊन नाशिकच्या अभिनवभारत संस्थेचे सभासद करून घेतल्याचें सरकारतर्फे पुराव्यानें मांडण्यांत आलें.

पुढें खटला सेशनांत गेला, तो ता. २१ नोव्हेंबरपासून १९ डिसेंबरपर्यंत चालला. पोलिसांच्या छळाचे भीतीनें प्रथम

पोलिसच्याजवळ दिलेली जबानी आपण दिल्याचें मेहेंदळयांनीं सांगितले. अष्टपुत्र्यांच्या जोडीस फणसळकर, आगाशे, करंदीकर यांनीहि सेशनांत काम चालविलें. एक महिनाभर सातार्‍यांत हा खटला गाजला; राजद्रोहाचे आरोप लागू पडत नाहींत ह्मणून वकिलांनी आपली शिकस्त केली; तरी पण क्रांतिकारक कटाचा व इंग्रजांचें राज्य उलथून पाडण्याचा आरोप सिद्ध होऊन पर्सिव्हल साहेबांनीं हिंग्यांना ८ वर्षे, आठल्यांना ५ वर्षे व मेहेंदळयांना ३॥ वर्षें अशा शिक्षा दिल्यावर सर्वांच्या मिळकती जप्त करण्याचा हुकूम झाला. तेव्हां वन्देमातरमच्या गजरांत हजारों प्रेक्षकांचें कडे वळून आठले व हिंगे यांनीं न्यायाधिशांनीं दिलेल्या शिक्षांचा स्वीकार केला. नंतर अपील झालें पण शिक्षा ढळल्या नाहीत. तथापि मिळकतीची जप्ती सुटली.

गणपतरावजी फणसळकरांपर्यंतहि एकदां बॉंबनें आपला मोर्चा वळविला होता. १९०९ सालीं जानेवारींतल्या पहिल्या पंधरवड्यांत फणसळकर वकिलांचे तांबट आळींतील घरांत एका कोनाड्यांत एक बॉम्बसारखा पदार्थ आणून ठेवण्यांत आला. हें कृत्य करणारा किकली (वाई) येथील बाबर या नांवाचा गृहस्थ होता. फणसळकर वकीलांचे लोकधुरीणत्व न खपणार्‍या मनोवृत्तीची अधिकृत स्फूर्ति त्या भाऊ बाबराला असल्याची त्या काळीं लोकवार्ता होती. कांहीं असो, पोलिसखात्यानें नेट धरला, गुन्हेगार व त्याचे साथ्ये कोंडिबा, महा-

देव कुलकर्णी हे शोधून काढले, आणि खटला रीतसर चालवून बावर यांस ५ महादेव कुलकर्ण्यास ४ आणि कोंडीबास ३ वर्षे सक्तमजुरीही झाली.

बॉम्बच्या बाबतींत लोकांचे हात शेकले, तर अगदीं साहजिक चमहायुद्धांत इंग्रजांना पैसा व माणसांची मदत करावयास लोक तयार असतांना, रंगरूट गोळा करणाऱ्या हपीसरांच्या हडेलहप्पीमुळें उडतरे प्रकरण माजलें व लोकांच्या अंगावर आलें याचें कोणालाही आश्चर्यच वाटेल. इतिहास हा कधीं कधीं कादंबरीपेक्षां अद्‌भुतरम्य कसा असतो पहा !

१९१९ डिसेंबर ३१ अखेर उडतरें प्रकरणाबाबत जादा पोलीस बसले, वाई तालुक्यांतील उडतरें, विरमाडे, कळंबे या गांवावर. जावली तालुक्यांतील अनेवाडी, सरजापूर, रायगांव हीं गांवें होतीं त्यांत सहकार्याला. आरोपी एकूण तीस होते. ते रायगांव १, कळंबे २, सरजापूर ३, उडतरें २२, सोनगांव १, वाई १ अशी त्यांची गांववार वाटणी. कोर्टांत त्यांचे आणखी एका तऱ्हेनें वर्गीकरण केलें होतें तें असें कीं, ब्राह्मण ४, मराठे १९, मुसलमान ३, चांभार २, महार १ व मांग १. यांपैकीं ११ जण निर्दोषी सुटले. बाकीच्यांना ता. २६ सप्टेंबर १९१९ रोजीं शिक्षा झाल्या त्या अशाः—धोंडी वामन पवार, वामन केशव कुलकर्णी प्रत्येकीं २२, रामा बाळा सोनावणे, महादेव नीळकंठ साठे, आबा तुकाराम सोनावणे, गोपाळ

सखाराम प्रत्येकीं १९, जम्या वा॥ बाबजा, बाबज्या वा॥ हसन, अल्ली वा॥ राजूभाई प्रत्येकीं १६, खंडू कृष्णा चांभार, नाना पिरा मांग प्रत्येकी १२, पर्वती धोंडी ९, महादू नारू निंबाळकर, गणपती बाबाजी बाबर, कुंडलिका मुरारी सोनावणे, प्रत्येकी ६ महिने सक्त मजूरीच्या शिक्षा झाल्या. शिवाय श्रीपती वामन पवार २२, हरी भिकू महार १२, व केसू येसू माळी ६ महिने अशा साध्या कैदेच्या शिक्षा झाल्या त्या निराळ्याच. या शिक्षा इं. पी. को. कलम १४५, १४७, ३२३ व ४५२ प्रमाणें झाल्या. आरोपींच्या तर्फे अष्टेकर वकीलांनीं आर्ग्युमेंट केल होतें. त्यापूर्वी एक आठवडाभर दादासाहेब करंदीकर ही मंडळी तर्कदुष्ट वागणूक मिळाल्यामुळें कोर्ट सोडून आलीं होतीं.

हें झालें मोठ्या खटल्याचें पुराण. त्याच्या जोडीला धाकटाही एक खटला होता. त्यांत सातच आरोपी होते. त्या सर्वांना ३२३ व १४९ क. प्रमाणें ९ महिने आणि १४७ प्रमाणें ६ म. सक्तमजूरी अशा शिक्षा भोगावयाच्या होत्या, पण त्या एकदम भोगावयाच्या असा निकाल मिळाला.

हा एवढा विस्तार ज्या वृक्षाचा झाला त्याचा बुंधा असा. भुइंज पोलिस ठाण्याचे सबइन्स्पेक्टर तुकाराम कान्होजी गावडे यांनी वरील आरोपींवर इं. पि. को. २४७, १४८, १२४, ३३२, ३५३ व ३२३ या कलमाखालीं फौजदारी

केली. सन १९१८ च्या १० मे रोजीं उडतऱ्यास दंगल माजली ह्मणून सदर फौजदारी झाली. या दंगलीची चौकशी शनिवार ता. ११ रोजीं करंदीकर-सोमण वगैरे मंडळींनीं येऊन आपल्यापरी केली होती.

दंगलीचा तरी मुळवा असा. रिक्रूटिंग ऑफिसर आबा ताल्या व मुलकी पट्टेवाले गुलाब—गोविंदा हे उडतरे येथील काळेश्वराच्या देवळांत भंडारा चालला होता, तेथें ऐन भंडाऱ्याच्या ठिकाणीं पादत्राणें घालून गेले व चार माणसांची नांवें त्यांनी रंगरूट ह्मणून टिपून घेतलीं. असल्या सक्तीचा अर्थ लोकांना कळेना. शिवाय भंडाऱ्यामध्यें पादत्राणें आल्यामुळें लोकांच्या धार्मिक भावना दुखवल्या. त्यावरून वर्दळ होऊन लोक व अधिकारी हातघाईवर आले. पण लोकांच्या समुदायापुढें अधिकाऱ्यांना लांबवर जावें लागलें. हातघाईचें प्रकरण झाल्यामुंळच पोलीसपार्टी घेऊन कलेक्टरसाहेब तेथें गेलें आणि त्यांनीं लोकांचें सांत्वन कसेंबसें केलें. पण गुन्हेगार सांपडावयास पंधरा दिवस लागले व उडतऱ्यास ७०० रु. चे प्युनिटिव्ह पोलीस बसले.

लष्करी हपीसरामुळेंच १९२१ सालीं असेच एक प्रकरण देऊर येथें माजलें होतें. मिलिटरी सुभेदार मुरारराव गणपतराव शिंदे यांच्यासाठीं १४ डिसेंबर रोजीं पर्सनल असिस्टंट बास्कर व्हिले यांच्या समोर भाऊ नागाप्पा ओझरडे,

रावजी परमचंद गुजर, फुलचंद गुलाबचंद गुजर, गोविंदराव विनायक काकडे, वासुदेव केशव एरंडे, मोतीचंद देवचंद गुजर, राघु रामजी कदम, बाजीराव रावजी कदम, कृष्णा मुपु कदम, मनु कृष्णा भुइटे, राघु मधु कदम, मधु बळी कदम, धोंडीराम बाळा कदम, सीताराम चिमणाजी कदम, रुद्रा बाळा कदम, नामदेव भाऊ कदम, पिराजी मधु कदम अशा सतरा इसमांवर फिर्याद झाली. देऊरवर हा यंदाचा जबरा तडाखा होता. पूर्वी सरकारी सारा वसूल करण्याकरतां ता. १३ एप्रिल रोजीं ओढ्यावर शिपाई बसवून मामलेदार साहेबांनीं पन्नास माणसांना पाणी भरण्याचीच बंदी केली होती. पण या खेपेला मिलिटरी सुभेदारांचा रंग निराळाच होता. सदर मुरारराव शिंदे २ आक्टोबर १९२१ रोजीं देऊर येथें गेले असतां त्यांची अब्रू-नुकसानी होण्यासारखें वर्तन, गोविंदराव काकड्यासारख्या ८५ वर्षांच्या ह्यातार्‍यासुद्धां वरील आरोपींकडून घडल्याचा दावा सब् इन्स्पेक्टर सय्यद इब्राहिमभाई यांनीं आपल्या फिर्यादींत मांडला होता. तेव्हां आरोपीस झालेला दंड १००० रुपये शिंदे यांस अब्रुनुकसानीबद्दल मिळाला यांत अनपेक्षित काय? तांदुळ-वाडींच्या पेन्शनर सुभेदारांचा प्रश्न असाच दहा जणांना १००, १०० रुपये दंड होऊन सुटला. इतरांपैकीं गुन्ह्याबद्दल गोविंद राव काकड्यांसुद्धां चार आरोपीस १ वर्ष सक्तमजूरी व दोघांस सहा महिने सक्तमजूरी अशा शिक्षा मिळाल्या व एकजण

निर्दोषी सुटला. हा निकाल २९ जानेवारी १९२२ रोजीं लागला.

शिंदेसाहेब देऊरला गेले होते ते युवराजांच्या आगमनाचे वेळीं सर्व लष्करी लोकांना पुण्यास एकत्र करावयाचे होते, त्याचें निमंत्रण गांवोगांव पोंचतें करण्यासाठीं हिंडत असतां गेले होते. तेव्हां गैरकायदा जमाव करून व दंगा करून शिंद्यांच्या अंगावर " गांधी महाराज की जय " ह्मणत आरोपींनीं शेण-धूळ टाकली असा आरोप होता.

देऊर प्रकरणाप्रमाणेंच बास्करव्हिले यांच्यापुढें या सालीं पिकेटिंगचे खटले गरजले. या सालीं असहकाराची चळवळ जोरांत होती. चहाप्रमाणेंच दारूवरील बहिष्कार व निरोधन मे व जून महिन्यांत जोरांत आलें. साताऱ्यांत उमर पैलवान व नबीसाहेब वगैरेनीं पिकेटिंग केलें. शांतपणें निरोधन करणाऱ्या या मंडळीवर जूनमध्यें खटले होण्यास सुरवात झाली. मनु कुंभारास ३० रु. दंड व इतर चौघास २०० रु. दंड झाला. तसाच चार खटल्यांत १६६० रु. दंड बास्करव्हिलेनीं ठोठावला. उघडच लोकांनीं १६ जून रोजीं कडकडीत हरताळ पाळला व सभेंत सोमण प्रभृतींची भाषणेंही झालीं. तें निमित्त करून हुजूर डेप्युटी मि. डोमिंगो यांनीं सोमण, अष्टपुत्रे घाणेकर, हकीम, नजमुद्दीन यांना भाषणबंदी केली. पुढें त्याच डोमिंगो साहेबांनीं सोमण, श्रोत्री, गो. म. कुबेर, डॉ. भिडे,

मराठे प्रभृतींना १४४ कलमाखालीं "युवराजांचा अपमान होण्याचा संभव ज्यामध्यें आहे, अशा सर्व सभांना बंदी करण्यांत आली आहे." अशा नोटिसा ता. १६ नोव्हेंबर रोजीं ऐन सभेच्या अगोदर काढल्या. तेव्हां भाषणबंदीची नोटीस अव्हानपूर्वक स्वीकारून सोमणांनीं १६ नोव्हेंबर रोजीं थोड-केंच व कायद्याच्या मर्यादेंत असें परिणामकारक भाषण केलें कीं, १७ नोव्हेंबरचा युवराजाच्या आगमनावरील बहिष्काराचा हरताळ कल्पनातीत यशस्वी झाला.

पिकेटिंग बाबतच नारायणराव केळकर व तीन इसम यांना ता. २३ जुलै रोजीं १०० रु. दंड, दीड महिन्याची शिक्षा झाली. कराडासही शिराळकर, बटाणे, जाधव व इनाय-तुल्ला कागदी यांच्यावर पिकेटिंगसंबंधीं खटला झाला. पण प्रांतसाहेबांनीं निर्णय दिला त्यांत शिराळकर निर्दोषी सुटले, तर बाकीच्यास ५०।५० रु. दंड झाला.

१९२२ सालीं प्रचारकार्यासाठीं शिक्षा होण्यास सुरवात झाली. वाईचे रहिवासी गणेश हरी खरे हे जावली व पाटण तालुक्यांत टाटा कंपनी बांधणार असलेल्या कोयनेच्या धरणा-संबंधानें लोकजागृति करीत हिंडत असतां त्यांच्यावर जमानतीचा खटला भरण्यांत आला व एक वर्ष साधी कैद कोठावाला यांनीं ठोठावली. ता. २ जून रोजीं खऱ्यांच्या बरोबर गोव्याचे आपटे व हेळवाकचे शेंडे यांना प्रायश्चित्त भोगावें

लागलें. पण त्याच्या अगोदरच महिनाभर विष्णु लक्ष्मण मराठे यांस तासगांव येथें रिसबूड यांनीं क. १०८ प्रमाणें ९ महिन्यांची शिक्षा दिली होती. अशा चॅप्टर केसेस भरावयास मार्चमध्यें साताऱ्यासच आरंभ झाला होता. उमर पैलवान, नबीसाहेब, दादू महात, बुधकर व गणपतराव साठे यांना एक वर्ष सजा झाली, ती भोगून गणपतराव साठे यांनीं प्रशंसनीय कामगिरी केली. त्रिसापूरसारखा हालअपेष्टांचा तुरुंगवास त्यांनीं कंठला. ता. १७ नोव्हेंबर १९२१ रोजीं जो कडकडीत हरताळ साताऱ्यास पडला होता त्यानें जिल्ह्याची नोकरशाही चिडली होती. या चिडींत १९ डिसेंबर रोजीं झालेल्या विदेशी कापडाच्या होळीनें भर पडली. तेव्हां ६ जानेवारी १९२२ रोजीं पोलिस ॲक्टच्या ६१ कलमाखालीं बनोबा डोंगरे व मनुबोवा कुंभार यांस बास्करविले यांनीं ३० रु. दंड ठोकला, कुमार अष्टपुत्रे यास व शेखमिया यांसही तशीच तंगी दिली. तरी देखील लोक आपल्या असहकाराच्या व्रतापासून ढळत नाहींत; असें दिसल्यावरून शेखमिया यांस ५०० रुपयांचे दोन जामीन सरकारनें मागितले आणि वर सांगितल्याप्रमाणें चॅप्टरचे खटले भरले. राष्ट्रीयसभेनें पुकारलेल्या असहकाराच्या तत्त्वाकरतां झगडणाऱ्यांवर नोकरशाहीनें उनाडटप्पू ह्मणून खटले भरले, तरी राष्ट्रीयसभेची इज्जत गमवावयाची नाहीं, मग वैयक्तिक कमीपणा किती का येईना, अशी जबाबदारी गणपतरावजीवर

ता. ३ नं. ५११

येऊन पडली होती. आणि उनाडटप्पू ह्मणून खटले भरल्या-बरोबर जेथें इतरेजनांनीं नोकरशाहीला ' शरणं प्रपद्ये ' व्हावें, तेथें गणपतरावांनीं विसापुरचा तुरुंग भोगून बाणेदार उदाहरण घालून दिलें, हीच त्यांची शहामत.

युवराजांच्या बहिष्काराचा ताशा सातान्यास असा वाजला; तर वाईस नुसत्या बहिष्काराच्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारल्याबद्दल काकाराव पंडितांचे इनामच मॉयसी कलेक्टरांचें हुकमानें जप्त झालें. मग कऱ्हाड तालुक्यांत अनंतराव येळगांव-करांनीं ' साराबंदी 'ला उत्तेजन दिलें असा त्यांच्यावर आरोप असतां, त्यांचें इनाम कसें टिकणार ? ह्या दोनही प्रकरणीं अपीलें, जाहीर नोटीसा वगैरे सगळे प्रकार झाले; पण इकडची काडी तिकडे झाली नाहीं.

सुशिक्षित-अशिक्षित, हिंदु-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणे-तर, साधासुधा-पांढरपेशा, शेतकरी-इनामदार, कसलाही मनुष्य असला तरी सरकारी धोरणाच्या कात्रींत तो सांपडल्या-बरोबर नेमका कातरला जातो, असा जर येथपर्यंतचा अनुभव तर १९३०-१९३४ च्या शांतिसंग्रामांत तरी निराळा कोठून येणार ? बोलून चालून कायदेभंगाचा काळ तो. तेथें रोज खटले व रोज शिक्षा अशी केवढी तरी सरासरी पडेल.

त्यांतही " बिळाशी बंडा "चा खटला सुप्रसिद्ध आहे. विष्णु जोशी पाटील, दत्तात्रय वासुदेव कुलकर्णी, ( बिळाशी

शिबिराधिपति ) मुरलीधर शंकर देशपांडे, महादेव ज्ञानु, विठ्ठल केशव कुलकर्णी, श्रीपति हरि सावंत, जनार्दन श्रीधर जमदग्नि बापूसाहेब नानासाहेब देशमुख व मारुती विष्णु कुलकर्णी उर्फ बाबूराव चरणकर हे सदर खटल्यांतील आरोपी. बिळाशीला ता. १८ जुलै रोजीं झेंडा लावणारे हसबनीस व ७ सत्याग्रही यांना ता. २५ जुलै रोजीं पकडलें. पण त्यापूर्वी ता. २१ पासून जो पूर्ण अनत्याचारी असा सामाजिक बहिष्कार अधिकाऱ्यांवर पडला, त्याचाच " बिळाशीचें बंड " ह्मणून बंकटसिंगनीं रिपोर्ट केला होता. त्यामुळें ता. २८ ऑगष्टचा जंगल सत्याग्रह झाल्यावर, ता. ५ सप्टेंबर रोजीं कलेक्टरसाहेबांनीं तें बिळाशीचें बंड मोडलें, आणि वरील नऊ जणावर रीतसर खटला सुरू झाला.

आरोपीवर इं. पि. को. च्या ३५३, ३२४, ३७९, ४११, १४३, १४८, १४९ व ११४ या कलमान्वयें बंकटसिंग यांनी खटला केला होता. पण कोर्टांतील प्राथमिक चौकशीनंतर वरील पैकीं कलमें फक्त १४७, १४९, ३५३ व ४११ एवढीच शिल्लक उरली. "ह्मणजे बंडाचा आरोप जाऊन फक्त गर्दी करून दंगा केल्याचा, चोरीचा माल विकत घेतल्याचा व सरकारी अधिकाऱ्यांना कामांत अडथळा केल्याचा एवढेच आरोप राहिले. एकंदर खटल्यास इतकें सौम्य स्वरूप येण्यास इसलामपुरचे वकील गोविंदराव सांगावकर आणि

कऱ्हाडचे वकील राघुअण्णा धोपाटे, पांडुतात्या भाटे व विशेष ते वामनराव फडके यांचे श्रम कारणीभूत झाले. तथापि आरोप ठेवल्यानंतर सातारचे वकील रघुनाथ पांडुरंग करंदीकर यांनीही आपले वकिली चातुर्य लढवून महत्वाचें कार्य केलें." सरकारी पुराव्याचा फोलपणा दादासाहेबांनीं दाखवून दिला. तरी २२ डिसेंबर १९३० रोजीं नऊही आरोपींना फक्त ३५३ व १४७ एवढ्या दोनच कलमाखालीं प्रत्येकीं ६ महिने सक्तमजुरी व १०० रु. दंड व तो न दिल्यास दोन महिने सक्तमजुरी अशा शिक्षा झाल्या. दोनही शिक्षा एकाच वेळीं भोगावयाच्या होत्या.

बिळाशीचा खटला बंडाचा ह्मणून महत्वाचा, तर कऱ्हाड येथील गव्हर्नरसाहेबांच्या मानपत्राचा खटला त्यांतील आरोपामुळें बिळाशीसारखाच. ता. १३ जुलै रोजीं कऱ्हाडास गव्हर्नरसाहेब म्यु. टींत मानपत्रसमारंभ स्वीकारून व म्यु. अध्यक्षांकडील खाना आटोपून दुतर्फा काळ्या निशाणांच्या रांगांतून परत गेल्यावर बंदोबस्ताचे पोलिस ताबडतोब काढून घेण्यांत आले, काळ्या निशाणांचें स्वागत करण्याकरतां आलेली मंडळीही आपआपल्या घरी निघून गेलीं. परगांवची कृष्णेच्या घाटाकडे जेवणाची व्यवस्था होती तिकडे परतली. पण हे सर्व होत असतां गर्दीचा फायदा घेऊन कोणी पिशाच्चवृत्तीच्या लोकांनीं म्यु. टीने उभारलेल्या ६ कमानी मोडल्या, रस्त्याचे १३ कंदील फोडले, क्वचित दगडफेक केली. त्याबाबत ता.

२१ सप्टेंबर पासून कऱ्हाडास पकडापकडीला सुरवात होऊन त्यांत पांडुअण्णा शिराळकर, राघुअण्णा घोपाटे, बाबुराव गोखले नरसोपंत घोपाटे, सदाशिवराव वैद्य, गुलाब बागवान, तुकाराम पतकी, बाबुराव अष्टेकर, मोहनलाल शर्मा, रामचंद्र शर्मा, मारुतराव महाडीक व झारी अशी तेरा मंडळी आरोपी ह्मणून गोवली. सब इन्स्पेक्टर जाधव यांनीं १५ जुलै रोजीं १४७, १४९, ४२७, ३८०, ३४, ३३७, ११४ इतक्या कलमां-खालीं फिर्याद दाखल केली होती. सप्टेंबरांत पकडापकडी झाल्यावर आरोपींना जामिनावर सोडण्याबद्दल विनायकराव फणसळकर वकिलांनीं अर्ज दिला. पण कऱ्हाड कोर्टानें तो नामंजूर केला. शेवटीं साताऱ्यास अपील होऊन २०० रु. चा जामीन व २०० जातमुचलका प्रत्येकीं घेऊन ६ आक्टोबर रोजीं आरोपी खुले झाले. नंतर सातारचे सिटी मॅजिस्ट्रेट पोतनीस यांच्यापुढें वरील खटल्यास आरंभ झाला. मुख्यतः विना-नायकराव फणसळकर, व्यंकटराव सखदेव, भाटे आणि सातारेचे वाग्भट देशपांडे, न. गं. जोशी, दाभोळकर, करंदीकर वगैरे वकिलांनीं आरोपीतर्फे काम चालविल्यामुळें, सरकारतर्फे २६ साक्षी होऊनही ता. ६ जानेवारी १९३१ रोजीं फक्त १४३, १४९, ४२७ व ३३६ खालीं आरोपी सर्वांवर व आरोपी १ वर आणखी ११४ व्या कलमाखालीं चार्ज ठेवण्यांत आला. यापुढें दादासाहेब करंदीकरांनीं केलेल्या फेरतपा-

सर्णीत फौजदार साक्षीदारांची तिरपीट उडाली कीं एका साक्षी-दारास मॅजिस्ट्रेट ह्मणाले कीं, "अरे निदान खरे भासेल असे तरी कांही सांग." पण ५ मार्च १९३१ रोजीं गांधी-अर्विन करार झाल्यावर हा खटलाच काढून घेण्यांत आला.

आणखी कांहीं खटले लक्षांत धरण्यासारखे झाले. गुरुवार ता. २१ आगष्ट १९३० रोजीं मुंबई सरकारच्या जादा गॅझेटनें सातारा जिल्ह्यांतील जिल्हा कॉंग्रेस कमेटी, हिंदुस्थानी सेवादल व महाराष्ट्र कायदेभंग मंडळ हीं बेकायदे-शीर ठरविली. पण तें गॅझिट पहाण्यांत येण्यापूर्वींच वाईस गणपतराव वैद्य व वैशंपायन वकील, साताऱ्यांत सोमण, श्रोत्री, भिडे, हडप, होनराव, महाजनी, निळुभाऊ घाणेकर, मोडक व माधवराव आठल्ये प्रभृति १० स्वयंसेवक; कऱ्हाडास शिराळकर, गणपतराव आळतेकर व तासगांवास जोग-जोगळेकर यांजवर क्रि. लॉ. अ. १७ (१, २) प्रमाणें खटले भरले. पैकी हडप, महाजनी, घाणेकर यांनी खटले चालविले नाहींत, इतरांनीं चालविले. तरी सप्टेंबर ता. २० पासून पुढें त्यांना ३ ते ६ महिने शिक्षा झाल्याच. मौजेची गोष्ट अशी कीं ज्यांनीं खटले चालविले नाहींत ते निर्दोषी सुटले. तथापि झालेल्या शिक्षासुद्धां हायकोर्टांतील अपिलांत रद्द झाल्या. पण यापेक्षां हे खटले चालविण्याचा खरा परिणाम असा दिसून आला कीं १९३२ चे फर्मान कायदे निघाले ते पकडापकडीच्या अगोदर दोन दिवस

निघाले. सोमण प्रभृतीमंडळीवर १९३० सालीं खटले भरले त्यांत त्यांना अपमानकारक रीतीनें वागविण्यांत आलें कीं एकदां सोमणांचे हातांत बेड्या घालून कच्चया कैदेंतून कोर्टाकडे नेले हें सहन न होऊन त्यांचा खटला चालविणारे करंदीकर कोर्टांतून निघून आले.

असा मानापमानाचा प्रसंग उत्तरभागचें प्रांत बडवे यांचे कोर्टांत ता. ५ आगष्ट रोजीं शंकरराव साठे वकीलपत्र गुदरावयास गेले असतांही झाला. साठे यांनीं गांधी टोपी घातल्यामुळें त्यांना वकील समजण्यासच तयार होईनात. तसा लेखी हुकूम घेऊनच बाहेर आले. पण पुढें कोर्टानें साठ्यांकडे लेखी दिलगिरी प्रदर्शित केली. (७ आगष्ट १९३०). १९३२ मध्यें सत्याग्रहींच्या वैयक्तिक मानापमानाचा प्रश्नच उरला नव्हता. पण प्रमुखतः ता. २१ डिसेंबर रोजीं वामनराव कुलकर्णी यांस जत संस्थानांत, त्याचप्रमाणें लक्ष्मणराव गाडगीळ यांस सांगलीस हद्दपार करण्यांत आले होते.

या शिवाय १९३० ते १९३४ च्या शांतिसंग्रामांत निरनिराळ्या शिक्षा किती तरी झाल्या, त्यापैकीं कित्येक कशा अन्यायानें झाल्या याचा एकच नमुना ह्मणून १९३० डिसेंबर च्या २ तारखेस राघुअण्णा लिमये व निगडीकर यांना झालेल्या ४ महिने शिक्षेचें उदाहरण देतां येईल. जवाहिरलालांच्या अटकेदिवशीं मंडळीनीं साराबंदी उपदेशिली असा त्यांवर

आरोप होता. वटहुकमाची मुदत संपल्यामुळें ते अपीलांत जानेवारीं १९३१ मध्यें निर्दोषी सुटले. खटले झालेल्यापैकीं कांहीं जणांनीं माफ्या मागितल्या हें खरें, पण त्या विपरित-मार्ग-दर्शितांची संख्या "दर्यामे खसखस" होय.

---

प्रकरण ३ रें.

## राष्ट्रीय सभेंत.

"सर्व धर्मांच्या व जमातींच्या लोकांना एका भूमिकेवर आणील अशी राष्ट्रीय ऐक्याची भावना प्रस्थापित करण्याचें धोरण" राष्ट्रीय सभेनें आखलेलें होतें. या धोरणाचें पर्यवसान हिंदुस्थानच्या स्वयंपूर्ण स्वातंत्र्यांत व्हावयाचें असल्याकारणानें "परकीयांच्या हातांतील सत्ता काढून घेणें हें आपल्या लढ्याचें केंद्र असलें पाहिजे" हें उघडच होय. तेवढ्यासाठीं, राष्ट्रीय सभेच्या इज्जतीकरितां तन-मन-धन-लेखनानें सातारा जिल्ह्यानें कशी झीज सोसली हें पाहिल्यावर आतां खुद्द राष्ट्रीय सभेच्या कार्यांतील सातारा जिल्ह्याचा भाग अवलोकन करूं.

१९२९ पर्यंत अव्याहतपणें राष्ट्रीय सभेची वारी निष्ठेनें करणारे आणि तेथपर्यंत सर्व कमिट्यावर असलेले दादासाहेब

करंदीकर यांनीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशनच साताऱ्यास भरविण्याबद्दल दोनदां ह्मणजे १८९५ व १९२९ सालीं तयारी दाखविली होती. सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरवावयाची कीं नाहीं; असा वाद माजून पुण्यास राष्ट्रीय सभेचें अधिवेशन भरतें कीं नाहीं याची शंका उत्पन्न झाल्यामुळें, पहिल्या खेपेस दादासाहेबांनीं तार देऊन साताऱ्यास राष्ट्रीय सभा बोलावली. त्यावेळीं त्यांस वाईकर मंडळींचा सहकार होता. पण त्या वेळेस पुण्यासच अधिवेशन झालें. त्यानंतर तीन तपें महाराष्ट्रांत राष्ट्रीय सभेचें अधिवेशन झालें नाहीं ह्मणून १९३० ची राष्ट्रीय सभा साताऱ्यास करावयाची असा सातारा जिल्हा सभेच्या कार्यकारी मंडळानें लिंब येथें ठराव मुक्रर करून (८।१२।२९) भाऊसाहेब सोमण, पांडुअण्णा शिराळकर, दादासाहेब करंदीकर, गोसावी व वैद्य अशी मंडळी पुण्याला योजना मुक्रर करण्यासाठीं गेली होती. पण पुण्याई अपुरी पडली असेंच ह्मणावें लागतें.

पण याच्यापेक्षांही दादासाहेबांनीं राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांतून प्रत्यक्ष भाग घेतला आहे. तिसऱ्या राष्ट्रीय सभेनें नेमलेल्या घटना कमेटीचे ते सभासद होते; आठव्या अधिवेशनांत जंगलच्या कायद्याच्या जाचकपणाचा ठरावही त्यांनीं मांडला; नवव्या अधिवेशनांत हिंदी टंकसाळीसंबंधीच्या वाच्छांच्या ठरावास करंदीकरांनीं दुजोरा दिला, तर मुधोळकरांनीं

११ व्या अधिवेशनांत मांडलेल्या लँड्एलिनेशन हक्काच्या ठरावास अनुमति दिली; चंद्ररायांच्या ज्यूरीपद्धतीचे ठरावास अनुमोदन ( १२ वें अधि. ), सरदार मानासिंगांच्या लष्करी वरिष्ठ नोकऱ्यांच्या ठरावास पुष्टी ( १६ वें अधि. ), उच्चशिक्षणास मदत व मॅन्युअल ट्रेनिंगची अवश्यकता प्रतिपादणाऱ्या पाध्यांच्या ठरावास दुजोरा ( २० वें अधि. ), वरिष्ठ व कनिष्ठ कायदेमंडळें व त्यांची सत्ता यांची वाढ व्हावी ह्मणून मागणी करणाऱ्या चौधरींच्या ठरावास पुष्टी ( २१ वें अधि. ), गोखल्यांच्या प्राथमिक शिक्षण बिलाचें कौतुक करणारा ठराव गोविंदराघव अय्यरनीं मांडला, त्यास राष्ट्रीयसभेच्या सव्विसाव्या अधिवेशनांत अनुमोदन आणि त्याचवेळीं पोलिसखात्याच्या सुधारणेचा स्वतः मांडलेला ठराव—अशी दादासाहेब करंदीकरांची थोडक्यांत कामगिरी सांगतां येईल.

करंदीकरांच्या प्रमाणेंच नानासाहेब आगाशे व गणपतकर फणसळकर यांनींही राष्ट्रीयसभेच्या प्रत्यक्ष अधिवेशनांत भाग घेतला आहे. प्लेगप्रतिबंधाचा खर्च सरकारनें करावा, लोकांकडून घेऊं नये या व्ही. सी. देसीकाचारीअर यांच्या ठरावास अनुमोदन ( १४ वें अधि. ), व पंजाब लँड एलिनेशन बिलाला पुष्टी ( अधि. १५ वें ) आणि अंबिकाचरण मुजुमदारांनीं मांडलेल्या न्याय आणि अंमलबजावणीच्या विभक्तीकरणाचे ठरावास पाठिंबा ( १५ वें अधि. ). अशी अनुक्रमें

फणसळकर व आगाशे यांची कामगिरी होय.

आठव्या राष्ट्रीय सभेंत मिठावरील कर, प्राप्तीवरील कर, पोलीस, लष्कर वगैरेसंबंधींचा संमिश्र ठराव व चवदाव्या अधिवेशनांत "स्थानिक स्वराज्या"ची सरकारनें थट्टा चालविल्याबद्दल निषेधाचा ठराव, असे खापर्ड्यांनीं मांडले त्याला बळवंतराव सहस्रबुद्ध्यांनीं पुष्टी दिली.

यानंतर अगदीं अलिकडे ह्मणजे १९२९ चे राष्ट्रीय सभेचे विषयनियामक कमेटींत आप्पासाहेब आळतेकरांनीं "स्थानिक स्वराज्य संस्थावर" कांग्रेसच्या मंडळींनी बहिष्कार घालूं नये अशी सूचना पास करून घेतली.

मॉटफोर्ड सुधारणांपासून राष्ट्रीय सभेनें राज्ययंत्रावर घातलेल्या बहिष्कारांत लोकतंत्रांत आलेलीं स्थानिक स्वराज्यें-सुद्धां येतात अशा भ्रमांत पुष्कळ मंडळी होती, तो भ्रम यायोगें उतरला. त्यापूर्वींच सुमारें चार वर्षे बाबूराव भिडे यांनीं सातान्यास "सार्वजनिक म्यु.पल मंडळ" स्थापन केलें होतें आणि १९ मार्च १८९९ रोजीं स्थापन झालेल्या सातारा रेटपेयर्स असोसिएशनचेंच काम चालविलें होतें. तें काम, त्याची जबाबदारी व हेतु हें आळतेकरांना पटल्यामुळेंच त्यांचा वरील प्रयत्न झाला.

याशिवाय ऑल इंडिया कांग्रेस कमेटीवर दादासाहेब करंदीकरांचे शिवाय आप्पासाहेब आळतेकर, हकीम, भाऊसाहेब

सोमण, पांडुआण्णा शिराळकर आणि गोसावी यांची निवड-णूकही वर्ष–दीड वर्ष झाली होती.

तथापि या अधिकारपदापेक्षां राष्ट्रीय सभेचे पाईक ह्मणून काम करण्यांतच सातारा जिल्ह्यानें भूषण मानलेलें आहे. करंदीकर, बळवंतराव सहस्रबुद्धे, गोविंदराव लिमये, कोठावळे नारायणराव पाटणकर अशी कितीतरी मंडळी राष्ट्रीय सभेची निष्ठावंत वारकरी असून नानासाहेब वैद्य, फणसळकर, आगाशे वगैरे मंडळींनीं राष्ट्रीय सभेचा अभिमान सतत जागृत ठेवून जिल्ह्यांत जी राष्ट्रीयत्वाची भूमिका सतत अढळ ठेवण्याची परंपरा पाडली, तिच्याच जोरावर १९३५ पर्यंत देखील आपल्या वाढणीची संख्या जिल्ह्यानें नेहमींच परिपूर्ण केली आहे. शहरांच्या तिप्पट खेडेगांवांतून राष्ट्रीय सभेचे सभासद हवेत हा राष्ट्रीय सभेच्या घटनेचा नवा दंडकही आपल्या ४९०० सभासदांत सातारा जिल्ह्यानें पाळला आहे. राष्ट्रीय सभेच्या इज्जत–ठरावा–आज्ञांसंबंधीं सातारा जिल्ह्यानें केलेली कामगिरी यापूर्वीच येऊन गेली आहे.

प्रकरण ४ थें.

# प्रांतिक परिषदांतून.

राष्ट्रीय सभेच्या दरबारांतील कामकाजांची तपशीलवार बजावणी प्रांतिक सभेमार्फत व्हावयाची. हिंदुस्थानचे राजकीय विभाग इंग्रजसरकारनें पाडले आणि चालविले तसेच राष्ट्रीय सभेनें प्रारंभीं घेतल्याकारणानें, मुंबई प्रांतिक परिषदेच्या छत्रा-खालीं अर्थात्च सातारा जिल्हा नांदे. उघडच राष्ट्रीय सभेच्या दरबारांत जरी उठावानें सातारा जिल्हा झळकला नाहीं तरी प्रांतिक कारभारांत वजनदार ठरला आहे.

पुण्यास दुसरी प्रांतिकसभा १८८९ च्या २० ते २३ मे पर्यंत झाली. तिला सातारा जिल्ह्याचे ९० प्रतिनिधी गेले होते, त्याचें कौतुकच अध्यक्ष गोपाळराव हरी देशमुख यांनीं केलें. पुढच्या सालापासून संमतिवयाच्या कायद्यासंबंधीं लोकमत प्रगट व्हावयास सुरवात झाली. " सामाजिक सुधारणेसंबंधीं कायद्याची जबरदस्ती सरकारनें करूं नये " असें लोकमत १८९० च्या नोव्हेंबर महिन्यांत सातारा जिल्ह्यानें सामान्यत: प्रगट केलें होतें. पुण्याला वादाच्या ठिणग्या १८९१ मे पर्यंत चकमक करीतच होत्या; त्यामुळें चवथ्या प्रांतिक परिषदेचें अध्यक्षस्थान धुमचक्री घालणाऱ्या दोनही पक्षांच्या अविरोधानें

वाळवें तालुक्याचे पुढारी गोविंद धोंडदेव लिमये यांच्याकडे आलें. पुणें मुक्कामीं ता. ११ व १२ मे रोजीं झालेल्या त्या प्रांतिक परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून लिमये बोलले; ते मोठें विचारप्रवर्तक ह्मणाले " मी यःकश्चित मनुष्य आहे. शहरवासी बड्या लोकांच्या समाजांत मी अध्यक्ष होणें मला प्रशस्त वाटत नाहीं. परंतु सर्वांच्या इच्छेस मान देणें जरूर आहे ह्मणून मी येथें अध्यक्षस्थान पत्करतों. ही सभा काय व तिचे उद्देश काय हे सर्वश्रुत आहेच ते मला आणखी सांगण्याची जरूरी नाहीं. आजची ही चौथी बैठक आहे. आज चार वर्षांत तिनें बरेंच श्रम केलें. तिचें महत्व सर्वांस माहीत आहे. तेव्हां तिला विघ्न येणें अनिष्ट होय ह्मणून तसें न यावें.

आजच्या सभेच्या आरंभीं कांहीं विघ्न येईल अशी भीति होती; परंतु आरंभिलेलें कार्य तडीस न्यावें येवढ्यासाठीं तें टाळून टाकलें ही आनंदाची गोष्ट आहे. कांहीं गोष्टींनीं दुफळी होण्याचा संभव असला तर त्या दुफळीचा त्या कृत्याशीं संबंध ठेवूं नये. "

लिमयांच्या भाषणांतील गोडी व कामांतील चतुराई धारवाड येथील प्रांतिक परिषदेंत बळवंतराव सहस्रबुद्ध्यांनीं प्राप्तीवरील व मिठावरील कर कमी करण्यासंबंधीं केलेल्या जोरदार भाषणांत दिसून आल्यामुळें " त्यांची वाखाणणी चांगली झाली. " " शेतकी, व्यापार व कलाकौशल्य या

विषयांबद्दल राष्ट्रीय सभेनें अवश्य काळजी घेतली पाहिजे. या तीन विषयांच्या वृद्धीप्रीत्यर्थ राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक प्रतिनिधीनें झीज सोसली पाहिजे." हें ता. २७ जुलै १८९१ रोजीं वृत्तसारानें प्रतिपादिलेलें मत हेंच सातारा जिल्ह्यांतील राष्ट्रीय चळवळींचा प्रथमपासून ध्रुवतारा असल्याकारणानें तदनुषंगिक विषयासंबंधींच सातारा जिल्ह्यांतील प्रतिनिधींनीं प्रांतिक परिषदांतूनसुद्धां आपल्या उत्साहाचा व क्वचित् भाषणांचा कारंजा केला. अशामुळें १८९७ सालची प्रांतिक परिषद साताऱ्यास भरावी ह्मणून दिनशा एदलजी वाच्छा यांच्या जोडीला करंदीकर, सहस्रबुद्धे, गो. वि. रानडे, गणपतराव फणसळकर यांची चिटणीस ह्मणून नेमणूक देखील झाली. पण प्लेगनें सारखी गांजणूक मांडल्यामुळें १९०० सालापर्यंत तो योगायोग जमला नाहीं.

त्यासालीं १२।१३ मे रोज शनिवार रविवा या दिवशीं साताऱ्च्या घाटे थिएटरांत दहावी प्रांतिक परिषद झाली. सिंधशिवाय सगळीकडचे २०० प्रतिनिधी आले होते. "प्रेक्षक अफाट." रा. ब. पाठक स्वागताध्यक्ष होते आणि गोकुळ भाई परेख अध्यक्ष होते. टिळक, आण्णासाहेब परांजपे, विजापूरकर, गोखले, छत्रे, नायर अशी मंडळी आली होती. फेरोजशहा मेथा न आल्यामुळें थोडा विरस झाला. तथापि परिषदेचें काम मोठ्या उत्साहानें होऊन दुष्काळ, प्लेग, नातूप्रकरण, १८२७ चा २५० वा ठराव रद्द करणें, गुप्त कमेट्या मोडणें, प्राप्ती-

वरील कर कमी करणें, वैद्यक खात्याची सुधारणा, ज्यूरींचा हक्क वाढविणें, हत्याराचा परवाना, मादक पदार्थांचा कायदा, मीठ व जंगलें याबाबत सवलती असे ठराव पसार झाले.

तथापि अशा मामुली कामगिरीनें त्या परिषदेचें वैशिष्ट्य तरी काय ? पुढें राष्ट्रीय सभेंत जे दोन तट पडले, आणि त्या मवाळ-जहालांच्या भांडणापेक्षां दोघांमधील एकोप्यानेंच राष्ट्रकार्य हें नेहमींच प्रभावशाली होईल असा सातारा जिल्ह्यानें जो आग्रह धरला-चालविला, त्या दोहोंचाही मुळवा अथवा उमट १९०० सालच्या प्रांतिक परिषदेंत पाहण्यांत आला.

त्याचें असें झालें कीं, अध्यक्षांच्या भाषणानंतर विषयनियामक कमेटीच्या निवडीसंबंधीं थोडा लढा पडला; तो कसाबसा मिटल्यावर निर्विवाद अशा विषयांवरील ठरावांचे मसुदे पार पडले. पण लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीचा प्रश्न निघाला तेव्हां एकदम रण माजलें. "दुष्काळी व्यवस्था, प्लेगचा प्रतिबंध, यःकश्चित् कारणांवरून केलेले वर्तमानपत्रावरील खटले, केसरीवरील खटला, नातूबंधूंची कैद, पुण्यावरील जादा पोलीस" वगैरेनीं सँढर्स साहेबांची भरलेली कारकीर्द अप्रिय झाल्याचें जाहीर करणारा ठराव, सँढर्स्ट साहेबांचें नांव गाळून पुढें मांडला तरी अध्यक्षपद सोडून जाण्याचा धाक परेख यांनीं घातला तेव्हां तो ठराव विषयनियामक कमेटींत परत घेण्यांत आला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. ........ नं. ........
ता. ........

विषयांबद्दल राष्ट्रीय सभेनें अवश्य काळजी घेतली पाहिजे. या तीन विषयांच्या वृद्धीप्रीत्यर्थ राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक प्रतिनिधीनें झीज सोसली पाहिजे." हें ता. २७ जुलै १८९१ रोजीं वृत्तसारानें प्रतिपादिलेलें मत हेंच सातारा जिल्ह्यांतील राष्ट्रीय चळवळींचा प्रथमपासून ध्रुवतारा असल्याकारणानें तदनुषंगिक विषयासंबंधींच सातारा जिल्ह्यांतील प्रतिनिधींनीं प्रांतिक परिषदांतूनसुद्धां आपल्या उत्साहाचा व क्वचित् भाषणांचा कारंजा केला. अशामुळें १८९७ सालची प्रांतिक परिषद साताऱ्यास भरावी ह्मणून दिनशा एदलजी वाच्छा यांच्या जोडीला करंदीकर, सहस्रबुद्धे, गो. वि. रानडे, गणपतराव फणसळकर यांची चिटणीस ह्मणून नेमणूक देखील झाली. पण प्लेगनें सारखी गांजणूक मांडल्यामुळें १९०० सालापर्यंत तो योगायोग जमला नाहीं.

त्यासालीं १२।१३ मे रोज शनिवार रविवा या दिवशीं साताऱच्या घाटे थिएटरांत दहावी प्रांतिक परिषद झाली. सिंधशिवाय सगळीकडचे २०० प्रतिनिधी आले होते. "प्रेक्षक अफाट." रा. ब. पाठक स्वागताध्यक्ष होते आणि गोकुळ भाई परेख अध्यक्ष होते. टिळक, आण्णासाहेब परांजपे, विजापूरकर, गोखले, छत्रे, नायर अशी मंडळी आली होती. फेरोजशहा मेथा न आल्यामुळें थोडा विरस झाला. तथापि परिषदेचें काम मोठ्या उत्साहानें होऊन दुष्काळ, प्लेग, नातूप्रकरण, १८२७ चा २५० वा ठराव रद्द करणें, गुप्त कमेट्या मोडणें, प्राप्ती-

वरील कर कमी करणें, वैद्यक खात्याची सुधारणा, ज्यूरींचा हक्क वाढविणें, हत्याराचा परवाना, मादक पदार्थांचा कायदा, मीठ व जंगलें याबाबत सवलती असे ठराव पसार झाले.

तथापि अशा मामुली कामगिरीनें त्या परिषदेचें वैशिष्ट्य तरी काय ? पुढें राष्ट्रीय सभेंत जे दोन तट पडले, आणि त्या मवाळ-जहालांच्या भांडणापेक्षां दोघांमधील एकोप्यानेंच राष्ट्रकार्य हें नेहमींच प्रभावशाली होईल असा सातारा जिल्ह्यानें जो आग्रह धरला—चालविला, त्या दोहोंचाही मुळवा अथवा उमट १९०० सालच्या प्रांतिक परिषदेंत पाहण्यांत आला.

त्याचें असें झालें कीं, अध्यक्षांच्या भाषणानंतर विषयनियामक कमेटीच्या निवडीसंबंधीं थोडा लढा पडला; तो कसाबसा मिटल्यावर निर्विवाद अशा विषयांवरील ठरावांचे मसुदे पार पडले. पण लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीचा प्रश्न निघाला तेव्हां एकदम रण माजलें. “ दुष्काळी व्यवस्था, प्लेगचा प्रतिबंध, यःकश्चित् कारणांवरून केलेले वर्तमानपत्रावरील खटले, केसरीवरील खटला, नातूबंधूंची कैद, पुण्यावरील जादा पोलीस ” वगैरेनीं सँढर्स साहेबांची भरलेली कारकीर्द अप्रिय झाल्याचें जाहीर करणारा ठराव, सँढर्स्ट साहेबांचें नांव गाळून पुढें मांडला तरी अध्यक्षपद सोडून जाण्याचा धाक परेख यांनीं घातला तेव्हां तो ठराव विषयनियामक कमेटींत परत घेण्यांत आला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. ........ नं. ........
ता. ........

पण अध्यक्षांचा धाक हा एक अधिकाराचा अतिक्रम आणि जो ठराव एकानें माघारी घेतला तो पुढें आणण्यास दुस-ऱ्यास तितकेंच स्वातंत्र्य. तेव्हां १२४ प्रतिनिधींच्या सह्यांनीं ता. १३ मेरोजीं अध्यक्षांच्या हातीं दोन अर्ज देण्यांत आले. एकांत सभेच्या संमतिशिवाय अनेक लोक विषयनियामक मंड-ळांत घेतल्याची तक्रार होती. दुसऱ्यांत असा ठराव मांडण्याची परवानगी मागण्यांत आली कीं "गेल्या कांहीं वर्षांत मुंबई सरकारच्या हातून कांहीं गोष्टी घडल्या त्या लोकांवर त्यांचा विश्वास नसल्यामुळें त्यांचा पाडाव करण्याच्या हेतूनें सरकारनें केलेल्या होत्या, याबद्दल प्रांतिक सभेस मोठी दिलगिरी वाटत आहे. आणि सभेची अशी प्रार्थना आहे कीं ही राज्यपद्धति बदलून त्याठिकाणीं लोकांवर विश्वास ठेवून त्यांच्या हिताकरतां झटण्याची इंग्रजी राज्याची जी उत्कृष्ट पद्धत आहे तिचा पुन्हा लवकरच स्वीकार करण्यांत यावा." पण टेबलावर अर्ज येतांच अध्यक्ष कावेरबावेर झाले व वय, अनुभव, विद्या, कार्याची आवड हीं सर्व बाजूला राहून, "परिषद बरखास्त करून राजिनामा देऊन निघून" जाण्याचा दपटशा त्यांनीं दाखविला. तेव्हां प्रकरण इतकें बेताला आलें कीं सभागृहाला गुजरीचें स्वरूप प्राप्त झालें. परिषद उधळली जाऊं नये ह्मणून करंदी-कर, सहस्त्रबुद्धे, फणसळकर वगैरे सातारकर मंडळींनीं दोन्ही पक्षांना सामोपचाराच्या गोष्टी सांगितल्या आणि टिळकांच्या

मार्फत अशी तोड सुचविली कीं अध्यक्षांनीं ठराव आणण्यास परवानगी न दिली तरी चालेल. परंतु अर्ज सह्यानिशीं समक्ष वाचून दाखवावा आणि तो दप्तरीं ठेवण्याची संमति द्यावी. ही तोड सर्व संमत ठरली. त्याप्रमाणें घडून आलें आणि "तड-जोडीच्या राजकारणाची राजधानी" असा सातारचा लौकिक झाला.

यानंतर, १९०७ सालीं राष्ट्रीय सभेंत सुरतेला ज्या जहाल–मवाळ अशा दोन फळ्या पडल्या त्यावेळीं साताऱ्याला विशेष खबरदारी घ्यावीशी वाटली. १९०६ च्या राष्ट्रीय सभेंत पसार झालेल्या स्वदेशी–बहिष्काराच्या ठरावांच्या अनुरोधानेंच १९०७ च्या प्रांतिक सभेंत धोरण ठेवण्याबद्दल प्रतिनिधींना बजावण्यांत आलें होतें. राष्ट्रीय मनोवृत्तीचा हा पारा सुरतेच्या बखेड्यानंतरही खालीं उतरून न देण्याबद्दल सातारा जिल्ह्यानें काळजी घेतली. ता. ११ आक्टोबर १९०८ रोजीं झालेल्या तिसऱ्या जिल्हासभेचे अध्यक्ष देसाई यांनीं स्पष्टच बजावलें होतें कीं, "हॅम्लेट नाटकांतील संविधानकाशीं तुलना करतां येईल अशी सुरतेच्या बखेड्यानंतरची आपली स्थिति आहे. टिळक–गोखले यांच्यासारखे जहाल–मवाळ पुढारी आह्मांला श्रेष्ठ आहेत. तेव्हां त्यांनीं एकी करून राष्ट्रीय सभेचें १९०८ चें अधिवेशन भरवावें आणि राजकीय प्रगति अखंड चालवावी."
'कन्व्हेन्शन कमेटी'तर्फें गोपाळराव देवधर व चिंतोपंत देवळे

आले होते, त्यांना अशा तऱ्हेनें सातारा जिल्ह्याचें मत कळलें, इतकेंच नव्हे तर प्रांतापुरती तरी एकी साधण्यासाठीं सातारा जिल्ह्यानें बांधलेला चंगही आढळला. दादासाहेब करंदीकर, गणपतराव फणसळकर, भाऊसाहेब सोमण प्रभृतींची एक कमेटी नेमून महाराष्ट्रांतील जहाल–मवाळांची प्रथम एकी साधण्यासाठीं त्या कमेटीनें खटपट करावी असें ठरलें. सदर ठरावाप्रमाणें वरील सातारकर मंडळीनीं २७ एप्रिल १९०८ रोजीं झालेल्या धुळ्याच्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष गणेश व्यंकटेश जोशी यांना मध्यस्थ घालून महाराष्ट्रांतील एकीचा प्रयत्न करण्याचें ठरविलें. कारण धुळ्याच्या परिषदेनें चिंतामणराव वैद्य, केळकर यांच्या चिटणीशीची एक कमेटी नेमून राष्ट्रीय सभेंत ऐक्य घडवून आणण्यासाठीं प्रयत्न केला होता; तो अनेक तऱ्हांनीं खटपटी करूनही फलद्रूप झाला नसला तरी गणेश व्यंकटेश जोशी यांनाच मध्यस्थ घालून ती जुळणी होईल अशी सातारकरांना खात्री होती. ह्मणून रा. ब. पाठक यांच्या स्वतंत्र प्रयत्नाप्रमाणेंच जोशांच्याकडे वरील सातारकर मंडळी जाऊं लागली, विसाव्या शतकाच्या तोंडाशीं गोखले वरिष्ठ कायदे-मंडळांत असतांना जोशांना अर्थशास्त्रीय गुरु मानूनच गोखले काम करीत याची आठवण जोश्यांना देऊन आपलें वजन गोखल्यांवर घालण्याबद्दल विनवूं लागलीं व प्रथम प्रथम प्रयत्नांत कांहीं यशाचा वास दिसला नाहीं तरी १९१४ सालीं साता-

त्यास प्रांतिक परिषदेचें अधिवेशन करून सातारकर मंडळींनीं मवाळ–जहालांना सांधलें व त्याचा विकास १९१६ च्या बेळगांवच्या प्रांतिक परिषदेंत ऐक्य प्रस्थापित होण्यांत झाला.

१९१४ ची प्रांतिक परिषद ही धुळ्यानंतर भरणारी पहिली होती. ती २६ एप्रिल रोजीं बेळगांवचे बेळवी यांचे अध्यक्षतेखालीं झाली. स्वागताध्यक्ष दादासाहेब करंदीकर होते. मवाळ–जहालांच्या एकीवरच दोघांनीही आपआपल्या भाषणांतून भर दिला होता. नानासाहेब आगाशांनीं अध्यक्षांची सूचना मांडली, फणसळकरांनीं विषयनियामकमंडळांत प्रामुख्यानें भाग घेतला, १९११ च्या राजभेटीबद्दल आनंदाभिनंदनाचा पहिला ठराव रा. ब. पाठकांनीं सभेपुढें ठेवला, कायदेमंडळांच्या क्षेत्र-विस्ताराबद्दल करंदीकरांनीं ठराव पुढें आणला, कुलकर्णी वतना-वरील ठरावावर तासगांवच्या रामभाऊ कुलकर्ण्यांनीं अनुमोदनपर व पालीच्या धोंडोपंत कुलकर्ण्यांनीं पुष्टीपर भाषण केलें, आयु-र्वेदीय औषधासंबंधींच्या ठरावास डॉ. भिडे व वाईचे वैद्य गाडगीळ यांनीं उचलून धरलें, लोकलबोर्डांच्या सुधारणेबद्दल आण्णासाहेब चिरमुल्यांनीं प्रस्ताव केला, घाणेकर वकीलांनीं जिल्हाबाबीसंबंधीं कलेक्टरांनीं लोकांना विश्वासांत घेऊन चालावें असा ठराव होता त्याला पुष्टी दिली, अबकारीवरील ठरावास श्रोत्री वकिलांनीं अनुमोदिलें, तेंच काम लँड रेव्हेन्यू बिलाबाबतच्या ठरावावर मुतालिक वकीलांनीं केलें. म्युनिसिपल

बिलाविषयीं नापसंतीचा ठराव तासगांवच्या रामभाऊ कुळ-कर्ण्यांनीं व प्रेस ॲक्टसंबंधींचा ठराव भाऊशास्त्री लेल्यांनीं सभेपुढें जारी केला अगर आनंदराव अमृतराव शिंदे यांनीं लँड-रेव्हेन्यू पॉलिसीवरील ठरावास पुष्टी दिली, वगैरे सातारा जिल्ह्यांतील लोकांनीं १९१४ च्या प्रांतिक परिषदेंत घेतलेला भाग केवळ मामुली होय.

तथापि २५० च्या २५० प्रतिनिधींना जें कांहीं पटलें व समाधानाचें वाटलें तें हें. महत्कार्य साधत असल्यास क्षुल्लक गोष्टी बाजूला ठेवण्यानें मन उदार होतें. हें तत्त्व कांग्रेसच्या दोनही पक्षांतील मंडळींच्या वारंवार नजरेस आणून सातारकर मंडळीनीं समेटाचा ठराव सगळ्यांना संमत होईल असा बेळवींच्या नेतृत्वाखालीं मंजूर करून घेतला, हेंच तें कार्य होय. परिषदेकरतां साताऱ्यास मंडळी आल्यापासून विषय नियामक मंडळांत व ता. २८ एप्रिल रोजीं सभेच्या सुरवातीपर्यंत दोनही पक्षांत कडाक्याचे वाद चालत. पण ऐक्याचें महत्त्व सगळेच ओळखत असल्यामुळें सरतेशेवटीं नगरच्या चितळ्यांनीं मांडला व शिवरामपंत परांजप्यांनीं अनुमोदिला तो प्रथम प्रांतिक तरी ऐक्य साधणारा ठराव असा:— " बेळवी, पाठक, चिंतामण-राव वैद्य, चितळे, पाटणकर, देशपांडे, साने, या गृहस्थांना राष्ट्रीय सभेतील दोनही पक्षांचा पुढें दिलेल्या अटीवर सलोखा घडवून आणण्याचा प्रयत्न करण्याचा अधिकार देण्यांत आला

आहे. ती अट अशी—ब्रिटिश साम्राज्यांतील कोणत्याही सार्वजनिक संस्थेनें किंवा जाहीर सभेनें प्रतिनिधि ह्मणून निवडून दिलेल्या प्रत्येक मनुष्याचा काँग्रेसमध्यें प्रवेश व्हावा; मात्र त्यानें हिंदी राष्ट्रीयसभा—नियमावलीच्या पहिल्या नियमांतील सर्व अटी मान्य आहेत अशी लेखीं कबुली दिली पाहिजे." राष्ट्रीयसभा नियमावलींतील पहिला नियम "ब्रिटिश साम्राज्यांतील स्वतंत्र वसाहतींच्या राज्यपद्धतीप्रमाणें राज्यपद्धती हिंदुस्थानला प्राप्त करून घेणें हें हिंदी राष्ट्रीय सभेचें ध्येय असून तें साध्य सनदशीर उपायांनीं प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावयाचा."

सुरतेनंतर मवाळपक्षानें उत्पन्न केलेल्या घटनेंतील कडक अटीमुळें काँग्रेसची मर्यादा संकुचित झाली होती ती विस्तृत करावी, तिचें वर्तुळ वाढवावें याच एका हेतूनें वरील ठराव आणला असल्या कारणानें आणि त्याला मुदतही राष्ट्रीयसभांच्या दोन अधिवेशनांचीच असल्याकारणानें तो ठराव सर्वसंमत झाला. "क्षुल्लक मतभेद बाजूला ठेवून भावाप्रमाणें हातांत हात घालून राष्ट्रकार्यास तयार झाल्यास राष्ट्राची शक्ति वाढेल" असें गोपाळराव गोखल्यांचें वचन आहे. त्याचाच अनुभव पुढें येत गेला. लखनौच्या राष्ट्रीय सभेंत सातारकरांनीं १९०८ सालापासून धरलेल्या इच्छेला गोड फळ आलें.

उघडच १९१५ चे पुण्यास भरलेल्या प्रांतिक परिषदेचे अधिवेशनास ( ता. ८।९।१० मे ) सातारा जिल्ह्याचे

९१ प्रतिनिधी मोठ्या उत्साहानें गेले. बॅप्टिस्टांचे अध्यक्षतेखालील त्या परिषदेंत दादासाहेब करंदीकरांनीं अबकारीसंबंधाचा, व लोकांच्या राजकीय आकांक्षा पूर्ण करण्याचे कामीं लॉर्ड हार्डिंज यांची मुदत वाढविण्याचा उपयोग कांहीं होईल अशा आशयाचा दुसरा ठराव मांडला. कुलकर्णी वतनावरील ठरावास पालीच्या धोंडोपंत कुलकर्ण्यांनीं अनुमोदन दिलें, व नरसिंह चिंतामण केळकरांच्या नेतृत्वाखालीं परिषदेचें काम चालू राहण्याकरतां पगारी लोकांची वर्षभर नेमणूक करावी असा आप्पासाहेब आळतेकर यांनीं ठराव मांडला.

यापुढें १९१७ च्या प्रांतिक परिषदेंत सांगलीच्या गणपतराव अभ्यंकरांनीं स्वराज्याचा ठराव मांडला. १९२० च्या सोलापूर येथील प्रांतिक परिषदेंत पंजाब प्रकरणीं कॉंग्रेस कमेटीच्या रिपोर्टाची मुक्तता व विलायतेस शिष्टाई आणि राजकीय कैद्यांची ( उडतरें प्रकरणांतीलसुद्धां ) सुटका या विषयांवरील ठरावास दादासाहेब करंदीकरांनीं पुष्टी दिली, आणि लँड ॲक्विझिशन बिलाच्या दुरुस्तीसंबंधीच्या ठरावाला तसाच शब्दभार मारूलकर वकिलांनीं लावला.

१९२१ सालीं असहकाराच्या पोटीं कॉंग्रेसनें आपल्या कारभारासाठीं भाषानिहाय प्रांतरचना केली व तेव्हांपासून पूर्वीच्या मुंबई इलाखा प्रांतिक परिषदेऐवजीं महाराष्ट्र प्रांतिक परिषद स्वतंत्र भरूं लागली व सातारा जिल्ह्याचा तिच्यांतच

अंतर्भाव झाला. या योजनेप्रमाणें १९२२ सालीं पें।। येथें दुसरी प्रांतिक परिषद भरली असतां काँग्रेस कार्यक्रमाबद्दलच्या ठरावास सोमणांनीं पुष्टी दिली इतकेंच नव्हे, तर त्यांची नेमणूक महाराष्ट्रांतील ब्राह्मण ब्राह्मणेतर एकत्र आणण्याच्या कमेटीवर ही झाली.

तथापि असहकाराचा ऐनभर संपत आला आणि त्याला किंचित् ओहोटी लागण्यास १९२२ सालींच सुरवात झाली होती. त्याचें एक कारण असें होतें कीं १९१४ पूर्वी मवाळांच्या घटनेनें जसें संकुचित स्वरूप राष्ट्रीय सभेला प्राप्त झालें होतें, त्याचप्रमाणें असहकारांतून उत्पन्न झालेल्या घटनेनेंही येऊं पहात होतें. " म. गांधींनीं कांग्रेसची धुरा हातीं घेतल्यापासून देशांत जें ओत उत्पन्न झालें तें कमी न होतां कांग्रेस संस्था सर्व संग्राहक कशी करतां येईल हा प्रश्न सोडविणें " त्यावेळीं अगत्याचें होतें. " सुतास मत, हीच कांग्रेसच्या सभासदत्वाची मुख्यत्वें लायखी " त्यावेळीं गणली जाई. " देशांतील सर्व पक्षांचा समावेश कांग्रेसमध्यें व्हावा व असहकारवादी उजव्या डाव्या बगलांचे शक्तिसर्वस्व कांग्रेसच्या विधायक कार्यक्रमाच्या यशस्वितेवर एकवटलें जावें ही गोष्ट सुकर होण्याकरतां " १९०० व १९१४ प्रमाणेंच सातार्‍यास पुनः एकदां एकीचा प्रयत्न करावा या सदिच्छेनें प्रेरित होऊन सातारा जिल्ह्याचे पुढारी दादासाहेब करंदीकर व जिल्हा कांग्रेस

कमेटीचें अध्यक्ष आप्पासाहेब आळतेकर या उभयतांनीं जळगांवास १९२५ च्या प्रांतिक परिषदेला साताऱ्यास आमंत्रण दिलें.

११ व १२ मे रोजीं बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं साताऱ्यास प्रांतिक परिषद भरली व यशस्वी-पणानें पार पडली. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या जिल्ह्यांतून कांहीं नाफेरवाल्याशिवाय सर्व पक्षांचे सुमारें ३०० प्रतिनिधी हजर होते त्यामुळें अमृतसरच्या कांग्रेसची प्रत्येकाला आठवण होई.

सांगलीच्या विठ्ठलराव जोशांनीं व आप्पासाहेब आळते-करांनीं, रामराव देशमुखांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें ह्मणून ठराव मांडला, आणि देशमुखांनीं अध्यक्षस्थान स्वीकारल्यावर मुख्य प्रश्नासंबंधीं ते ह्मणाले कीं, "सुताला मत हें तत्त्व जेव्हां कांग्रेसनें मान्य केलें तेव्हां असें सांगण्यांत आलें कीं, कर्तृत्ववान मनुष्य हा या संस्थेचा सभासद पाहिजे. सूत काढणारा हाच कर्तबगार ही व्याख्या कोठली ?" पण त्यापूर्वी स्वागताध्यक्ष सोमण यांनीं या सुताच्या अटीसंबंधीं चार पर्याय सुचविले होते ते असे:–(१) स्वतः कातलेलें सूत देऊन सभासद होणें (२) सुताच्या किंमतीदाखल अल्पशी वर्गणी रोखीनें देऊन कांग्रेसच्या विधायक कार्यक्रमापैकीं एखाद्या बाबीप्रीत्यर्थ प्रत्यही विवक्षित काल अंगमेहनतीनें खर्ची घालणें (३) रोखीनें वर्गणी देऊन कांग्रेसच्या बहिष्कार कमेटीनें ज्या विदेशी वस्तूंचा बहिष्कार व्यवहार्य आहे असा अभिप्राय दिला आहे, त्यांपैकीं एकाहून

अधिक वस्तूंचा बहिष्कार आचरणांत आणूं असें प्रतिज्ञापूर्वक कबूल करणें (४) रोखांनें वर्गणी देऊन शहरांत स्थायिक झालेल्या कोणाही सुबुद्ध अगर पांढरपेशा माणसानें खेडेगांवच्या परिस्थितीचा अभ्यास करण्याकरतां व विधायक कार्यक्रम प्रसृत करण्याकरतां किमानपक्षीं पंधरा दिवस राहण्याची अट पाळणें. या पर्यायावरून सुतास मत ठेवण्यांतील जो हेतु कीं प्रत्येक राष्ट्रभक्तानें शेतकरी–गरीब वर्गाशीं समरस झाले पाहिजे, तो सोमणांनीं बिलकुल दृष्टीआड केला नव्हता. ह्मणूनच ज्या वेळीं सुताची वर्गणी रद्द करून रोख पैशांचीच वर्गणी ठेवण्या-बद्दल परिषदेंत ठराव आला, तेव्हां गणपतराव मारूलकर व गणपतराव आळतेकर यांनीं "सुतांत किंवा पैशांत" वर्गणी घ्यावी असा विकल्प सुचविला. हकीमनीं विरोधही केला. पण शेवटीं "हिंदुस्थानच्या राजकारणाची गाडी फिरून लोक-मान्यांच्या मार्गावर आणण्याचा निश्चय महाराष्ट्रानें जाहीर केला" व सुताची वर्गणी रद्द होण्याचाच ठराव जवळ जवळ एकमतानें पसार झाला आणि तशा एकमतामुळें परिषद बोला-वणाऱ्या सातारकरांचा हेतु सफल झाला. या सभेस विठ्ठलभाई पटेल, मिसेस बेझंट, केळकर प्रभृति मंडळी हजर होती.

राष्ट्रांत उत्पन्न झालेलें ओज कमी होऊं न देतां, राष्ट्रांत ऐक्य नांदेल अशी काळजी घेऊन बहुजनसमाजाच्या हिताचे कार्यक्रम करावयाचे, हा सातारा जिल्ह्याचा ब्रीदमंत्र असल्यामुळें

१९२८, १९२९ व १९३१ च्या प्रांतिक परिषदांतून जिल्ह्यांतील लोकांनीं त्याच दृष्टीनें भाग घेतला. मुंबई सरकारच्या जमीनमहसुलाच्या अरेरावी धोरणाच्या निषेधास नानासाहेब देशपांड्यांनीं पाठिंबा दिला, सायमन कमिशनवरील बहिष्काराचा ठराव सोमणांनीं मांडला, ब्रिटिश मालावरील बहिष्काराचा ठराव आप्पासाहेब आळतेकरांनीं मांडला व महादेवशास्त्री दिवेकरांनीं त्यास पुष्टी दिली, स्वदेशीचा ठराव पांडुआण्णा शिराळकरांनीं सादर केला, अबकारी धोरणाच्या निषेधाच्या ठरावास दतुनाना करंदीकरांनीं पुष्टी दिली, जिल्हानिहाय शंभर तरी स्वयंसेवक तयार करावे ह्मणून राष्ट्रीय स्वयंसेवकदल स्थापण्याचा डॉ. आठल्ये यांनीं ठराव मांडला आणि प्रचारक मंडळांत सोमणांची नेमणूक झाली ( १९२८ ). त्याचप्रमाणें १९२९ च्या प्रांतिक परिषदेंत साताराच्या ग्रामसेवासंघाच्या कार्याला मान्यता मिळाली, मद्यपान–बंदीच्या ठरावाला दतुनाना करंदीकरांनीं दुजोरा दिला, परदेशी कापड बहिष्कार व खादीप्रसार हा ठराव आप्पासाहेब आळतेकरांनीं जारी केला, या गोष्टी प्रामुख्यानें लक्षांत ठेवल्या, तर " राजशक्तेरधिष्ठानं लोकशक्तिर्विशिष्यते । " आणि ती लोकशक्ति समर्थ व्हावयास ऐक्य व त्या ऐक्याचा पाया बहुजनहितबुद्धीची सेवा असेल तरच भारतमाता अभ्युदय पावेल, हा सातारा जिल्ह्याचा आचरण सिद्धांत प्रत्येकास पटेलच पटेल.

---

# भाग तिसरा.

## जिल्हासभा.

### प्रकरण १ लें.

१९२९ सालच्या प्रांतिक परिषदेच्यावेळीं डॉ. ॲनीबेझंट यांचें भाषण होऊन त्यावेळचे शेतकी खात्याचे मुंबईसरकारचे दिवाण ना. देहलवी यांच्या हस्तें स्वदेशीप्रदर्शन आणि आण्णासाहेब शिंदे यांचे अध्यक्षतेखालीं सामाजिक परिषद साजरी झाली. त्या तीनही प्रकरणीं हें स्पष्ट निदर्शनास आलें कीं तपाशिलापेक्षां तत्त्वाचरणाला आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर असल्या शुष्क वादापेक्षां जातीवंत राष्ट्रीयत्वाला सातारा जिल्हा अधिक मानीत असून समाजांत उत्पन्न झालेलें ओज-तेज लवमात्र खालीं न आणतां सर्वांचें ऐक्य साधून सातारा जिल्हा प्रगति करूं इच्छितो.

म्हणून बहुजन समाज लोकशाहीसाठीं तयार व्हावा या दृष्टीनें सातारा जिल्ह्यानें सातत्यानें ज्या एका संस्थेमार्फत सेवा केली आहे, ती संस्था म्हणजे सातारा-जिल्हा-सभा होय. या संस्थेची कल्पना व स्थित्यंतरें १८९२ पासून १९०६ पर्यंत कशीं होत आलीं हें एकदां येऊन गेलें आहे. तेव्हां पुनरावृत्ति न करतां येथें एवढेंच सांगणें जरूर आहे कीं "कोकोनाडा व चिंगळपट येथील समारंभासारख्या जिल्हासभा मुंबई इलाख्यांतही भरवा", अशी सूचना २१ जून १९०३ रोजीं प्रतोदनें केली

असली तरी, सातारा जिल्ह्यांत जी जिल्हासभा मूळ धरून बसली ती १९०६ च्या राष्ट्रीयसभेच्या त्या अर्थाच्या ठरावा नंतरच होय. " राष्ट्रीयसभेच्या हेतूचा प्रसार करणें, राष्ट्रीय सभेला लागणारी माहिती गोळा करणें, जिल्ह्याच्या औद्योगिक उन्नतिप्रीत्यर्थ झटणें "या उद्देशांनीं तालुक्यातालुक्यांचें मत घेऊन व तालुका सभा स्थापून जिल्हासभा ता. ३० जून १९०७ रोजीं घाटे थिएटरांत दादासाहेब करंदीकरांच्या हस्तें अस्तित्वांत आली, ती आजतागायत आपलें काम बहुजनसमाजाच्या व लोकशाहीच्या सेवाबुद्धीनें करीत आहे. त्याची कल्पना सोबतच्या तक्त्यावरून थोडीशी येईल जिल्हासभेच्या पहिल्या अधिवेशनाची हकीकत सांपडते ती अशीः--

" रविवार ता. ३० जून रोजीं ( १९०७ ) जिल्ह्यांतील पुढाऱ्यांची जाहीर सभा झाली. तालुक्यांतून सुमारें ६० प्रतिनिधी आले होते. प्रथम ४॥ वाजतां राष्ट्रगीत होऊन फणसळकर वकिलांनीं दादासाहेबांच्या खटपटीचें यश सांगून जिल्हासभा स्थापण्याचा सुयोग आला वगैरे सांगितलें. व कऱ्हाड—तासगांवचे जोग यांनीं सुचविलें, बहुलेकर यांनीं अनुमोदिलें. तेव्हां करंदीकर अध्यक्षस्थानापन्न झाले. जिल्हासभा स्थापनेचा ठराव रहिमतपूरच्या परांजप्यांनीं मांडला व तासगांवच्या रामभाऊ कुलकर्ण्यांनीं अनुमोदिला. ( २ ) ठिकठिकाणीं झालेल्या व होणाऱ्या तालुकासभांनीं निवडून दिलेले इसम जिल्ह्यासभेचे सभासद समजले जावे असा ठराव विट्याचे पेंडसे वकीलांनीं मांडला, त्यास इसलामपूरच्या पाटणकर वकिलांनीं अनुमोदन दिलें. ( ३ ) जिल्हासभेच्या उद्देशांचा ठराव नानासाहेब आगाशेनीं

अ.नं

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ८११
वा. ३
ता.
ठाणे

मांडला व इसलापूरच्या देसाई वकिलांनीं पोक्त भाषण करून आणि वैद्यांनीं ( वाई ) मार्मिक विनोदी बोलून अनुमोदिला व दुजोरिला. ( ४ ) जिल्हासभेचे कार्यकारी मंडळ म्हणून इसलामपूरचे दळवी, रहिमतपूरचे परांजपे, विट्याचे पेंडसे, वाईचे अभ्यंकर व अष्टपुत्रे, तासगांवचे भिडे, कऱ्हाडचे बहुलेकर, खटावचे वैद्य, दहिवडीचे पोतदार, सातारचे आगाशे, दिवेकर, भिडे व घाणेकर असे सभासद, अध्यक्ष करंदीकर, व चिटणीस फणसळकर असे नेमावे असा ठराव कऱ्हाडचे शिराळकर यांनीं मांडला, हरिदास घमंडे बुवांनीं सुश्राव्य भाषणानें अनुमोदिला व वाईच्या अभ्यंकरांनीं दुजोरिला. शेवटीं दळवी, अष्टपुत्रे, अभ्यंकर, शंकरशास्त्री महाजन, जोग, घोडके, (खटाव) पोत-दार ( म्हसवड ) जोशी ( जावली ) यांचीं भाषणें झालीं ''

या प्रकारें सुरू झालेल्या जिल्हा सभेचीं पहिली ९ अधिवेशनें चिटणीस म्हणजेच स्वागताध्यक्ष धरून झालीं त्यापुढें चिटणीस व स्वागताध्यक्ष हीं कामें निरानिराळ्या व्यक्ती करूं लागल्या. वडगांव ( १९२७ ) च्या जिल्हा सभेपासून कार्यकारी मंडळाच्या बैठकी तालुक्यांच्या निरनिराळ्या ठिकाणीं बाबुराव वैद्यांच्या सूचनेप्रमाणें भरूं लागून वर्षभर जिल्हासभेची जागृति राहूं लागली. तत्राप यापेक्षांही जिल्हासभेच्या चरित्राचा विचार करतांना तिचें १९२१ अखेरचें सर्वपक्षीय स्वरूप आणि त्यानंतरचें केवळ राष्ट्रीयसभानिष्ठ स्वरूप हीं सहजच डोळ्यांत भरतात. फिरून या दोनही स्वरूपांत बारकावे आहेत ते निराळेच.

सातारा-जिल्हा-सभा सर्वपक्षीय होती तरी १९०७

च्या सुरतेच्या राष्ट्रीयसभेनंतर हिंदुस्थानांतील अर्भकाप्रमाणेंच तिच्यावर गंडांतर येतें कीं काय अशी भीति होती. डिस्ट्रिक्ट कांग्रेसकमेटीचे अध्यक्ष घाणेकर वकील व चिटणीस फणसळकर व आगाशे ही मंडळी टिळकांच्या पक्षाला अनुयायी म्हणूनच होती असें नव्हें तर कन्व्हेंशनचे सभासद झालेले रांगोळे, दत्तोपंत जोशी, नजमुद्दीनशेट आणि अष्टपुत्रे व डॉ॰ भिडे, इत्यादि मंडळी ' राष्ट्रीय – पक्षाला समाविष्ट करून घेऊन होणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या ' बाजूची होती. फार काय, वरील मंडळी शिवाय श्री. वि. जोशी, वामनराव गोवईकर, रणभोर, श्रोत्री, वासुदेवराव सहस्रबुद्धे, मुंडले, सीताराम गुजर, वासुदेवराव गोळे, रघुनाथराव महाबळेश्वरकर, पुरुषोत्तमशेट गुजर, दत्तोपंत चितळे, सोमण, लक्ष्मणराव आपटे, गणपतराव रामदास वगैरे साताराची २९, वाईची १२, जावलीचे साहेबसा व जोशी, खटावचे वैद्य-इनामदार, विट्याचे पेंडसे, चावरे, लिमये, रानडे आदिकरून मंडळी राष्ट्रीय पक्षाचा अंतर्भाव करणाऱ्या राष्ट्रीयसभेच्या बाजूची असल्याबद्दल जाहीर झालें होतें. व राज्योपाध्ये, पाठक, दिवेकर, लक्ष्मणराव जोशी हेही वरील मंडळींत समाविष्ट होते. पण उलट ता. २ डिसेंबर १९०८ रोजीं कन्व्हेन्शनतर्फे होणाऱ्या मवाळांच्या राष्ट्रीय सभेला रा. ब. पाठक, लक्ष्मणराव जोशी, दिवेकर, नाबर, कडूस्कर, कऱ्हाडचे भागवत-मारूलकर असेही प्रतिनिधी जाहीर झाले होते. पण तिसऱ्या जिल्हासभेंत म्हणजे आक्टोबर १९०८ मध्येंच असा ठराव पास झाला होता कीं, " अलाहाबाद येथें १८ व १९ एप्रिल रोजीं कन्व्हेन्शनच्या सभेंत पास झालेल्या तर्जुम्यांतील आर्टिकल नं. १ मधील

राष्ट्रीय सभेचे हेतु सातारा जिल्ह्यासभेस मान्य आहेत'' त्यामुळें व राष्ट्रीय आणि प्रागतिक पक्षांत प्रांतापुरती तरी एकी घडवून आणावी या उद्देशानें पाठक, आगाशे, फणसणकर यांची कमेटीही नेमली होती. या योजनेंतील साताराजिल्ह्याचें मन स्पष्टपणें पाठकांसच कळलें असें नाहीं तर रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांसही पटलें, आणि जोशांच्या मार्फतच प्रांतिक जहाल – मवाळांचें व त्यायोगें भारतीय जहालमवाळांचें ऐक्य साधण्याचा मनसुबा असल्याकारणानें सातारा जिल्ह्यांतील दुफळी टळली. टिळक गोखल्यांच्यामुळें महाराष्ट्र याकाळीं राष्ट्रीयसभेंत अग्रेसर होता तेव्हां त्यांची एकी होऊन १९०६ चे कलकत्ता कांग्रेसमध्यें स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीमुळें उत्पन्न झालेल्या अंशाखालीं जनतेनें जातां कामा नये अशी दक्षता घेतली पाहिजे, ही सातारा जिल्ह्याची दृष्टी जोशांस पटल्यामुळेंच त्यांच्यामार्फतीनें पुष्कळ वाटाघाटी झाल्या, पण जोशांच्या हयातींत त्या वाटाघाटींना यश आलें नाहीं.

तिसऱ्या जिल्हा सभेंत कन्व्हेन्शनतर्फें गोपाळराव देवधर आदि मण्डळी आली होती आणि त्यांच्या बुद्धिवादास शिराळयाच्या बाळाजी दामोदर प्रभृतींनींच बुद्धिवाद सांगून विषयनियामकमंडळांत गप्प केलें होतें. कलकत्त्याच्या चतुःसूत्रींचा प्रभाव अशा तऱ्हेनें कानावर असलेले जोशी सातारा जिल्ह्याच्या तेजोरक्षणतत्परतेचें व ऐक्याबद्दलच्या उत्सुकतेचें स्वाभिमान कौतुक करीत. म्हणूनच, १९०७ ते १९१० ह्या काळीं स्वदेशीबद्दल सातारा जिल्हा सरसावल्यांमुळें सरकारी इतराजीस पात्र झाला

असतां, दडपशाहीनें दबलेल्या लोकांना धीर देण्याकरतां गणेश व्यंकटेश जोशी बोलावल्याबरोबर जिल्हासभेला प्रेक्षक म्हणून येत, आपल्या सल्लामसलतीचा फायदा देत आणि आपल्या अर्थशास्त्रीय सम्यग् ज्ञानावर आधारलेलें एकादें व्याख्यानही देऊन जात.

" नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता " असा जोशीं-सारखा गृहस्थ पाठीशीं आशीर्वादाचे हात उभारून असल्या-मुळें त्या धीरावर १९१३ अखेर सातारा जिल्हासभा स्थिरपणें भरत आल्या, १९१४ ची प्रांतिक परिषद भरवून मवाळ-जहालांच्या एकीचा पाया सातारा जिल्ह्यानें घातला व पुढें लोकमान्य मंडालेहून परत आल्यावर त्यांच्या स्वराज्य संघाच्या-होमरूलच्या चळवळींत समरस झाला.

काँग्रेसस्कीमच्या ऐवजीं माँटफोर्ड सुधारणा आल्या आणि अपुऱ्या, असमाधानकारक अशा असल्या तरी त्या राबवून घ्यावयाच्या असें ठरलें, तरी रौलट ॲक्ट व जालियन-वालाबाग यांच्या कृपाप्रसादानें राष्ट्रांत जो असहकाराचा कल्लोळ उठला, त्यांत १९२१ सालीं विठ्ठलभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या जिल्हासभेनें असा आज्ञापक सूर काढला कीं राष्ट्रीयसभेंतील असहकाराचा कार्यक्रम ज्यांना झेपेल, तेवढ्यांनींच जिल्हासभेच्या निशाणाखालीं रहावें. १९१८ सालीं कऱ्हाडास खाडीलकरांच्या अध्यक्षतेखालीं माँटफोर्ड सुधारणांसंबंधीं मतप्रदर्शन करण्याकरतां जिल्हासभेचें जादा अधिवेशन भरवून सातारा जिल्ह्यानें जो दम दाखविला होता, त्याला अनुरूप असाच १९२१ चा सूर होता. तथापि असहकाराचें तत्त्व राष्ट्रीय तेजोवर्धक असल्याचें कबूल

असूनही तपशिलाबाबत मतभेद असणारांचा संग्रह १९२१ च्या जिल्हासभेंत निघालेल्या आज्ञापक सुरांत नव्हता. तेवढ्यासाठीं असहकाराचा ऐन भर होता तोंपर्यंत हा प्रश्न कोणीं धसाला लावला नाहीं तरी आगष्ट-सप्टेंबरमध्यें त्यासंबंधीं वाटाघाटी सुरू झाल्या, आणि १९२२ पासून जिल्हासभेचीं अधिवेशनें जिल्हा कांग्रेसकमेटीच्या वतीनें व परवानगीनेंच भरण्याचें ठरलें. त्याप्रमाणें इसलामपूर येथें वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं • जिल्हासभेचें पहिलें अधिवेशन भाऊराव वैद्य यांच्या पुढाकारानें भरलेंही. त्या अधिवेशनांत कौन्सिलप्रवेशाच्या प्रश्नाचे निमित्तानें उलटसुलट बुद्धिवाद सांगण्यांत आले आणि तडजोड म्हणून परवानगीवजा कौन्सिलप्रवेशाला मान्यता देणारी एक उपसूचनाही आली. पण बहिष्काराचाच ठराव जिल्हा सभेनें मान्य केला.

"सुतास मत," व कौन्सिल बहिष्कारामुळें लोकमताच्या खोट्या नांवावर होयबांना हाताशीं धरून सरकारनें चालविलेला खेळखंडोबा पहावत नाहीं अशी एक फळी; तर बहुजनसमाजाच्या जीवितजपणुकीचा प्रश्न हातीं घेऊन स्वावलंबनानें स्वराज्य मिळवूं पाहणाऱ्या असहकाराच्या कार्यक्रमाला उचलून धरणारे निष्ठावंत आज चारच असले तरी त्यांच्या तपश्चर्येच्या जोरावरच सगळी जनता त्यांच्या मागून येईल या श्रद्धेनें सरकार कशाला लोकमत म्हणते याची पर्वा न करणारी दुसरी फळी; पाहिली व्यवहार सावध तर दुसरी तत्त्वजीवन. राष्ट्रीय पक्षांतीलच या दुपाखी संसाराची तोंडमिळवणी करणारा कोणी सर्वमान्य "गणेश व्यंकटेश" सातारा जिल्ह्याला लाभला असतां तर बरें झालें असतें तो न

लाभल्यामुळें हे दोन्हीपक्ष एकमेकांवर कोलमडून न पडण्याची दक्षता दाखवीत होते तरी जिल्हासभेला " येतां अपरिचित काळ नवा, सुखानें ध्येय मनीं सेवा। स्वकर आवरा, कूर्मगुरु करा ॥ " हा उपदेशच आचरणांत आणावा लागला.

सामुदायिक प्रगति ही सुवर्णमध्यानें होते आणि हा सुवर्णमध्य फक्त तपशिलाच्या बाबतींतच साधावयाचा असतो. कांग्रेसमधील स्वराज्यपक्षाची स्थापना आणि त्यायोगें अखिल भारताच्या वातावरणांत झालेले फेरबदल यांचा व्हावयाचा तोच परिणाम सातारा जिल्ह्यावरही झाला आणि सातारा जिल्हासभा १९२७ ला फिरून वडगांव ( जयराम स्वामींचें ) ला भरली. आणि तेथून तिचीं अधिवेशनें - कायदेभंगाच्या चळवळींतील सरकारी दडपशाहीचा प्रतिबंध सोडला तर - नियमितपणें १९३४ अखेर भरत आलीं आहेत.

सन १९२१ पर्यंत सातारा जिल्हासभा साधारणपणें तालुक्यांच्या गांवीं अगर रहिमतपूरसारख्या तालुक्यांतील प्रमुख गांवींच भरत असे. पण असहकारांतून बहुजनसमाजाच्या जीवनाशीं होऊन राजकारणाचे खरेखुरे भागीदार जर खेडकरी शेतकऱ्यांना करावयास हवे आणि त्यादृष्टीनें जिल्हासभेचें अधिवेशन जर हें एक राजकीय शिक्षण आहे तर जिल्हासभेचीं अधिवेशनें तालुक्यातालुक्यांच्या पोटांतील खेडेगांवांत झालीं पाहिजेत. ही कल्पना पटल्याबरोबर जयरामस्वामींचें वडगांव, लिंब, चाफळ, मसूर, बिळाशी अशी गिरकी जिल्ह्यासभेच्या अधिवेशनांनीं घेतली. स्थळाप्रमाणेंच काळासंबंधीं विचार करतां मवाळ-जहालांची एकी करणारी प्रांतिक परिषद भरवून ती यशस्वी करण्याच्या कामांत कार्य-

कै. ग. ब. फणसळकर



कै. ना. गोखले



कै. रा. ब. विठ्ठलराव पाठक



जन्म ४-५-१८६४ मृत्यु ५-२-१९२३

जन्म १८४० मृत्यु २७-१-१८

कर्त्यांची उत्साहपूर्ण सवड आटल्यामुळें १९१४ सालीं, १९२२ ते १९२७ मधील काळांत असहकाराच्या तपशीलावरून होणारा राष्ट्रीयांचा गृहकलह टाळण्यासाठीं व १९३२ व १९३३ सालीं कायदेभंगाच्या धूमधडाक्यांत जिल्हासभा बंद राहिली आहे. एरवी ती नियमानें भरली आहे आणि या तिच्या नियमितपणाबद्दल केसरी, बापूजी अणे, चिंतामणराव वैद्य अशांनीं कौतुकही केलें आहे. आतां दरेक सालीं कार्यकर्त्यांच्या, बोलावलेल्या अध्यक्षांच्या आणि राष्ट्रीय चळवळींच्या ओघांच्या दृष्टीनेंच जिल्हासभेचे दिवस धरण्यांत आले, ही गोष्ट खरी. पण स्थळ काळ कोणतेंही असलें तरी जिल्हासभेचे ठराव आपआपल्या तालुक्यांत व पंचक्रोशींत प्रसृत करण्याची जबाबदारी जिल्हासभेच्या प्रतिनिधींवर व हितचिंतकांवर १९०७ प्रमाणेंच म्हणजे आरंभासारखीच नेहमींही आहे. याबाबतींत जिल्हासभेचें स्थळ, काळ व कार्यकारी मंडळाच्या फिरत्या बैठकी तुलनात्मक दृष्ट्या स्थायी कार्य अपेक्षइतकें कसें करूं शकतील ?

तथापि हा प्रश्न कोणी काढीतही नाहीं. स्वागतसभासद, प्रेक्षक व प्रतिनिधी यांबाबत जिल्हासभेच्या पहिल्या अधिवेशनाचे वेळीं जो उत्साह दिसला तसा पुढें स्वदेशी चळवळींच्या निमित्तानें सरकारनें निर्माण केलेल्या दहशतशाहीस बावरून जनतेला दाखवतां आला नाहीं. पण १९१५ सालापासून म्हणजे लोकमान्य मंडालेहून सुटून येऊन राष्ट्रांत फिरून चैतन्य ओतावयास त्यांनीं सुरवात केल्यापासून लोकांस जसा धीर येऊं लागला, तशी जिल्हासभेची आस्था जनतेनें वाढत्या प्रमाणांत दाखविली आणि मसूरच्या व बिळाशीच्या

जिल्हापरिषदांना ३००० व ५००० शेतकरी आपुलकीनें झटून आ[illegible] हें राष्ट्रीयसभेशीं आजवर निष्ठेनें जिल्ह्यांतील कार्यकर्ते वागले हें जनतेला मनोमन पटल्याचें गमकच मानण्यांत आलें. कांहीं एक गैरभुलावणीनें १९२० च्या रहिमतपूरचे अधिवेशनाचे वेळीं सत्यसमाजाचे जलसे करण्याचा घाट घालून जिल्हासभा उधळून लावण्याचा बूट निघाला होता. पण भाऊसाहेब सोमणांसारखा लोकसंग्राहक अध्यक्ष, जिल्हासभेची पहिल्यापासूनची सर्वश्रुत अशी शेतकऱ्यांबद्दलची कामगिरी आणि प्रत्यक्ष त्या अधिवेशनांतील कार्यपद्धती पाहून, सत्यसमाजाच्या नांवावर होणारी आचरट उधळपट्टीही थंड पडली.

जिल्हासभांच्या चिटणीसांची निवड वर्षभर काम होण्याच्या दृष्टीनें जशी होई, तशीच स्वागताध्यक्षाची निवडणूक पूर्वकालीन जनसेवा, (मग ती गाजावाजा न करतांही केलेली असेल.) जनतेवरील वजन, आणि कामाचा उरक या गोष्टी लक्षांत घेऊन होई. अध्यक्षांच्या निवडणुकींतही त्यांनीं केलेल्या तावत्कालपर्यंतच्या राष्ट्रसेवेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याचा इरादा जसा असे, तसाच प्राप्त परिस्थितींत मार्गदर्शन करणारा कुशल कर्णधार म्हणूनही त्यांच्याकडे पाहण्यांत येई आणि म्हणूनच जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांच्या गळ्यांत जशा जिल्हासभेनें अध्यक्षपदाच्या माळा घातल्या तशाच पुण्याचे केळकर, खाडीलकर, गाडगीळ, वऱ्हाडचे वामनराव जोशी, बाबासाहेब देशमुख, माधवराव अणे अगर गुजराथी जम्नादास द्वारकादास विठ्ठलभाई पटेल यांच्याहि गळ्यांत घातल्या.

जिल्हासभांच्या खर्चासंबंधीं विचार करतां हें सर्व सामान्यपणें सांगतां येईल कीं, पुढाकार घेणारांना ह्या कार्यासाठीं अखंड पदरमोडच करावी लागली आहे आणि पहिल्या तीन अधिवेशनांस तर दादासाहेबांनीं दोनशे-पांचशे रुपये असे स्वतःच खर्चून तसें उदाहरण घालून दिलें होतें. परिषदेस शेतकरी आणि अगदीं अलीकडे कायदेभंगाचा गरीब स्वयंसेवक हे सन्मान्य पाहुणेच म्हणून समजले जात व स्वागतसभासदांची आणि प्रतिनिधींची फी इतकी तोकडी असे कीं खर्चाच्या मानानें ती अपुरीच पडे. नाहीं म्हणावयास, १९३१ सालीं कराची कांग्रेसनें उघडा मण्डप घालून काटकसरीचें उदाहरण घालून देतांच त्याच धर्तीवर मसूर व बिळाशी येथें जिल्हासभा भरल्या तेव्हां पूर्वापार अंदाजाच्या मानानें बराच खर्च कमी येऊं लागला तरी सुद्धां बाबुराव चरणकरप्रभृतीं बिळाशी—करांना मोठी घस सोसावी लागली.

स्वागताध्यक्षांचीं भाषणें अगर जिल्ह्यांतीलच अध्यक्ष निवडलेले असतील तर त्यांचीं भाषणें बहुशः आपल्या स्थानिक व जिल्ह्याच्या गरजांचें आविष्करण, जिल्हासभेच्या कामाचा थोडाफार आढावा आणि प्रांतिक व राष्ट्रीय प्रश्नांवरील मार्गदर्शन यांनीं भरलेलीं असावयाचीं तर जिल्ह्याबाहेरून आलेल्या अध्यक्षांचीं भाषणें राष्ट्रीय राजकारणाच्या गुंतागुंती सोडवून समाधान करणारीं असावयाचीं. मधून मधून शिवराम महादेव परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर अशांसारख्या सन्मान्य पाहुण्यांच्या वक्तृत्वपूर्ण राजकारणी अभ्यासाचाही फायदा मिळाल्याकारणानें जिल्हासभेच्या एकंदर कामाला खरोखरच उठाव आला आहे.

या सर्वांचा आणि जिल्हासभेनें पसार केलेल्या ठरावांचा विचार करतां जिल्हासभेच्या कामाचा एकंदरीनें आपणांस आढावा काढतां येईल तो असा. १९०६ च्या कलकत्ता कांग्रेसमध्यें ठरल्याप्रमाणें राष्ट्रीयसभेच्या व स्थानिक अडचणी निवारण्याच्या कार्यासाठीं जिल्हासभा स्थापन झाली. अर्थात् त्याचवृत्तीनें अवलोकन केलें पाहिजे.

१९१७ सालचे स्वागताध्यक्ष कडूसकर स्वराज्यासंबंधीं बोलतांना म्हणतात कीं " संयुक्त राष्ट्रीयसभेच्या बाबतींत या जिल्हासभेनें केलेल्या खटपटीस देशांतील सर्व पुढाऱ्यांच्या सहकारितेची जोड मिळाल्याकारणानें त्या प्रयत्नास पूर्ण यशप्राप्त झालें व डिसेंबरांत ( १९१६ ) लखनौ येथें पहिली संयुक्त राष्ट्रीयसभा भरून तिजमध्यें स्वराज्याचा ठराव एकमतानें मान्य झाला ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे." पण काळ बदलला तशी सरकारचीं धोरणें व जनतेच्या चळवळीची दिशाही बदलली आणि १९२१ सालीं जिल्हासभेनें असहकारास जशी संमति दिली तशी ' नागपूरच्या कांग्रेसनें ठरविलेल्या हिंदुस्थानच्या लोकांनीं सर्व न्याय्य व शांततेच्या मार्गांनीं मिळविण्याच्या स्वराज्यास ' ही संमति दिली. पुढें १९२९ सालीं, सर्वपक्षीय परिषदेनें परिश्रमपूर्वक तयार केलेल्या " नेहरू रिपोर्टास " साताराजिल्हासभेनें संमति दिली; एवढेंच नव्हे तर " लाहोरच्या राष्ट्रीयसभेनें मान्य केलेलें पूर्ण स्वराज्याचें ध्येय या सभेस मान्य असून त्याबाबत कांग्रेसनें केलेल्या ठरावास या सभेचा पूर्ण पाठिंबा आहे " असाहि ठराव १९३० सालीं जिल्हासभेनें केला. स्वातंत्र्यसार ठरावाला एकदां अशी मान्यता दिल्यावर हें जिल्हासभेस

क्रमप्राप्तच होतें कीं आतां ज्या होअरविलिंग्डन सु (?) धारणा येणार आहेत त्यासंबंधीं १९३४ सालीं जिल्हासभेनें खालील ठराव करावा:- " त्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला बाधक संस्थानीप्रजेचे प्रतिनिधित्व नाकरणाऱ्या आणि साम्राज्यशाही कायम करणाऱ्या त्याचप्रमाणे मॉंटफोर्ड घटनेपेक्षांही कित्येक महत्त्वाच्या बाबतींत पिछेहाटीच्या आहेत म्हणून त्या सुधारणा त्याज्य आहेत. ;"

अर्थात् राष्ट्रीय आकांक्षाबरोबर साताराजिल्ह्यानें आपल्या आकांक्षा राखल्या. त्या आकांक्षा वर्तनांतरित करण्यासाठीं नेहमीं अडचण जी येते ती बहुधा हिंदुमुसलमानांच्या बेकीची. साताराजिल्ह्यापुरताच विचार केला तर हा प्रश्न स्वतंत्र तीव्रतेनें येथें कधींच उभा नव्हता. पण उत्तर हिंदुस्थानचें वारें कधींकधीं जिल्ह्यांत चार दोन दिवस भोंवतें असा अनुभव असल्याकारणानें, आणि मोर्लेमिंटोसुधारणांनीं मुसलमानांचा सवतासुभा पाडून " हिंदु हिंदुस्थान व मुसलमान हिंदुस्थान " असलीं राजकीय छकलें सुरूं केलीं त्या धोरणाला १९२७ पासून इस्लामी संस्थामार्फत ऊत आल्याकारणानें " तसल्या धोरणाचा राष्ट्रीयसभेनें स्वीकार करूं नये " अशा इषाऱ्याच्या विनंतीचा ठरावही जिल्हासभेनें १९२८ सालीं केला होता.

तथापि हिंदुमुसलमान, स्पृश्यास्पृश्य, ब्राह्मणब्राह्मणेतर, कोणीही असला तरी तो आपआपल्यापरी स्वयंपूर्ण, स्वयंसिद्ध आणि सुखी घटक झाल्याखेरीज राजकीय तत्त्वज्ञान अगर त्यानें मिळालेलें स्वातंत्र्य टिकणारें नव्हे. म्हणून गांधींनीं ग्रामोद्धाराची चळवळ काढल्यावर वा मूलभूत हक्काचा कराची येथें तीस कलमी ठराव कांग्रेसनें केल्यावर सातारा

या सर्वांचा आणि जिल्हासभेनें पसार केलेल्या ठरावांचा विचार करतां जिल्हासभेच्या कामाचा एकंदरीनें आपणांस आढावा काढतां येईल तो असा. १९०६ च्या कलकत्ता कांग्रेसमध्यें ठरल्याप्रमाणें राष्ट्रीयसभेच्या व स्थानिक अडचणी निवारण्याच्या कार्यासाठीं जिल्हासभा स्थापन झाली. अर्थात् त्याचवृत्तीनें अवलोकन केलें पाहिजे.

१९१७ सालचे स्वागताध्यक्ष कडूसकर स्वराज्यासंबंधीं बोलतांना म्हणतात कीं " संयुक्त राष्ट्रीयसभेच्या बाबतींत या जिल्हासभेनें केलेल्या खटपटीस देशांतील सर्व पुढाऱ्यांच्या सहकारितेची जोड मिळाल्याकारणानें त्या प्रयत्नास पूर्ण यशप्राप्त झालें व डिसेंबरांत ( १९१६ ) लखनौ येथें पहिली संयुक्त राष्ट्रीयसभा भरून तिजमध्यें स्वराज्याचा ठराव एकमतानें मान्य झाला ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे." पण काळ बदलला तशी सरकारचीं धोरणें व जनतेच्या चळवळीची दिशाही बदलली आणि १९२१ सालीं जिल्हासभेनें असहकारास जशी संमति दिली तशी ' नागपूरच्या कांग्रेसनें ठरविलेल्या हिंदुस्थानच्या लोकांनीं सर्व न्याय्य व शांततेच्या मार्गांनीं मिळविण्याच्या स्वराज्यास ' ही संमति दिली. पुढें १९२९ सालीं, सर्वपक्षीय परिषदेनें परिश्रमपूर्वक तयार केलेल्या " नेहरू रिपोर्टास " साताराजिल्हासभेनें संमति दिली; एवढेंच नव्हे तर " लाहोरच्या राष्ट्रीयसभेनें मान्य केलेलें पूर्ण स्वराज्याचें ध्येय या सभेस मान्य असून त्याबाबत कांग्रेसनें केलेल्या ठरावास या सभेचा पूर्ण पाठिंबा आहे" असाहि ठराव १९३० सालीं जिल्हासभेनें केला. स्वातंत्र्यसार ठरावाला एकदां अशी मान्यता दिल्यावर हें जिल्हासभेस

क्रमप्राप्तच होतें कीं आतां ज्या होअराविलिंग्डन सु (?) धारणा येणार आहेत त्यासंबंधीं १९३४ सालीं जिल्हासभेनें खालील ठराव करावा:- " त्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला बाधक संस्थानीप्रजेचें प्रतिनिधित्व नाकरणाऱ्या आणि साम्राज्यशाही कायम करणाऱ्या त्याचप्रमाणे मॉंटफोर्ड घटनेपेक्षांही कित्येक महत्त्वाच्या बाबतींत पिछेहाटीच्या आहेत म्हणून त्या सुधारणा त्याज्य आहेत. "

अर्थात् राष्ट्रीय आकांक्षाबरोबर साताराजिल्ह्यानें आपल्या आकांक्षा राखल्या. त्या आकांक्षा वर्तनांतरित करण्यासाठीं नेहमीं अडचण जी येते ती बहुधा हिंदुमुसलमानांच्या बेकीची. साताराजिल्ह्यापुरताच विचार केला तर हा प्रश्न स्वतंत्र तीव्रतेनें येथें कधींच उभा नव्हता. पण उत्तर हिंदुस्थानचें वारें कधींकधीं जिल्ह्यांत चार दोन दिवस भोंवतें असा अनुभव असल्याकारणानें, आणि मोर्लेमिंटोसुधारणांनीं मुसलमानांचा सवतासुभा पाडून " हिंदु हिंदुस्थान व मुसलमान हिंदुस्थान " असलीं राजकीय छकलें सुरू केलीं त्या धोरणाला १९२७ पासून इस्लामी संस्थामार्फत ऊत आल्याकारणानें " तसल्या धोरणाचा राष्ट्रीयसभेनें स्वीकार करूं नये " अशा इषाऱ्याच्या विनंतीचा ठरावही जिल्हासभेनें १९२८ सालीं केला होता.

तथापि हिंदुमुसलमान, स्पृश्यास्पृश्य, ब्राह्मणब्राह्मणेतर, कोणीही असला तरी तो आपआपल्यापरीं स्वयंपूर्ण, स्वयंसिद्ध आणि सुखी घटक झाल्याखेरीज राजकीय तत्त्वज्ञान अगर त्यानें मिळालेलें स्वातंत्र्य टिकणारें नव्हे. म्हणून गांधींनीं ग्रामोद्धाराची चळवळ काढल्यावर वा मूलभूत हक्काचा कराची येथें तीस कलमी ठराव कांग्रेसनें केल्यावर सातारा

जिल्हासभेनें मान्यता दिली तर जिल्हासभेचें वैशिष्ठय कांहींच नव्हे. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं जिल्हासभेच्या जन्मापूर्वीपासून सहस्रबुद्धे व करंदीकर यांनीं शेतकऱ्यांत राज्यघटनेच्या व आपलीं दुःखें नाहींशीं करून घेण्याच्या मार्गांचा फैलावा करण्याकरतां आपल्या " सहस्रकर " छापखान्यामार्फत साध्या भाषेंत शेकडों पुस्तकें वाटून जो उपक्रम केला, त्याच्या हेतूची परिपूर्तता जिल्हासभेनें अव्याहत केली आहे. शेतसाऱ्यांत सूट, शेतसाऱ्याच्या थकबाकीमुळें होणाऱ्या खालसा जमिनींविरुद्ध तक्रार, रानडुकरांपासून त्रास होतो म्हणून शेतकऱ्यांस योग्य हत्यारें बाळगण्याची परवानगी, दुभत्या व शेतकीच्या उपयोगाचीं जनावरें जोपासावीं म्हणून गायरानें व जंगलच्या सवलती, कृष्णाकॅनॉलवरील पाण्याच्या सोई, उसाच्या लागवडीबाबत व गुऱ्हाळाबाबत सुधारणा व्हावी म्हणून सरकारी मॉडेल फार्मची आवश्यकता, गुरांच्या दवाखान्यागणिक एकएक वळू ठेवून सशक्त बैलांच्या उत्पत्तीची जरुरी, गोरक्षण, अन्यायाची व पिळून काढणारी सारावाढ बंद झालीच पाहिजे असा अट्टाहास, पुरवणी धंदा म्हणून रहाटावर शेतकऱ्यांनीं सूत काढण्याची शिफारस, शेतकऱ्यांच्या कायदेशीर चळवळीस सरकारनें प्रतिबंध करण्याकरीतां हात उचलतांच तीव्र निषेध, कोयनाधरणासंबंधींचें सरकारी धोरण स्पष्ट करण्याची मागणी, तुकडेपद्टीच्या बिलाची खेंच, इनामदारांचा खंड बदलणाऱ्या धान्याचा भावाप्रमाणें घेण्याची शिफारस, शेतीच्या मालावरील अन्याय्य दस्तुऱ्यां विरुद्ध तक्रारी, शेतकरी पूर्ण ऋणमुक्त व्हावा म्हणून

शेतकरी बँकांची व्यवस्था वा भावनगरसारखी योजना करण्या-बद्दल शिफारस, या सगळ्या निरनिराळ्या ठरावांतून आलेल्या गोष्टी सातारा जिल्ह्यांतील मुख्य समाज जो शेतकरी त्याच्या जिव्हाळ्याच्या आहेत.

या गोष्टी वर्तनांतरित व्हावयाच्या आणि त्या बहुजन-समाजाच्या बहुजन समाजानें करावयाच्या तर सहकारी पतपेढ्या, इन्कमटॅक्सच्या तत्त्वावर शेतीच्या निव्वळ उत्पन्नावर सारा, आणि शेतकरी जीवनाला अवश्यक असणाऱ्या वस्तूंवर प्रत्यक्षच काय पण अप्रत्यक्ष कर देखील कमालीचे कमी असले पाहिजेत. जिल्ह्याची औद्योगिक पाहणी करून अस्तित्वांत असलेल्या उद्योगधंद्यास सरकारनें मदत करावी आणि लोकांनीं लुप्त झालेल्या उद्योगांचें पुनरुज्जीवन व असलेल्या उद्योगांचें उत्तेजन करावें. औद्योगिक शाळा जिल्ह्याच्या मध्यवर्ती जागीं सुरूं करून ती लोकलबोर्डाचे ताब्यांत असावी. कऱ्हाडच्या आगपेट्यांचा कारखाना किंवा नांगाराऔतांच्या कारखान्याला सरकारनें व रेल्वेनें सवलती द्याव्या. स्वतांच्या शेतावरलि कामाच्या अभावीं शेतकरी ज्यावेळीं मजूर म्हणून कामावर जातो, त्यावेळीं त्याला आठ तासांपेक्षां जास्त काम पडूं नये, योग्य मजुरी मिळावी व माणुसकीचे सर्व हक्क असावे. असेही ठराव जिल्हासभेनें पास केले आहेत.

हरिजनांची अस्पृश्यता "ही सामाजिक, धार्मिक व राजकीय दृष्टीनें हानिकारक आहे" असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त करून त्यांच्या उन्नतीची शिकस्त करावी असा इषारा जसा जिल्हासभेनें दिला आहे तसा कुलकर्णी वतनांसबंधींचा

जिल्हासभेनें मान्यता दिली तर जिल्हासभेचें वैशिष्ठय कांहींच नव्हे. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं जिल्हासभेच्या जन्मापूर्वीपासून सहस्रबुद्धे व करंदीकर यांनीं शेतकऱ्यांत राज्यघटनेचा व आपलीं दुःखें नाहींशीं करून घेण्याच्या मार्गाचा फैलावा करण्याकरतां आपल्या " सहस्रकर " छापखान्यामार्फत साध्या भाषेंत शेकडों पुस्तकें वाटून जो उपक्रम केला, त्याच्या हेतूची परिपूर्तता जिल्हासभेनें अव्याहत केली आहे. शेतसाऱ्यांत सूट, शेतसाऱ्याच्या थकबाकीमुळें होणाऱ्या खालसा जमिनींविरुद्ध तक्रार, रानडुकरांपासून त्रास होतो म्हणून शेतकऱ्यांस योग्य हत्यारें बाळगण्याची परवानगी, दुभत्या व शेतकीच्या उपयोगाचीं जनावरें जोपासावीं म्हणून गायरानें व जंगलच्या सवलती, कृष्णाकॅनॉलवरील पाण्याच्या सोई, उसाच्या लागवडीबाबत व गुऱ्हाळाबाबत सुधारणा व्हावी म्हणून सरकारी मॉडेल फार्मची आवश्यकता, गुरांच्या दवाखान्यागणिक एकएक वळू ठेवून सशक्त बैलांच्या उत्पत्तीची जरुरी, गोरक्षण, अन्यायाची व पिळून काढणारी सारावाढ बंद झालीच पाहिजे असा अट्टाहास, पुरवणी धंदा म्हणून रहाटावर शेतकऱ्यांनीं सूत काढण्याची शिफारस, शेतकऱ्यांच्या कायदेशीर चळवळीस सरकारनें प्रतिबंध करण्याकरीतां हात उचलतांच तीव्र निषेध, कोयनाधरणासंबंधींचें सरकारी धोरण स्पष्ट करण्याची मागणी, तुकडेपद्दीच्या बिलाची खेंच, इनामदारांचा खंड बदलणाऱ्या धान्याचा भावाप्रमाणें घेण्याची शिफारस, शेतीच्या मालावरील अन्याय्य दस्तुऱ्यां विरुद्ध तक्रारी, शेतकरी पूर्ण ऋणमुक्त व्हावा म्हणून

शेतकरी बँकांची व्यवस्था वा भावनगरसारखी योजना करण्या-बद्दल शिफारस, या सगळ्या निरनिराळ्या ठरावांतून आलेल्या गोष्टी सातारा जिल्ह्यांतील मुख्य समाज जो शेतकरी त्याच्या जिव्हाळ्याच्या आहेत.

या गोष्टी वर्तनांतरित व्हावयाच्या आणि त्या बहुजन–समाजाच्या बहुजन समाजानें करावयाच्या तर सहकारी पतपेढ्या, इन्कमटॅक्सच्या तत्त्वावर शेतीच्या निव्वळ उत्पन्नावर सारा, आणि शेतकरी जीवनाला अवश्यक असणाऱ्या वस्तूंवर प्रत्यक्षच काय पण अप्रत्यक्ष कर देखील कमालीचे कमी असले पाहिजेत. जिल्ह्याची औद्योगिक पाहणी करून अस्तित्वांत असलेल्या उद्योगधंद्यास सरकारनें मदत करावी आणि लोकांनीं लुप्त झालेल्या उद्योगांचें पुनरुज्जीवन व असलेल्या उद्योगांचें उत्तेजन करावें. औद्योगिक शाळा जिल्ह्याच्या मध्यवर्ती जागीं सुरूं करून ती लोकलबोर्डाचे ताब्यांत असावी. कऱ्हाडच्या आगपेट्यांचा कारखाना किंवा नांगाराऔतांच्या कारखान्याला सरकारनें व रेल्वेनें सवलती द्याव्या. स्वतांच्या शेतावरील कामाच्या अभावीं शेतकरी ज्यावेळीं मजूर म्हणून कामावर जातो, त्यावेळीं त्याला आठ तासांपेक्षां जास्त काम पडूं नये, योग्य मजुरी मिळावी व माणुसकीचे सर्व हक्क असावे. असेही ठराव जिल्हासभेनें पास केले आहेत.

हरिजनांची अस्पृश्यता " ही सामाजिक, धार्मिक व राजकीय दृष्टीनें हानिकारक आहे " असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त करून त्यांच्या उन्नतीची शिकस्त करावी असा इषारा जसा जिल्हासभेनें दिला आहे तसा कुलकर्णी वतनासंबंधींचा

कुलकर्णी मंडळींच्या म्हणण्याचा सरकारनें सहानुभूतीनें विचार करावा. आणि इनामदारांच्या वसुलासंबंधींची जबाबदारी सरकारनें आपल्या सारा वसुलीबरोबरच पतकरावी असा ही अभिप्राय जिल्हासभेनें प्रगट केला आहे.

तात्पर्य समाजांत अन्यायित कोणी राहूं नये आणि सर्वांचे हितसंबंध अविरोधानें नांदावेत म्हणून जिल्हासभेनें काळजी घेतली असून त्या हितसंबंधाचें कपाळ ज्यांच्या योगें फुटतें किंवा उमटतें ते जिल्ह्याच्या कारभाराचे सरकारी रिपोर्ट (निदान गुप्त भाग वगळून) जनतेच्या पुढाऱ्यांना पहावयास मिळावेत आणि जनतेला विश्वासांत घेऊन जिल्हा दरबार कलेक्टरांनीं भरवावें आणि लोकांच्या सहकारितेनें व्यवहार्य मार्ग काढावा, असेही ठराव जिल्हा सभेनें केले आहेत.

मग, प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करावें, सरकारी हायस्कूलांतून वगैरे वाढलेले फीचे दर कमी करावे, सातारा न्यू इंग्लीश स्कूलसारख्या संस्थांची वाढ मोकळेपणानें होऊन द्यावी, शिक्षणाकरतां जमविलेला, वाढलेल्या लोकलफंडासारख्या पैसा शिक्षणाकरितांच खर्च करावा. मोफत वाचनालयांचा प्रसार वाढवावा, आणि टिळकराष्ट्रीय विद्यालयांसारख्या घाणेकरबंधू व त्यांचे सहकारी यांच्या स्वार्थत्यागानें चाललेल्या अस्सल राष्ट्रीय शिक्षणसंस्थांना लोकांनीं सढळ हातानें व स्थानिकस्वराज्यसंस्थांनीं झेपेल तशी मदत करावी; सर्व स्थानिकस्वराज्यसंस्था पूर्णपणें लोकनियुक्तांच्या असाव्या; देशी वैद्यकाचा प्रामुख्यानें अवलंब करावा; मादक पदार्थांच्या प्रसारास आळा घालून दारूचे बाबतींत जिल्हा कोरडा-

ठणठणीत करावा; पैसाफंडासारख्या औद्योगिक निधीस सर्वतोपरी सहाय्य करावें; स्वदेशी हें स्वराज्याचें अमोघ साधन आहे तेव्हां वैयक्तिक झीज सोसूनही स्वदेशीच वस्तु प्रत्येकानें वापराव्या, आणि आपला पोषाख शुद्ध खादीचा ठेवावा; स्थानिक स्वराज्य संस्थांनीं आपल्या नौकरांस द्यावयाचे गणवेश खादीचेच द्यावेत; रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे सुख-सोयीकडे लक्ष कंपन्यांनीं पुरवावें व वाहतुकीच्या दृष्टीनें युरोपियन–नेटिव्ह असा भेद करूं नये; शेतकऱ्याला दिलेल्या कर्जावरील सावकारी व्याजाचे दर अत्यंत कमी असावे; इत्यादि स्वरुपाच्या सामान्यजीवनाला अवश्यक असलेल्या गोष्टींविषयीं वर्षानुवर्ष जिल्हासभेनें आपले शेंकडो हात उभारून ठराव केले असले तर तिनें आपलें कर्तव्य केलें नाहीं का ?

आपल्या हद्दींतील संस्थानिकांनाही "आपल्या प्रजेला जबाबदारीचें स्वराज्य द्या" असा निर्वाळ्यानें विनंति करणारा ठराव जिल्हासभेनें केला आहे.

या ठरावांच्या बाबतींत जरूर तेव्हां शिष्टमंडळें नेमून कायदेमंडळांत ठराव आणवून व प्रश्न विचारून, आणि सालोसाल तालुकानिहाय माणसांची कार्यकारी मंडळें स्थापून जिल्हासभेनें थोडें फार कार्य घडवून आणलें आहे. पण जिल्हासभेचा खरा विश्वास ग्रामसंघटना, सेवादल आणि बलसंवर्धन यावर असल्याकारणानें त्या गोष्टींवर भर देऊन खेडोपाडीं जागृत, सुसंघटित आणि स्वावलंबी करण्याच्या अल्पस्वल्प प्रयत्नांचें जिल्हासभेनें आदरून कौतुक केलें आहे. त्यांत सातारा तालुका ग्रामसेवासंघाचें काम सत्वशुद्ध झालेलें

पाहून दिलेपार्ले येथें भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक सभेनेंही शाबासकी दिली हा वृत्तांत येऊन गेलाच आहे.

असो १९१३ सालीं, " आज नाहीं उद्यां आपण अंगिकारलेल्या गोष्टींचा पिच्छा पुरवतों असें सरकारास आढळून आल्यास योग्य विचार होऊन आपल्या म्हणण्यास मान मिळालाच पाहिजे, " अशी आशेची मनोवृत्ति होती; ती दीडतपांत इतकी बदलली कीं जिल्हासभा बोलूं लागली " जनताजनार्दनाची विखुरलेलीं तोंडें एका दिशेला आणून स्वातंत्र्य संपादण्याचें कार्य शिवाजी महाराजांनीं केलें. हल्लींच्या काळीं या एकीकरणाचा मंत्र सिद्ध करावयास आपण त्यागी बनलें पाहिजे, आत्मसमर्पण केलें पाहिजे. "

या तयारीच्या स्वयंसैनिकांचीही एक परिषद मसूरच्या जिल्हासभेला जोडून झाली होती. तींत संघटनात्मक चळवळच सत्याग्रहींनीं करावी असें ठरलें. कारण " पुढाऱ्यांइतकें ज्ञान जनतेला नसलें तरी जनता पराक्रमी असावी लागते. "

जनतेच्या हातून पराक्रम चढत्या वाढत्या पायरीनें अखंडपणें व्हावा म्हणून ज्यांनीं ज्यांनीं जिल्ह्यांत व जिल्ह्याबाहेर आणि एकंदर राष्ट्राकरतां खटपटी केल्या त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरणही जिल्हासभेनें केलें आहे. पण एवढ्यानें अगर कोठें रेल्वेनें सवलती दिल्या म्हणून, कलेक्टरांच्या दरबारांत थोडी सहानुभूति मिळाली म्हणून, तुकडेपट्टीसारखें बिल सरकारनें माघारीं घेतलें म्हणून, किंबहुना स्वराज्याचे जाहीरनाम्यावर जाहीरनामे निघाले म्हणून, जिल्हासभेचें समाधान नसून संपूर्ण स्वराज्य मिळाल्याशिवाय जिल्हासभेला समाधान नाहीं कीं ती आपलें कार्य झालें असें

मानीत नाहीं. आज तिला इतकेंच समाधान आहे कीं "लोकांनीं पोटाच्या उद्योगांत व प्रपंचाच्या अडचणींत सदोदित गुरफटून रहावें म्हणजे आपली चंगळ निर्वेधपणें चालेल असें नोकरशाहीच्या चालकांस वाटतें. पण त्यांची ही इच्छा सफळ होण्याचे दिवस आतां राहिले नाहींत." जिल्हा-सभेला हें समाधान इतर जिल्ह्यापेक्षां सातारा जिल्हा मोठा तल्लख म्हणून लाभलें नसून राजकीय चळवळीच्या अखंड सातत्यानें लाभलें आहे. इतरांच्या मानानें ही अभिमानसमा-धानाची गोष्ट असली तरी कार्यकर्त्यांना संघटनेनें एकसूत्री व एकमुखी काम करावयास चालना मिळावी आणि त्यायोगें सर्व आपत्तीस कारण असलेल्या पारतंत्र्याला जनतेनें बाजूस सारावें, म्हणून जिल्ह्यापुरती मध्यवर्ती राष्ट्रीयसंस्था काढण्या-साठीं एक लक्ष रुपये जमवावे असा ठराव मसूर जिल्हासभेनें केला व दादासाहेब करंदीकरांनीं आपल्या ७५ व्या वाढ-दिवशीं त्या लक्ष रुपये फंडाचा आरंभ जिल्हासभेचे बहिश्चर-प्राण, सोमण यांच्याजवळ एक हजार रु. ची देणगी देऊन १९३१ सालींच केला.

## प्रकरण २ रें.

# कायदेमंडळांत.

लोकांच्या लोकांनीं जाहीर परिषदांतून केलेली कामगिरी संक्षेपानें पाहिल्यावर सरकारी यंत्राच्या सभा-दरबारांतून लोकांनीं काय काय महत्त्वाचें काम केलें तिकडे नजर टाकणें अत्यावश्यक वाटतें.

यासंबंधानें विचार करतांना सातारा जिल्हाकडे आपली माणसें स्वतंत्ररीत्या पाठविण्याची कामगिरी १९२० सालापर्यंत नव्हतीच म्हटलें तरी चालेल. १८९२ सालीं प्रांतिक सरकारच्या कायदेमंडळांचा किंचित् विस्तार झाल्यावर १८९५ त टिळक व १८९९ त गोखले यांना लोकलबोर्डांचें मतानें व पुढें मोर्लेमिंटो सुधारणानंतर गणेश व्यंकटेश जोशी यांस म्युनिसिपालिटींचें मतानें मुंबई कायदेमंडळांत सातारा जिल्ह्यानें निवडून दिलें. दरम्यान सातारा जिल्ह्याचे कलेक्टरसाहेब जिल्हादरबार भरवून रयतेचीं सुखदुःखें चर्चून टाकीत. पण तेथें रयतेच्या निवडणूकीपेक्षां सरकारी निमंत्रितांचा भरणा असल्यामुळें, १९११ सालीं दादासाहेब करंदीकर मुंबई कायदेमंडळांत निवडून येईपर्यंत त्यांच्या सारख्या "खेळीमेळीच्या राजकारणी" पुरुषालाही दरबारास आमंत्रण नसें हें लक्षांत ठेवलें तर सातारा-जिल्हा-दरबारांत रयतेच्या प्रत्यक्ष कल्याणाकडे कितपत लक्ष दिलें गेलें असेल याची कल्पना येईल.

तथापि असलेल्या मर्यादित कक्षेंतसुद्धां डोसाभाई माणेकजी, पाठक, फणसळकर, करंदीकर वगैरेंनीं अनेक प्रश्न विचारून आणि रयतेच्या मागण्या पुढें मांडून मिळवेल तेवढा सरकारी सहाभूतीचा ओलावा मिळविलाच. महायुद्धाची धुमश्चक्री चालू असतां जिल्हा-दरबारांत रयतेबद्दल बरीच सहानुभूति प्रगट करण्यांत आली व सातारा जिल्ह्यांतील मर्द मराठ्यांनीं रणांगणावर गाजविलेल्या पराक्रमाचे मुक्तकंठानें गोडवेही गाण्यांत आले. पण अडचणींत सांपडलेलें साम्राज्य, राजनिष्ठेनें होणारी प्रजेची मदत आणि स्वतां कलेक्टर-साहेबांचा उदार स्वभाव यांचा एकजीव मेळ त्यावेळीं होता म्हणूनच या गोष्टी घडल्या. १९२१ सालीं असहकाराच्या चळवळीनें स्वावलंबनाचा मार्ग जनतेनें अनुसरावयास सुरवात केल्याबरोबर अरेराव नोकरशाहीनें जिल्हादरबाराचा देखावाही बंद केला, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. एतावता, मॉंटफोर्ड सुधारणा येण्यापूर्वी सातारा जिल्हा-तर्फे १९११ चे मे महिन्यांत फक्त दादासाहेब करंदीकर मुंबई सरकारच्या कायदेमंडळांत जाऊन बसले होते, तेवढा गणेश व्यंकटेश जोशांच्या अकालीं मृत्युमुळें आलेला कौन्सिल कामाचा वाटा जर सोडला तर मॉंटफोर्ड सुधारणांपासूनच सातारा जिल्ह्यांतील मंडळींनीं कायदेमंडळांतून कामें केलीं असें म्हणावयाचें.

१९२० सालीं मॉंडफोर्ड सुधारणांच्या पहिल्यावहिल्या निवडणुकीवर कांग्रेसनें बहिष्कार घातल्यामुळें लोकमान्यांच्या डेमॉक्रॅटिक स्वराज्यपक्षातर्फे उभे राहिलेले भाऊसाहेब सोमण, कद्रूसकर, नरसिंहपूरकर बाळासाहेब पाटील हे घरीं बसले तरी

रा. ब. काळे, खा. ब. कूपर व पांडुरंगराव आढावही मंडळी मुंबई कौंसिलांत निवडून आली. १९२२-२३ या काळांत भास्करराव जाधव सरकारनियुक्त सभासद म्हणून मुंबई कौंसिलांत बसूं लागले. १९२३ सालीं स्वराज्यपक्षातर्फे निवडणुकी लढविल्या-वर भाऊसाहेब सोमण प्रचंड बहुमतानें पहिले निवडून आले, तर त्यांच्या जोडीला जाधव व कूपर कौंसिलांत शिरले. १९२६ सालच्या निवडणुकींत प्रतियोगी सहकारपक्षातर्फे कऱ्हाडचे लक्ष्मणराव देशपांडे व रा. ब. काळे आणि जाधव निवडले गेले. १९३० च्या मे महिन्यांत सरकारच्या अकारण दडपशाहीच्या धारेणाचा निषेध म्हणून देशपांड्यांनीं राजिनामा दिल्यावर सरदार पाटणकर कांहीं दिवस मुंबई कौन्सिलांत होते. १९३० च्यां निवडणुकींत कूपर, आचरेकर, शिंदे अशी मंडळी निवडून आली आणि कूपरसाहेब प्रथम स्थानिकस्वराज्यखात्याचे दिवाण व पुढें 'फिनॅन्समेंबर' झाल्यावर कांग्रेसचे उमेदवार म्हणून भाऊसाहेब सोमणांचा प्रवेश कौन्सिलमध्यें झाला, आणि १९३० च्या निवडणुकींत मुंबई विश्वविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून रा. ब. काळेही निवडून आले.

या अवधींत दादासाहेब करंदीकर, सोमण, काळे, देशपांडे यांची पद्धति अशी असे कीं लोकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न वर्तमानपत्रांवरून, आपल्या निरीक्षणावरून आणि लोकांकडून मागवून कौंसिलांत विचारावयाचे व लोकाहितदक्ष राहून सरकारी यंत्रांतूनच निघालेल्या माहि-तीवर सरकारी कारभाराच्या चुका सरकारच्या नजरेस आणा-वयाच्या. दादासाहेबांनीं पाहिल्याच तडाक्याला ११९ प्रश्न विचारले होते आणि फक्त ७८ प्रश्नांचींच उत्तरें मिळालीं.

असाच मोर्चा सोमण व विशेषतां दरवेळीं काळे यांनीं सरकारकडे वळवला; दादासाहेब व देशपांडे यांचीं बजेट् वरील पहिलींच भाषणें अभ्यासू असल्याचा कबूली जबाब तत्कालीन सरकारी गोटाच्या मुख्यांनीं दिला; जिल्ह्याजिल्ह्याच्या कोणत्या प्रतिनिधीकडून कोणते प्रश्न विचारवावे याचा विचार करून तशी व्यवस्था करंदीकर करवीत, तर काळ्यांचा अभ्यास सर्वगामी असल्याकारणानें त्यांचा चौफेर असा सनदशीर हल्ला विधायक व विघातक स्वरूपांत झाल्यामुळें "विरोधीपक्षाचे नायक" त्व त्यांच्याकडेच गेले पाऊण तप येऊन राहिलें आहे. निवडणुकीनंतर मतदारांकडे सवड सांपडेल तसें फिरून, जाऊन त्यांच्या गाऱ्हाण्यांची समक्ष चौकशी करण्याचा पायंडा सोमणांनींच पाडला होता, एकदोघांनीं पुढें अनुसरला. अर्थातच सातारा जिल्ह्यातर्फें निवडून आलेल्या प्रतिनिधींत सरकारलाही कोणी मण्डळी जवळ करण्याची बुद्धी कशी व्हावी ? तीं झाली असती तरच नवल !

असो १९०८ सालीं स्वतांचे हजारांवर आणि जिल्ह्यांतील लोकांनीं दिलेले दोन हजार रुपये घेऊन इंग्लंडांतच लोकमान्य टिळकांच्या खटल्यांत वकिली करावयास गेलेले दादासाहेब १९११ सालीं मुंबई कायदे-मण्डळांत निवडून येतांच त्यांना दिल्ली येथील त्या सालच्या बादशाही राज्यारोहणसमारंभास आमंत्रण आलें होतें आणि दादासाहेब गेलेही होते. पण त्यांचें कायदेमंडळांतील काम मात्र बादशाही दरबारी थाटाचें न होतां, १९१८ सालीं विलायतेंत कॉंग्रेसचे शिष्ट म्हणून जसें लोकांच्या मागण्या

पुरस्करणाऱ्या वकीलांचें झालें, तसेंच १९११ ते १९१२ अखेर "तुटमुद्तीचेंही" कौन्सिलांत झालें. वैद्यनोंदणीच्या कायद्याचें बिल पहिल्या वाचनासाठीं पुढें आलें त्यावेळीं त्यांतील जाचकपणा करंदीकरांनीं दाखविला; डि. पो. ॲक्ट व बॉम्बे सिव्हिल कोर्ट ॲक्ट यांमध्यें लोकसुखकारक दुरुस्त्याबद्दल आग्रह धरला; १९१२ सालीं पोलिसखात्याला वीस हजार रुपये खैरात म्हणून काढले असतां त्याला विरोध केला, "लोकांच्या वाढत्या दारूबाजीस आळा पडणें शक्य असेल तर त्याकरतां सरकार अबकारीचें सर्व उत्पन्न गमावण्यास खुषीनें तयार होईल" या सरकारनें १८४४ सालीं दिलेल्या आश्वासनाची आठवण देऊन विवक्षित निवडकस्थळीं तरी दारूची अजिबात बंदी मागितली; रयतेच्या सांपत्तिक स्थितीची चौकशी करण्याची अवश्यकता आणि शेतकऱ्यांचा सारा कमी होण्याचे दृष्टीनें फेरपाहणी होण्याची जरूरी प्रतिपादन केली; आणि शेवटीं अबकारीरेव्हेन्यूमधून योग्य रक्कम डिस्ट्रिक्ट बोर्डास मिळालीच पाहिजे असा आग्रह दादासाहेबांनीं धरला.

तुटपुंज्या अधिकारक्षेत्राच्या मोर्ले-मिंटो सुधारणांच्या कौन्सिलांत दादासाहेबांनीं कामाचें हें जें वळण लावून दिलें त्याच्याच पुस्त्या मॉंटफोर्ड सुधारणांच्या विस्तृत अधिकारांच्या कौन्सिलांतही साताराजिल्ह्याच्या प्रतिनिधींनीं काढल्या. आचरेकरांनीं १९३२ सालीं काळयांच्या बरोबरीनें सरकारी फर्मानशाही कायद्यांना विरोध केलाच पण १९३९ मध्यें फर्मानी कायद्यांच्या निषेधार्थ काळयांच्या बरोबर आचरेकरही कौन्सिलांतून उठून आले. १९३९ चे कायदेमंडळाच्या

दुसऱ्या बैठकींत असा ठराव आचरेकरांनीं आणला कीं "सातारा जिल्ह्यांतील लोकलफंड दोन आणे आहे तो एक आणा व्हावा, निदान दीड आणा करावा." कारण शेतकऱ्यांकडून वसूल केलेला हा लोकलफंड वास्तविक सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाकरतां असतांना, डॉ. परांजप्यांच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यांत अभिप्रेत असलेली सरकारी ग्रँट सरकार सातारा जिल्हा लोकल बोर्डाला देऊं शकत नाहीं म्हणून, लोकलफंडाचे पैसे बोर्डाजवळ लाखांनीं उगाच उरले किंवा मूळ हेतुपेक्षां अन्य प्रवाहीं सरकूं लागले.

डॉ. परांजप्यांच्या प्राथमिक शिक्षणाचे कायद्यासंबंधांत भास्करराव जाधवांनीं प्रशंसनीय कामगिरी मिळालेल्या स्वायत्ततेप्रमाणें केली आहे. १९२३ च्या निवडणुकींत यशस्वी होऊन शिक्षणमंत्री झाल्याबरोबर परांजप्यांच्या कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी जाधवांवर पडली; दिवाणांसुद्धां सरकारचें कारभारी मण्डळ हें एक "एकत्र कुटुंब" असून "सगळ्या खात्यांच्या सोयी पाहूनच कारभार हाकणें जरूर असतें," म्हणून आपल्यापरी अटोकाट प्रयत्न करून सातारा जिल्ह्याला प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचा फायदा जाधवांनीं प्रथम दिला. सातारा जिल्ह्यावर प्राथमिक शिक्षणाकरितां तीस हजार रुपये पूर्वी सरकार खर्च करी, तें साठ हजार रुपये जाधवांच्या खटपटीनें करूं लागले. तथापि शिक्षण दिवाण म्हणून त्यांची एवढीच कामगिरी नाहीं. इलाख्यांत जेवढ्या म्हणून "बिल्डिंग ग्रँट्स" द्यावयाच्या उरल्या होत्या त्या जाधवांनीं देऊन टाकल्या; 'एकच रुपाया' फी ठेवण्याच्या अटीवर एका बोहरीनें लाख रुपयांची देणगी

( व्याजांतून खर्च भागविण्येस ) देऊन धोलकास्कूल चालविण्याची तयारी दाखवतांच त्याला परवानगी दिली; असहकाराच्या चळवळींत ज्या गुजराथी शिक्षकांनीं भाग घेतला होता त्यांना परत कामावर घेतलें; ग्रँट मेडिकल कॉलेजचा डीन युरोपियनच ठेवावयाचा असा पूर्वी अट्टाहास असे तो बदलून तेथें हिंदी माणसाची नेमणूक केली आणि मागासलेल्या वर्गांतील विद्यार्थ्यांच्याकरतां "डिस्ट्रिक्ट स्कॉलरशिप्स" दिल्या. शिक्षणमंत्र्याप्रमाणेंच १९२८ मध्यें ( डॉ० परांजप्ये "सेक्रेटरी ऑफ स्टेट" चे कौन्सिलांत मेंबर होऊन गेल्यावर ) जाधव शेतकी दिवाणही झाले. त्या कारकीर्दीत त्यांनीं गो-वर्धनासाठीं ग्रँट्स मंजूर केल्या व इंपीरियल कौंसिल ऑफ ॲग्रिकल्चर" च्या स्थापनेंत भाग घेतला. या दोन दिवाणगिऱ्यांशिवाय, १९२२-२३ सालीं सरकारनियुक्त सभासद असतांना व १९२६ च्या निवडणुकीनंतर शेतकी दिवाण होण्यापूर्वी, चुनिलाल मेथांच्या "एक्साइज कमेटीवर" 'तुकडे पट्टीच्या बिलाचे कमेटीवर' व 'युनिव्हर्सिटी कमेटीवर' ही जाधवांनीं कामें केलीं. तरी पण जाधव दिवाण झाल्यावर शेतसारा आदिकरून गरीब रयतेवरील बोजा कमी होईल ही जनतेची अपेक्षा अंशानें सुद्धां पुरी होऊं शकली नाहीं ही गोष्ट बरीक खरी.

युनिव्हर्सिटी बिलानें असा एक चमत्कार मुंबई कायदेमंडळांत दाखविला कीं, काळे, देशपांड्यांच्या सारख्या सरकार विरोधी पक्षांतील माणसांनीं तें बिल अनेक तऱ्हेनें दोषपूर्ण असूनही सरकारी सभासदांच्या बरोबरीनें उचलून धरलें. कारण इतकेंच कीं

विश्वविद्यालयासारख्या निर्लेप शिक्षणसंस्थेंतसुद्धां मुसलमानां-करतां विशेष हक्क राखून ठेवण्याची कारवाई त्यावेळीं चालू होती. आणि कोणत्याही जमातीला विशेष हक्क शिक्षण-संस्थांतून द्यावयाचे म्हणजे त्यांच्या पावित्र्याचें विडंबन व्हावयाचें. तें टाळण्यासाठीं सरकारशीं इतर समंजस सभासदांप्रमाणेंच काळे देशपांड्यांनीं सहकार केला. बाकी ‘ ये यथा मां प्रपद्यन्ते ’ हाच दंडक नेहमींचा.

देशपांड्यांच्या कामगिरीचा विचार करतांना सायमनकमिशनवरील बहिष्काराबाबत काळ्यांशीं संपूर्ण सहकार त्यांनीं केला. १९२६—२७ मध्यें झालेल्या सातारा जिल्ह्यांतील सारावाढीची फेरतपासणी त्यांनीं मागितली. फोटोरजिस्ट्रेशनला व तुकडेपट्टीबिलाला आटोकाट विरोध केला. फार काय, वीस मजूर ज्या शेतांत काम करीत असतील तेथील नियंत्रण फॅक्टरी ॲक्टसारखें करण्याचा अधिकार लोकलबोर्डाला देण्याची मोहनी सरकार टाकीत असतां, “ आजचा मालक शेतकरी पैरेकऱ्याच्या शेतांत काम करावयास उद्यां गेला म्हणून या परस्पर सहकारांत मालक-मजूर-प्रश्न कोठें उद्भवतो ? ” असा प्रश्न करून ती सहकारी मोहनी देशपांड्यांनीं हाणून पाडली. या शिवाय डिस्ट्रिक्ट म्युनिसिपॅलिटीज, लोकलबोर्ड्स व सिटी म्युनिसिपॅलिटीज ॲक्टसंबंधींच्या सिलेक्ट कमेटीवर काळ्यांचे बरोबर देशपांड्यांनीं काम केलें असून मुंबई कायदे-मंडळाच्या फिनॅन्स कमेटीवर त्याचप्रमाणें १९२९ मध्यें कायदेमंडळाचा प्रतिनिधी म्हणून सदर्न मराठा रेल्वेच्या सल्लागार मंडळावर ही देशपांड्यांनीं काम केलें.

या उप्परही पाटण, जावली तालुक्यांत होणारे टाटा कंपनीचें धरण लोकांच्या तक्रारींला पूर्ण अवसर देऊनच जेव्हां केव्हां व्हावयाचें तेव्हां होईल असें जें सरकारी उत्तर देशपांड्यांनीं मिळविलें, त्या प्रकरणाला आरंभ १९२६ चे मार्चमधील कौंसिलच्या बैठकींत प्रश्न विचारून भाऊसाहेब सोमणांनींच केला होता. १९२३ त स्वराज्य पक्षातर्फे निवडून आल्यावर त्यांनीं त्या त्रैवार्षिक कारकीर्दींत लँडरेव्हेन्यूकमेटीवर काम केलें आणि असा अभिप्राय व्यक्त केला कीं "उत्पन्नाच्या १७ ते ९० टक्केपर्यंत हल्लीं सारा झाला असून शेतकऱ्याच्या कुटुंबाचा खर्च व लागवडीचा खर्च हे दोंनही ठोकळ उत्पन्नांतून वजा जातां राहील तें निव्वळ उत्पन्न मानावें." हा शेतकऱ्यांसंबंधीं उघडा-उघड अन्यायावरचा तोडगा जसा सोमणांनीं सुचविला, तसाच त्यांच्यावर गुपचूप होणारा आघातही उघडकीस आणला. कोणी मरे पेन्‌मन् नांवाचा चहाच्या मळेवाल्यांचा हस्तक सातारा जिल्ह्यांत मुदतबंदांचे मजूर तीन महिने गोळा करीत (१९२५ च्या डिसेंबरपर्यंत) राहिल्याचा सरकारी जबाब १९२६ च्या मार्चमध्यें सोमणांनीं एका प्रश्नानें मिळवला.

सातारा जिल्ह्यांतील विशेषतः शिराळें भागांतील सरकारी जंगला शेजारील खाजगी पडजमिनींत असलेलीं झाडें सरकारी निरख देऊनही तोडण्याची परवानगी मिळत नव्हती, तेव्हां सोमणांच्या (आक्टोबर १९२४) प्रश्नानें तीं झाडेंच मालकांकडे सोंपविण्याचें काम झालें. १९२२ सालीं तयार झालेले कॅनॉलच्या पाण्याचे नियम सातारा जिल्ह्यांतील लहान कॅनॉलना लागूं करण्याचें कारण नसतांना ते लागूं करून

अधिकाऱ्यांनीं खटाव तालुक्यांत वसूलही केला होता. तेव्हां १३ आक्टोबर १९२४ रोजीं एका प्रश्नानें सोमणांनीं सरकार-कडून असें आश्वासन घेतलें कीं सातारा जिल्ह्यांतील कृष्णा-कॅनाल आदिकरून सहाही बारीक कॅनालांवरील ३१ डिसेंबर १९२५ अखेर बागायतदारांकडे १९२२ च्या कॅनॉल नियम ११ व १२ यांची अंमलबजावणी होणार नाहीं. आणि एवढ्या-वरच न थांबतां खटाव तालुक्यांतील लोकांना मुंबई सरकारचे दिवाणास भेटवून निष्कारण वसूल झालेले त्यांचे वीस हजार रुपये सरकारकडून सोमणांनीं परत देवविले. मग, लहान-लहान पाटबंधाऱ्यांबाबत ओढे कोरडे पडले तरी पाण्याचा कर भरावा लागे किंवा त्याची तरमांत जमा होऊन तशी वसुली होई, ह्या सर्व प्रकारास सोमणांनीं आळा घालविला, हें मुद्दाम सांगा-वयास नको. जिल्हासभेचेवेळीं मागणी केल्याप्रमाणें जिल्ह्याच्या कारभाराचें अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडून कायदे-मंडळाच्या सभासदांना तरी विकत मिळण्याची व्यवस्था सरकारी फर्मान निघून सोमणांच्या खटपटीनें झाली. याशिवाय लॅन्डरेव्हेन्यू कोडाच्या दुरुस्ती बिलावरील सिलेक्ट कमेटीवर व सिंध हिंदुमॅरेज बिलाच्या सिलेक्ट कमेटीवरही सोमणांनीं मर्मग्राही कामें केलीं आहेतच.

१९३५ च्या पहिल्या कौंसिल बैठकींत सोमणांनीं बाग-लाण कळवण मधील शेतकऱ्यांच्या दुःस्थितिसंबंधीं एका ठरावानें सरकारी खडकांत कोठें पाणी लागतें कां पाहिलें, शिराळे पेठ्यांतील गांवेंच्या गांवें पोस्टाच्या यत्किंचित सोयी-शिवाय सुधारलेल्या इंग्रजी राज्यांत असल्याचें सरकारी

तोंडांनीं जाहीर व्हावयास एका प्रश्नानें लावलें, आणि शेवटीं दुसऱ्या बैठकींत, फर्मानी कायद्यांच्या जोरावर सरकार इलाखाभर ठाण्या ठाण्याला ज्यांच्या विरुद्ध दाद मागण्याची सर्वथैव बंदी आहे असें "चिमणे हुकूमशहा" (पेट्टी गव्हर्नर्स) शांततेच्या काळांत अकारण निर्माण करून ठेवण्याचा आपला हट्ट सोडत नाहीं असें पाहिल्यावर सरकारच्या निषेधार्थ काळे प्रभृतींच्या बरोबर सोमण यांनींही "वॉक औट" केला.

फर्मानी कायद्यांच्या जोरावर शांतता-सुव्यवस्था राखल्याचा अभिमान कोणत्याही सरकारनें बाळगणें हें तत्त्वच घातुक असल्याकारणानें, सरकारच्या निषेधार्थ मेथा-गोखल्यांनीं तीन तपांपूर्वीच उदाहरण घालून दिल्याप्रमाणें आपण "वॉक औट" करणार असल्याचें, विरोधी पक्षाचे अध्वर्यु म्हणून अगाऊ बजावूनच काळे आपल्या तत्त्वांकित मित्रांसह कौंसिलांतून बाहेर पडले होते. कारण ऐन कायदेभंगाचे वेळीं देखील आरोपितांना न्याय मिळविण्याच्या वाटा बंद होणें काळ्यांस सर्वस्वी नापसंत होतें. आणि म्हणूनच १९३२ च्या सप्टेंबरांत, वटहुकुम मागें घ्यावें आणि १९३१ च्या फेब्रुवारींत सर्व राजबंद्यांना माफी देऊन मुक्त करावे, असे ठराव काळ्यांनीं घाडले व नैतिक विजय मिळवला. शिवाय १९३२ सालीं फर्माना कायदा मुंबई कौंसिलांत पास झाला त्यावेळीं काळ्यांनीं जोराचा विरोध केला होता. अशा तीनही वेळीं जिल्ह्याच्या प्रतिनिधींपैकीं एकट्या आचरेकरांशिवाय दुसरा कोणताही प्रतिनिधी काळ्यांना पाठिंबा देत नव्हता म्हणून जिल्ह्यांत सर्वत्र असमाधान होतें. १९२२ सालीं अशीच असमाधानाची स्थिती असतांना देखील, २८ जुलै रोजीं,

" राजकीय कैद्यांना पहिल्या प्रतीच्या गुन्हेगारांना इंग्लंडांत वागवणूक देण्यांत येते त्या प्रकारची इकडे देण्यांत यावी " या ठरावास जोराचा पाठिंबा देऊन " लोकमताचा सल्ला न घेतां आम्हीच आपल्या इच्छेप्रमाणें गोष्टी करूं अशा प्रकारच्या सरकारी अधिकाऱ्यांच्यां प्रवृत्ती-बद्दल " काळ्यांनीं नापसंती दाखविली.

तथापि " केवळ लोकहितावरच दृष्टी ठेवून लोकोपयोगी बाबी सरकारनें हातीं घेतल्यास शक्य तेव्हां त्यांच्याशीं सह-कार्य व न घेतल्यास जरूर तेथें त्यांना विरोध करून लोकहित साधणें " हें काळ्यांचें सामान्य धोरण. त्या धोरणाप्रमाणें काम करतांना प्रेसिडेन्सी एरिआ ( इमरजन्सी ) सिक्युरिटीबिल ( १९२९ ) तुकडेपट्टीबिल व मुंबई विश्वविद्यालय बिल ( १९२७ ), आणि लॅन्डरेव्हेन्यू कोड दुरुस्ती बिल, वतन अॅक्टाच्या दुरुस्तीचें बिल, डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड अॅक्टाच्या दुरुस्तीचें बिल व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचें बिल ( सर्व १९२० ते १९२३ ) या बाबतच्या सिलेक्ट कमेट्यांवर काळ्यांनीं प्रामुख्यानें कामें केलीं असून, १९२०-२३ च्या तिन्ही फिन्यान्स कमेट्या, व कौंसिल लायब्ररी कमेटी, मुसलमान वक्फ कमेटी आणि डिलिमिटेशन कमेटी ( १९३५ ) यांच्यावर ही काळ्यांनीं समर्थपणें कामें केलीं आहेत. त्याचप्रमाणें १९३१ सालीं सदर्न मराठा रेल्वे सल्लागार मण्डळावर त्यांची नेमणूक झाली होती.

काळ्यांचीं बजेटवरील भाषणें, " बिलांतील " व "ठरावांतील" खाचाखोंचा उलगडणारीं अन्वेषणें, आणि देशी वैद्यक, न्याय व अंमलबजावणी खात्यांची फारकत (१९२०-२३)

व प्राथमिक शिक्षणावरील २० टक्के कपात रद्द करणें (१९३२) असे त्यांचे महत्वाचे ठराव कायदेमंडळांत शांतपणें काम करूं इच्छिणारांसही प्रबोधक होतील. पण या सर्वांपेक्षा वारसा हक्कावरील करास विरोध ( १९३१ ), तुरुंगांत फटक्यांच्या शिक्षेस बंदी करण्याबद्दलचा आग्रह (१९२२-२३) आणि गोध्रयाच्या दंग्यांत वामनराव मुकादमासारख्या प्रतिष्ठितांच्या प्राणावर बेतण्याचा प्रसंग आला होता, त्या प्रकरणीं भीमभाई नाईकांबरोबर काळयांनीं लावलेला छडा यांनीं काळयांची कामगिरी जो उठाव घेउन बसली, त्याच्यावर काळयांच्या "सायमन कमिशनवर अविश्वास व्यक्त करून त्यांजशीं कौन्सिलनें कसलाही संबंध ठेवूं नये" या ठरावानें ( १९२८ ) कळस चढविला.

मुम्बई कायदे मण्डळा व्यतिरिक्त मॉंडफोर्ड सुधारणान्वयें आलेल्या दिल्ली-सिमल्यांच्या वरिष्ठ कायदेमण्डळांतही सरदार मुतालीक (१९२०-२३) व भास्करराव जाधव ( १९३०-३४ ) यांनीं आणि "कौन्सिल ऑफ स्टेट" मध्यें प्रो. काळयांची टॅरिफबोर्डावर नेमणूक झाल्यावर दादासाहेब करंदीकरांनीं ( १९२५ ) कामें केलीं आहेत. पैकीं करंदीकरांनींच "प्रकाश" पत्राला दिलेल्या मुलाखतींत म्हटल्याप्रमाणें कौन्सिल ऑफ स्टेट ही कांचेच्या घरांतील प्रेक्षणीय वस्तु असल्याकारणानें स्वराज्यपक्षाचा एकटा एकच पाठिराखा म्हणून दादासाहेबांनीं तेथील कामांत कीर्ति मिळवली आणि टॅरिफबोर्ड व ली कमिशन यांच्या संबंधींच्या टीकेनें सरकारी सभासदांना "आपण लोकनियुक्त मंडळांत तर बसलों नाहीं ना?" असा भ्रम उत्पन्न केला. वरिष्ठ

कायदेमंडळांत सरदार मुतालिक यांनीं आणीबाणीच्या प्रसंगीं लोकपक्षाची बाजू पुरस्कारून व सावरून धरली म्हणून लोकपक्षास विजय मिळत गेले ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. असेंब्लीचे प्रतिनिधी म्हणून मुतालिकांनीं १९२५-२६ सालीं आर्मी अकाउंट्स-कमेटीवर बिनसरकारी सभासद म्हणून व १९३२ सालीं प्रांतिक फ्रँचाइज कमेटीवर कामें केलीं आहेत. भास्करराव जाधवांनींही असेंब्लींतील मुदतींत फर्मानी कायद्यांना तीव्र विरोध करून लोकपक्षास पोषक अशी कामगिरी केली व राऊंड टेबल परिषदेस हजर राहण्याचाही मान मिळवला !

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. ........... नं. ...........
ता. ...........
ठाणे.



## प्रकरण ३ रें.

# संस्थानी---स्वराज्यांत

हिंदी राष्ट्रावर स्वातंत्र्याचा सूर्य प्रकाशत रहावा म्हणून खालसांतील लोक जितक्या तळमळीनें चळवळ करणार, तितक्याच तळमळीनें संस्थानांतील लोकांनाही करावीशी वाटते व ते करतात. कारण गतेतिहासाचे अवशेष म्हणून संस्थानिक असले तरी, त्या अभिमानास्पद अवशेषांनीं "राजा प्रजानुरंजनाद्" हें धोरण सोडलें. सातारा जिल्ह्यांत ब्रिटिश रियासतीला १८४८ पासून सुरवात झाली असें मानलें, तरी १८१८ त पेशवाईच्या अंताबरोबर प्रतिनिधी - पटवर्धन आणि कोल्हापूरकर हेही ब्रिटिशसरकारनें चारदोन वर्षांच्या अवधींत आवरले सावरले होतेच. तरीपण सार्वजनिकसभांच्या काळीं व छोट्या कांग्रेसा भरांत असे तों संस्थानिकांची सहानुभूति लोकचळवळींना असे, हें मागें येऊन गेलेंच आहे. या आपुलकीबद्दल खुद्द संस्थानिकांनाही त्रास कमी झाला नाहीं. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळीं कोल्हापुरच्या रिसाल्यानें थोडीशी जी गडबड केली . ती चिमासाहेबांच्या प्रोत्साहनानें केली अशा संशयानें चिमासाहेबांस कराचीस स्थानबद्ध होऊन रहावें लागलें. फार काय, पुण्यास टिळक प्रभृति लोक जी चळवळ करतात तिला करवीरकर शाहू महाराजांची सहानुभुती आहे आणि म्हणून त्यांनीं रेसिडेंट

मि. रे यांच्यावर बटलर फर्नांडिस याच्यामार्फत विषप्रयोग केला अशा संशयानें १८९८ सालीं कामही चाललें. त्यांत निष्पन्न कांहीं झालें नाहीं हा भाग निराळा; पण करवीर घराण्यावरील अशा प्रसंगावरून बाकीचे संस्थानिक आपआपल्या ठिकाणींच कसे चूर होऊन राहिले असतील आणि १८८९ पासून राष्ट्रीयसभेवर ब्रिटिश सरकारचा डोळा वक्र होऊं लागल्यावर त्यांनीं लोकांच्या चळवळीवरून १८९४ अखेर सहानुभूतींचे सर्व पदर कां काढून घेतले असतील याची कल्पना होईल.

तरी पण, "पुरुषाला आपली सदसद्विवेकबुद्धी, स्त्रीला आपलें पातिव्रत्य आणि राष्ट्राला आपलें स्वातंत्र्य यांच्या पलिकडे कांहींही प्रिय असत नाहीं." हे १९१२ सालीं कऱ्हाड येथें सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावरून तात्यासाहेब केळकरांनीं काढलेले उद्गार सार्थ नाहींत असें कोण म्हणेल? याच अंतरीच्या जाणीवेनें संस्थानांतील प्रजाजनांनीं कांहीं प्रयत्न केलेच. राष्ट्रीय उत्थापनाकरितां शिवाजी महाराजांचा उत्सव लोकमान्यांनीं पुण्यास सुरू केला. पण कोल्हापुरास शिवाजीच्या मार्गांनीं "स्वराज्य" मिळवावयाचे या हेतूनें १८९६-९७ सालीं शिवाजी-क्लब स्थापन झाला. मात्र, शिवाजीची राजनीतिकुशलता अगर 'धर्मासाठीं फकिरी' हें कांहींएक न अंगिकारतां, ग्रँटडफनें शिवाजीचे मार्ग सांगितले ते चोऱ्यादरवड्यांचे मार्ग ध्येयभूत मानून चालल्यामुळें दामू जोशीप्रभृती शिवाजी क्लबाचे चालक-क्लबासकट नेस्तनाबूद झाले.

दुसरा स्वातंत्र्याचा प्रयत्न म्हणजे १९०७-८ सालचा.

नाशिकच्या अभिनव-भारतसंस्थेच्या धर्तीवर उत्तमराव शेणोलीकर, बापट, वडणकर, पाडळकर, पाध्ये, परसू सुतार, गंगाधर गोखले अशा मण्डळींनीं बॉम्ब तयार करण्याच्या उद्देशानें शाळेच्या लॅबोरेटरींतून कांहीं असिडें लांबविलीं इतकेंच नव्हें तर बॉम्बचा प्रसार कसा करावा याबद्दल एक पत्रकही तयार केलें. अशा आरोपावरून वरील मण्डळीवर खटला झाला, पुण्यास त्याच वेळीं "बॉम्ब तयार" करणाऱ्या नागपूरकरांशीं त्या खटल्याचा संबंध लावण्यांत आला आणि भरीला दामू जोशीच त्या तरुणांचा नायक असें धरून त्यालाही खटल्यांत गोवण्यांत आलें. पण हे पुढचे धागेदोरे पुराव्यानें सर्वच तुटले व मूळ आरोपींपैकीं गोखले निर्दोषी सुटून, सेशन कोर्टानें बाकीच्या आरोपींस तीनतीन वर्षांच्या शिक्षा दिल्या.

पण याशिवायही सनदशीर, शांततामय आणि तड-जोडीच्या राजकारणाला साजतील अशाही चळवळी चालू होत्या. त्यांपैकीं स्वदेशीची चळवळ संस्थानांतून व खालसांतही श्रीपादशास्त्री देवधर व गणपतराव भुसारी करीत आल्याचा उल्लेख मागें येऊन गेलाच आहे. त्यांचीच परंपरा पुढें चालवून १९०० च्या तोंडाशीं आप्पासाहेब आळतेकर, रामभाऊ गोखले प्रभृतीमंडळीनीं आपल्या कोल्हापूर संस्थानांत प्रातिनिधिक सभा स्थापावी म्हणून चळवळ सुरू केली आणि प्रजापरिषदेचाही घाट घातला. त्याप्रमाणें १९०५ सालीं एक रयतसभा झालीही. ही मंडळी स्वदेशीच्या चळवळी-बरोबर पैसाफंडाचें प्रचारकार्यही करीत असत. तेव्हां ब्रिटिश अमलांत "लोकशाही स्वराज्य म्हणजे आकाशांतील चांदोबा

असे मोर्लेसाहेब म्हणण्यापूर्वीच प्रातिनिधिक कारभार संस्थानांत स्थापण्याची इच्छा करूं लागणें हा आत्यंतिक साहसाचा प्रकार वाटला असल्यास नवल काय ? या वाटण्याचा असा परिणाम झाला कीं आळतेकर गोखल्यांच्या चळवळींचा संबंध शिवाजी – क्लबाशीं व बॉंबप्रकरणाशीं लावण्याचा प्रयत्न होऊं लागला आणि परिणामीं आळतेकरांना कऱ्हाडास व रामभाऊ गोखल्यांना कोरेगांवास येऊन प्रपंचाचा गाडा व देशसेवेचें कार्य चालवावें लागलें.

पुढें १९१४ सालीं मंडलेच्या कारागृहांतून लोकमान्य सुटून येईपर्यंत सगळीकडेच सामान्यतः शांतता होती तशी संस्थानांतूनही होती. पण लोकमान्यांच्या होमरूल लीगच्या चळवळीनें ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळविणारच ' हा आत्मविश्वास जनतेंत उत्पन्न केल्याबरोबर सांगलीस के. रा. छापखाने, गो. रा. बिनीवाले व वा. रा. फडके प्रभृतींच्या युनियनक्लबनें हातपाय हलवावयास सुरवात केली आणि छापखान्यांनीं होमरूलच्या प्रचारासाठीं दौरे काढले, गणपतराव अभ्यंकरांनीं प्रांतिक परिषदांतून संस्थानी करभारांत प्रजेच्या प्रतिनिधींचाच हक्क असावा म्हणून ठराव आणण्यास सुरवात केली आणि कोल्हापुरांत वासुदेव बाळकृष्ण कुलकर्णी ( सागांवकर ) प्रभृतीमंडळींनीं कुलकर्णी असोसिएशन स्थापून संस्थानिकांच्या पिढीजाद राज्यावरील हक्काप्रमाणेंच कुलकर्ण्यांच्याही वतनाचा पिढीजाद हक्क कायम ठेवा म्हणून टाहो फोडला.

यापेक्षांही १९२० सालीं एका बाजूनें मॉंटफोर्ड सुधारणा

नाशिकच्या अभिनव-भारतसंस्थेच्या धर्तीवर उत्तमराव शेणोलीकर, बापट, वडणकर, पाडळकर, पाध्ये, परसू सुतार, गंगाधर गोखले अशा मण्डळींनीं बॉम्ब तयार करण्याच्या उद्देशानें शाळेच्या लॅबोरेटरींतून कांहीं आसिडें लांबविलीं इतकेंच नव्हें तर बॉम्बचा प्रसार कसा करावा याबद्दल एक पत्रकही तयार केलें. अशा आरोपावरून वरील मण्डळीवर खटला झाला, पुण्यास त्याच वेळीं "बॉम्ब तयार" करणाऱ्या नागपूरकरांशीं त्या खटल्याचा संबंध लावण्यांत आला आणि भरीला दामू जोशीच त्या तरुणांचा नायक असें धरून त्यालाही खटल्यांत गोवण्यांत आलें. पण हे पुढचे धागेदोरे पुराव्यानें सर्वच तुटले व मूळ आरोपींपैकीं गोखले निर्दोषी सुटून, सेशन कोर्टानें बाकीच्या आरोपींस तीनतीन वर्षांच्या शिक्षा दिल्या.

पण याशिवायही सनदशीर, शांततामय आणि तड-जोडीच्या राजकारणाला साजतील अशाही चळवळी चालू होत्या. त्यांपैकीं स्वदेशीची चळवळ संस्थानांतून व खालसांतही श्रीपादशास्त्री देवधर व गणपतराव भुसारी करीत आल्याचा उल्लेख मागें येऊन गेलाच आहे. त्यांचीच परंपरा पुढें चालवून १९०० च्या तोंडाशीं आप्पासाहेब आळतेकर, रामभाऊ गोखले प्रभृतीमंडळींनीं आपल्या कोल्हापूर संस्थानांत प्रातिनिधिक सभा स्थापावी म्हणून चळवळ सुरू केली आणि प्रजापरिषदेचाही घाट घातला. त्याप्रमाणें १९०५ सालीं एक रयतसभा झालीही. ही मंडळी स्वदेशीच्या चळवळी-बरोबर पैसाफंडाचें प्रचारकार्यही करीत असत. तेव्हां ब्रिटिश अमलांत "लोकशाही स्वराज्य म्हणजे आकाशांतील चांदोबा

असे मोर्लेसाहेब म्हणण्यापूर्वीच प्रातिनिधिक कारभार संस्थानांत स्थापण्याची इच्छा करूं लागणें हा आत्यंतिक साहसाचा प्रकार वाटला असल्यास नवल काय ? या वाटण्याचा असा परिणाम झाला कीं आळतेकर गोखल्यांच्या चळवळींचा संबंध शिवाजी – क्लबाशीं व बॉंबप्रकरणाशीं लावण्याचा प्रयत्न होऊं लागला आणि परिणामीं आळतेकरांना कऱ्हाडास व रामभाऊ गोखल्यांना कोरेगांवास येऊन प्रपंचाचा गाडा व देशसेवेचें कार्य चालवावें लागलें.

पुढें १९१४ सालीं मंडलेच्या कारागृहांतून लोकमान्य सुटून येईपर्यंत सगळीकडेच सामान्यतः शांतता होती तशी संस्थानांतूनही होती. पण लोकमान्यांच्या होमरूल लीगच्या चळवळीनें ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळविणारच ' हा आत्मविश्वास जनतेंत उत्पन्न केल्याबरोबर सांगलीस के. रा. छापखाने, गो. रा. बिनीवाले व वा. रा. फडके प्रभृतींच्या युनियनक्लबनें हातपाय हलवावयास सुरवात केली आणि छापखान्यांनीं होमरूलच्या प्रचारासाठीं दौरे काढले, गणपतराव अभ्यंकरांनीं प्रांतिक परिषदांतून संस्थानी करभारांत प्रजेच्या प्रतिनिधींचाच हक्क असावा म्हणून ठराव आणण्यास सुरवात केली आणि कोल्हापुरांत वासुदेव बाळकृष्ण कुलकर्णी ( सागांवकर ) प्रभृतीमंडळींनीं कुलकर्णी असोसिएशन स्थापून संस्थानिकांच्या पिढीजाद राज्यावरील हक्काप्रमाणेंच कुलकर्ण्यांच्याही वतनाचा पिढीजाद हक्क कायम ठेवा म्हणून टाहो फोडला.

यापेक्षांही १९२० सालीं एका बाजूनें मॉंटफोर्ड सुधारणा

आणि दुसऱ्या बाजूनें असहकार यांचीं किरणें खालसा मुलखांत्र चमकूं लागलीं असतां संस्थानी प्रजेनें स्वावलंबनाची चळवळ नेटास लावली. महात्मा गांधींचा दौरा सांगली, कोल्हापूर येथें झाला आणि ' यद्यत्परवशं दुःखं यद्यदात्मवशं सुखं " हा असहकाराचा महामंत्र महात्माजींनीं प्रचंड लोकसमुदायापुढें समजावून सांगितला.

तो संदेश घेऊन खादीचा प्रसार करण्याकरितां खादी भांडारें व चरखासंघ स्थापन झाले आणि त्या कार्याची धुरा कोल्हापुरास मेथे मास्तरांनीं मोठ्या नेटानें खांद्यावर घेतली. कोल्हापूरच्या विद्याविलासानें निर्भीडपणें महात्माजींचा स्वावलंबनसंदेश फैलावण्यास सुरवात केली, व त्या उपक्रमांत ता. २९ आक्टोबर १९२० चे अंकांत गळगतेकर यांच्या सहीनें एक पत्र कोल्हापूर संबंधीं छापलें. तेव्हां विद्याविलासच्या १९१८।१९।२० च्या फायली जप्त करण्यांत आल्या, ९०० रुपये जामीन व तितकाच जात मुचलका घेऊन संपादकांची कच्ची कैद सुटली तरी पुढें १९३ व १२४ खालीं दोन वर्षांची शिक्षाही झाली.

संस्थानी कारभारावर टीका केल्यामुळें विद्याविलासावर संस्थानी अधिकाऱ्यांनीं आपआपली अब्रू साफ करून घेण्याकरतां लहानमोठे आठएक खटले भरले होते आणि त्यांत संपादक गोखल्यांना लहानमोठ्या शिक्षाही आजवर झाल्या होत्या. पण स्वावलंबनाची शिकस्त म्हणजे संस्थानचा कारभार सर्वस्वी प्रजेच्या प्रतिनिधींच्या हातांत पाहिजे असें प्रतिपादन करीत राहिल्यामुळें, कांहींएक कारण न देतां, हंटर पत्राकडून ता. १७ सप्टेंबर १९३० रोजीं पांच हजारांचा

जबर जामीन मागितला आणि तें पत्र बंदच पडलें. सदर पत्राचे संपादक माधवराव बागल वाळवें तालुक्यांत येऊन खादीप्रसारासाठीं खेडोखेडीं हिंडतात व कायदेभंगाचा प्रचार करतात म्हणून हंटरच्या जामीनकीची आपत्ति त्यांच्यावर ओढवली असा त्यावेळीं एक लोकप्रवादही बराच प्रचलित होता. त्यांत कांहीं तथ्य असो नसो, ग्रामोद्धारापासून लोक-मतानुवर्ती सर्व राज्यकारभार चाललाच पाहिजे असें ब्रिटिश मुलखांतील मानाच्या सभांमधून प्रतिपादन करणारे संस्थानचे मालक स्वतांच्या संस्थानांत त्यांतलें कांहींच करीत नाहींत, अशी तक्रार करीत राहिल्याकारणानें 'हंटर' सारखेच सांगलीच्या विजयपत्रासही १९३४ सालीं बंद व्हावें लागलें. अन्यान्य कायदे मोडलेच पाहिजेत इतकी जनतेची मनोवृत्ति तयार झाली असतां जर वरील तऱ्हेचे प्रयोग होतात, तर १९०७-८ च्या त्या दहशतशाहीच्या काळांत विजापूरकरांनीं कोल्हापुरास चालविलेल्या विश्ववृत्त व समर्थ या मासिक साप्ताहिकांची काय अवस्था झाली असेल बरें ? जुलूमशहा एखाद्या छत्रपतीनें सुद्धां होऊं नये, अशा अर्थाचें एक वाक्य विजापूरकरांच्या नियतकालिकांतून येतांच तीं तर बंद पडलींच, पण स्वयंपूर्ण विद्यार्थी तयार करणारें विजापूरकरांचें समर्थ विद्यालयही कोल्हापुराहून हललें व पुढें बेकायदेशीर संस्था म्हणून बंदही पडलें.

स्वावलंबनाच्या चळवळीला असे आघात जरी संस्था-नांत बसत आले असले तरी लोकमात्र दबले नाहींत. ब्रिटिश मुलखांत जाऊन आपलीं दुःखें वेशीवर मांडण्यास सांगलीच्या विठ्ठलराव जोशांनीं व गणपतराव अभ्यंकरांनीं

सुरवात केली. त्याचाच परिणाम म्हणजे सातारा जिल्हासभे-पासून तों राष्ट्रीय सभेपर्यंत संस्थानी प्रजेला संस्थानच्या कारभारांत मोकळ्या मनानें बोलतां, हालतां व चढतां आलें पाहिजे असे ठराव झाले. अशा सहानुभूतीमुळेंच संस्थानी प्रजापरिषदांचा जन्म झाला व लोकांचा वाढता उत्साह, जागतिक इतिहासाचा लोकशाही कल, आणि पूर्वी महायुद्धाच्या अडचणी-मुळें तर आतां १९२१-२२ सालीं गाजविलेल्या जुलूमशाहीची जागतिक बेअब्रू होऊं नये म्हणून जबाबदार ब्रिटिश मुत्सद्यांनीं स्वराज्यदानाची हिंदुस्थानला दिलेलीं अश्वासनें यांचा एकमेळ परिणाम होऊन काळाच्या ओघांत सांपडलेल्या संस्थानिकांनीं प्रजापरिषदा संस्थानच्या हद्दींतही भरविण्यास परवानगी दिली. मिरज, कुरुंदवाड, भोर, सांगली, औंध या संस्थानांतून प्रजा-परिषदा बऱ्याच उशीरानें भरल्या आणि आतां त्याचें बीज रुजलें असलें तरी अजून त्याचें चीज झालेलें नाहा. नाहीं म्हणावयास १९२८ च्या सायमन कमिशनवराल बहिष्कारापासून १९३०-१९३४ कायदेभंगाअखेर खालसा मुलखांत झालेल्या चळवळींत आपल्या प्रजाजनांनीं प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष घेतलेला भाग पाहून, एकून आपलें परंपरेनें आलेलें आढ्यतेचें स्थान ढिलें झालें तरी ढळूं नये आणि साधल्यास तें दृढही करावें म्हणून आपल्या संस्थानांत लोकमत स्थापण्यास त्यांनीं सुरवात केली. कोल्हापूरनें इलाखा-पंचायत लोकमतानुवर्ती करून शिक्षण सोयी झपा-ट्यानें करीत राहण्याचा सपाटा चालविला. भोर, बुधगांव, सांगली, मिरज, औंध येथें प्रत्यक्ष लोकसभा स्थापल्या; इतकेंच नव्हे तर रा. ब. काळ्यांसारखे अध्यक्ष त्या सभांना लाभून दिले. मिरजेनें एकवेळ लोकपक्षातर्फें चळवळ करणाऱ्या

जोशांस दिवाण नेमले; आणि औंधनें तर संस्थानचे घटक स्वयंपूर्ण स्वावलंबी करण्याच्या दृष्टान " पैशांत परवडत नसेल तर हातानें कातलेल्या सुतांत सारा घेण्याची प्रथा पाडून " आणि शेवटीं लोकानियुक्त प्रतिनिधि लक्ष्मणराव किर्लोस्कर यांस मंत्री व लोकपक्षाचे वाग्भट देशपांडे यांस दिवाण ( १९३९ ) नेमून प्रजानुरंजनाचें श्रेय घेतलें.

असहकाराच्या जन्माबरोबर प्रो० फडक्यांच्या व्याख्यानामुळें सांगलीचें विलिंग्डन कॉलेज ' ओस पडलें, ' त्यावरून तरुण अंतःकरणांचा कल उमगून आला. आणि ह्या स्वावलंबनवृत्तीचा ध्वजा छापखाने-राजवाडे-बिनीवाले-मेथे-फडके प्रभृतींनीं लावला तसाच तो अव्याहत फडकत ठेवण्यासाठीं मिरजेचे पुंडलिकजी कातगडे गांधी-तत्त्वज्ञानाचे अखंड प्रचारक बनले. बाळकृष्ण विठ्ठल शिखऱ्यांनीं तर मिरजेंत अफाट वाढलेल्या सारावाढीविरुद्ध शेतकऱ्यांच्या कैवारानें अशी चळवळ केली कीं त्यांना कारागृहवास तर भोगावा लागलाच पण सरतेशेवटीं " फॉरेनर्स ॲक्टा खालीं " आपल्या जन्मभूमीला मुकावें लागलें. त्याच्या अगोदर १९२९ सालींच कांग्रेसची ध्वजा खांद्यावर घेऊन भरणाऱ्या तिसऱ्या जिल्हासभेचे स्वागताध्यक्ष होऊन सांगली गजानन मिलचे मालक विष्णुपंत वेलणकर यांनीं लिंब येथें एकप्रकारें खालसांतील व संस्थानांतील प्रजाजनांचे हितसंबंध एकसूत्रीं असल्याचेंच जाहीर केलें होतें. आणि तोच धागा पुढें ओढून १९३०-३४ च्या शांतिसंग्रामाला संस्थानी प्रजाजनांनीं तनमनधनानें हातभार लावला.

सदर शांतिसंग्रामाचा " श्रीमन् महागणाधिपतयेनमः "

औंधच्या पुरुषार्थाचे संपादक पंडित सातवळेकर यांनीं सातारा जिल्हासभेच्या अध्यक्षपदावरून असा केला कीं, "हिंदुस्थानच्या अफाट किनाऱ्यावर फुकट मिळणारें मीठ सुद्धां राजसत्तेनें महाग केलें आहे. जगांत आजपर्यंत कोणीही केलें नाहीं असें शांतिच्या क्रांतिचें कार्य मिठाच्या कायदेभंगाच्या रूपानें महात्माजींनीं सुरू केलें आहे. हे व्यापक दृष्टीचे जनहो, हे मित्रप्रवृत्तीचे लोकहो, तुम्ही व आम्ही सर्व मिळून विस्तृत व बहुतांकडून पालन केल्या जाणाऱ्या पूर्ण स्वराज्यासाठीं यत्न करूं या."

आणि जिल्हासभेच्या व्यासपीठावरून सातवळेकर उतरले ते जिल्ह्यांत अन्याय्य कायदे मोडण्याचा प्रचार करीतच हिंडू लागले. पण मे १९३० च्या पहिल्या आठवड्यांतच औंधसंस्थानानें त्यांना प्रचारकार्याची बंदी केली व मग पंडितजींनीं आपलें लक्ष औंधसंस्थानच्या ग्रामसंघटनेंत व लोकसभेच्या यशोमार्गांत घातलें.

तरी, संस्थानी मुलखांतील व विशेष म्हणजे सांगली व त्यापेक्षांही कोल्हापूर येथील तरुण साताऱ्याच्या शिबिरांत येऊन दाखल झाले, संस्थानांतून पैसाही येऊं लागला आणि रत्नागिरी, शिरोडें, विलेपार्लें वगैरे मीठसत्याग्रहाच्या केंद्रांतून माने, हविरे, बर्डेमास्तर वगैरे तरुणांनीं अप्रतिम कामगिरी केली. यांत विशेष म्हणजे कोल्हापूर कॉलेज मधील प्रोफेसरी सोडून सत्याग्रही म्हणून प्रो. मोहनलाल सातारा-शिबिरांत दाखल झाले हें डोळ्यांत भरण्यासारखें आहे. धारासन्यास सत्याग्रहींवर घोडे घालण्यांत आले तेव्हां मेथेमास्तरांच्या हाता-

खालील कोल्हटकरप्रभृति " कृष्णा कांठचा मराठा "च निभला. बाहेरील या चळवळीबरोबर मद्यपान निरोधन, खादीप्रसार, प्रभातफेऱ्या वगैरे कार्यक्रम संस्थानांत चालू होतेच. त्यांत विठ्ठलराव जोशी, वसगडेकर, साने, बंडोपंत बर्डे वगैरे सांगलीच्या व्यापारी-मंडळींनीं ठिकठिकाणच्या प्रभातफेऱ्यांचा मेळावा करून जवाहिरलाल-दिनादिवशीं काढलेली दहाहजार माणसांची खादी — पोशाखांतील प्रभातफेरी रोमांचकारी झाली. कोल्हापुरांत तर खादीप्रचारसंघ, स्वतंत्र चरखा संघ, करवीर इलाखा खादीसंघ, दरिद्रीनारायण संघ, खादीप्रदर्शन आणि खादीसंमेलन यांच्यातर्फे खादीचा प्रचार आजकालही चालू आहे. भरीला संस्थानीसप्ताह संस्थानामधून साजरे झाले आणि "स्वतांचा राज्यकारभार लोकांस स्वतांच्या मर्जीप्रमाणें चालवितां यावा, दैनिक जीवनक्रमातील लहानमोठे सर्व व्यवहार करतां यावे व आपणांवरील राज्यकारभार आपल्या सुखाकरतांच असा चालविला अशी शहरवासी व खेडवळ या सर्वांची खात्री पटावी असें स्वराज्य पाहिजे " असें जनतेच्या मनावर ठसविण्यांत आलें. अर्थातच सत्ता-प्रकोप आतां आपले चटके पाहिल्यापेक्षांही तीव्र करूं लागला आणि त्यांत " बेकायदेशीर " ठरलेल्या संस्थापैकीं मिरजेची कांग्रेस कमेटी १९३९ चा अखेर आला तरी बेकायदेशीरच राहिली आहे. मग ता. ५ आगष्ट १९३० रोजीं पं. मालवीय वगैरेंच्या अटकेबद्दल हरताळ पाडण्यासाठीं कोल्हापुरांत गंगा-वेशींत दुकानदारांस विनंती चालली असतां गुत्त्याजवळ गडबड झाली आणि सत्याग्रहींच्या अंगावर घोडे घालण्यांत

औंधच्या पुरुषार्थाचे संपादक पंडित सातवळेकर यांनी सातारा जिल्हासभेच्या अध्यक्षपदावरून असा केला कीं, "हिंदुस्थानच्या अफाट किनाऱ्यावर फुकट मिळणारें मीठ सुद्धां राजसत्तेनें महाग केलें आहे. जगांत आजपर्यंत कोणीही केलें नाहीं असें शांतिच्या क्रांतिचें कार्य मिठाच्या कायदेभंगाच्या रूपानें महात्माजींनीं सुरू केलें आहे. हे व्यापक दृष्टीचे जनहो, हे मित्रप्रवृत्तीचे लोकहो, तुम्ही व आम्ही सर्व मिळून विस्तृत व बहुतांकडून पालन केल्या जाणाऱ्या पूर्ण स्वराज्यासाठीं यत्न करूं या."

आणि जिल्हासभेच्या व्यासपीठावरून सातवळेकर उतरले ते जिल्ह्यांत अन्याय्य कायदे मोडण्याचा प्रचार करीतच हिंडू लागले. पण मे १९३० च्या पहिल्या आठवड्यांतच औंधसंस्थानानें त्यांना प्रचारकार्याची बंदी केली व मग पंडितजींनीं आपलें लक्ष औंधसंस्थानच्या ग्रामसंघटनेंत व लोकसभेच्या यशोमार्गांत घातलें.

तरी, संस्थानी मुलखांतील व विशेष म्हणजे सांगली व त्यापेक्षांही कोल्हापूर येथील तरुण साताऱ्च्या शिबिरांत येऊन दाखल झाले, संस्थानांतून पैसाही येऊं लागला आणि रत्नागिरी, शिरोडें, विलेपार्लें वगैरे मीठसत्याग्रहाच्या केंद्रांतून माने, हविरे, बर्डेमास्तर वगैरे तरुणांनीं अप्रतिम कामगिरी केली. यांत विशेष म्हणजे कोल्हापूर कॉलेज मधील प्रोफेसरी सोडून सत्याग्रही म्हणून प्रो. मोहनलाल सातारा-शिबिरांत दाखल झाले हें डोळ्यांत भरण्यासारखें आहे. धारासन्यास सत्याग्रहींवर घोडे घालण्यांत आले तेव्हां मेथेमास्तरांच्या हातः-

खालील कोल्हटकरप्रभृति " कृष्णा कांठचा मराठा "च निभला. बाहेरील या चळवळीबरोबर मद्यपान निरोधन, खादीप्रसार, प्रभातफेऱ्या वगैरे कार्यक्रम संस्थानांत चालू होतेच. त्यांत विठ्ठलराव जोशी, वसगडेकर, साने, बंडोपंत बर्डे वगैरे सांगलीच्या व्यापारी-मंडळींनीं ठिकाठिकाणच्या प्रभातफेऱ्यांचा मेळावा करून जवाहिरलाल-दिनादिवशीं काढलेली दहाहजार माणसांची खादी — पोशाखांतील प्रभातफेरी रोमांचकारी झाली. कोल्हापुरांत तर खादीप्रचारसंघ, स्वतंत्र चरखा संघ, करवीर इलाखा खादीसंघ, दरिद्रीनारायण संघ, खादीप्रदर्शन आणि खादीसंमेलन यांच्यातर्फे खादीचा प्रचार आजकालही चालू आहे. भरीला संस्थानीसप्ताह संस्थानामधून साजरे झाले आणि "स्वतांचा राज्यकारभार लोकांस स्वतांच्या मर्जीप्रमाणें चालवितां यावा, दैनिक जीवनक्रमांतील लहानमोठे सर्व व्यवहार करतां यावे व आपणांवरील राज्यकारभार आपल्या सुखाकरतांच असा चालविला अशी शहरवासी व खेडवळ या सर्वांची खात्री पटावी असें स्वराज्य पाहिजे" असें जनतेच्या मनावर ठसविण्यांत आलें. अर्थातच सत्ता-प्रकोप आतां आपले चटके पहिल्यापेक्षांही तीव्र करूं लागला आणि त्यांत " बेकायदेशीर " ठरलेल्या संस्थापैकीं मिरजेची कांग्रेस कमेटी १९३९ चा अखेर आला तरी बेकायदेशीरच राहिली आहे. मग ता. ५ आगष्ट १९३० रोजीं पं. मालवीय वगैरेंच्या अटकेबद्दल हरताळ पाडण्यासाठीं कोल्हापुरांत गंगा-वेशींत दुकानदारांस विनंती चालली असतां गुत्त्याजवळ गडबड झाली आणि सत्याग्रहींच्या अंगावर घोडे घालण्यांत

औंधच्या पुरुषार्थाचे संपादक पंडित सातवळेकर यांनीं सातारा जिल्हासभेच्या अध्यक्षपदावरून असा केला कीं, "हिंदुस्थानच्या अफाट किनाऱ्यावर फुकट मिळणारें मीठ सुद्धां राजसत्तेनें महाग केलें आहे. जगांत आजपर्यंत कोणीही केलें नाहीं असें शांतिच्या क्रांतिचें कार्य मिठाच्या कायदेभंगाच्या रूपानें महात्माजींनीं सुरू केलें आहे. हे व्यापक दृष्टीचे जनहो, हे मित्रप्रवृत्तीचे लोकहो, तुम्ही व आम्ही सर्व मिळून विस्तृत व बहुतांकडून पालन केल्या जाणाऱ्या पूर्ण स्वराज्यासाठीं यत्न करूं या."

आणि जिल्हासभेच्या व्यासपीठावरून सातवळेकर उतरले ते जिल्ह्यांत अन्याय्य क्रायदे मोडण्याचा प्रचार करीतच हिंडू लागले. पण मे १९३० च्या पहिल्या आठवड्यांतच औंधसंस्थानानें त्यांना प्रचारकार्याची बंदी केली व मग पंडितजींनीं आपलें लक्ष औंधसंस्थानच्या ग्रामसंघटनेंत व लोकसभेच्या यशोमार्गात घातलें.

तरी, संस्थानी मुलखांतील व विशेष म्हणजे सांगली व त्यापेक्षांही कोल्हापूर येथील तरुण साताराच्या शिबिरांत येऊन दाखल झाले, संस्थानांतून पैसाही येऊं लागला आणि रत्नागिरी, शिरोडें, विलेपार्लें वगैरे मीठसत्याग्रहाच्या केंद्रांतून माने, हविरे, बर्डेमास्तर वगैरे तरुणांनीं अप्रतिम कामगिरी केली. यांत विशेष म्हणजे कोल्हापूर कॉलेज मधील प्रोफेसरी सोडून सत्याग्रही म्हणून प्रो. मोहनलाल सातारा-शिबिरांत दाखल झाले हें डोळ्यांत भरण्यासारखें आहे. धारासन्यास सत्याग्रहींवर घोडे घालण्यांत आले तेव्हां मेथेमास्तरांच्या हाता-

खालील कोल्हटकरप्रभृति " कृष्णा कांठचा मराठा "च निभला. बाहेरील या चळवळीबरोबर मद्यपान निरोधन, खादीप्रसार, प्रभातफेऱ्या वगैरे कार्यक्रम संस्थानांत चालू होतेच. त्यांत विठ्ठलराव जोशी, वसगडेकर, साने, बंडोपंत बर्डे वगैरे सांगलीच्या व्यापारी-मंडळींनीं ठिकाठिकाणच्या प्रभातफेऱ्यांचा मेळावा करून जवाहिरलाल-दिनादिवशीं काढलेली दहाहजार माणसांची खादी — पोशाखांतील प्रभातफेरी रोमांचकारी झाली. कोल्हापुरांत तर खादीप्रचारसंघ, स्वतंत्र चरखा संघ, करवीर इलाखा खादीसंघ, दरिद्रीनारायण संघ, खादीप्रदर्शन आणि खादीसंमेलन यांच्यातर्फे खादीचा प्रचार आजकालही चालू आहे. शिवाय संस्थानीसप्ताह संस्थानामधून साजरे झाले आणि "स्वतांचा राज्यकारभार लोकांस स्वतांच्या मर्जीप्रमाणें चालवितां यावा, दैनिक जीवनक्रमांतील लहानमोठे सर्व व्यवहार करतां यावे व आपणांवरील राज्यकारभार आपल्या सुखाकरतांच असा चालविला अशी शहरवासी व खेडवळ या सर्वांची खात्री पटावी असें स्वराज्य पाहिजे " असें जनतेच्या मनावर ठसविण्यांत आलें. अर्थातच सत्ता-प्रकोप आतां आपले चटके पाहिल्यापेक्षांही तीव्र करूं लागला आणि त्यांत " बेकायदेशीर " ठरलेल्या संस्थांपैकीं मिरजेची कांग्रेस कमेटी १९३९ चा अखेर आला तरी बेकायदेशीरच राहिली आहे. मग ता. ५ आगष्ट १९३० रोजीं पं. मालवीय वगैरेंच्या अटकेबद्दल हरताळ पाडण्यासाठीं कोल्हापुरांत गंगा-वेशींत दुकानदारांस विनंती चालली असतां गुत्त्याजवळ गडबड झाली आणि सत्याग्रहींच्या अंगावर घोडे घालण्यांत

आले अगर ता. ६ आक्टोबर १९३० रोजीं प्रभातफेऱ्या व झेंडावंदनाला बंदी होऊन तडकाफडकीं माने यास शिक्षा झाली यांत काय नवल ?

लोक अशा तऱ्हेनें आपलें उग्रतेज दाखवीत असतांना जनता-जनार्दनाची आराधना करण्याऐवजीं संस्थानांकडून होअर सुधारणांमध्यें फेडरेशनची पद्धति आली तरी संस्थानिकांचें स्थान अचल रहावें अशी जोराची खटपट झाली. तिला तोंड देऊन फेडरेशनच्या हिंदी पार्लमेंटांत ब्रिटिश प्रजाजनांच्या प्रतिनिधींबरोबर संस्थानी प्रजाजनांचे प्रतिनिधी बसले पाहिजेत म्हणून गणपतराव अभ्यंकरांनीं खुद्द इंग्लंडांत व हिंदुस्थानांत जीवापाड प्रयत्न केला. पण त्याला अपयश आलें तसा परावलंबी उपायांवरील तरुणांचा होता नव्हता तो सर्वच विश्वास उडाला.

अर्थातच १९३०-३१ चे पहिल्या शांतिसंग्रामांत कोल्हापूचे १६६ व सांगलीचे ३० असे सत्याग्रही तुरुंगवास भोगून जसे आले, त्याच हिय्यानें १९३२-३४ च्या शतिसंग्रामातही संस्थानांनीं आपआपल्या परी भाग घेतला. याबाबतींत नमूद करण्यासारखें एकच उदाहरण दिलें म्हणजे बस्स होईल. मेथे मास्तर व धर्माधिकारीप्रभृती त्यांचे मित्र यांना चळवळींत भाग घेण्याची बंदी करण्यांत आल्यामुळें, ही मंडळी वर्ध्याच्या आश्रमांत गेल्यावर नागपूरकडील सत्याग्रहांत त्यांना कारागृहवास घडला. तसेच कित्येक छोटे मोठे मेथे—धर्माधिकारी सर्वच संस्थानांतून जिल्ह्यांत व अन्यत्र पावन झाले.

आणि शांतिसंग्रामांत कोल्हापूरच्या तरुणांनीं विशेष धडाडीनें भाग घेतल्यामुळें कीं काय, ता. ४ जुलै १९३६

रोजीं म्हणजे राष्ट्रीयसभा पूर्ण सनदशीर मार्गाचा अवलंब करूं लागल्यावरही करवीर सरकारांनीं जादा गॅझीट काढून एकंदर राजकीय चळवळीलाच आपल्या सत्तेचा पूर्ण विराम घातला !!

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. ३ नं. ७९१
ता.
ठाणे.

## समालोचन.

ब्रिटिशहद्दींत काय किंवा संस्थानांत काय, आज सर्व वातावरण शांत झालें असून राष्ट्रसभेपासून सर्व राजकीय संस्था प्रामुख्येंकरून सनदशीर मार्गाचा अवलंब करीत आहेत. मग ब्रिटिश नोकरशाही वटहुकूम जारी करो कीं संस्थानांतून त्या वटहुकमांच्या नकला होवोत ! ब्रिटिश रियासतीच्या प्रारंभीं नवीन राज्य शिस्तीचें, घड्याळाच्या काट्यासारखें, म्हणून तें ‘ रामराज्य ’ वाटलें आणि एकोणिसाव्या शतकाच्या साठीसत्तरीला त्या घड्याळाच्या काट्याची टिक् टिक् कान किटवू लागली तरी राज्यकर्त्यांच्या उदारमनस्कतेवर मदार ठेवून वैयक्तिक व क्वचित् सामुदायिक अर्ज होऊं लागले. सातारा जिल्ह्यानें १८५२ सालींच पूर्ण दारूबंदी व्हावी म्हणून एक अर्ज केल्याचा दाखला मिळतो. पण अशा तुटक व तुरळक प्रयत्नांला १८७१ पासून ‘ सार्वजनिक सभांच्या ’ द्वारा संघटित स्वरूप येऊं लागलें, आणि स्वदेशी व लवादकोर्टें वगैरे स्वावलंबनाच्या चळवळींची मेहनत

मशागत झाली. १८८९ पासून म्हणजे राष्ट्रीयसभेच्या स्थापनेनंतर राष्ट्रीयसभेच्या छोट्या आवृत्त्या तालुकानिहाय निघावयास सुरवात होऊन एकपरी राष्ट्रीय सभेचा संदेश खेड्यापाड्यांतील घराघरापर्यंत पोंचवावा. आणि उलट दुसरेपरी आपल्या स्थानिक दुःखांना वाचा फोडून त्यांतील जो भाग राष्ट्रव्यापी सुखदुःखांच्या दृढभाजकास उपयोगी पडेल तो राष्ट्रसभेपर्यंत पोंचवावा असा उपक्रम झाला. या छोट्या कांग्रेसांत १८९३ मधील वाळव्याची छोटी कांग्रेस राष्ट्रीयसभेचे जनक ह्यूमसाहेब यांनाही थक्क करण्यासारखी झाली. छोट्या कांग्रेसांचें चक्र १८९७ त मंद होऊं लागलें आणि प्लेग, दुष्काळ व अनुषंगिक आपत्ति यांनीं त्रासलेल्या सातारा जिल्ह्यानें ग्रामसंघटनेच्या तत्त्वावर शेतकरी सभा केल्या आणि १९०० सालची मुम्बई -प्रांतिक- परिषद भरवून लॉर्ड सँढर्स्टच्या कारकीर्दीतील लोकमतविन्मुख धोरणाच्या धिक्कारानें येऊं पाहणारा लोकपक्षांतील वांधा टाळून सांधा जुळवला. पुढें वंगभंगामुळें कलकत्त्यास १९०६ सालीं लोकमान्यप्रणित स्वराज्याची चतुःसूत्री राष्ट्रीयसभेनें पास केल्यावर, त्याच सभेच्या ठरावान्वयें १९०७ जूनमध्यें साताराजिल्हासभा स्थापन झाली आणि ती सातत्यानें आजपर्यंत काम करीत आली असून राष्ट्रीय आंदोलनांत ज्या लाटा आल्या त्यांची शक्य तोंवर कड लावण्याची कामगिरी जिल्हासभेनें केली आहे.

सुरतेच्या राष्ट्रीयसभेनंतर राष्ट्रीयसभेंत मवाळ-जहाल असे पक्षभेद पडले आणि पुढें नाशकास १९०९ सालीं जॅक्सनसाहेबांचा खून झाला त्यामुळें, स्वदेशीसारख्या

व्रताचा अंगिकार-पुरस्कार १९०४ सालापासून केलेला सातारा जिल्हा संशयग्रस्त नोकरशाहीच्या तडाक्यांत संकटग्रस्त झाला. तरीपण स्वदेशी चळवळीनें जें स्वावलंबनाचें तेज विकसविलें तें कांहीं काळ मंद झालें तरी लुप्त होतांच कामा नये इतक्या दक्षतेनें जिल्ह्यांतील जहाल-मवाळ वागले, राष्ट्रीय सभेंतील मवाळजहालांनीं एकी करून राष्ट्रीय प्रगति मार्गाला लावावी असा सातत्यानें पाठपुरावा केला आणि १९१४ ची प्रांतिक परिषद यशस्वी करून राष्ट्रीयसभेंतील एकीचा पाया घातला.

लोकमान्य मंडलेहून सुटून आल्यावर या एकीच्या प्रयत्नाला बाळसें आलें आणि होमरूलची चळवळ सुरू झाली. महायुद्धांत गुंतलेल्या इंग्लंडला पैशा-पुरुषांचें सहाय्य करून आपल्या स्वराज्याच्या मागणीचा ठेका सोडावयाचा नाहीं असा तो काल होता. आणि स्वावलंबनशास्त्राची ही प्रगति असल्याकारणानें सातारा जिल्ह्यांतील बाळाजी दामोदर हसबनीसांनीं होमरूलसाठीं आपली एक मिळकत अर्पण केली, एवढी आठवण ठेवली म्हणजे लोकमान्यप्रणीत स्वराज्य-संघाची चळवळ सातारा जिल्ह्यानें केवढ्या आस्थेनें केली याची बरोबर कल्पना येईल.

'उजाडलें पण सूर्य कोठें आहे ? असें लोकमान्यांच्या लेखणींतून प्रश्नचिन्ह उतरविणाऱ्या मॉटफोर्ड सुधारणा हिंदुस्थानांत अवतरल्या आणि त्याचवेळीं जालियनवाला-बाग प्रकरणांतील हिंदुस्थानवरील अन्यायाचें परिमार्जन नोकरशाही करीना म्हणून १९२० सालीं महात्माजींच्या असहकाराचा अवतार झाला. असहकाराची परिणती अन्याय्य कायदे मोडण्यांत झाल्यावर ५ मार्च १९३१ रोजीं इर्विन-गांधी-करार

झाला आणि त्यांत राष्ट्रीय सभेला हिंदुस्थानसरकाच्या बरोबरीनें मान मिळाल्यामुळें १८९३ सालीं वाळ्याच्या छोट्या कांग्रेसमध्यें ह्यूमसाहेबांनीं काढलल "कांग्रेस हें दुसरें सरकार आहे असें" उद्गार सार्थ असल्याचें सातारा जिल्ह्याला पटलें तथापि त्याची अंधुक जाणीव आणि स्वावलंबनाचा निश्चित विकास असहकारांत असल्यामुळें सातारा जिल्ह्यानें १९२० पासूनच तें व्रत पतकरिलें आणि यावच्छक्य आचरूनही दाखविलें. १९२१ च्या साताराजिल्हासभेच्या अध्यक्षांनीं म्हटल्याप्रमाणें "कांग्रेसनें सर्व वर्गाच्या कायद्यांचें समतेच्या तत्त्वावरील स्वराज्य मिळविण्याचें ध्येय पत्करिलें आहे ...... परराष्ट्रांशीं आपला संबंध काय शर्तीवर असावा हें ठरविण्याचा अधिकार हिंदुस्थानाला हवा आहे; आणि यालाच जर निर्भेळ स्वातंत्र्य म्हणावयाचे असेल तर तसें स्वातंत्र्य कांग्रेसला पाहिजे आहे. हिंदुस्थान हा साम्राज्याचा घटक रहावा-असें असेल तर हिंदुस्थानला मोकळ्या मनानें भागीदारी मिळाली पाहिजे." हीच स्वावलंबनसहकाराची आकांक्षा सातारा जिल्ह्याची होती आणि असहकाराचें तत्त्व त्या आकांक्षेच्या परिपूर्तिला कारण होईल म्हणूनच जिल्ह्यानें त्याचा अवलंब केला.

पण त्यायोगें दुसरी एक आपत्ति आली. ती म्हणजे प्रागतिक बाजूला सरले तर राष्ट्रीयांतील ज्यांचा असहकाराच्या तपशीलाबद्दल मतभेद होता, ते तेवढ्यापुरते उदासीन राहिले. राष्ट्रीय सभेच्या अभिमान्यांत असे पक्ष उत्पन्न होण्याचें कारण म्हणजे राष्ट्रीय सभेचा सभासद व्हावयास

"सुताची वर्गणी" आणि जेथून कायदे होऊन त्यांचा पुढें अंमल होतो तीं कायदे-मण्डळें बहिष्कृत होतीं, हेंच मुख्यत: होय. याबाबत खुद्द कांग्रेसमध्येंच स्वराज्यपक्ष स्थापन झाला आणि सातारा जिल्ह्यांत त्या पक्षाच्या उमेदवारालाच पहिल्या प्रतीचीं मतें १९२३ चे निवडणुकींत मिळालीं. तशी १९२९ सालीं प्रांतिक परिषद साताऱ्यास भरून राष्ट्रीय सभानुयायांची एकी झाली. त्यानंतर कायदेभंगाच्या पहिल्या मोहिमेंत आणि दुसऱ्या स्वाभिमानसंरक्षणकार्यांत, फार काय, त्यानंतरच्या सनदशीर चळवळींतही सातारा जिल्हा महाराष्ट्रांत मागें बिलकूल पडला नाहीं याचें कारण स्वावलंबनाविकासक्षम पण ऐक्यपोषक अशी सातारा जिल्ह्याची मनोवृत्तीच होय. ता. १० आक्टोबर १९०८ च्या प्रतोदनें म्हटल्याप्रमाणें "लोक समंजस असल्यामुळें विकारवश होण्यापेक्षां विचारवश होऊन तडजोडीनें जीं काय थोडीं कामें करावयाचीं तीं करतात." त्यामुळें मतभेदामुळें बाजूला सरलेले प्रागतिक असोत, कौन्सिल-प्रवेशवादी राष्ट्रीय असोत, संपूर्ण असहकारवाले समाजसत्ता-वादी असोत, अगर नेटस ब्राह्मणेतरांचे कैवारी असोत, सर्वजण दुसऱ्याचा तेजोभंग न करण्याची काळजी घेतात आणि आपआपल्या निश्चित क्षेत्रांत होईल तेवढी उत्कृष्ट कामगिरी कर-ण्याचा प्रयत्न करतात. त्यायोगें कोठेंकोठें दिसणाऱ्या व्यक्तिस्वा-र्थाच्या थोड्याशा जळवा दुर्लक्षित केल्या तर बहुतेक सर्वांचें असेंच मत आहे कीं "जोहार व दान याला स्वावलंबी, स्वाभिमानी माणसें व राष्ट्रें किंमत देत नसतात....स्वातंत्र्य हें मिळवावयाचें असतें. तें मिळविण्याच्या प्रयत्नांत आज दान

उलटें पडलें आहे. अर्थात् आपण किती जरी 'माघार' घेतलीं तरी कोठें तरी एका रेषेवर उभें रहावें म्हणजे शत्रुसुद्धां पाठलाग करण्यास दबकेल. सिंह भुकेला व त्रस्त झाला तरी गवत खाणार नाहीं......... सध्यांचा काळ संघटनेचा आहे. स्त्रियांना पातिव्रत्य व पुरुषांना पराक्रम हे गुण बहुमोल आहेत. त्याचप्रमाणें गांवांनीं राव होण्यांत महत्त्व आहे. गोपुराच्या सोन्याच्या कळसाइतकेंच खालील दगडांना महत्त्व असतें. हें जाणून समाजांतील सारा देणाऱ्या व मजुरी करणाऱ्या शेतकऱ्यांत सुद्धां चैतन्य निर्माण करून सर्वांच्या सहकार्यानें स्वराज्याचा लढा लढला पाहिजे" (जिल्हा सभा १९३४ अध्यक्ष)

याच दृष्टीनें काँग्रेसच्या आजच्या कार्यक्रमाशीं कांहीं मतभेद असणारे समाजसत्तावादी अगर लोकशाही पक्षाचे लोक स्वतंत्र कार्यक्रम अथवा जुन्या मार्गाची उजळणी सुचवित आहेत. नव्या कार्यक्रमाची उभारणी नेहमींच जुन्या मार्गांतून उत्क्रांत झाली तर ती झेपावयाला जड जात नाहीं आणि दमछाट करीत नाहीं. त्यायोगें निश्चित प्रगति होते. या गोष्टीवर नजर देऊन भारतीय अभ्युदयासाठीं सातारा जिल्ह्यानें प्रारंभापासूनच खटपटी केल्या होत्या. त्यांतील जिल्हा-सभेचा व १९३०-३४ च्या शांतिसंग्रामाचा स्वतंत्र इतिहास लिहिला तरी होण्यासारखा व शोभण्यासारखा आहे.

'इति'हासाच्या स्वराज्यविषयक भागासंबंधीं जसा वरील तऱ्हेनें अभिमान बाळगतां येतो तसाच थोडाफार स्वदेशीसंबंधानेंही बाळगण्यासारखी स्थिति आहे. कापडाच्या

बाबतींत खादीची निपज स्वतंत्र व मोठ्या प्रमाणावर कोठें झाली नसली तरी देशी कापडाच्या बाबतींत कोल्हापूरच्या शाहूमिल्स, सांगलीची गजाननमिल, आणि कऱ्हाडचे फडके टेक्स्टाईल अॅन्ड इंडस्ट्रियल वर्क्सचा उल्लेख केला पाहिजे. परिपूर्ण स्वदेशी या दृष्टीनें सातारा-कोल्हापूरचीं खादीभांडारेंच अभिमानस्पद आहेत. पण दुय्यम स्वदेशी या नात्यानें वरील कारखान्यांना महत्व आहे हें नाकबूल करून चालणार नाहीं. या दृष्टीनेंच ओगल्यांच्या कांच-कंदीलांचा कारखाना, किर्लोस्करांचा लोखंडी कारखाना, समर्थपूरचें डेक्कन इंडस्ट्रियल वर्क्स, कूपर इंजिनियरिंग वर्क्स, कराड येथील गाजी आगपेट्यांचा कारखाना व अंधळी येथील भिडे कार्डबोर्ड मॅच वर्क्स, कोल्हापूरचा साखरेचा कारखाना, ओगलेवाडी-कराडचे वॉशेक्स व माणिक सोपवर्क्स, आणि उंब्रजचे राष्ट्रीय कला-भुवन यांचा विकास लक्षांत आणला तर स्वदेशीच्या बाबतींत सातारा जिल्हा आघाडीला नसला तरीं पिछाडीला खास नाहीं. प्रसंगाप्रसंगानें भर दिला तशी बहिष्काराची चळवळ सातारा जिल्ह्यांत प्रभावी झाली. आणि शक्य तेवढ्या "परकीय"त्वावरील बहिष्काराची मनोवृत्ती तयार झाली. तरीपण बहिष्कारानें निखालस व निश्चित धर धरल्याचें अगर धर केल्याचें कोठें आढळत नाहीं.

आर्थिक दृष्ट्या विचार करतां वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे खालोखाल को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचा विचार केला पाहिजे. समाजांतील तळच्या समाजापासून सर्वांना काटकसरीची राहणी व निष्कर्जीपणा प्राप्त व्हावा

म्हणून गोपाळराव देधवरांनीं १९१६ च्या सुमारास सातारा जिल्ह्यांत कोऑपरेटिव्ह सोसायट्या स्थापन व्हाव्या म्हणून अतिशय खटपट केली व तिला यश येऊन प्रॉव्हिंशिअल बँकेच्या शाखा जिल्ह्यांत ठिकठिकाणीं निघाल्या. बाबूराव पेडकर, धोंडजी पाटील, केशवराव विचारे, पांडुरंगराव आढाव, राजाज्ञा हे त्यांतील तज्ज्ञ म्हणून जिल्ह्यांत पुढें सरसावले आणि आतां शेतकरी ऋणमोचन-बँक ही स्थापन झाली आहे. पण यापेक्षां शेतकऱ्यांच्या खऱ्या सुधारणेसाठीं तालुकानिहाय शेतकीसुधारणासंघ स्थापन झाले असून प्रदर्शनें वगैरे मार्गांनीं शेतकऱ्यांचें उत्पन्न वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न चाललेला असतो. आढावांनीं सरकारी सारावसूलीचीं तत्त्वें चुकीचीं असल्याबद्दल गांवोगांव पत्रकें काढून १९२०-२३ चे कौन्सिल अमदानींत चळवळ केली होती, पण फारसा उपयोग झाला नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट होय.

याशिवाय, शेतकरी-जीवनाला व त्याचप्रमाणें समाजाच्या जीवनाला उपयुक्त होणारें म्हणजे चौंडेमहाराजांचें गोरक्षणकार्य होय. वाईची गोवर्धनसंस्था आणि तिच्या ठिकठिकाणच्या शाखा याबाबतींत उत्कृष्ट कार्य करीत असून पाटणच्या कंटकांनीं गुरांच्या जोपासनेविषयीं साताराजिल्ह्याचा आंकडेवार अहवालच तयार केला आहे.

याच्या बरोबरच प्रत्यक्ष शारीरिक शिक्षणाच्या बाबतींत, शाळांशाळांतील तालीम मास्तरांव्यतिरिक्त मसूरच्या ब्रह्मचर्याश्रमानें, सातारा-तासगांव येथील गजानन व्यायामशाळांचे चालक गणपतराव साठे व आबासाहेब जोग यांनीं, व सांगलीचे वैद्य परांजपे आणि औंधचे बाळासाहेब पंतप्रतिनिधि

यांनीं परिश्रमपूर्वक पद्धतशीर कार्यें केलीं असून मिरज, तासगांव – सातारा येथील सामनामंडळांनींही विशेष प्रयत्नांस उत्तेजन दिलें आहे.

बौद्धिक-शिक्षणाचा विचार करतां, जिल्ह्यांत आज एकाहत्तर हजार विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेत असून' त्यां-पैकीं साडेबाराहजार मुली आहेत. बहुजनसमाजाच्या प्रतिनि-धींच्या हातांत समाजाचीं सर्व अधिकारसूत्रें हवींत असें प्रतिपादून स्थानिक-स्वराज्यांत शिरणाऱ्या ब्राह्मणेतरांनीं डॉ. परांजप्यांच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचा भरपूर फायदा जिल्ह्यास करून घेण्याचें मनावर घेतलें आणि म्हणूनच काळाच्या प्रगतीबरोबर १९२९ सालीं फक्त साडेचव्वेचाळीस हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते त्याचे आतां एकाहत्तर हजार झाले आहेत. याच मानानें दुय्यम शिक्षणाची वाढ होऊन कूपवाडास विलिंग्डन कॉलेजही चालत आहे. अशातऱ्हेच्या सरकारी, निमसरकारी संस्था-व्यतिरिक्त भाऊराव पायगौंडा पाटलांचें शाहू-बोर्डिंग-हौस हें सध्यां, स्वस्त व स्वावलंबी आणि संमिश्र राहणीचें शिक्षणगृह असून हरिजनांची बौद्धिक सेवा त्यानें केली आहे. याशिवाय सरकारमान्य शिक्षण देणाऱ्या सातारा, वाई, सांगली येथील कन्याशाळा व कोल्हापूरचें विद्यापीठ याशिक्षण संस्थां आपआपल्यापरी उत्कृष्ट कामगिरी करीत आहेत.

या शैक्षणिक कामागिरीचा थोडाफार उपयोग राष्ट्राला होत असला तरी खरें खणखणीत असें राष्ट्रीय-शिक्षणाचें नाणें म्हणून वाईच्या प्राज्ञपाठशाळेकडे आणि विशेषता साता-ऱ्याच्या टिळक राष्ट्रीय विद्यालयाकडे बोट दाखवतां येईल.

राष्ट्रीय-शिक्षण घेतलेला तरुण स्वाभिमानी, स्वावलंबी, शूर व राष्ट्रासाठीं तळहातावर शिर घेण्याइतका त्यागी निघाला पाहिजे, ही अपेक्षा असते. १९३०-३४ च्या लढ्यांत या दोनही संस्थांच्या चालकांप्रमाणेच विद्यार्थ्यांनीं वरील कसाला उतरून दाखविलें आहे. तथापि प्राज्ञपाठशाळेचें कार्य धर्मवलयांकित असून संस्थेचे उत्पादक नारायणशास्त्री मराठ्यांनीं सुरू केलेलें धर्मकोशाचें काम पुरें झाल्यावर त्या संस्थेचा इष्ट कार्यप्रकर्ष होणार आहे. साताराच्या टिळकराष्ट्रीय-विद्यालयानें आपल्या तेजस्वी कार्याचे जोरावर एकं तपाच्या आंतच " मुहूर्तं ज्वलितं श्रेयः " हें वचन सार्थ करून दाखविलें आहे. म्हणूनच ही त्याची कामगिरी पाहिल्यावर इमारती, शिक्षणसाधनें व चालू खर्च यांच्यासाठीं राष्ट्रीय विद्यालयानें आपण आनंदानें दिलेले सुमारें ४९ हजार रुपये बारा वर्षांत खर्चून संपूर्ण शिक्षणक्रम झालेले सुमारें ९० स्वावलंबी व तेजस्वी विद्यार्थी तयार केले याबद्दल जनतेस अभिमानच वाटतो.

तथापि राष्ट्रीय भावनेचा दूधसागर जिल्ह्यातील माणसा-माणसागणिक ज्यायोगें उचंबळून राहील तेंच टिकावूं व भरीव असें राष्ट्रीय-शिक्षण. आपल्या कीर्तनांतून तें सामुदायिक पद्धतीनें देण्याचा उद्योग डॉ. दत्तोपंत पटवर्धनांनीं आजवर सारखा दोनअडीच तपें केला. पण त्यापेक्षांही घरटीं जाऊन समाजाच्या तळच्या माणसांच्याही सुखदुःखांची चौकशी करून, त्यांला आर्थिक, सामाजिक, बौद्धिक, औद्योगिक व राजकीय दृष्ट्याही स्वावलंबनानें आणि स्वयंपूर्णतेनें परिस्थिती समजून घेऊन आपलें प्राप्त कर्तव्य राष्ट्रीय दृष्टया कसें करावें,

याचें शिक्षण परचुरे शास्त्र्यांनीं सातारा ग्रामसेवासंघातर्फे काम करून दिलें आणि त्या मार्गानें जाणारासाठीं प्राथमिक पुस्तक म्हणून "खेड्यांतील यात्रा" हें पुस्तकही प्रसिद्ध केलें. पण दुर्दैव जिल्ह्याचें कीं जवाहिरलाल नेहरूंनींही गौरविलेला हा राष्ट्रीय-शिक्षक आज विकलांग झाल्यामुळें तो कुटुंबास, समाजास व जिल्ह्यासही अंतरला आहे.

याशिवाय तीनही प्रांतिक परिषदांच्या बरोबर भरलेल्या सामाजिक प्रांतिक परिषदा व १९१२ सालासारखी क्वचित् एकादी भरलेली जिल्हा सामाजिक परिषद, स्वदेशींचीं व औद्योगिक प्रदर्शनें यांचा संकलित चित्रपट व त्या पाठीमागील मनोवृत्तींचें विश्लेषण आमोरासमोर असल्याशिवाय जिल्ह्याच्या राजकीय रेखाचित्राच्या गुणदोषांचा बिनचूक हिशोब व ताळेबंद होणार नाहीं. आतां, इतिहासाच्या कारखान्यांतील खतावणीपैकीं एक खातें पुरें केल्यासारखें वाटलें, तरी ऑस्टनसारख्या कडक न्यायाधिशाची अन्याय्य भाषा आपल्या सचोटीनें चालविलेल्या वकीलीच्या धंद्यासंबंधीं आल्याबरोबर तेथून तडक निघून येऊन ऑस्टनसाहेबांनीं दिलगिरी प्रदर्शित केल्यावरच ज्या बळवंतराव सहस्रबुद्ध्यांनीं ऑस्टनसाहेबांच्या कोर्टांत पुन्हां पाऊल टाकलें ते बळवंतराव सहस्रबुद्धे स्वतांच्या मृत्युपर्यन्त दादासाहेब करंदीकरांच्या "सर्व कार्यांत समरस आणि स्फूर्तिचे ठिकाणीं असत हें सांगितल्याशिवाय" सातारा जिल्ह्याच्या राजकीय खात्यापुरतें देखील चिकित्सक व सूक्ष्म हिशोबतपासनीसाचें समाधान नाहीं. खरें; पण प्रत्येक बाबीची अशी तपशीलवार फोड व्हावयास स्थल काल--साधनें तरी, पुरेशीं कोठें आहेत ?

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. ........ नं.

तात्पर्य बहुजनसमाजाच्या हितसंबंधाचें संगोपन करून राष्ट्रीय अभ्युत्थानासाठीं झालेल्या सातारा जिल्ह्यांतील सर्व उत्पटींत असे कितीतरी सुपुत्र व सुकन्या आहेत कीं, ज्यांची शांतपणें व निरलसपणें केलेली कामगिरी नमूद करावयास इतिहास असमर्थ आहे; कार्लाईल म्हणतो त्याप्रमाणें इतिहास थोरांच्या चरित्रांचा झालेला असतो खरा, पण हे थोर लोक बऱ्यावाईट तऱ्हेनें लोकांच्यापुढें आलेले असतात. म्हणूनच सेनापती व " व्हिक्टोरिया क्रॉसवाले " सैनिक आणि मुत्सद्दी व त्यांचे उलाढाले हस्तक यांचीं नांवें व कामगिरी इतिहास पाठ म्हणत असतो. आणि इतिहासानें पाठ म्हटलेलीं नांवें प्रातिनिधिक असतात असें जें म्हणण्यांत येतें तें एवढ्यासाठींच. म्हणून राष्ट्रांतील एका नेपोलियनचें अगर एका शिवाजीचें नांव ज्यावेळीं इतिहास घेतो, त्यावेळीं त्या राष्ट्रांत आपआपल्या विवक्षित क्षेत्रांतील किती तरी अप्रसिद्ध नेपोलियन व अप्रसिद्ध शिवाजी नांदतात असें मानण्याची चिकित्सकांची चाल आहे. कारण खरें पाहिलें असतां अशा छोट्या व अप्रसिद्ध शिवाजी नेपोलियनांच्या प्रसिद्धिनिरपेक्ष कामागिरींतूनच राष्ट्रीय उत्कर्षाचा धवलगिरी उंचावत असतो.

ठिकाठिकाणच्या अशा सामर्थ्यवन्तांना संघटित करावें, त्यांचें कार्य शक्य तोंवर उजेडांत आणावें ( कारण प्रसिद्धी हें एक नवीन शक्ति निर्माण करण्याचें स्फूर्तिसाधन ठरतें. ) आणि कोपऱ्यांतल्या खेडेगांवापासून जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणापर्यंत सार्वजनिक चळवळींची शास्त्रशुद्ध साखळी अशी जोडावी कीं तिच्या जोरावर भारतीय स्वातंत्र्याविषयीं जागृत

४३७४

असलेला सातारा जिल्हा राष्ट्रीय तेजोवर्धनाला निर्धारानें सहाय्यक व्हावा. या हेतूनें एक संस्था काढण्याविषयीं वडगांवच्या जिल्हासभेपासून महिन्यामहिन्याला कार्यकारी मंडळाच्या सभांतून चर्चा होतां होतां मसूर परिषदेंत त्या अर्थाचा ठराव झाला, आणि त्या ठरावाला आतां मूर्त-स्वरूप देण्याच्या विचारात आज जिल्ह्यांतील सन्माननीय राष्ट्रसेवक आहेत. कारण, शिस्त आणि संघटनेशिवाय शहाण-पणाचा उपयोग होत नाहीं. टिळकांचा फोटो युनियन क्लबांत असे तों अगर 'परदेशी साखर अशुद्ध असल्याच्या जाहिराती व्हिक्टोरिया लायब्ररीवर लागल्या' म्हणून त्या संस्थांचे सभासद राहण्याचें एकजात सर्व युरोपियनांनीं १९०९-१० च्या काळांत नाकारण्यांत देखील जी मार्मिक संघटना व शिस्त दाखविली त्यापासून बरोबर धडा सातारा जिल्हा घेईल तरच कांहीं चिरस्थायी स्वरुपाचें कार्य जिल्हा करूं शकेल अशी सर्वत्र समजूत आढळते. तशी शिस्त व संघटना आली तर राजेंद्रबाबूंनीं गंतूर येथें (ता. १३ नव्हेंबर १९३९) म्हटल्याप्रमाणें "देशासाठीं जगून आयुष्याचा प्रत्येक क्षण देशसेवेकडे खर्च करणें हा आत्यंतिक त्याग" थोड्या तरी महाभागांना आचारतां येईल.

---

मुद्रकः— भाग २ **विष्णु रामकृष्ण ढवळे** यानीं न्यायाधीश छापखाना सातारा येथें छापलें.
बाकीची सर्व छपाई **विनायक शंकर वैद्य** आनंद प्रेस, सातारा यानीं केली.
प्रकाशकः— **पुरुषोत्तम पांडुरंग गोखले.** कऱ्हाड.

# जरूरच तेवढें शुद्धीकरण

| भा० पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ ६ | ९ व १६ | रिसायत | रियासत |
| ४४ | १४ | तांबेकारकून | ताबेकारकून |
| ६९ | १० | १९०६ | १९०७ |
| ७४ | २४ | विष्णु | विश्वनाथ |
| ७६ | ७ | सरकार | सहकार |
| ८९ | १६ | ती | वकीली |
| १०३ | २२ | अधिक | अधिक गांवचे |
| ११२ | ४ | राजाभाऊ | रामभाऊ |
| | ७ | आपल्या | डॉ आठल्ये |
| १२३ | १९ | गोदूबाई | गोदूबाई दामलयां |
| १४८ | १९ | तालुका | तालुका शेतकरी |
| १५५ | १३ | २० वा | १० वा |
| २ ८ | ९ | बघातापापासून | बद्यातापापासून |
| १६ | १ | मानण्यांत | मानण्यांत येऊन |
| २३ | ६ | हिंगे | इंगळे |
| २६ | ५ | चमहायुद्धांत | पण महायुद्धांत |
| ३८ | ९ | तयार | बडवे तयार |
| | ,, | तसा | तेव्हां साठे तसा |
| ३९ | १ | मुदत | मुदत १. डिसेंबरलाच |
| ४९ | ३४ तें मोठें विचारप्रवर्तक म्हणाले | | |
| ४६ | २१ | चा २५० वा | चा २५ वा |
| ५४ | १३ | मुक्तता | युक्तता. |
| ३ ८ | १७ | होऊन | समरस होऊन. |
| २७ | १९ | सहकारी | सरकारी |

सातत्यानें भरली ८ जिल्हा सभांची रूपरेखा १० राष्ट्रीय आकांक्षांची कांग्रेसनिष्ठ वाढ १२ शेतकऱ्यांची प्रामुख्यानें कळकळ १५ इतर हितसंबंध १६ जिल्ह्यापुरती मध्यवर्ती राष्ट्रीय संस्थेची योजना १९

प्रकरण २ रें:--कायदेमंडळांत -१९११ पासून १९३५ पर्यंत सातारचे कौन्सिलांतील प्रतिनिधी २१ लोकपक्षीय प्रतिनिधींची कार्यपद्धति २३ दादासाहेबांची कामगिरी २४ भास्करराव जाधवांचें काम २५ नानासाहेब देशपांडयांचें काम २७ भाऊसाहेब सोमणांची कामगिरी २९ रा. ब. काळे यांची कामगिरी ३१ बडया कौन्सिलांतील काम ३२

प्रकरण ३ रें:—संस्थानी स्वराज्यांत—संस्थानिकांची लोकचळवळीला सहानुभूति ३४ शिवाजीक्लब, अभिनवभारतसंस्थेची नक्कल ३५ स्वदेशी चळवळ ३६ होमरूल चळवळ ३७ खादीप्रसार, वृत्तपत्रांवरील खटले ३८ ब्रिटिश मुलखांत व संस्थानांत संस्थानीं प्रजेची चळवळ ३९ चळवळयांचे भोग ४१ कायदेभंगांतील कामगिरी ४२ संस्थानिक व प्रजेचे पुढारी ४४

समालोचन:- स्वराज्यविषयक चळवळ ४५. स्वदेशी बहिष्कार ५० सहकारीं चळवळ ५१ गोरक्षण, शिक्षण – शारीरिक, बौद्धिक ५२. राष्ट्रीय शिक्षण ५३. इतिहासाचा अपुरेपणा ५४. संघटित व शिस्तीची संस्था ५६–५७.

चित्रें:-- राव० लिमये, नानासाहेब वैद्य, ३२ दादासाहेब करंदीकर, बळवंतराव सहस्रबुद्धे, दादाभाई नौरोजी ४८ लोकमान्य टिळक, ७२ न्यायमूर्ति रानडे ८० महात्मा गांधी १२८ रा. ब. पाठक, ग. ब. फणसळकर, ना. गोखले, भाग ३ पान ९

जिल्हा सभांचा तक्ता ( भाग ३ पृ. २ )

---

प्रकरण २ रें

# जुन्यांतून नव्याकडे —

छत्रपतींच्या घराण्याबद्दल जनतेला प्रेम वाटतें, याचें कारण महाराष्ट्रांचे संस्थापक शिवाजी महाराज यांनीं " धर्मासाठीं आह्मी घेतली फकिरी " ह्मणून जो बाणा धरला तोच पुण्यश्लोक बाणा जरी प्रतापसिंह महाराजांना राज्य गमवावें लागलें तरी छत्रपतीघराण्यांत कायम आहे. या बाण्या-मुळेंच छत्रपतींचा उत्सव महाराष्ट्रीय अंतःकरणांतून होत असतो. " इंग्रज नव्हेत, कारण इंग्रज हे पुराणवस्तुसंशोधक व संरक्षक आहेत; पण दुसरे कोणी चोर हिंदुस्थानांत आले तर कदाचित् रायगडावरील दगडांच्या छातीचें तुझें सिंहासन सुरुंग लावून ते फोडतील; तेव्हां अढळ असें सिंहासन मी तुला देतें, आणि तें ह्मणजे महाराष्ट्राच्या हृदयाचें सिंहासन होय, असें देवी भवानी शिवाजीराजांना ह्मणाली. काळकर्ते परां-जप्यांचे १९२४ सालीं सातारा येथील ग. व्या. शाळेच्या गणपत्यु-त्सवांत व्याख्यान झाल्यावर संदेशकार कोल्हटकरांनीं जे वरील उद्गार काढले ते छत्रपतींच्या बाण्यानें महाराष्ट्रीय अंतःकरणांत उत्पन्न केलेल्या कृतज्ञतेचे बोल आहेत, हें कोण नाकबूल करील ? या कृतज्ञतेच्या जाणीवेंतूनच लोकमान्य टिळकांनीं शिवाजीमहाराजांचा उत्सव सालोसाल करण्यास शिकविलें, आणि साताराजिल्ह्यांत तो उत्सव प्रेमानें साजरा झाला, इतकेंच नव्हे, तर इतिहाससंशोधकांच्या धुमश्चक्रीमुळें त्रिशतसांवत्सरिक शिवजन्मोत्सव १९२७ व १९३० अशा दोन सालीं आले

असतां दोनही वेळीं सातारा जिल्ह्यानें तो उत्सव सारख्याच जिव्हाळ्यानें साजरा केला. १९३० सालीं सदर उत्सव आणि महात्माजीनीं स्वातंत्र्यमार्गावरील कायदेभंगाची जी मोहीम सुरू केली ती एकासुमारासच झाल्याकारणानें महाराष्ट्रांतील इतर भागाप्रमाणेंच शिवाजी महाराजांचें नांव घेऊनच सातारा जिल्ह्यांतील लोकांनीं सदर चळवळींत भाग घेतला. अशा तऱ्हेची उत्कट भक्ति असल्याकारणानें छत्रपतींची निंदा साताऱ्यास सहन झाली नाहीं तर नवल कसलें? १९२७ सालीं 'पेशवा' या हसननिजामीच्या दिल्ली येथील पत्रांत आणि १९३९ सालीं कानडी इतिहासाच्या पुस्तकांत (१९२९ पासून) शिवाजीमहाराजांबद्दल निरर्गल प्रलाप येतांच त्यांचा तीव्रतम निषेध करण्यांत आला.

काळ पालटला तशी परिस्थिति, लोकांच्या आकांक्षा, अपेक्षा व मार्ग पालटले, हें खरें. पण राज्याच स्वरूप कोणतेंहि असलें तरी महाराष्ट्राला आनंदवनभुवन करून सोडणाऱ्या छत्रपतींच्या राज्यासारखेंच तें राज्य "देवाचें आणि धर्माचें" असलें ह्मणजे झालें, हा कटाक्षच छत्रपतींच्या प्रेमाची संततधार राखण्यांत आहे. ब्रिटिश रियासतीच्या आरंभीं नवें राज्य ह्मणजे "ईश्वरी प्रसाद" असें बहुजनसमाजाला आणि अधिकारलोलुप पांढरपेशा वर्गाला वाटलें ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. इंग्रजी विद्या, इंग्रजी सुधारणा यांची धुंदी अशी तीव्र होती कीं गेलेल्या स्वराज्यापेक्षां आलेलें परराज्य हेंच खरें "छत्रपतींचें रामराज्य" असें लोकांना वाटें. "राजा कालस्य कारणम्" या न्यायानें "एतिकेता"चा ह्मणजे इंग्रजी चालचलणुकींचा कित्ता सही उचलण्यांत व देवीमदिरेच्या कृपाप्रसादानें पुनीत होऊन गटार-

उपड्या घड्यावरील पाण्याप्रमाणेंच झाला.

" नेटिव्ह मॅजिस्ट्रेट ज्युरिस्डिक्शन बिलाचा विचार " ता. १७ जून १८८३ रोजीं आगट्यांच्या वाड्यांत सुमंत, नातू, करंदीकर वगैरे वीस सभासदांनीं करून सहस्त्रबुध्दे व पांडु-रंगराव देसाई यांच्या चिकित्सेनें पुणें सार्वजनिक सभेच्या मागणी प्रमाणें एक मेमोरिअल पाठविण्यांत आलें. एवढी एक ठळक गोष्ट नमूद करून " सार्वजानिक सभां " विषयीं एक साधारण विधान करतां येईल कीं नानासाहेब वैद्यांचे देखरेखी-खालीं वाईची सभा जितकी कार्यकर्ती होती, तितकी कोणतीच नव्हती. रस्त्यावरील म्युनिसिपल कचऱ्यापासून तों थट प्युनिटिव्ह पोलीसपर्यंत सर्व बाबींत वाई सार्वजानिक सभेनें अतिशय जागरूकता दाखविल्याचे तिच्या दप्तरावरून कळतें. महाबळेश्वरास जाणाऱ्या गव्हर्नरांस जातांयेतां केव्हांतरी गांठून मानपत्राच्या निमित्तानें आपलीं गाऱ्हाणीं सरकारच्या वेशीवर टांगण्याचा त्या सभेचा जणुं शिरस्ताच दिसतो. तोंच कित्ता पुढें सातारा म्युनिसिपालिटीनें उचललेला आढळतो. या व अशा प्रयत्नांचा परिणाम आतांच काय, पण त्यावेळीं देखील फारसा दृग्गोचर नव्हता. पण पायांतील दगडांना चिखलांत तोंड खुपसून जमीनीच्या खालींच गडप होऊन रहावें लागते ना ? अशा सर्व खटाटोपांनीं एक गोष्ट सुतराम् साधली आणि ती म्हणजे विचारजागृति या जागृतिच्याच. जोरावर १८८९ सालीं " सावराष्ट्रीक कॉन्स्फरन्स " ऊर्फ राष्ट्रीय सभा जेव्हां होऊं घातली तेव्हां तिच्यापुढें ठेवण्याची महत्त्वाची गोष्ट म्हणून ता. २१ डिसेंबरचें वाई येथील

वृत्तसार पत्र नमूद करतें कीं " विलायतेंत इंग्लंड, स्कॉट्लंड, आयर्लंड या प्रांतांतून पार्लमेंटसभेमध्यें जसे मेंबर पाठविले जातात त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या तर्फेनें कांहीं मेंबर पाठविण्यास आम्हांस अधिकार मिळावा " असें आपलें मागणें पार्लमेंट-सभेपुढे ठेवलेंच पाहिजे.

---

## प्रकरण ४ थें

# छोटी कॉंग्रेस.

ता. २८ डिसेंबर १८८५ रोजीं, पुण्यास अडचण उत्पन्न झाल्यामुळें मुंबापुरीस राष्ट्रीय सभेचा जन्म झाला. त्या पहिल्या वाहिल्या सभेला सातारा जिल्ह्यांतून कोणी हजर असल्याचें आढळत नाहीं. तथापि अखिल भारताचें एकमुखी मागणें जगापुढें मांडण्याकरतां, किंबहुना भारतवर्षानें आपलें सार्वजानिक सामर्थ्य व मतप्रदर्शन करावें आणि धर्म व पंथ यांचा विचार न करतां लहान मोठ्या सर्व दर्जांच्या लोकांना आपल्या संपूर्ण व स्वयंपूर्ण वाढीसाठीं क्षेत्र निर्माण करावें, अशा रोखानें राष्ट्रीय सभेचा दृष्टीकोन आहे, असें पटतांच, दादासाहेब करंदीकर हे तिचे एकनिष्ठ " वारकरी " झाले आणि त्यांनीं हें व्रत एकनिष्ठपणें १९२९ अखेर अव्याहत चालविलें होतें. दादासाहेबांच्या बरोबरीनेंच ज्यांचीं नांवें कॉंग्रेस निष्ठेविषयीं नमूद करावीं लागतील अशी परंपरा चढत्या